# काश्मीर वर्णन.

3/८४

No. 14 of 1897-98 ~~५९४२~~

3/28 Recd 23-8-97.

Presented to

The Secretary to the

Deccan Vernacular Society

Poona by the author with

best compliments.

Miraj
22nd August 1897.

3/८४

# काश्मीर वर्णन.

हें पुस्तक

## रामचंद्र भिकाजी गोखले

यांनीं लिहिलें

तें

**मुंबईमध्यें,**

"तत्वविवेचक" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९९ इसवी.

( या पुस्तकाचे सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविले आहेत. )

**किंमत १२ आणे.**

हें

लहान पुस्तक,

नामदार श्रीमंत रा. रा. बाळासाहेब

कुरुंदवाडकर यांस त्यांच्या स्तुत्य

गुणांकरितां ग्रंथ कर्त्यानें त्यांच्या

परवानगीनें परम आदर

व कृतज्ञता पूर्वक अर्पण

केलें असे.

# प्रस्तावना.

काश्मीर देशाच्या वर्णनाविषयीं आह्मीं पांच सहा इंग्रजी ग्रंथ वाचिले. त्या सर्वांत या देशास भूस्वर्ग असें नांव दिलेलें पाहून त्याच्या दर्शनाचा लाभ आपण एकवार तरी करून घ्यावा ह्मणून इच्छा उत्पन्न जाहली, ती पांच सात वर्षें मनांत घोळत होती. पण आमच्या वयाच्या अशक्तपणामुळें व प्रंपचांतील प्रेमबंधनामुळें ती अगदीं शिथिल जाहली होती. तत्रापि आमच्या बलवत्तर दुर्दैवानें उपट खाऊन तें बंधन तोडिलें आणि आह्मांस घरांतून बाहेर ओढून काढून ती शेवटास नेवविली. असो.

हा देश पंजाबच्या ईशान्येस आहे व यास भूस्वर्ग ह्मणतात, एवढें पुष्कळ लोकांस माहित आहे. याहून विशेष माहिती असणाऱ्या लोकांची संख्या फारच थोडी सांपडेल. याचें मुख्य कारण मराठी भाषेंत या विषयावर ग्रंथांची उणीव असें आह्मांस वाटतें. अलीकडे हा देश पाहून आलेल्या एक दोन गृहस्थांनीं मासिक पुस्तकांत व सप्ताहिक वर्तमानपत्रांत या देशाविषयीं चित्तवेधक अशी बरीच माहिती दिली आहे, पण साद्यंत व संगतवार ज्यांत वर्णन मिळेल असा ग्रंथ आमचे तरी पाहण्यांत आलेला नाहीं. या विषयावर इंग्रजी भाषेंत बरेच ग्रंथ आहेत, पण शुद्ध प्राकृत भाषा जाणणारांस त्यांचा काय उपयोग? ही उणीव अंशतः तरी दूर व्हावी व आपल्या जन्मभाषेची कांहीं सेवाही घडावी असा विचार मनांत आणून, हें लहानसें पुस्तक तयार करून प्रिय वाचकांस नजर केलें आहे.

याचा ते हंसदुग्धन्यायानें स्वीकार करतील अशी आशा आहे. हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं आह्मीं जे ग्रंथ वाचिले त्यांत **डा० डब्ल्यु. हंटर, जे. कोलेट** व **डा० जे. ड्यूक** यांच्या ग्रंथांचा आह्मांस फार उपयोग जाहला, करितां त्यांचे व आमचे स्नेही **वे० शा० सं० रा० रा० विष्णु शास्त्री देवधर** यांनीं सर्व राजतरंगिणी ग्रंथ आह्मांस समजून सांगितला, याजकरितां त्यांचे व **वे० शा० सं० रा० रा० वामन शास्त्री पंडित इस्लामपुरकर** यांनीं ऐतिहासिक भाग सुधारण्याच्या कामीं योग्य सूचना दिल्या त्याजकरितां त्यांचेही आह्मीं फार आभारी आहों. आतां एक गोष्ट सांगून हा प्रस्तावनालेख पुरा करितों. या पुस्तकास एक लहानसा नकाशा जोडावा असा आमचा विचार होता. पण तसें केलें असतां खर्च विशेष येऊन पुस्तकाची किंमत जादा ठेवावी लागणार व ती अधिक ठेविली असतां आश्रयदात्यांची संख्या कमी होणार, असें पाहून तो बेत आह्मीं रहित केला.

**मिरज,**
ता. १ नवंबर १८९५.

**रा. भि. गोखले,**
ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ महत्व ............ | १ |
| २ काश्मीर राज्याचा विस्तार ............ | ७ |
| ३ देशांत जाण्याचे मार्ग. | ८ |
| ४ मार्गक्रमण ......... | १३ |
| ५ हवापाणी ......... | ३३ |
| ६ पर्वत ............... | ३५ |
| ७ नद्या ............... | ३७ |
| ८ सरोवरें ............ | ३९ |
| ९ देखावे ............ | ४४ |
| १० जमीन ............ | ४८ |
| ११ उद्भिज ............ | ५० |
| १२ द्राक्ष ............... | ५३ |
| १३ केशर ............ | ५४ |
| १४ खनिज ............ | ५८ |
| १५ पशु व पक्षी ...... | ५९ |
| १६ मृग ............... | ६१ |
| १७ बकरे व मेंढे ...... | ६३ |
| १८ शिकार ............ | ६५ |
| १९ शाली ............ | ६७ |
| २० लोक ............ | ७१ |
| २१ धर्म ............... | ७४ |
| २२ श्रीनगर ............ | ७७ |
| २३ जम्मू ............ | ९० |
| २४ श्रीनगर येथील धंदे. | ९१ |
| २५ प्रसिद्ध बगीचे ...... | ९४ |
| २६ बाहेरील स्थलें ...... | ९८ |
| २७ दरे व खिंडी ...... | १०९ |
| २८ धरणीकंप ......... | ११० |
| २९ पोटजहागिरदार ... | ११२ |
| ३० राज्यकारभार ...... | ११७ |
| ३१ सांप्रत स्थिति ...... | १२० |
| ३२ प्रत्यागमन ......... | १२७ |
| ३३ इतिहास ............ | १३५ |

# काश्मीर वर्णन.

## महत्व.

जगांतील सर्व प्राण्यांचा व्यवहार मुख्यत्वें सुखप्राप्तीच्या आशेनें चालला आहे. या सुखांत मानसिक व शारीरिक असे दोन भेद आहेत. या दोहोंचा अति निकट संबंध आहे. त्यांत पहिल्या प्रकारचें सुख पुष्कळ अंशीं दुसऱ्यावर अवलंबून राहतें आणि हें दुसऱ्या जातीचें सुख शरीरसंपत्तीस व इंद्रियांस सुख देणारे पदार्थ यांच्या योगानें प्राप्त होतें. या संबंधानें पाहिलें असतां काश्मीर देशास भूस्वर्ग असें जें विद्वान् लोकांनीं नांव दिलें आहे तें अगदीं यथार्थ आहे, असें पुढील वर्णनावरून लक्षांत येईल. तसेंच कोणत्याही देशांतील लोकांच्या सुखास तेथील हवा आणि पाणी हीं आद्य कारणें आहेत, असें एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे. या देशांतील हवा मोकळी, शीतल व आरोग्यकारक असून पाणी तर पर्वतांच्या गगनचुंबित शिखरांवरील बर्फ वितळून तें ओहोळरूपानें खालीं येत असल्याकारणानें अत्यंत थंड, स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व अमृतासारखें गोड असून तें लोहमिश्रत असल्यामुळें मोठें पाचक व पौष्टिक आहे. या हवापाण्याचे संबंधानें **ए० वुइलसन्** नांवाचे गृहस्थ आपल्या ग्रंथांत असें ह्मणतात कीं, कोणी मरण्यास टेंकलेलें माणूस या भूस्वर्गीं वसंतऋतूंत जाऊन राहील तर त्याच्या प्रकृतीसही निःसंशय आराम पडून तो पूर्ववत्

सशक्त होईल. हें त्यांचें ह्मणणें अगदीं खरें आहे, अशी आमचेंच मन व प्रकृति साक्ष देतात. तसेंच हिमाचलांत लहान मोठे दुसरे अनेक दरे आहेत. पण त्या सर्वांत यासच भूस्वर्ग हें पद प्राप्त होण्याचें कारण त्याची अद्भुत सृष्टिरचना हें एक असलें पाहिजें.

आतां दुसऱ्या तऱ्हेनें याजविषयीं विचार करूं. प्रत्येक देश बहुतकरून कांहीं उत्तम पदार्थ उत्पन्न करण्याविषयीं प्रसिद्ध असतो, पण त्या सर्वांत **काश्मिराप्रमाणें** अत्युत्तम पदार्थ उत्पन्न होणारे देश फारच थोडे सांगतां येतील. पहा, सर्व फळांमध्यें अति रुचिकर व सर्वांस प्रिय जें द्राक्षाफळ त्याचें तर हा देश मुख्य उत्पत्तिस्थान आहे. येथें उत्पन्न होणाऱ्यासारखें द्राक्ष स्वर्गांत इंद्रास देखील मिळत नाहीं, असें राजतरंगिणींत एका स्थळीं ह्मटलें आहे. या शिवाय अनेक जातींचीं दुसरीं स्वादिष्ट फळें येथें उत्पन्न होतात. त्यांचें वर्णन पुढें येणार आहे. त्याचप्रमाणें शेंकडों जातींचीं सुवासिक द्रव्यें आहेत, पण त्या सर्वांत केशर व कस्तुरी हीं अग्रगण्य होत, व त्यांचेंही मुख्य स्थान हाच देश होय. तसेंच नेत्रांस आनंद देणारें जें सृष्टिसौंदर्य याच्या संबंधानें पाहिलें असतां हिमाचलरूप करंड्यांत हा देश एक रत्न आहे. असा रमणीय देश **एशिया** खंडांत नव्हे पण सर्व पृथ्वीच्या पाठीवर दुसरा नाहीं, असें आपल्या देशाचे प्रसिद्ध इतिहासकार **एल्फिन्स्तन्** साहेब ह्मणतात. **जनरल कनिंगहाम** व **सर रिचर्ड टेंपल** हे आपल्या ग्रंथांत या देशाच्या वनश्रीविषयीं अशींच मतें देतात. त्यांचा उल्लेख पुढें येणार आहे.

आतां प्रपंचांतील सर्व सुखांस कारणीभूत जी कांता तिच्या संबंधानें पाहिलें असतांही या देशास विशेष मान दिला पाहिजे. कारण, येथील स्त्रियांस त्यांचे अप्रातिम लावण्यावरून कित्येक कवींनीं साक्षात् अप्सरांची उपमा दिली आहे. या लावण्यखाणीचें विशेष वर्णन पुढें देणार आहों.

आतां विद्येच्या संबंधानें आपण या देशाविषयीं विचार करूं. सर्व विद्यांचें मुख्य स्थान जें सरस्वतीपीठ तें याच देशांत होतें असें विद्वान् लोकांचें मत आहे. या देशाच्या पश्चिमेस श्रीनगरापासून सुमारें शंभर मैलांवर **शारदा** नांवाचा एक प्रांत आहे. तेथेंच हें पीठ असावें असें अनुमान करितात, ह्मणून आह्मांस पंडित **महानंदस्वामि** यानीं सांगितलें. हे गृहस्थ **श्रीनगर** येथील इंग्रजी शाळेंत संस्कृताचे अध्यापक आहेत. यांचे वडील **दामोदर पंडित** हे सर्व शास्त्रांत मोठे धुरीण होते. **एल्फिन्स्तन्** विद्यालयाचे माजी संस्कृत प्रोफेसर **डाक्तर बुलर** हे या देशांत संस्कृत पुस्तकांचा शोध करण्यास गेले होते, तेव्हां हे पंडित हयात होते. यांची व दुसऱ्या पंडितांची डा० साहेबानीं आपल्या ग्रंथांत बहुत प्रशंसा केली आहे. हें पीठ याच देशांत होतें असें ह्मणण्यास वरीलपेक्षां बलवत्तर आणखी एक आधार मिळाला आहे तो असा कीं, तंत्रशास्त्रांत या देशाच्या मर्यादा सांगतांना पुढें दिलेलें वाक्य लिहिलें आहे. "शारदामठमारभ्य कुंकुमाद्रितटांतकः" काश्मीर देशाचा आरंभ शारदामठापासून तों कुंकुम (केशराचे) पर्वताचे शेवटापर्यंत." तसेंच इ० स० १०, ११, १२ या शतकांत विद्वत्ते-

संबंधी कांहीं वाद उत्पन्न झाले असतां वरिष्ठ न्यायसभे-प्रमाणें त्यांचा अखेर निर्णय करण्याचीं स्थानें **काश्मीर** येथील पंडितांच्या परिषद् मुख्य मानिल्या होत्या, असें जैन आणि ब्राह्मण प्रबंध नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे. याच संबंधानें **बिल्हण** कवीची गर्वोक्ति खालीं देतों.

> **सहोदराः कुङ्कुमकेसराणाम् ।**
> **भवन्ति नूनं कविताविलासाः ॥**
> **न शारदादेशमपास्य दृष्ट- ।**
> **स्तेषां यदन्यत्र मया प्ररोहः ॥**

**अर्थ**—कवितेचे विलास व केशराचे अंकुर **काश्मीर** देश सोडून दुसरीकडे दिसत नाहींत, करितां कविता-विलास हे केशराच्या अंकुरांचे सहोदर होतात.

इतकेंच नव्हे पण येथील स्त्रियासुद्धां संस्कृत भाषण करीत असत असें **बिल्हण** व दुसरे पंडित ह्मणतात. त्याचप्रमाणें महान् पंडित **चंद्रादित्य** त्याचे पुत्र **कय्यट, जय्यट, उब्बट** (?) व यांचा मातुल **मम्मट** हे प्रख्यात पंडित असून त्यांनीं अनुक्रमें केलेले भाष्यप्रदीप, उद्योत, यजुर्वेदसंहिताभाष्य व काव्यप्रकाश हे ग्रंथ सर्व-मान्य व सर्वप्रसिद्ध आहेत. तसेंच अद्वैतब्रह्मसिद्धीचे कर्ते **सदानंदयति**, अलंकारदेवीस्तोत्राचे कर्ते **यशस्कर**, काशिकावृत्तीचे कर्ते **जिनेंद्रबुध**, हर्षचरिताचे कर्ते **बाणभट्ट**, कथासरित्सागराचे कर्ते **सोमदेव**, माघ, रघू, कुमारसंभव व मेघदूत यांजवरील टीकाकार व सुभाषितावली ग्रंथाचा कर्ता **वल्लभदेव**, यांशिवाय **चंद्र, अमृतभानु**, याचा पुत्र **चंद्रक, भर्तृमेंठ, अभिनंद, वामन, दामोदर, उद्भट, मुक्ताकण, शिवस्वामी, आनंदवर्धन, रत्नाकर,**

भल्लट, अभिनवगुप्त, बिल्हण, कल्हण, शंभु, मंख, रामानंद, सौगत, कर्पूरभट्ट, रूपभट्ट, योद्धभट्ट, जोनराज, श्रीवर हे व दुसरे शेंकडों पंडित काश्मिरी असून ते आपणांस तद्देशीय ह्मणवून घेण्यांत मोठा गर्व मानीत. याच देशांत क्षेमेंद्र नांवाचा एक जाडा पंडित होऊन गेला. त्यानें सर्व विषयांवर शेंकडों ग्रंथ लिहिले आहेत. कविश्रेष्ठ जो **कालिदास** तोही **काश्मीरांत** किंवा त्याच्या लगतच्या प्रदेशांत जन्मलेला असावा असें अनुमान होतें. तें पुढें इतिहासभागांत दर्शविलें आहे. या सर्व गोष्टींवरून **काश्मीर** देश संस्कृत विद्येचें माहेरघर होतें असें ह्मटलें असतां शोभेल. **काश्मीरां**तील लोकांच्या सौंदर्यास जसें तेथील हवापाणी हें मुख्य कारण आहे, तसेंच तेथील कवींच्या अलौकिक कल्पनाशक्तीस व बुद्धीस तेथील निसर्गाच्या ( सृष्टिरचनेच्या ) नानाविधलीला हें मुख्य कारण असावें असें वाटतें. असो, वर सांगितलेले व दुसरे पंडित, त्यांनीं लिहिलेले अनेक ग्रंथ, त्यांविषयीं ऐतिहासिक कथा व आख्यायिका यांची जेवढी माहिती मिळाली तेवढी पुढें योग्य स्थळीं दिली आहे.

बरें, आतां कलाकौशल्याच्या संबंधानें आपण थोडासा विचार करूं. या देशीं प्राचीनकालीं बांधिलेल्या इमारतींचे जे अवशिष्ट भाग दृष्टीस पडतात, त्यांवरून व तेथें सांपडणाऱ्या जुन्या नाण्यांवरून शिल्पशास्त्र किती उच्च दशेस पोहोंचलें होतें, याची सहज कल्पना करितां येते. तसेंच सर्व वस्त्रांत महावस्त्र जी शाल ती विणण्यांच्या अपूर्व कलेकरितां या देशाचें नांव हजारों वर्षां-

पासून सर्व पृथ्वीवर गाजत असल्याचा उल्लेख वर केलाच आहे. याचप्रमाणें बंदुका, तरवारी व दुसरीं हत्यारें तयार करण्याची कला, खोदींव काम, नकशीचें काम व मिन्याचें काम करण्याचें हस्तकौशल्य, पेपिआरम्याचीचें (कागदाच्या कुट्याचें ) काम, येथें तयार होणाऱ्या कागदांची सफाई, व दुसरे कारागिरीचे जिन्नस पाहिले असतां, हा देश हस्त-कौशल्याचे कामीं दुसऱ्या कोणत्याही देशास मागें सरणार नाहीं असेंच ह्मणावें लागतें. या सर्व गोष्टींवरून प्राचीनकालीं **ग्रीस** व **रोम** हे देश जसे **युरोप** खंडांत विद्या व कला यांचीं मुख्य स्थळें होतीं तसा **काश्मीर** देश आपल्या खंडांत सर्व विद्या व कला यांचा आद्यस्थान होता.

शेवटीं प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहाससंबंधानें विचार केला असतांही या देशाची योग्यता आपणांस दुसऱ्या कित्येक देशांपेक्षां विशेष मानिली पाहिजे. कारण, येथील पहिला राजा जो **गोनंद** ( गोनर्द ) तो **श्रीकृष्णाचा** समकालीन असून या उभयतांत युद्धप्रसंग झाल्याची कथा राजतरंगिणींत दिली आहे. ती पुढें इतिहास प्रक-रणांत येईल. अलीकडच्या कालांतही कित्येक मोंगल बादशहांचा हा देश मोठा आवडता असून उष्णकाळांत ते आपल्या प्रियांसह या भूस्वर्गीं जाऊन मोठ्या आनंदानें विलाससुख घेत राहत. **जहांगिर** बादशहास तर हा देश इतका आवडता असे कीं, "माझें सर्व राज्य गेलें तरी हरकत नाहीं, पण **काश्मीर** देश मात्र मी कधीं सोडणार नाहीं," असें तो ह्मणत असे, असें **ए० वुईलसन्** आपल्या ग्रंथांत लिहितो. त्याची प्रिया जी **नूरजहान्** तिचा हा देश किती आवडता होता, याची

व येथील स्थळांच्या मोहक शक्तीची साक्ष, तिच्या सूचनेवरून बादशाहानें केलेले रमणीय बगीचे व दुसऱ्या मजेदार इमारती देतात. या देशांतील हवापाण्याचा उपभोग घेण्यास व तेथील सृष्टिसौंदर्य पाहण्यास आपल्या देशांतून दरसाल शेंकडों साहेब लोक जातात. इतकेंच नव्हे तर **युरोप** व **अमेरिका** या खंडांतून सुद्धां कांहीं प्रवासी या भूस्वर्गाचा लाभ मिळावा ह्मणून येतात. **पंजाबां**तील पुढारी लोकांत ज्यानें या भूस्वर्गाचा दर्शनलाभ घेतलेला नाहीं असा पुरुष क्वचितच सांपडेल.

## काश्मीर राज्याचा विस्तार.

**काश्मीर** प्रांत हा हिमाचलांतील एक मोठा दरा आहे. तो आपल्या देशाच्या उत्तरेस वायव्य बाजूस आहे. मुख्य दऱ्याची लांबी १२० व रुंदी ६९ मैल आहे. येथें पूर्वकाळीं एक मोठें सरोवर होतें. त्यांतील पाणी **कश्यप** ऋषीनें बाहेर काढून दिलें आणि हा दरा बनविला. त्यावरून त्यास **काश्मीर** असें नांव पडलें. ती कथा पुढें देऊं. तसेंच या दऱ्याच्या सभोंवती पर्वतांच्या रांगा असून त्यांत दुसरे दरे, खिंडी व घांट आहेत. त्यांतील कांहींचें वर्णन पुढें दिलें आहे. **काश्मीर** राज्याचा विस्तार उत्तर, पूर्व आणि दक्षिण दिशांकडे पुष्कळ वाढला आहे. या सर्व राज्याची पूर्वपश्चिम लांबी सुमारें ३९० व दक्षिणोत्तर रुंदी २७० मैल आहे. त्याचें क्षेत्रफळ अजमासें ८०,९०० चौरस मैल आहे. यांत **काश्मीर, जम्बू, लदाक, स्कार्डू** व **गिलजित्** हे मुख्य भाग आहेत. यांतील लोकसंख्या २९,४३,९९२ ×

× In what year!

आहे. यांत यवन व हिंदु यांचा मुख्य भरणा आहे. वर सांगितलेल्या भागांत गेल्या खानेसुमारीप्रमाणें कोणत्या जातीचे किती लोक राहतात याचें पत्रक या ग्रंथाचे शेवटीं जोडलें आहे. त्या पत्रकावरून असें दिसून येईल कीं, यवनधर्मी लोक या राज्यांत दर शेंकडा ७०.९, हिंदु २७.७, बौद्ध १.२ व इतर .६ आहेत. हिंदूंत पंडित, सीक, रजपूत व जैन यांचा समावेश होतो. पंडित लोक आपणांस ब्राह्मण ह्मणवितात. यांत कांहीं पोटभेद असल्याचें समजतें. यांची संख्या पन्नास साठ हजारांहून अधिक नाहीं. ते मुख्यत्वें **श्रीनगर** येथें व दुसऱ्या मोठ्या गांवीं राहतात. बौद्ध लोकांचा विशेष भरणा **लदाक** प्रांतीं आहे. जैन **जम्मू** प्रांतीं मात्र आहेत. अनिर्दिष्ट सदराखालीं **गिलजित्** प्रांतांतील दाखविलेले लोक बहुतेक यवन आहेत, असें खानेसुमारीचे पत्रकांत लिहिलें आहे. या राज्यांत **काश्मीर, चित्रल, यासीन, याजिस्तान, गिलजित्, बालतिस्तान्, लदाक, भुदरवा, जम्मू, नौशीरा, पुंच व अस्तार** हे मुख्य प्रांत आहेत. त्यांविषयीं थोडीशी माहितीपुढें दिली आहे. या राज्यांतील निरनिराळ्या भागांत स्त्रीपुरुषाचें प्रमाण आपल्या देशापेक्षां बरेंच भिन्न आहे, करितां त्याचेंही एक पत्रक शेवटीं जोडलें आहे. त्यावरून असें सिद्ध होतें कीं, या राज्यांतील सर्व धर्माच्या लोकांत स्त्रियांची संख्या कमी आहे. **लद्दाक** प्रांतांत बहुपति करण्याची चाल आहे, ती याचमुळें पडली असावी असें वाटतें.

## या देशांत जाण्याचे मार्ग.

या देशांत जाण्याचे मुख्य मार्ग पांच आहेत. पण

आह्मी ज्या मार्गानें गेलों तो मार्ग सर्वांत सुलभ असून त्याजवरील सोयीही चांगल्या आहेत व सरकारी टपालही याच मार्गानें जातें. करितां प्रथम त्याची विशेष माहिती देऊन नंतर राहिलेल्या चार मार्गांची थोडीशी माहिती देऊं. आह्मी घराहून निघून **मुंबई, अहमदाबाद, अजमीर, जयपूर, रेवारी, लाहोर** या शहरांवरून **रावळपिंडीस** गेलों. **मुंबईहून** येथपावेतों सुमारें १,३२९ व **मिरजेहून** १,६०० मैल आह्मीं लोहमार्गानें प्रवास केला. **लाहोर** येथें मात्र तें शहर पाहण्या करितां दोन मुक्काम केले. **रावळपिंडी** येथें पाहण्या सारखीं दोन मुख्य स्थलें आहेत, तीं आह्मीं एक दिवसांत पाहून घेतलीं. बाकीचीं शहरें आह्मीं पूर्वींचे प्रवासांत पाहिलीं होतीं. असो. **रावळपिंडी** येथें लोहमार्ग संपला. येथून पुढें **मरी** नांवांचें गांव ३७ व तेथून **बरामुला** १२८ व **बरामुलाहून श्रीनगर** ३४ मैल राहतें, ह्मणजे **रावळपिंडीहून श्रीनगर** हें सरासरी २०० मैल लांब आहे. **रावळपिंडी** येथून पुढें जाण्यास फैटणी, कुटुंबाचे टांगे, टांगे, एक्के व बैलगाड्या हीं वाहनें मिळतांत. हंगामाच्या दिवसांत जातां येतां या वाहनास अनुक्रमें ४००, २६०, २००, ४० रुपये पडतात. गैर हंगामाच्या दिवसांत कांहीं कमी घेतात. फैटणींत व कुटुंबाचे टांग्यांत तीन मोठीं मनुष्यें व दोन मुलें, टांग्यांत तीन व एक्क्यांत दोन मनुष्यें बसूं देतात. फैटणींत पक्के बारा शेर, कुटुंबाचे टांग्यांत एक मण, टांग्यांत दीड मण, व एक्क्यांत सव्वा मण ओझें घेऊं देतात. एकच मनुष्यास जाणें असल्यास **रावळपिंडी-**

हून **मरी**पर्यंत ८ रुपये व **मरी**पासून **बरामुला**पर्यंत २७ रुपये घेऊन टपालाचे टांग्यांतून नेतात. यापुढें घोड्यावरून किंवा नांवेंत बसून **श्रीनगरास** गेलें पाहिजे. पायवांटेनें गेल्यास वाटेंत **पाटन** येथें मुक्काम करून दुसरे दिवशीं **श्रीनगरास** जातां येतें. घोड्यास भाडें दररोज बारा आणे पासून एक रुपया पडतें. मध्यम प्रतीची नाव दररोज आठ दहा आणे भाड्यानें मिळते. तींतून तीन चार मनुष्यें सुखानें जाऊं शकतात. एकाच मनुष्यास जाण्याचें असल्यास त्यास दीड दोन रुपये घेतात. **रावळपिंडीहून मरीपर्यंत** ३७ मैलांत **बाराकाऊ**, **ट्रेट** व दुसरीं दोन तीन खेडीं लागतात. परत येतेवेळीं मात्र आह्मीं **ट्रेट** येथें रहदारी बंगल्यांत उतरलों होतों. **मरीहून बरामुलापर्यंत** १२८ मैलांतील मुक्काम करण्याचीं गांवें, व त्यांजमधील अंतरें खालीं दिल्याप्रमाणें आहेतः—

| | मैल. | | मैल. |
|---|---|---|---|
| १ मरीहून देवल | १३ | ६ गडी—हट्टी | ११ |
| २ देवल—कोहाला | १४ | ७ हट्टी—चागोटी | १४ |
| ३ कोहाला—दुलेई | १२ | ८ चागोटी—उरी | १६ |
| ४ दुलेई—दोमेल | १० | ९ उरी—रामपूर | १३ |
| ५ दोमेल—गडी | १३ | १० रामपूर—बरामुला | १२ |

या सर्व गांवीं प्रवाशांस लागणारी सामुग्री मिळते, व उतरण्यास रहदारी बंगले असून त्यांत चोवीस तास राहण्यास एक रुपया भाडें व दिवाबत्तीबद्दल दोन आणे द्यावे लागतात. वर सांगितल्यापैकीं बहुतेक गांव सडकेपासून जवळ असून वितस्ता नदीच्या अगदीं कांठावर आहेत;

कारण, हा मार्ग **कोहालापासून बरामुलापर्यंत** तिला डावी घालून जातो.

आतां, राहिलेल्या दुसऱ्या चार मार्गांविषयीं थोडीशी माहिती देऊन आह्मी आमच्या मार्गक्रमण वर्णनाकडे वळूं. २ रा, बनिहालमार्ग. हा बनिहाल नांवाच्या खिंडींतून जातो ह्मणून त्यास हें नांव पडलें आहे. **काश्मीर** देशाची दुसरी राजधानी **जम्मू** सर्वांस माहितच आहे, येथ-पावेतों लोहमार्ग आहे. तेथून **इसलामबाद** नांवाचें गांव १३० मैल आहे आणि तेथून **श्रीनगर** ३३ मैल राहतें. या मार्गांत लहान मोठीं आठ नऊ खेडीं लागतात. हा मार्ग पहिल्या मार्गापेक्षां कांहीं जवळ आहे, पण रस्ता जागोजाग फार वाईट असून चढउतार वारंवार लागतात. या मार्गानें गेल्यास **अमरनाथाचें** शिवस्थान पूर्वेस राहतें. ३ रा, पुंचमार्ग, **नार्थवेस्ट** नांवाच्या लोहमार्गावर **जेलम** नांवाचें एक स्टेशन आहे. तेथून **श्रीनगर** १९९ मैल राहतें. हा मार्ग एकशेचाळीस मैल जाऊन पुढें पहिल्या मार्गास **उरी** गांवीं मिळतो. या मार्गांत ही चढउतार फार लागून रस्ता खराब असल्यामुळें मोठा त्रासदायक वाटतो, व कांहीं मुक्कामीं प्रवाशांस लागणारे पदार्थही मिळत नाहींत. पण ह्या व पुढील मार्गावर वनश्री मात्र मोठी रमणीय दृष्टीस पडते. ४ था मार्ग, यास पंजार असें ह्मणतात. कारण, हा पंजार ( पंजाल ) खिंडींतून जातो. वर सांगितलेल्या लोह-मार्गावर **गुजरात** नांवाचें स्टेशन आहे. तेथून या मार्गास आरंभ होतो. हा मार्ग बराच जवळ आहे. पण मोठा बिकट आहे. कारण, दुसऱ्या व तिसऱ्या मार्गाप्रमाणें

चढउतार पुष्कळ असून रस्ता फार खराब आहे, व मुक्काम करण्यास कांहीं गांवीं रहदारी बंगले किंवा दुसऱ्या सोयीच्या जागाही नाहींत. शिवाय या मार्गानें गेलें असतां दोन भयंकर खिंडी ओलांडून जावें लागतें व आक्टोबरच्या मध्यापासून जूनच्या मध्यापर्यंत या मार्गा-वरील सुमारें पन्नास मैल रस्ता बर्फामुळें बंद असतो. पण पूर्वीं मोंगल बादशहा याच मार्गानें जात असत. **औरंगजीब** बादशहा पायदळ, स्वार, तोफखाना, हत्ती व जनानखाना बरोबर घेऊन या मार्गानें मोठ्या थाटानें इ० स० १६६४ त जात असतां **पोशिन** व **अलियाद-सराई** यांच्या दरम्यान एका हत्तीचा पाय निसरून तो त्याच्या मागल्याच्या आंगावर घसरला; तेव्हां तो जाऊन तिसऱ्यावर पडला. याप्रमाणें पंधरा हत्ती एकमेकांवर आदळत कड्याच्या तळास लोटांगणें खात खालीं मेले. त्यांतील कांहींवर जनानखान्यांतील अबला आरूढ होऊन चालल्या होत्या. त्यांची या भयंकर प्रसंगीं काय अवस्था जाहली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी; तरी वेळ चांगली होती म्हणून तिघीचौघीच प्राणास मुकल्या, नाहींतर सर्वांच्या हाडांचा चुराडा उडाला असता. प्रसिद्ध फ्रेंचप्रवासी जो **बर्नियर** तो या स्वारीबरोबर होता. ९ वा मार्ग, याचें नांव अबटोबाद. वरील लोहमार्गावर **हसनअबदल** नांवाचें स्टेशन आहे. तेथून **अबटोबाद** चाळीस मैलांवर आहे. हें गांव हजारा प्रांताचें सिव्हिल स्टेशन आहे. तेथून ४९ मैलांवर हा मार्ग पहिल्या मार्गास **दोमेल** गांवाजवळ मिळतो. पांच सात वर्षांपूर्वीं हाच वाहता मार्ग होता. वर सांगि-

तलेल्या सर्व मार्गांनीं जाणारांस केव्हां केव्हां एक मोठा अपघात होण्याचा संभव आहे. तो असा कीं, पाऊस पडत असतां किंवा पडून गेल्यावर कांहीं कालपर्यंत बाजूचे पर्वत चिरून त्यांचीं हत्तीसारख्या जनावरास खालीं दडपून टाकणारीं प्रचंड शकलें मार्गावर येऊन पडतात.

## मार्गक्रमण.

**रावळपिंडी** येथें लोहमार्ग संपल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. येथून आह्मी सकाळचे अकरा वाजतां भोजन करून **मरीस** जावयास टांग्यांतून निघालों. मार्ग एकसारखा चढता लागला. याच्या दोहोंबाजूंस शिसव्याचीं झाडें लाविलीं आहेत. महासागराचा अफाट विस्तार, त्याची अगाध खोली, त्याजवरील प्रचंड लाटा, त्यांचा सिंहगर्जनेसारखा अतिघोर आवाज, त्याच्यांत संचार करणारे भयंकर नानाविध प्राणि, त्याजवरून दिसणारा भव्य देखावा, इत्यादि गोष्टींची यथार्थ कल्पना आगबोटींत बसून कांहीं जलपर्यटण केल्यावांचून जशी येत नाहीं तशीच महान् हिमाचल, त्याचीं बर्फानें आच्छादित व गगनचुंबित शिखरें, त्यांचा आश्रय करूं पाहणारे व हत्तीच्या आकारास तुच्छ मानणारे मेघसमूह, त्या शिखरांवरून उड्डाणें मारीत निरनिराळ्या वळणांनीं खालीं येणारे जलौघ, त्यांजवरून सोसाट्यानें वाहणारा अनिवार्य वायु, त्यास आडवूं पहाणारे भव्य व उंच वृक्ष, त्या पर्वतांतील भयंकर खिंडी, पाताल फुटल्यासारखे त्यांतील अति खोल व विशाल दरे, कड्यांवरून त्या दऱ्यांत निर्भयपणें संचार करणारे वनपशु, ह्या सर्वांच्या संयोगानें

उत्पन्न झालेली भयप्रद पण चित्तवेधक वनश्री, यांतील प्रत्येक गोष्टींचें खरें रूप आम्ही रावळपिंडी वीस पंचवीस मैल मागें टाकून जसजसें पुढें जाऊं लागलों तसतसें आमच्या लक्षांत येऊं लागलें. तसेंच हा सर्व मार्ग पर्वतांच्या बाजूंबाजूंनीं काढलेला असल्यामुळें बहुतकरून प्रत्येक वळणाच्या ठिकाणीं पर्वतांच्या शिखरांवरून लहान मोठे जलौघ वाहत येत असून ते खालच्या दर्‍यांत जाऊन पडतात आणि ते ओलांडून जाण्याकरितां त्यांजवरून मार्गावर पूल बांधिलेले आहेत. याप्रमाणें मार्ग क्रमीत असतां डाव्या हातास अति उंच पर्वत व उजवे हातास तसेच अति खोल दरे व त्या पलीकडे त्याच पर्वतांची दुसरी रांग असून या दोन्ही रांगा एकमेकींस मिळाल्यासारख्या दुरून दिसत, यामुळें आतां हा मार्ग पुढें कोठून व कसा काढिला असेल असा विचार करीत कांहीं काल रहावें तों अशाच अडचणींतून एके बाजूनें रस्ता काढिलेला दृष्टीस पडे. कोठें कोठें मार्गाच्या दोहोंबाजूंच्या उंच रांगा जात असून समोरून एक सुळका आडवा येऊन त्यांस मिळाल्यासारखा नेत्रास भास होऊन, आतां मात्र हा मार्ग कुंठित होतो, असें वाटून तिकडेच नजर लावून बसावें तों वरीलप्रमाणें तेथेंही कोणीकडून तरी मार्ग पुढें काढिलेला पाहून मनास मोठा अचंबा वाटे. जसजसें आम्ही पुढें जाऊं लागलों तसतसें एकाहून एक अधिकच उंच पर्वत व तसेच अगाध दरे पाहून आतां ही उंची संपणार तरी कोठें, व आपला मार्ग जातां जातां किती उंचीवर जाणार, असा विचार मनांत घोळत असून हिमाचलाचें तें अत्यंत विशाल रूप पाहून आमचें मन

वारंवार चकित होऊन जाई. याप्रमाणें मार्ग क्रमीत आह्मी संध्याकाळचे पांच वाजतां **मरी** येथें जाऊन दाखल जाहलों.

**मरी** हें गांव हिमाचलाच्या पायथ्यावर वसलेलें आहे. याची उंची समुद्राच्या सपाटीपासून ७,५०० फूट आहे. येथील हवा **इंग्लंडा**प्रमाणें किंवा **काश्मीरां**तील हवेपेक्षां अधिक थंड असल्यामुळें इंग्रज लोक या स्थलास फार चाहतात. **लाहोर, रावळपिंडी** व **पेशावर** या प्रांतांतील पुष्कळ साहेब लोक सवडीप्रमाणें येथें वारंवार येऊन राहतात. यामुळें येथें मुख्य वसति त्याच लोकांची आहे. ऐन हिवाळ्यांत येथील वसति अडीच तीन हजार असते, पण गरमीच्या दिवसांत ती आठ हजारांपर्यंत वाढते. येथील देखावा अति रमणीय आहे. कारण, येथें झाडी घनदाट असून, तींतून पर्वताच्या पायथ्याशीं बाजार वसलेला आहे. त्याच्या वरच्या बाजूस मध्यम प्रतीच्या लोकांचे बंगले किंवा तशाच नमुन्यावर बांधलेलीं घरें आहेत आणि जसजसें वर जावें तसतसें एकापेक्षां एक अधिक उंच स्थलें पाहून त्यांजवर कैलासवासी गौरकाय लोकांनीं आपले बंगले बांधिले आहेत, ते दृष्टीस पडतात. बाजारच्या खालच्या बाजूस मोठे खोल दरे असून त्यांत हिरवीं गार शेतें व मधून मधून लहान खेडीं दृग्गोचर होतात. पुढें या टेंकडीच्या पूर्व बाजूस पाहिलें असतां **काश्मीरां**तील बर्फाच्छादित शिखरें जणूं काय गगनास टेकूं देण्याच्या ईर्षेनें एकाहून एक उंच होत गेलेलीं दृष्टीस पडूं लागतात. यांतील कांहीं बर्फानें व कांहीं ढगांनीं आच्छादिलेलीं दिसतात. सूर्यप्रकाश जसजसा

बदलत जातो, तसतसा ह्या शिखरांचा वर्ण पालटत जाऊन एक प्रकारचा इतका मनोहर देखावा उत्पन्न होतो कीं, तो पहातच रहावें असें वाटतें. असा रम्य देखावा आपल्या देशीं कोठून दृष्टीस पडणार असें वारंवार मनांत येऊं लागतें.

दुसरे दिवशीं भोजन करून आह्मी अकरा वाजतां मरीहून निघालों. रस्त्याच्या दोहोंबाजूंस ओक, पाईन व दुसरे प्रचंड वृक्ष यांची दाट झाडी लागते. यांतील कांहीं वृक्ष शंभर फुटांपेक्षां अधिक उंच होतील असें वाटलें. मार्गांत निरनिराळ्या स्वादिष्ट फळांनीं लादलेल्या कराच्या ( बैलगाड्या ), उंट, घोडीं, खेचरें व गाढवें, यांचे तांडे केव्हां केव्हां आडवे येत असलेले पाहून त्यांनीं वाट द्यावी ह्मणून कोचमन ब्युगल वाजवी. तें ऐकतांच तांडेवाले लोक आपलीं जनावरें एके बाजूस वळविण्याचा यत्न करूं लागत. तों तीं दुसऱ्याच बाजूनें चालूं लागत. तेव्हां त्यांची मोठी त्रेधा उडून जात असे. पण यांत नवल मानण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, ज्ञानी मनुष्यांस सरळ मार्गानें चालण्याचें शिक्षण देण्यास जर फार श्रम घ्यावे लागतात, तर हे अज्ञानी पशु, त्यांत बैल व गाढव यांस मार्गावर आणण्यास महत् प्रयास पडणें हें साहजिकच आहे. असो. याप्रमाणें सुमारें दहा बारा मैल पुढें गेलों तों महानदी जी वितस्ता ( झेलम ) हिनें आमचा तिच्या भेटीस जाण्याचा दृढनिश्चय पाहून बालरूप धारण करून आह्मांस दर्शनलाभ दिला. बालरूप ह्मणण्याचें कारण आह्मांस दर्शन देण्यापूर्वीं ती वुलर नांवाच्या सरोवरांतून बाहेर पडते, तेव्हां तिचें रूप मोठें भयंकर दिसतें. तेंही पुढें

आमच्या पाहण्यांत आलें. **वितस्तेच्या** दर्शनाचा लाभ होऊन दोन तीन मैल गेल्यावर **देवल** नांवाचें गांव लागलें. हा मार्ग बराच उतरणीचा वाटला. येथून १४ मैलांवर **कोहाला** नांवाचा गांव लागला. हा गांव **वितस्तेच्या** दोहों तिरांवर वसला आहे. त्याच्या दोहों भागांस जोडणारा एक सस्पेन्शन ( लोंबता ) पूल **पंजाब** सरकाराकडून वीस वर्षांपूर्वी बांधण्यांत आला आहे. तो ओलांडून जाण्यास टांग्यास एक रुपया दस्तुरी द्यावी लागते. पुलाच्या अलिकडील **कोहाले** गांवचा भाग **पंजाबांत** मोडतो आणि पलीकडे गेलें कीं, **काश्मीर** महाराजांच्या राज्यास आरंभ होतो. **कोहाला** येथें मार्गावर सोनारांचीं दोन तीन दुकानें लागलीं. त्यांत अल्प मोलाचे दागिने विकरीस ठेविले होते. त्यांची करणावळ पाहून **श्रीनगर** येथें असले अलंकार किती उत्तम करीत असतील असें वाटलें. येथून कांहीं मैल पुढें गेलों, तेव्हां मार्गांत एक दोन ओबडधोबड बोगदे लागले. ते पाहतांच आपण **काश्मीरच्या** राज्यांत आलों असें प्रवाशांच्या सहज लक्षांत येतें. **कोहाला**-पर्यंत **वितस्ता** आपल्या उजवीकडे होती. ती पूल ओलांडल्यावर आपल्या डावीकडून वाहत खालीं जाते. येथून मार्ग चढता लागतो. पुढें **दुलेई** नांवाचें गांव लागलें. दिवस तासापेक्षां अधिक आहे असें पाहून टांगा पुढें हाकण्यास सांगितलें. तेथून दहा मैलांवर **दोमेल** गांव आहे तें दिसूं लागलें. तेव्हां सूर्यास्ताची वेळ जवळ आली हें जसें काय सुचविण्याकरितांच पक्षी किलबिल शब्द करून आपल्या घरट्यांचा मार्ग

सुधरूं लागले. हें पाहून आह्मीं याच गांवीं रहदारी बंगल्यांत मुक्काम केला. प्रत्येक बंगल्यांत पलंग, खुर्च्या, मेज, आरसा हें सामान असून **महाबळेश्वर** येथील बंगल्याप्रमाणें शेकाटीची एक जागा असते. तींत रात्रीं लांकडें जळत ठेविलीं ह्मणजे थंडीपासून चांगला बचाव होतो. येथें वसति सुमारें ४,८०० आहे. या गांवीं लांकडें कापण्याचा एक मोठा कारखाना असून त्यांतील करवतांस प्रेरकशक्ति वाफेच्या यंत्रानें मिळते. येथें **वितस्ता** आणि **किसनगंगा** यांचा संगम होतो. रहदारी बंगला संगमाच्या नजिक आहे. या स्थलीं **वितस्ता** भयंकर आक्रोश करीत असलेली सर्व रात्रभर ऐकूं येत होती. गांवच्या नजिक एक जातीची मृत्तिका सांपडते. तिचा येथील लोक कपडे रंगविण्याच्या कामीं निळीप्रमाणें उपयोग करितात. येथेंही एक सस्पेन्शन् (लोंबता) पूल बांधिला असून त्यावरून पलीकडच्या तिरीं **मुजाफर** नांवाचें गांव आहे तेथें जातां येतें. हा गांव पाहण्यास आह्मी दुसऱ्या दिवशीं सकाळीं गेलों होतों. या गांवचा बराच भाग अग्निनारायणानें जाळून फस्त केला असून लोक आपआपलीं घरें व दुकानें पुन्हा बांधण्याच्या कामीं निमग्न असलेले दृष्टीस पडले. वर सांगितलेल्या पुलावरून आमचा मार्ग मुळींच जात नाहीं, तत्राप येथेंही आमच्या वाहनाकरितां दस्तुरी ह्मणून एक रुपया द्यावा लागला. त्याच्या कारणाचा तपास करितां हें नेटिव्ह राज्य ह्मणून दस्तुरी दिली पाहिजे असें समजलें. असो.

**दोमेल** गांवीं भोजन करून अकरा वाजतां आह्मीं तें

सोडलें. वाटेनें **गरी**, **हट्टी**, व **चागोटी**, हीं गांवें लागलीं. आजरोजीं मार्गानें वनश्रीचीं जीं नानाविध रूपें आमच्या पाहण्यांत आलीं त्यांचें वर्णन करावें तितकें थोडेंच होणार. आपला जन्म भूस्वर्गी होऊन पुढें ही अधोगति प्राप्त झाली अशा विचारानें अति दुःखित व लज्जायमान होऊन रुदन करीत दृष्टिआड होण्याकरितां वांकडीं तिकडीं वळणें घेऊन वाहणारी **वितस्ता**, मातेस भेटून तिच्या दुःखाचें सांत्वन करावें अशा इराद्यानें जिवाकडे न पाहतां पर्वतांवरून उड्डाणें घेत येणारे लहान मोठे प्रवाह, त्यांस आडवूं पाहणारे नगबाहू, या दोहोंच्या संघट्टणापासून उत्पन्न झालेल्या फेनयुक्त लाटा, त्यांचा भयप्रद पण मनास आनंद देणारा कलकलाट, हिरव्यागार शेवाळानें शोभा पावलेलें नदीचें तटाक, त्यांच्या वरच्या बाजूंस आरक्त व हरितपर्णांनीं विभूषित झालेल्या वृक्षराजी, त्यांस सप्रेम आलिंगन देणाऱ्या पुष्पलता, इत्यादि सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत पुढें जावें तों मार्ग चढता लागून डावे बाजूस दुःखानें व लाजेनें आड झालेली **वितस्ता** खोल दऱ्यांत कृश व पांढरी झालेली पुनः दिसूं लागते. उजवीकडे पहावें तों भोंवतालच्या पर्वतांचे आपण मालक आहों असें दाखविण्याच्या बुद्धीनें तेथील जमीनदारांनीं त्यांच्या माथ्यावर बांधलेल्या गढ्या, त्यांच्या भोंवतीं त्या जमीनदारांच्या आश्रयास राहणाऱ्या गरीब लोकांच्या लहान झोंपड्या, त्यांतून निघून वर मेघमंडळास भेटावयास जाणारे धुराचे लोट; झोंपड्यांच्या भोंवतालचीं कमोदादि धान्यांचीं त्यांचीं हिरवीगार शेतें, त्यांतून खेळविलेले पाट, हीं पाहून आणखी कांहीं पुढें जावें

तों एकाद्या उंच पर्वताच्या तुटक्या कड्यावरून संतापानें भयंकर शब्द करीत खालीं येणारा धबधबा दिसूं लागतो. अविचारानें उडी टाकल्यामुळें आपल्या देहाचीं हजारों शकलें उडालीं असें जाणून तो तीं एकत्र करून एकाद्या दरींतून शांतपणीं वाहूं लागतो. ही त्याची दुर्दशा पाहून त्याजवरील दोऱ्यांचा पूल थरथरा कांपूं लागतो. तेव्हां त्याजवरून जाणाऱ्या वाटसरांची अगदीं पांचावर धारण बसते. त्या धबधब्याच्या आश्रयानें चालणारी पानचक्की तर घेरी आल्याप्रमाणें गरगरा फिरूं लागते. खालीं प्रवाहाच्या बाजूस गरीब लोक आपली जाडीभरडी भाकरी खात बसत, आणि तो धबधबा, दोऱ्यांचा पूल, व पानचक्की यांची मौज पाहत राहत. त्यांचें तें रमणीय स्थळ, तेथील स्वच्छ हवा, आणि तें गोड व निर्मळ पाणी यांचा ते सुखोपभोग घेत असलेले पाहून आमच्या मनांत हेवा उत्पन्न होत असे. वर सांगितल्या जातीच्या चक्क्या या देशीं पुष्कळ ठिकाणीं आहेत. त्यांची रचना सोपी आहे. त्यांच्या साह्यानें गहूं दळतात. याच मासल्याची पानचक्की आह्मीं **नाशिकाजवळ गोदे**च्या कांठीं पाहिली. व तेथेंही तेंच काम चालूं होतें. असो. पुढें मार्ग उतरता लागला. **वितस्ता** आमच्या जवळून वाहूं लागली. पलीकडच्या बाजूस एक लहानशी पुष्करिणी दिसली. ती कमलें व पुष्पवेलींनीं शोभायमान झाली असून तिच्या कांठीं कांहीं सुंदर पक्षी मंजुळ स्वरांनीं गायन करीत होते. याप्रमाणें ज्यांची आह्मांस पूर्वीं कल्पना नव्हती असे एकाहून एक विशेष रमणीय देखावे पाहत आह्मी अस्तमानीं

उरी गांवीं जाऊन उतरलों. येथें वितस्तेवर दोऱ्यांचा एक पूल आहे. या मार्गावर झाडी अधिक दाट असून थंडीनें आपला अम्मल बजाविण्यास आरंभ केला असल्या-मुळें अंगावरील कपड्यांचा ऐन दुपारीं सुद्धां आह्मीं अना-दर केला नाहीं.

उरी येथें मुक्काम केला ह्मणून वर सांगितलें आहे. पण तेथें आह्मांस जी जागा मिळाली होती, तिजविषयीं दोन शब्द लिहिल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं, तत्रापि, या लेखाकरितां आमचे प्रियवाचक आह्मांवर घुस्सा करणार नाहींत अशी अशा करितों. या गांवीं रहदारी बंगला असून त्यांत चार वेगळ्या कोठड्या आहेत ह्मणजे चार प्रवासी उतरण्यास चांगली सोय आहे. पण आह्मीं तेथें गेलों तों दोन कोठड्यांत दोन गौरकाय बाळें येऊन उतरलीं होतीं. तिसरीबद्दल तेथील रखवालदार शिपायास विचारतां आणखी एक बालक येण्याची वर्दी आली आहे ह्मणून त्यानें सांगितलें. तेव्हां चवथी उघडून देण्यास विचारितां ती त्या लोकांस खाण्यास बसण्यास पाहिजे. व ती ९। ९॥ च्या पुढें रिकामी होईल ह्मणून त्यानें उत्तर दिलें; इतकें होईपर्यंत तास रात्र होऊन गेली. थंडी आपला अम्मल चांगला गाजवूं लागली. आह्मी कुडकुडूं लागलों होतों, पण वरील उत्तरानें आमच्या आंगांत बरीच गर्मी उत्पन्न होऊन त्या रखवाल-दारास चार खरमरीत प्रश्न विचारणार होतों, इतक्यांत विचार मनांत आला कीं, याच्याशीं वाद करणें ह्मणजे त्या गौरकाय लोकांशीं भांडण करणें आहे. आपण तर काळे आणि वृद्ध तेव्हां त्या बालकांशीं भांडून

आपणांस यश तरी कोठून मिळणार! याप्रमाणें मनाची समजूत करून आह्मी तेथून जवळ गांव होतें तेथें गेलों, आणि जाग्याचा तपास करूं लागलों. कोठेंही रात्र काढण्यापुरती बरीशी जागा मिळेना. अखेर एक जागा मिळाली. ती पाहून हें स्थल केवळ लंबकर्णाचें ठाणें असावें व त्यांचा खरा मालक अन्य स्थलीं गेल्यामुळें हें आपणांस मिळत आहे असें वाटलें. गरजवंतास अक्कल नाहीं, व अशा थंडदेशीं अगदीं उघड्यांत रहावें तर अजारी पडण्याची भीति असा विचार करून आह्मीं ती रात्र कशी तरी त्याच जागेंत काढिली.

**उरी** येथें भोजन करून पुढें निघालों. वाटेंत **पांडुगड** नांवाचा जीर्ण दशेस आलेला एक किल्ला लागला. त्यांत जातेवेळीं मोडकळीस आलेली एक कमान दृष्टीस पडली. तिचें काम इतकें भव्य व मजबूत आहे कीं, तें पाहून मन अगदीं थक्क होऊन जातें. आंतल्या बाजूस एक अगदीं पडकें शिवालय मात्र दिसलें. येथून पुढें **रामपूर** गांव लागलें. नंतर अस्तमानचे चार वाजतां आह्मी **बरामुला** येथें येऊन पोहोंचलों. याचें मूळ नांव **वराहमूल;** श्रीविष्णूनें तिसरा अवतार येथें धारण केला असल्यामुळें यास हें नांव पडलें ह्मणून कथा सांगतात. **बरामुला** हें **काश्मीरच्या** मुख्य दऱ्यांत जाण्याचें द्वार असल्यामुळें त्यास **द्वारपति** असें ह्मटलें आहे. **राम, सीता** व **हनुमान्** यांच्या नांवांचीं पवित्र कुंडें येथून थोड्या अंतरावर आहेत. **वितस्तेच्या** अगदीं कांठावर हा गांव वसलेला आहे. येथें तिचें पात्र ४२० फूट रुंद असून तिजवर एक पूल बांधलेला आहे. त्यास आठ कमानी

आहेत. या गांवाच्या खालीं नदीचें पात्र कांहीं अवकाशपर्यंत उथळ असल्यामुळें तेथें नावा चालत नाहींत. या गांवाच्या तिन्ही बाजूंस सफेदा व दुसरे वृक्ष यांची दाट झाडी लागून गेली असून एके बाजूनें **वितस्ता** वाहत गेली आहे, तेणेंकरून या गांवास मोठी शोभा आली आहे. येथून **श्रीनगरास** जाण्यास दोन मार्ग असल्याचें पूर्वींच सांगितलें आहे; पण व्यापारी व बहुतेक प्रवासी लोक होडींतून जाण्यायेण्याचें पसंत करितात. यामुळें येथें लहान मोठ्या शेंकडों होड्या दृष्टीस पडतात. कांहीं माल भरून जात येत असतात. कांहींत माल चढविण्याची व कांहींतून तो उतरून घेण्याची गडबड चालू असते. कांहीं प्रवासी टांग्यांतून उतरून पुढें **श्रीनगरास** जाण्याकरितां होडीचा ठराव करीत असतात. कांहीं **श्रीनगराहून** परत येऊन टांग्यांत किंवा एक्क्यांत आपलें सामान ठेवून परत निघण्याच्या घाईंत असतात. मि० **धनजीभाई पारसी** मेलकंट्राक्टर यांचा गुमास्ता येथें असतो. तो आपल्या नांवावर आलेला माल तपासून घेऊन तो जिकडच्या तिकडे रवाना करण्याच्या गडबडींत असतो. सारांश लहानशा बंदराप्रमाणें येथें मोठा मजेदार देखावा दिसतो. पुढें वरील गुमास्त्याचे मार्फत एक होडी भाड्यानें ठरवून तींत आमचें सामान नेऊन ठेविलें, आणि हांजीस (नावाडी) होडी चालूं करण्यास सांगितलें असतां शेजारचे ह्मणजे ( **बरामूला गांव**) पाहावयास जाण्याची त्यानें शिफारस केली. कांहीं तरी करून हा आमचा वेळ घालविणार असें वाटून आह्मी **श्रीनगर** पाहावयास आलों आहों. मार्गांतील खेडीं

पाहण्याची आमची इच्छा नाहीं ह्मणून त्यास सांगितलें. वरील गुमास्ते आह्मांजवळ बसले होते. ते आमचें बोलणें ऐकून ह्मणाले तुह्मी काश्मीर देश पाहावयास येऊन तें गांव पाहाण्यास जात नाहीं ह्मणतां हें काय? असें बोलून त्यांनीं शेजारचा गांव, किल्ला व बाग दाखविण्यास हांजीस सांगितलें. तेव्हां आह्मीं त्याजबरोबर पुलाव-रून गांवांत गेलों. येथील लोकांची ठेवण,पेहराव, त्यांची भाषा, घरें व दुकानें हीं पाहतांच आतां मात्र आह्मी काश्मीरांत खरे आलों असें वाटलें. गांव दाखवून हांजी एके बाजूस आम्हांस थोडें दूर घेऊन गेला, आणि हा पहा किल्ला म्हणाला. तेव्हां कोठें आहे तो ह्मणून विचारितां तो येथेंच होता पण पृथ्वी कांपली तेव्हां सर्व गांव व किल्ला तिच्या पोटांत गारद झाला असें त्यानें सांगितलें. तेव्हां या देशांत पांच सहा वर्षांपूर्वीं भयंकर भूकंप झाल्याचें वर्तमान आह्मी वाचीत होतों त्याचें स्मरण झालें. येथें किल्ल्याचें रूप तर कांहींच राहिलें नाहीं. पण कोठें त्याच्या पडक्या तटाचा थोडा भाग, कोठें बुरजाची खूण, कोठें दगडांचे ढीग, व मध्यें मध्यें खड्डे पडलेले असून त्यांजवर गवत उगवलेलें मात्र दृष्टीस पडलें. हा देखावा पाहून भूकंपानें केवढ्या उलटापा-लटी होतात याची कल्पना आम्हांस करितां आली आणि हा एक प्रकारचा लाभच झाला असें वाटलें. नंतर हांजी बाग दाखविण्यास नेऊं लागला. पण अस्तमान झाला होता. व कांहीं दूर नेऊन किल्ल्याच्या नमुन्या-प्रमाणें हा पहा बाग म्हणून त्यानें दाखविला तर आम-च्या पायाचें भाडें मात्र फुकट जाणार असें समजून

तिकडे न जातां आमच्या किस्तीकडे परतलों आणि ही रात्र आम्ही त्याच्या किस्तींतच काढिली व याच रात्रीं कांग्री ( शेगडी )चा आम्हीं प्रथम आश्रय केला. हिची रचना पाहण्यासारखी आहे ; पुढें रिकामे बसण्यापेक्षां कांहीं तरी उद्योग करावा असें मनांत आणून तेथें कांहीं टिपणें घेतलीं, तींच येथें देतों.

होडी, नाव, तरी, आंबी, नावाडी हे शब्द या देशीं कोणास माहीत नाहींत. येथें होडीस किस्ती व तिच्या चालकास हांजी म्हणतात. येथील होड्यांची करणावळ आपल्या देशांतील होड्यांपेक्षां पुष्कळ भिन्न आहे. या होड्या अगदीं चिंचोळ्या असून फार लांब असतात. या किस्त्यांत चार प्रकार आहेत. पैकीं दोन्हींत प्रवासी लोक बसून जातात येतात व दोन्हींत माल भरून नेतात. प्रवासी लोक ज्यांत बसतात त्यांस डुंगा व शिकारी अशीं नांवें आहेत. या दोहोंची रचना सारखीच असते पण शिकारी लहान व हलकी असते. आह्मीं जी होडी भाड्यानें केली, तिची रुंदी पुरी चार हात नसून लांबी मात्र चाळीस हात होती. तिच्यावर मध्यभागीं ८-१० हात लांबीचा एक गवती चटयांनीं मढविलेला बंगला अगर दुपाकी छप्पर होतें. या छप्पराची उंची अडीच तीन हात होती. त्यांतच आह्मी व आमचीं दोन माणसें जेवणखाण व निजणें बसणें करीत होतों. बंगल्याच्या एके बाजूस हांजी व त्याचीं मनुष्यें आपला खाना तयार करीत व तेथेंच निजत बसत. आह्मी उन्हाचे वेळीं दुसरे बाजूस बाहेर बसत होतों. एक दोन वेळां आमच्या मनुष्यानें आमच्या उपहाराची तयारी येथेंच

केली. होडी हेंच हांजीचें घर असल्यामुळें त्याच्या प्रपंचास लागणारे सर्व जिन्नस तो होडीच्या तळघरांत सांठवून ठेवितो. आमच्या होडीवर आह्मीं तिघे, हांजी, त्याचा झातारा बाप व दोन बहिणी अशीं सातजण होतों. **काश्मीर** प्रांतीं पुरुषांप्रमाणें बायकाही नावा चालवितात, इतकेंच नाहीं पण त्यांच्याप्रमाणें त्या घष्ट-पुष्टही असतात. **काश्मीरांतील** नावाड्यांच्या बायका सुरेख असतात असें कांहीं युरोपियनांनीं आपल्या प्रवास-वर्णनांत लिहिलें आहे. या दोघी बहिणींस पाहून वरील लेखांत पुष्कळ सत्यता आहे असें आह्मांस वाटलें. असो. पुढें घड्याळ पाहिलें तों सात वाजले, थंडी चमकूं लागली. तेव्हां कांहीं उपहार करून ऊर्णावस्त्रांचा व कांग्रीचा आश्रय करून नित्याप्रमाणें कुंभकर्णाचें नामस्म-रण आरंभिलें. पण आमच्या मनास विकृति झाली असल्यामुळें तो आह्मांस जलदी प्रसन्न होत नसे. असो.

दुसरे दिवशीं पाहाटे हांजीनें किस्ती हांकारण्याचें काम चालू केलें. सकाळचे आठ वाजेपर्यंत थंडी अति-शय असल्यामुळें आह्मांस बिछाना सोडणें इष्ट वाटलें नाहीं. येथून **श्रीनगरास** जातांना बाजूस **सोपूर, दबगांव, बांडीपूर, हजन, संबळ, शादीपूर** व दुसरीं दोन तीन खेडीं लागतात. **सोपूर**जवळ **वितस्ता वुलर** सरोवरांतून बाहेर पडते. **शादीपूरा**जवळ **वितस्तें**त एक शिवस्थान आहे. त्याच्याजवळ **ललितादित्य** राजाच्या मंत्र्यानें जलसमाधि घेतली असें राजतरंगिणींत लिहिलें आहे. असो. वर सांगितलेल्या गांवांपैकीं एक दोन गांवीं मात्र प्रवाशांस लागणारी शिधासामुग्री सरासरी मिळते पण

दहीं मात्र मिळत नाहीं. दबगांव हें बरामुलाहून ९ मैल आहे. दबगांव येथें हाप ( एक वनस्पति )च्या विस्तीर्ण बागा आहेत. हजन येथें एक सरकारी पागा असून तींत शेंकडों घोडीं आहेत. इकडे हांजी व त्याच्या बहिणी यांनीं आळीपाळीनें किस्ती हांकण्याचें काम चालू ठेविलें होतें. नाव चालविण्याच्या कामीं जातेवेळीं वल्ह्यांचा उपयोग फार करीत नाहींत. नावेस एक लांब दोरी बांधून तिचा शेवट पुरुष किंवा बायको पाठीकडून डोक्यावरून घेऊन तें पुढच्या बाजूस छातीस बांधितात आणि एक बैली मोटेप्रमाणें नदीचे कांठानें नाव ओढीत जातात. कित्येक वेळां दोन पुरुष किंवा दोन बायका अगर एक पुरुष व एक बायको वर सांगितल्याप्रमाणें दोरी बांधून नाव ओढीत जातात. या देशांत अत्यंत थंडी असल्यामुळें दुपारीं भोजनाचे वेळीं सुद्धां आह्मी आंगावरील सर्व कपडे काढीत नव्हतों व लाडक्या कांग्रीचा आश्रयही बहुधा सर्वकाल असेच, पण आमचे हांजी व त्याच्या बहिणी ऐन थंडीच्या वेळीं सुद्धां पाणी, चिखल व कांटेकुटे यांतून अनवाणी पायांनीं जनावरांप्रमाणें नाव ओढीत चालत. पोटाची खळी भरण्याकरितां गरीब लोक नाहीं तसले हालवनवास सोशितात. पण सरासरीच्या मानानें यांस रोजचा एक आणा सुद्धां मजुरी पडत नाहीं; त्यामुळें त्यांस हत्तीभोग तांदूळ, मका, शिंगाडे, कमळाचे देंठ व दुसरीं कंदमुळें यांजवरच बहुतकरून निर्वाह करावा लागतो. या लोकांस चहा पिण्यास फार आवडतो आणि तो घेण्यास दोन चार आणे बक्षिस ह्मणून कोणी दिले असतां ते मोठे खूष

होऊन पाहिजे ती चाकरी करण्यास तयार असतात. अशा प्रकारें मार्गक्रमण करीत असतां सकाळचे अकरा वाजतां आह्मी **सोपूर** गांवाजवळ आलों. याचें जुनें नांव **कंबूर** होतें. हा गांव नदीच्या दोहों तिरांवर वसलेला असून त्यास जोडणारा येथें एक पूल आहे. **गुलमर्ग** (पुष्पवाटिका) व **लोलाबदरी** येथें जाण्यास येथूनच मार्ग फुटतात. **सोपूर** येथें नदीतीरीं उतरून भोजन करून घेतलें. नंतर पुन्हा किस्तींत बसलों. केव्हां पुस्तक वाचण्यांत, केव्हां नदीतीरची वनश्री पाहण्यांत व केव्हां हांजीशीं गप्पा मारण्यांत आह्मी वेळ घालवीत असूं. याप्रमाणें जलमार्ग कंठीत असतां पश्चिम दिशेनें लालभडक शालू परिधान केला. त्याच्या तेजानें ती सर्व दिशा आरक्त दिसूं लागली. तेव्हां हांजीनें होडी नदीच्या कांठीं उभी केली. जवळ गांव दृष्टीस पडलें नाहीं. आजची रात्रही आह्मीं होडींतच काढिली. आमच्या शेजारीं आमच्या सारखे प्रवासी व व्यापारी लोक यांच्या होड्या येऊन उभ्या राहिल्या आणि या रात्रीं आह्मांस त्यांचीच सोबत होती.

दुसरे दिवशीं पहाटे दोन तास रात्र घेऊन हांजीनें किस्ती चालू केली. सूर्योदयाचे वेळीं बंगल्याचा पडदा वर करून पाहिलें तों चोंहोंकडे जलमय असून कांहीं लाटा मारीत असलेल्या दृष्टीस पडल्या. आमची होडी समुद्रांत कोठून यावी असा विचार मनांत येऊन हांजीस पुसलें, तेव्हां आह्मी दर्यांत आलों आहों ह्मणून त्यानें सांगितलें. तेव्हां **वितस्ता** नदी **वुलर** सरोवरांत येऊन बाहेर पडते व यांत भयंकर तुफानें होतात, असें आह्मीं वाचलें

होतें त्याचें लागलेंच स्मरण झालें. तेव्हां या तुफानाविषयीं हांजीस विचारितां ऐन दुपारचे वेळीं येथें नेहमीं वावटळी सुटून मोठ्या लाटा मारूं लागतात आणि उन्हाळ्यांत तर हा सर्व दर्या तुफान होऊन किस्त्या पालथ्या पाडतो करितां त्यावेळीं येथें कोणीही त्या चालवीत नाहींत, असें त्यानें सांगितलें. या भयंकर तुफानांत येथील **गुलाबसिंग** महाराज एके प्रसंगीं सांपडले होते. तेव्हां त्यांजबरोबर असलेल्या तीनशें नौकांचा त्यांच्यांतील सेवकजनसह नाश झाला. खुद्द महाराज मात्र मोठ्या पराकाष्ठेनें बचावले असा लेख आहे. या सरोवराचा परिघ ३० मैल आहे. या जलाशयाविषयीं अशी एक आख्यायिका आहे कीं **चंद्रपूर** नांवाचें गांव पूर्वकालीं येथें होतें. पण **दुर्वास** ऋषीच्या शापानें तें नाहींसें होऊन तेथें हें सरोवर बनलें. यांत पानकोंबडीं व दुसरे जलचर–पक्षी आणि मासे यांची शिकार चांगली सांपडते व येथें शिंगाडे फार पिकतात. एवढा मोठा जलाशय आपल्या देशांत दुसरा कोठें नाहीं. याच्या पूर्व कांठावर उत्तरेस **बांडीपूर** व दक्षिणेस **संबळ** हीं गांवें आहेत. याच्या मुखाजवळ **लंका** नांवाचें एक छोटें बेट आहे. त्यांत तुतीचीं व दुसरीं झाडें असून तीं द्राक्षवेलींनीं अगदीं गुंफून गेलीं आहेत. आगस्ट महिन्यांत या वेली द्राक्षाच्या घोसांनीं अगदीं ओथंबून जातात.

या स्थलीं जो अति मनोहर देखावा आमच्या दृष्टीस पडला, त्याचें हुबेहूब चित्र रेखण्यास आह्मीं तर असमर्थ आहों. पण आमच्या प्रियवाचकांस त्याची कांहीं कल्पना यावी ह्मणून होईल तेवढें त्याचें वर्णन देण्याचा यत्न करितों.

Extra happy metaphor throughout!



यावेळीं बालार्कानें आपलीं आरक्त व प्रज्वलित किरणें सर्व भूतलावर फेंकण्यास आरंभ केला होता, तेणेंकरून अष्टदिशारूप ललना श्रृंगारल्या सारख्या दिसून त्यांस मर्यादित करूं पाहणारा जो हिमाचल त्याजकडे पाहून त्या हसूं लागल्या. तसेंच त्यांस आड येणारीं जीं त्याचीं शिखरें तीं त्यांनीं आपला पराजय केला असें पाहून संतापानें लाल झालीं. या पराभवानें कांहींचीं मुखें तर काळींठिक्कर होऊन तीं नेत्रावाटें जलधारा सोडूं लागलीं. या कलहांत आपण पडावें तर गोष्ट कोणत्या थरास जाईल याचा नियम नाहीं असा विचार करून वायु स्तब्ध राहिला. आपणास आधारभूत जीं शिखरें त्यांचा पराजय पाहून सर्व वृक्ष तटस्थ उभे राहिले. या पराभवावर आच्छादन घालून कलहाचा कसा तरी समेट करावा अशा हेतूनें मेघमंडळ दोघांमध्यें आडवें आलें. तत्रापि संतापानें लाल व भीतीनें कंपायमान झालेलीं तीं शिखरें जलाशयांत मधून मधून दृग्गोचर होत होतीं या बलाढ्यांच्या भांडणांत आपली धडगति दिसत नाहीं, असें पाहून सर्व पक्षी कलकलाट रूपानें आक्रोश करूं लागले. पृथ्वीवर हा काय दंगा चालला आहे त्याचा शोध करण्याच्या बुद्धीनें जलचर प्राणी वारंवार डोकीं वर काढीत आणि क्षणमात्र इकडे तिकडे अवलोकन करून सट्दिशी खालीं जात. अशा धांदलींत कांहीं काल गेला. अखेर बालार्काचा वरचष्मा झालेला पाहून मेघमंडळानेंही पळ काढिला. तेव्हां वायूही जयपक्षाचा स्वीकार करण्यास त्याच दिशेनें वाहूं लागला. इकडे हिमाच्छादित शिखरें संतापानें जीं लाल दिसत होतीं तीं

उत्तम चांदी अग्नींतून तावून काढिल्यावर जशी चमकते तशीं चमकूं लागलीं. हें पाहून त्यांजवरील वृक्षही माना डोलवूं लागले. याप्रमाणें या कलहाचा आरंभ व शेवट जाहला. पण आमचे हांजी साहेब व त्याच्या बहिणी यांनीं तिकडे मुळींच लक्ष न देतां आपली होडी हांकारण्याचें काम चालू ठेविलें होतें. वर सांगितल्या प्रकारचे अपूर्व देखावे पहात व होडींतील अंदोलनाचा उपभोग घेत सुमारें दहा वाजतां नदीच्या कांठीं आह्मी एका खेड्याजवळ आलों. त्याचें नांव टिपून घेण्यास विसरलों. येथें भोजन करून अस्तमानीं **शादीपूर** येथें नावेंतच रात्र काढिली. **शादीपूर** आणि **सोपूर** यांच्या दरम्यान **नारू** नांवाचा एक कालवा काढिलेला असून **वुलरांत** तुफान होतें तेव्हां किस्त्या या कालव्यांतून चालवितात.

नित्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं हांजी व त्याच्या बहिणी यांनीं होडी ओढण्याचें काम सुरू केलें. **श्रीनगर** केव्हां दृष्टीस पडेल ह्मणून आह्मी मोठे सोत्कंठ झालों होतों, करितां भोजनास नदीचे कांठीं न उतरतां नावेंतच सोजी, दशम्या व दुसरे दोन जिन्नस तयार करवून तेथेंच उपहार केला. आज रोजीं सफेदा, चिनार व दुसरे वृक्ष यांची दोहों तीरीं दाट झाडी दृष्टीस पडत गेली. वाटेंत जागोजाग कुरणें लागलीं. त्यांत गाई, घोडीं व बकरीं हीं यथेच्छ चरून **वितस्तेचें** अमृततुल्य पाणी पिऊन आनंदांत असल्याचें त्यांची मुद्रा दाखवीत होती. **श्रीनगर** आमच्या केव्हां नजरेस पडेल असें वारंवार हांजीस विचारीत होतों. आमच्या अत्युत्कंठेमुळें आमची होडी आजरोजीं फार सावकाश चालली आहे असें

वाटे. अखेर बारावर तीन वाजण्याचे सुमारास **श्रीनगर** आह्मांस दृग्गोचर झालें. तत्रापि तेथील राजवाडे, मंदिरें, मशिदी व शहरांतील दुसऱ्या इमारती यांजवळ जाण्यास आणखी एक तास लागला. **श्रीनगर** शहर पाहण्याचा विचार आमचे मनांत पुष्कळ वर्षें घोळत होता आणि तो घडून आला ह्मणून एके प्रकारें मोठा संतोष वाटला. पण जसा घडून यावा तसा आला नाहीं असा विचार मनांत येऊन तें फार खिन्न झालें. असो. या मार्गक्रमणरूप वर्णनानें आमचे प्रियवाचक बरेच थकले असतील; करितां आह्मी आतां थोडक्या अवकाशांत त्यांस बिऱ्हाडीं नेऊन विश्रांति देतों अगर घेतों. **रावळपिंडी** येथें **श्रीनगरांतील** तीन बड्या कामगारांस पत्रें मिळवून ठेविलीं होतीं, तीं बाहेर काढिलीं आणि त्या पत्रांचे मालक कोठें राहतात, याचा तपास करूं लागलों असतां **श्रीनगरचे** गव्हरनर आपल्या महाराजांच्या स्वारीबरोबर **जम्मूस** गेले असल्याचें समजलें. तेव्हां दुसऱ्या कामगाराचा शोध केला, तेही बाहेर गेले असल्याचें लोकांनीं सांगितलें. अर्थात तिसरें पत्र काढिलें तें **राय बहादूर पंडित सुराजकोल** यांचे नांवाचें होतें. हे गृहस्थ महाराजांच्या कौन्सलचे सिनियर मेंबर आहेत. आह्मी यांच्या राहण्याचा तपास करून तेथें गेलों. पत्र त्यांस पावतें केलें. त्यांनीं आमची भेट घेऊन जरूर असलेल्या सर्व गोष्टींची आह्मास मदत करण्यास आपल्या हेडक्लार्कास सांगितलें. हे गृहस्थ मोठे सभ्य व पोक्त विचारी दिसले. आह्मीं त्यांचा निरोप घेतला आणि त्यांनीं दिलेल्या बिऱ्हाडीं जाऊन उतरलों.

## हवापाणी.

येथील हवेचें मान आपल्या देशापेक्षां फार भिन्न आहे. मार्च महिन्याचे अखेरीस व एप्रिलचे आवलीस येथील दऱ्यांत झंझावात सुटून पाऊस व गारा पडतात आणि मे व जून महिन्यांत पावसाचीं पुष्कळ सरवटें येतात. जुलई किंवा आगस्ट महिन्यांत थोडे दिवस **श्रीनगर** येथें फारच उष्मा होतो. तेव्हां मोठी गर्जना होऊन विजा चमकूं लागतात आणि त्याबरोबर केव्हां केव्हां मोठा पाऊस पडून व पर्वतांवरील बर्फ वितळून **वितस्तेस** दांडगा पूर येतो. पुढें सप्तंबर महिन्यांत पुनः पुष्कळ पाऊस पडतो, अक्टोबर व नवंबर महिन्यांत केव्हां केव्हां थोडा पडतो. या दऱ्यांत सर सालांत २०।२५ इंचांपेक्षां अधिक पाऊस पडत नाहीं, पण भोंवतालच्या पर्वतांवर हिमाचलाच्या बाकीच्या भागांप्रमाणें विपुल पडतो. जुलई व आगस्ट महिन्यांत **श्रीनगर** येथें अति उष्मा भासूं लागतो. तेव्हां उष्णतामापक यंत्रांत पारा ६०।७० अंश पर्यंत चढतो. या दोन महिन्यांतही केव्हां केव्हां थोडासा पाऊस पडतो. यावेळीं साहेब लोक हवा बदलण्याकरितां **गुलमर्ग**, **सोनामर्ग** किंवा दुसऱ्या थंड स्थलीं जाऊन राहतात. त्यावेळीं येथें ३०।३५ अंश पर्यंत पारा चढतो. नोव्हेंबर महिन्याचे मध्यापासून धुकें पडावयास लागून महिना अखेर सर्व दरा त्यानें व्यापून जातो. पुढें दिसेंबर अवलपासून फेब्रुवारीचे मध्यापर्यंत अति कडक थंडी पडते. त्यावेळीं दऱ्यांत ३०।३२ अंशपर्यंत पारा उतरतो व

तोच भोंवतालच्या उच्च पर्वतांवरील स्थलीं १८ अंशापर्यंत उतरतो. या दिवसांत बर्फानें सर्व पर्वत आच्छादिले जातात, इतकेंच नाहीं पण एकादे वर्षीं नद्या व सरोवरें यांतील पाणी सुद्धां गोठून त्यांजवर ४।६ इंच जाडी बर्फाचा थर बनतो. इ० स० १८८७ सालच्या हिंवाळ्यांत दल सरोवरांतील पाणी गोठून त्याच्या पृष्ठभागावर चार इंच जाड बर्फाचा थर बनला होता आणि साहेब लोक त्याजवर लोखंडी जोडे घालून कित्येक दिवस खेळत होते. या राज्यांत सर्व प्रकारची हवा आहे असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं, कारण मुख्य दऱ्यांत व त्याच्या भोंवतालच्या पर्वतांवर जशी अति कडक थंडी पडते तसाच जम्मू येथें उन्हाळाही अतिशय होतो.

या हवेंत असा एक विलक्षण गुण आहे कीं कांहीं स्त्रिया त्यांच्या प्रकृतीस विकृति झाली असल्यामुळें गरोदर राहत नव्हत्या. पण हवा पालटण्याकरितां त्या या देशांत येऊन कांहीं महिने राहिल्या आणि गरोदर होऊन मातृपद पावल्याचीं उदाहरणें अनेक आहेत असें इन्स साहेब आपल्या ग्रंथांत लिहितात. सपाट प्रदेशांतून पर्वतांकडे जसजसें उच्च प्रदेशांत जावें तसतशी अल्पावकाशांत हवा बदलत जाऊन तींत उत्पन्न होणारें भिन्न जातींचें उद्भिज दृष्टीस पडूं लागतें. श्रीनगरच्या आसमंतांतील प्रदेश पावसाळ्यांत पाण्यानें आच्छादला जातो आणि त्यांत भाताची लागवड करितात. यामुळें येथील हवा अगदीं बिघडून जाते आणि एक जातीचा शीत ज्वर ज्यास इंग्रजींत "मलेरिया" ह्मणतात, तो केव्हां केव्हां उत्पन्न होतो.

## पर्वत.

या सर्व देशांतील पर्वत हिमालयाचे फांटे आहेत. त्यांतील कांहीं मुख्यांचीं नांवें सांगतों. **पिरपंजाल** ( पंतसाल ) नांवाची रांग या देशाच्या मध्यभागीं आहे. तिची लांबी ४०० मैल आहे. तींत **मली** व **हरटोपा** नांवांचीं दोन शिखरें आहेत. त्यांची उंची अनुक्रमें १३,९९० व १३,०४० फूट आहे. उत्तरेस **हरमुख** व **अमर** नांवांचीं शिखरें आहेत. तीं **श्रीनगरा**पासून दृष्टीस पडतात. त्यांची उंची १६,९०० व १६,००० फूट आहे. **गुलमर्ग, सोनामर्ग, झेजीमर्ग** व **रुबमर्ग** या पुष्पवाटिका याच पर्वतावर आहेत. यांतील पहिल्या दोन स्थलांचें वर्णन पुढें देणार आहों. उत्तरेस **गिल्जित** प्रांतांत १८,००० पासून २४,००० फूट उंचीचीं शिखरें आहेत. ईशान्येस **काराकोरम** नांवाच्या पर्वतांत एक शिखर तर २८,२६५ फूट उंच आहे. **नंगा** पर्वत या देशाच्या वायव्येस आहे. त्याची उंची २६,६२९ फूट आहे. उत्तरेकडील पर्वतांवर झाडी विशेष नसल्यामुळें ते शोभिवंत दिसत नाहींत. पण ते अधिक कालपर्यंत बर्फाच्छादित असतात व त्यांजवरून अनेक प्रवाह खालीं येत असतां त्यांचे धबधबे बनले आहेत. दक्षिणेकडील पर्वतांवर झाडी दाट असल्यामुळें तेथील वनश्री मोठी रमणीय दिसते. या देशाच्या आग्नेयेस **कैलास** नांवाचा पर्वत आहे. त्याची उंची २२,००० फूट आहे. पुराण-प्रसिद्ध शंकराचा कैलास तो हाच असावा असें अनुमान आहे. त्याचें **नंगा** नांवाचें शिखर २६,६०० फूट उंच

आहे. या पर्वतांत खोल व लांब दरे आणि खिंडी अनेक आहेत. येथील अति खोल दरे स्विट्झर्लंडांतील महान् दऱ्या एवढे आहेत.

या पर्वतांवर मोठमोठाले ग्ल्यॉसिअर्स (बर्फाचे डोंगर) आहेत. त्यांतील कित्येकांची लांबी ९०।६० मैल आहे. ते कित्येक वर्षेंपर्यंत पर्वतांच्या शिखरांवरून खालीं घसरत येत असून त्यांच्या गर्भांत हत्तीसारखे मोठे डोंगराचे खडपे असतात.. यांच्या जवळून प्रवासी किंवा यात्रेकरू लोक मार्गक्रमण करीत असतां वाद्यांचा किंवा हरिनामाचा मोठा गजर करीत नाहींत, कारण तसें केलें असतां हवा खवळून जाते आणि त्यायोगानें वर सांगितलेल्या बर्फाच्या डोंगरांस गति प्राप्त होऊन ते एकाएकीं खालीं कोसळून येऊं लागतात आणि त्यांच्या तडाक्यांत जे प्राणी सांपडतील त्यांचा चुराडा होऊन जातो. **जहांगीर** बादशहाची स्वारी **पिरपंजाल** नांवाच्या पर्वतावरून एक वेळ जात असतां, त्यानें करणा व झांज हीं वाद्यें वाजविण्यास बुध्या हुकूम केला. तेव्हां बर्फाचा एक डोंगर त्याजवर येऊन कोसळण्याचा प्रसंग आला होता, परंतु त्यांतून तो मोठ्या मुशकिलीनें बचावला, असें प्रसिद्ध **फ्रेंच** प्रवासी डॉक्टर **बर्निअर** आपल्या ग्रंथांत लिहितो.

**शंकर** (तक्तीसुलिमान) व **हरी** नांवाच्या दोन लहान टेंकड्या **श्रीनगरा**जवळ आहेत. **जेलम** नदी यांच्या मधून वाहते. या टेंकड्याविषयींचें विशेष वर्णन पुढें दिलें आहे. येथील पर्वतांचीं उच्च शिखरें वर्षांतून आठ महिने बर्फानें आच्छादलेलीं असतात. तत्रापि पूर्वकालीं जितकें बर्फ

पडत असे तितकें अलिकडे पडत नाहीं असें ह्मणतात. **कप्तान मांटगामरी** नांवाचे रायल इंजिनियर हे **पिर-पंजाल** पर्वताच्या शिखरावर सर्व्हेचें काम करित असतां तुफान किंवा वादळ नसून विद्युत् मात्र इतकी खडतर होती कीं आपले थिओडलाइट ( कोन मापण्याचें यंत्र ) च्या बचावाकरितां तिचा वाहक आपल्या बरोबर न्यावा लागे असें ते लिहितात. आकाश निरभ्र असून हवा स्वच्छ असते तेव्हां या पर्वतांवरून १३९ मैल अंतरा-वरचे **लाहोर** येथील मनोरे चांगले **दृष्टीस** पडतात.

## नद्या.

या भूस्वर्गांत मुख्य नदी **झेलम** ही होय. करितां हिजविषयीं प्रथम थोडेंसें वर्णन देतों. या नदीस संस्कृतांत **वितस्ता** असें नांव आहे. वेदांतही हिचें नांव आलेलें आहे. राजतरंगिणींत हेंच नांव जागोजाग येतें. **काश्मीरांतील** पंडित लोकांतही हेंच नांव आज मितीस चालू आहे. **शिकंदर** बादशहानें या देशावर स्वारी केली, तिचे वर्णनांत हिला **हिडॉसपिस** असें ह्मटलें आहे. यवन लोक हिला **बिहत** असें ह्मणतात. हिचें पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व अमृतासारखें मधुर असल्यामुळें हिला **स्वर्गनदी** असेंही क्वचित् ह्मटलें आहे. तीन नद्या एकत्र होऊन ही नदी बनते. हिचा उगम इशान्येकडील पर्वतांत **वरनाग** नांवाचा एक झरा आहे तेथें होतो. येथून ती वायव्य गामिनी होऊन सर्व दऱ्यास दुभागते व **शहाबाद, इसलामबाद** व **पांपूर** या गांवांवरून **श्रीनगरांतून वुलर** नांवाच्या सरो-

वरास जाऊन मिळते. वरील सरोवरास मिळण्यापूर्वी सिंद नांवाची नदी उत्तरेकडील पर्वतांत उगम पावून तिला मिळते. नंतर हा सर्व जलौघ **पिरपंजाल** पर्वतांतील **बरामुला** नांवाच्या अरुंद खिंडींतून बाहेर पडतो. उगमापासून **बरामुला**पर्यंत **झेलम**ची लांबी १३० मैल आहे. पैकीं ७० मैलांत नावा चालतात. **श्रीनगरा-**जवळ तिचें पात्र २६० फूट रुंद आहे. **मुजाफरबाद** येथें हिला **किसनगंगा** ( कृष्णगंगा ) येऊन मिळते. हिचा उगम **बालतिस्तान** (लहान तिबेट ) येथें होतो. **वितस्ता चिनाब** नदीस **तिम्मू** नांवाचे गांवाजवळ मिळते. हिची सर्व लांबी ४२० मैल आहे. पर्वतांतून या नदी इतकीं जागोजाग वळणें घेत जाणाऱ्या नद्या थोड्या सांगतां येतील. हिच्या कांठीं मुख्य गांवें **श्रीनगर, झेलम, पिंडदादरखान, मिआनी, भेरा** व **शहापूर** हीं आहेत. जुलई व आगस्ट महिन्यांत हिला पूर येतो तव्हां हिचें पाणी बारा फूट चढतें. हिच्यावर तेरा पूल आहेत. पैकीं **श्रीनगर** येथें सात व बाकीचे दुसऱ्या गांवांजवळ आहेत.

आतां येथील दुसऱ्या नद्या किंवा मोठे प्रवाह यांज-विषयीं थोडीशी माहिती देतों. **किसनगंगा, दुधगंगा, पोहरा, सिंद, मारवाड, विश्वा, नैनसूख, लिडार** इत्यादि लहान मोठे अनेक प्रवाह आहेत. यांतील बहु-तेक प्रवाह **वितस्ते**स येऊन मिळतात. या देशाच्या वायव्येस **तिलेल** नांवाच्या दऱ्यांत दोन तीन ओहोळ एकत्र होऊन **किसनगंगा** ही नदी बनली आहे. ही **कोहाला** नांवाच्या गांवाजवळ **वितस्ते**स येऊन मिळते.

**दुधगंगा** हिचा उगम **पिरपंजाल** पर्वतांत होऊन ती **वितस्तेस श्रीनगरा**जवळ मिळते. **मारवाड** व **कामित** हे दोन प्रवाह एकत्र होऊन **पोहरा** नदी बनते. ही **सोपूर** गांवाच्या खालच्या बाजूस **वितस्तेस** मिळते. **सिंद** हिचा उगम **अमरनाथ** नांवाचें प्रसिद्ध जें शिवस्थान याच्या जवळील पर्वतांत होऊन तिचा संगम **वितस्तेशीं** ज्या गांवाजवळ होतो त्यास **शादीपूर** ( लग्नाचें गांव ) असें ह्मणतात. **नूरजहान** हिनें या नदीवर एक पूल बांधला होता. **विश्वा** ही नदी **कौंसनाग** नांवाच्या सरोवरांत उगम पावते. हिच्या प्रवाहानें **हरिबल** नांवाचा एक सुरेख धबधबा बनला आहे. **नैनसूख** ही **लोसूर** नांवाचें सरोवरांतून निघून **पाटन** गांवाजवळ **वितस्तेस** मिळते. **लिदार** ही **इसलामबाद** गांवाचे खालीं पांच मैलांवर **वितस्तेस** मिळते. **सिंद, पोहरा** आणि **लिदार** या उजवीकडून **वितस्तेस** मिळतात. यांतील कांहींवर दोऱ्यांचे पूल केलेले आहेत. त्यांची रचना मोठी चमत्कारिक आहे. अनभ्यस्त मनुष्यास हे पूल ओलांडून जाणें असल्यास फारच सावध रहावें लागतें. पण यांतील कांहींवरून **काश्मीरी** तट्टें सुद्धां जातात.

## सरोवरें.

या देशांत लहान मोठीं सरोवरें अनेक आहेत. **वुलर** हें सर्वांत मोठें होय. त्याचें वर्णन आम्हीं मार्गक्रमण भागांत दिलेंच आहे. दुसरें **दल** हें **श्रीनगर**च्या ईशान्येस आहे. त्याची लांबी सुमारें पांच व रुंदी अडीच मैल आहे. त्यांतील पाणी आठ दहा फुटांपेक्षां अधिक खोल

नसतें. याच्या वायव्य कांठावर **नजिब** नांवाचा एक बाग आहे. तेथें मात्र पाण्याची खोली २९-३० फूट आहे असें ह्मणतात. **सोंतीकल** नांवाचा कालवा या सरोवरांतून निघून **वितस्तेस शेरगडी** राजवाड्याचे खालच्या बाजूस येऊन मिळतो. याची लांबी सुमारें एक मैल असून रुंदी ९० फूट होईल. याच्या दोहों-बाजूस **पॉप्लर** नांवाचे शेंकडों वृक्ष लावले असून त्यांत कांहीं **चिनार**ही आहेत. हें सरोवर पाहण्यास आम्ही ऐन दोन प्रहरीं निघालों. राजवाड्याचे थोडे खालीं जातांच कालवा लागला. त्यांतून आमच्या हांजींनीं किस्ती हांकली. डावे बाजूस **धर्मदास** नांवाचें लहान पण टुमदार मंदिर दिसलें. उजवे बाजूस **चिनार** बाग लागला. तेथें चिनार वृक्षांची दाट झाडी असल्यामुळें त्यास वरील नांव पडलें आहे. या बागेंत साहेब लोक तंबू देऊन राहतात. थोडेंसें पुढें गेलों तों उजवीकडे **शंकर** व डावीकडे **हरि** या नांवाचे पर्वत दिसूं लागले. हा देखावा पहात पहात आम्ही कालव्यांतून **दल** सरोवराच्या दाराजवळ गेलों. तेथें सरोवरास एक मोठें धरण बांधलेलें असून त्यास एक द्वार राखिलें आहे. सरोवरांतील पाणी बाहेर सोडण्याचे वेळीं हें द्वार उघडतात. तेव्हां कालव्यांत जो पाण्याचा लोंढा येऊं लागतो त्यास ओढ फार असते. यामुळें या द्वारांतून किस्ती सरोवरांत नेतांना ती उलटण्याचा संभव विशेष असतो. आह्मी ज्या दिवशीं हें सरोवर पाहण्यास गेलों, तेच दिवशीं सकाळीं द्वार उघडलें होतें ह्मणून कालव्यांतून येणाऱ्या पाण्यास ओढ फार होती. हें स्थल मोठें धोक्याचें असून तेथें वारंवार दगे होतात,

ह्मणून आमच्या हांजींनीं सांगितलें. अर्थात् हें द्वार ओलांडून सरोवरांत कसें जातों ह्मणून आह्मांस मोठी भीति पडली होती, पण हांजींनीं मोठी मेहनत करून हुशारीनें किस्ती आंत नेली; तेव्हां आमची काळजी दूर झाली.

येथें जी अति मनोहर वनश्री आमच्या नजरेस पडली तिचें वर्णन करावें तितकें थोडेंच होणार. नाना प्रकारच्या कमलवेली व दुसऱ्या वेली, शिंगाडे, लव्हाळा व शेवाळ यांचा सरोवराच्या पृष्ठभागावर गालिचा पसरल्या सारखा दिसत होता. कमल पत्रांवरील जलबिंदु मौक्तिकां-प्रमाणें शोभत होते. सरोवराच्या उत्तर व पूर्व बाजूंस पर्व-तांनीं गरका दिला असून नजर जसजशी दूर फेकूं लागलों तसतशीं एकापेक्षां एक अधिक उंच होत गेलेलीं शिखरें दृष्टीस पडूं लागलीं. यांतील कांहींनीं शुभ्र, आरक्त, श्याम व हरित रंगांचीं वस्त्रें परिधान केल्यासारखा भास होत होता. कांहींवरून लहान मोठ्या आकारांचे मेघ-समूह ओळकंबत असलेले पाहून हे कां हत्तींचे कळप तृषा शांत करण्यास पायथ्याजवळच्या झऱ्याकडे खालीं उतरत आहेत कीं काय असा भास होई. कांहीं सूर्य किरणांनीं संतप्त होऊन लाल झालीं असून त्यांच्या देहां-तून जलधारा वाहत होत्या. कांहीं अभ्रजालाच्या आड होऊन त्याचा आश्रय करूं पाहत होतीं. या तापापासून आपला बचाव करण्याकरितां कांहींनीं मोठमोठे वृक्ष मस्तकीं धारण केले होते. त्यांच्या पायथ्यापाशीं प्लेन, चिनार व टील इत्यादि वृक्षांची दाट झाडी असून तींतून शालीमार बाग, नजीबबाग, चष्माषाई, पेरीमहाल व दुसरीं रम्य स्थलें व द्राक्षवेलींचे मंडप हीं दृग्गोचर

होऊं लागलीं. यांच्या योगानें सरोवरास मोठी शोभा आली आहे. या बागांचें विशेष वर्णन पुढें देणार आहों. कांहीं पुढें गेलों तों डाव्या बाजूच्या झाडींतून **रघुनाथपूर** नांवाचें गांव वर डोकावूं लागलें. उजवे बाजूस **सोन-लंका** व **रूपलंका** नांवांचीं सुंदर उपद्वीपें दिसूं लागलीं. **सोनलंका** हें बेट **जहांगीर** बादशहानें आपल्या प्रियेकरितां तयार करविलें होतें असें सांगतात. हा सर्व देखावा पहात किस्तींतून थोडें पुढें गेलों तों तरंगत्या बागा लागल्या. या बागांस तेथील लोक ( राद ) असें ह्मणतात. लांब पसरणाऱ्या वेली किंवा लव्हाळ्यासारखें उंच गवत कापून त्याच्या जुड्या बांधितात आणि सरोवराचा उथळ भाग पाहून त्याजवर हंतरतात. नंतर पुन्हां त्यांजवर थोडेंसें गवत टाकून वर माती पसरितात. याप्रमाणें जमीन तयार करून तिजवर निरनिराळ्या प्रकारचीं बुटुकलीं फुलझाडें, वेली, कलंगडीं, काकड्या इत्यादिकांची लावण करितात. वसंतऋतूंत भोंवतालचा जलाशय चित्रविचित्र रंगांच्या कमलांनीं आच्छादिला जातो आणि या बागांतील वृक्षांस व वेलींस फलपुष्पांचा बहार येऊन जेव्हां त्या तरंगूं लागतात तेव्हां हा प्रदेश किती रमणीय दिसत असेल! हें अप्रतिम सृष्टिसौंदर्य पाहण्याचा लाभ आह्मांस झाला नाहीं. तत्रापि ही वेळ पावेतों जेवढा देखावा दृष्टीस पडला तेवढ्यानेंच आमचें मन इतकें रममाण होऊन गेलें कीं, तेथून बिऱ्हाडीं परतावेंसें वाटेना. पण रात्रीं तेथें राहण्याची पूर्वीं तजवीज केली नसल्यामुळें परतणें भाग पडलें.

**मानसबल** हें सरोवर **वुलरच्या** आग्नेयेस **वितस्ता**

नदीच्या उजव्या तीरीं आहे. यांच्यामध्यें एक कालवा काढलेला आहे. या सरोवराची लांबी तीन व रुंदी एक मैल आहे, पण यांतील पाणी मात्र ४०।९० फूट खोल असतें. यांत नाना प्रकारच्या कमलवेली आहेत. जुलई महिन्यांत त्यांस बहार येतो. तेव्हां सर्व सरोवर सुंदर कमलांनीं आच्छादिलें जाऊन त्याजवरील देखावा मोठा रमणीय दिसतो. **बिल्हण** कवीनें येथील वनश्रीचें सुरेख वर्णन दिलें आहे. येथील हवा मोकळी व आरोग्य-कारक आहे. एकांत पण रम्य स्थलीं राहण्याचें मनांत आलें ह्मणजे **नूरजहान** येथें जाऊन राहत असे. तिजकरितां **जहांगीर** बादशहानें याच्या कांठीं एक आरामगृह बांधिलें होतें. येथें एकाद्या उंचवट्यावर उभें राहून पाहिलें असतां **सिंद** नांवाच्या दऱ्यांतील कांहीं भाग दृष्टीस पडतो. याशिवाय **लदाक्** प्रांतांत लहान मोठीं सरोवरें अनेक आहेत. त्यांतील कांहीं क्षार पाण्याचीं आहेत. या प्रांताच्या पूर्व टोंकास **प्यांगकांग** नांवाचें सरोवर आहे. याची लांबी ४० व रुंदी २–४ मैल आहे. याचा निमेहून अधिक भाग **लदाक्** प्रांतांत असून बाकीचा **चिनई तिबेटांत** आहे. याचेंही पाणी क्षार असल्यामुळें पिण्याचें उपयोगीं नाहीं. **हार-मुक** नांवाचे पर्वताच्या पायथ्याशीं **गंगाबल** ह्मणून एक लहान सरोवर आहे. याची लांबी सुमारें दोन मैल व रुंदी पाव मैल आहे. पर्वतावरील बर्फ वितळून यास पाण्याचा पुरवठा होतो. आपल्या देशांतील लोक **भागीरथीस** जशी अति पवित्र मानितात तसे **काश्मीरी** लोक या सरोवरास मोठें पवित्र मानून त्यांत प्रेतांच्या

अस्थि टाकितात. येथें एक शिवालय आहे. श्रावण महिन्यांत हिंदु लोक पर्वतावर चढून जाण्याचे कष्ट सोसून मोठ्या भक्तीनें या तीर्थास जातात. **वानगाट** येथें अति प्राचीन काळच्या देवालयांचे अवशिष्ट भाग दृष्टीस पडतात. तीं देवालयें या तीर्थाच्या संबंधानें बांधलेलीं असावींत असें कांहीं विद्वान् लोकांचें मत आहे. तसेंच **कंसनाग** ( केसरनाग ) या नांवाचें सरोवर **फत्ते पंजाल** नांवाच्या पर्वताच्या उत्तरेस आहे. याची लांबी पाऊण मैल व रुंदी ४२९ यार्ड आहे. बर्फ वितळून तें पाणी या सरोवरांत येतें. **शेषनाग** हें **लिदार** दऱ्याचे वरच्या बाजूस आहे. तें **अमरनाथास** जातेवेळीं मार्गांत लागतें.

## देखावे ( सृष्टिसौंदर्य. )

या देशास आपल्या व पाश्चात्य देशांतील विद्वानांनीं **भूस्वर्ग** असें नांव देऊन त्याच्या सौंदर्याचीं गाणीं गाइलीं आहेत. पण आमच्या मतें यास **नंदनवन** किंवा सृष्टिसौंदर्याचा देश असें ह्मणावें. कारण अति रमणीय व आनंद देणारीं स्थलें येथें इतकीं विपुल आहेत कीं, त्या सर्वांचें वर्णन देण्यास एक वेगळाच ग्रंथ लिहिला पाहिजे. आह्मी मार्गक्रमण करीत असतां जे अति प्रेक्षणीय व मनोहर देखावे दृष्टीस पडत गेले, त्यांतील कांहींचें व **दल** सरोवरावरील देखाव्याचें वर्णन आमच्या प्रियवाचकांकरितां पूर्वीं दिलेंच आहे. आतां **शंकर** पर्वतावरून जो देखावा आमचे पाहण्यांत आला त्याचें वर्णन देण्याचा यत्न करितों. येथून **काश्मीर** दऱ्याचा बहुतेक देखावा दृष्टीस पडतो. ही टेंकडी **श्रीनगरच्या** ईशान्येस आहे.

हिची उंची **श्रीनगराहून** सुमारें एक हजार फूट आहे. पण ती चढण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें आह्मी झंपानांत बसून वर गेलों. हा पायमार्ग अति बिकट असून फार अरुंद आहे. कित्येक स्थलीं दोन मनुष्यांस हातांत हात धरून जातां येत नाहीं. बाजूचे दरे इतके खोल आणि कडे तुटलेले आहेत कीं, या मार्गानें जाणाऱ्या मनुष्याचें थोडें पाऊल चुकलें असतां त्याचें हाड सुद्धां मिळावयाचें नाहीं. वाहक लोक आह्मांस वर नेत असतां, आतां हे आह्मांस खरोखरीच स्वर्गांत पोहोंचवितात कीं काय, असा विचार मनांत येत असे. वर गेल्यावर प्रथम देवालयांत जाऊन **शंकराचें** दर्शन घेतलें. हें देवालय **अशोक** राजाचा पुत्र जो **जलौक** त्यानें इ० स० २२० वर्षांपूर्वीं **बुध्धाकरितां** बांधलें होतें असें ह्मणतात. येथें वसति नाहीं. पण डोंगराच्या पायथ्याशीं एक खेडें असून तेथील एक ब्राह्मण दररोज येऊन **शंकराची** पूजा करून जात असतो ह्मणून समजलें. हरी पर्वतावर आह्मांस पुजाऱ्यांनीं घेरिलें तसा येथें एकही दृष्टीस पडला नाहीं, एवढेंच नव्हे पण देवाची पूजा दररोज होत असल्याचीं चिन्हें आमच्या चर्मचक्षूस तरी दिसलीं नाहींत. **शंकराचा** मंडणमिश्राच्या पत्नीशीं संवाद याच स्थलीं झाला ह्मणून सांगतात. असो.

पुढें बाहेर येऊन एका उंच स्थलीं उभे राहून भोंवतालची वनश्री पाहूं लागलों, तों पायथ्याशीं **वितस्ता, शंकरानें गंगेस** मस्तकीं धारण करून आपणास मात्र वाट फुटेल तिकडे जाण्यास सांगितलें ह्मणून मोठ्या त्वेषानें आक्रोश करीत भुजंगीप्रमाणें निरनिराळीं वळणें घेऊन

वाहत असलेली दृष्टीस पडली. हिच्या कांठच्या शोभायमान वृक्षराजी, निरनिराळे वर्ण धारण करणारीं पर्वतशिखरें व अस्मान हीं नदीच्या प्रवाहांत प्रतिबिंबित झालीं असल्यामुळें इंद्रचापाच्या शकलांप्रमाणें सुंदर दिसत होतीं. एके बाजूस पिकानें शोभायमान झालेलीं हिरवीं गार शेतें, रांगोळी घातल्यासारखे त्यांतील वाफे व त्यांच्या भोंवतीं फिरविलेले पाण्याचे पाट; यांच्या पलीकडे सफेदा, चिनार व तुती इत्यादि वृक्षांचे कुंज, त्यांत मधुर शब्द करीत भ्रमण करणारे सुंदर पक्षी, उत्तरेस व पश्चिमेस एकाहून एक उंच होत गेलेलीं बर्फाच्छादित शिखरें, वायव्येस **वानगाट** दऱ्याच्या वरच्या बाजूस रुप्याप्रमाणें चमकणारें हरमुक पर्वताचें शंकाकृति शिखर, दूर पूर्वेस **अमरनाथ**, नैर्ऋत्येस **श्रीनगर**, त्यास दुभागून वाहणारा **वितस्ते**चा प्रवाह, त्यास शोभा देणारे तिच्या कांठचे राजवाडे, मंदिरें व दुसऱ्या इमारती; प्रवाहांतून काढलेले किंवा प्रवाहास मिळणारे कालवे, त्यांवरील वृक्षांच्या राजी, मुनशी बाग, त्यांतील बंगले; उत्तरेस दल सरोवर, त्यावरील कमलाच्या व दुसऱ्या वेली, त्याच्या कांठचीं आराम मंदिरें, त्यांतील तरंगत्या बागा व बेटें, भोंतालच्या वृक्षांची दाट झाडी, तिच्यांतील लहानशीं गांवें, या सर्वांच्या सभोंवतीं बर्फ आणि वृक्ष यांनीं आच्छादलेलीं पर्वत शिखरें, सूर्य किरणांच्या पतनानें उत्पन्न झालेली त्यांजवरील चकाकी, शिखरांवरून खालीं खोल व भयाण दऱ्यांत उड्डाणें मारीत वाहणारे जलौघ, त्यांतील धबधबे, त्या दऱ्यांत संचार करणारे पशुपक्षी, असा हा अपूर्व व अति सुंदर देखावा पाहून चित्तवृत्ति

रममाण होऊन जात असतां वारंवार असा विचार मनांत येई कीं, ह्या दिवसांत जर या देशाची वनश्री एवढी मनोरम दिसत आहे तर तिच्या उत्साहाच्या दिवसांत (वसंतकालांत) जेव्हां ती आपल्या सर्व अलंकारांनीं विभूषित होते, तेव्हां तिची शोभा किती अवर्णनीय दिसत असेल! शेवटीं आमचे मनांत अशी कल्पना आली कीं, सृष्टिजन्य सर्व संपत्तीनें पूरित जी आर्यभूमि तिचा हा देश केवळ मुखचंद्र असल्यामुळें त्यास मुख्य शोभा देणारें जें कुंकुम त्याचें हें जन्मस्थान आहे. येथील सृष्टीसौंदर्यांत अशी कांहीं मोहक शक्ति आहे कीं, तें किती वेळ पाहत राहिलें तरी मनाची तृप्ति ही कधीं होतच नाहीं. हें सृष्टिसौंदर्य पाहून सर्व शक्तिमान् जो परमेश्वर त्याजविषयीं ज्याचें मन लीन होणार नाहीं, असा शून्य हृदयी कोण आहे! हें सौंदर्य अवलोकन करून अंतःकरण रममाण होत असतां **स्विट्झरलंड, इतली** व **स्काटलंड**. या देशांतील सर्व प्रकारच्या सृष्टिसौंदर्याचा हा आपणापुढें जसा काय चित्रपटच मांडिला आहे असा **यूरोपियन्** प्रवाशांस भास होत असेल. येथील प्रमाणें अति सुंदर देखावा सर्व **यूरोपांत** आपण कोठें पाहिला नाहीं असें **सर रिचर्ड टेंपल** आपल्या ग्रंथांत ह्मणतात. आतां एवढेंच सांगतों कीं, अशी अप्रतिम वनश्री पाहण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांनीं या भूस्वर्गीं जाऊन ती पहावी ह्मणजे त्यांची इच्छा परिपूर्ण होईल. असो. या पर्वताच्या आग्नयेस दीड मैलावर **मेरूवर्धन स्वामि** नांवाचें **विष्णूचें** एक जुनें देवालय आहे. **मेरूवर्धन** हा **पार्थ** राजाचा मंत्री होता. त्यानें हें बांधिलें असें ह्मणतात.

# जमीन.

अति प्राचीनकालीं **काश्मीर** दरा हा एक महान् सरोवर होतें असें अनुमान करितात. गोड्या पाण्यांत राहणाऱ्या माशांचे अवशिष्ट भाग कांहीं सपाट जमिनीवरील प्रदेशांत सांपडले आहेत, त्यांजवरून व कोठें कोठें पर्वतांच्या बाजूंवर पूर्वकालीं पाण्याच्या लाटा मारल्याच्या खुणा दृष्टीस पडतात, त्यांजवरून वरील कल्पनेस दृढीकरण येतें. पुढें जलाशयाचा जोर अनिवार्य होऊन पर्वताची जी बाजू कमजोर होती तिकडून पाणी फुटून तो लोंढा बाहेर फुटला असावा असें दिसतें. कारण, **काश्मीराहून मरी** नांवाच्या रस्त्यानें परत येऊं लागलें असतां वाटेंत पर्वताच्या बाजूंवर झालेले खांड व भेगा सूक्ष्म रीतीनें पाहणारांच्या नजरेस येतात.

या सरोवराविषयीं अशी एक कथा आहे कीं, याचें पूर्वीचें नांव **साहास्तिसार** किंवा **सतिसार** असून त्यांत **बलदेव** ( जलदेव ) नांवाचा एक राक्षस राहत होता. तो सरोवरांतील सर्व मत्स्य गिळून टाकून भोंवतालच्या टेंकडीवर राहणाऱ्या लोकांचें भक्षण करूं लागला. तेव्हां ते लोक पर्वताच्या उंच भागावर जाऊन राहिले. यावेळीं **कश्यप** ऋषि तेथें प्राप्त झाले आणि त्यांनीं सरोवराच्या वायव्य टोंकास **बरामुला** येथें आपला त्रिशूल जमिनींत खोंवला; तेणेंकरून ती जमीन दुभागून सरोवरांतील पाणी नाहींसें झालें आणि तो राक्षस मरण पावला. दुसरी कथा अशी आहे कीं, राक्षसाच्या भक्षणानें सर्व लोक मोठे त्रस्त होऊन ते **कश्यप** ऋषीकडे गेले ह्मणून त्यांनीं

तपश्चर्या केली. तेव्हां एक देवता त्यास प्रसन्न होऊन तिनें **शारिका** पक्ष्याचें रूप धारण केलें आणि आपल्या चोंचींत एक मोठी शिला धरून ती, तो राक्षस जेथून वर येत असे तेथें ठेविली. या देवीचें दर्शन आह्मांस **हरि** पर्वतावर झालें. या ऋषीचे नांवावरून या दऱ्यास **काश्मीर** असें नांव पडलें. वरील दोन्ही कथांवरून हा प्रदेश एक मोठें सरोवर होतें असें ठरतें.

कोणत्याही देशांत पीक उत्तम येण्यास तेथील हवा, पाणी, जमीन व मनुष्यश्रम हीं मुख्य साधनें होत. येथील उष्णतेचें मान व आर्द्र वातावरण हीं पिकास असावीं तशीं अनुकूल आहेत. त्याचप्रमाणें **वितस्ता** नदी दऱ्याच्या मध्य भागांतून वहात असून तींतून व सरोवरांतून अनेक कालवे काढिलेले आहेत व भोंवतालच्या पर्वतांतून उत्तम पाण्याचे झरे एकसारखे वहात असतात. जमीन तर गाळवट व कसदार असल्यामुळें मोठी सुपीक आहे. पण शेतकीचें ज्ञान येथील लोकांस कमी असल्यामुळें या नैसर्गिक लाभांचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं असें दिसतें. येथील पिकास पावसापेक्षां उन्हाळ्यांत जें बर्फ वितळतें त्याचा अधिक उपयोग होतो. पर्वतांच्या बाजूंवर जेथें सपाट मैदानें आहेत, तेथें पर्वतांवरील झऱ्यांचें पाणी पाटानें वळवून नेऊन पिकें तयार करितात. हे झरे पूर्वेकडील पर्वतांवर अधिक आहेत. या देशीं भाताचें पीक मुख्य असल्याकारणानें लागवड जमिनीपैकीं तीन चतुर्थांशांत त्याची लावण करितात. आपल्या देशाप्रमाणें येथें रब्बी व खरीप अशीं दोन पिकें होतात. पहिल्यांत गहू, जवस, वाटाणा, मूग व उडीद हीं उत्पन्न

असतें. चूट हें फळ खाण्यास चांगलें लागत नाहीं, पण यांत मांस शिजवून खातात व याच्या बिया औषधी आहेत. ॲप्रिकाट हें फळ पीचफळा एवढें असून त्यांत बीं असतें. यांतील तीन जातींचीं फळें आह्मांस पाहण्यास सुद्धां मिळालीं नाहींत. बाकीचीं सर्व आह्मांस मिळालीं तीं मोठीं स्वादिष्ट लागलीं.

या देशांत मुख्य धान्य तांदूळ होय. त्याच्या येथें अनेक जाती आहेत. तेथील बहुतेक लोक आपला निर्वाह याजवर करितात. गहूं, मूग, उडीद, सातू, जवस व बरग हीं धान्यें येथें उत्पन्न करितात. मका येथें पुष्कळ पिकतो. ज्या लोकांस तांदूळ मिळत नाहीं ते लोक मका, निलंबो ( एक जातीचें बीज ), दुसरीं कनिष्ठ धान्यें व कंदमूळें यांजवर आपलें पोषण करून घेतात. या देशांतील दलदलीच्या स्थलांत शिंगाडा फार पिकतो. याच्या पिकाचें मुख्य स्थान वुलर सरोवर होय. येथें दरसाल पन्नास साठ हजार टन शिंगाडे पिकतात. हें पीक अक्टोबर महिन्यांत येतें. आपल्या देशांतील अति दरिद्री लोक जसे गाजरें, रताळीं, शेंदाडीं, भोपळे यांजवर जगतात, तसे येथील लोक शिंगाडे, कमळांचीं देठें व दुसरीं कंदमूळें खाऊन जिवाचें रक्षण करितात. शिंगाडे वाळवून त्यांचें पीठ करून चपात्या करितात. बटाटे, कोबी व नवलकोल यांची लागवड अलीकडे करूं लागले आहेत. तीं येथें उत्तम निपजतात. मिरची, लसूण, कांदा, मुळा, वांगी, गाजर, मेथी या व दुसऱ्या भाज्या उत्पन्न होतात. तसेच आगरू, गुलाब, चाफा, मोतिया, मोगरा, जाई, शेवती, पाच, गठ्हला, कचोरा

इत्यादि सुवासिक द्रव्यांचे लहानमोठे पुष्पवृक्ष व वेली अनेक स्थलीं दृष्टीस पडतात. येथल्याप्रमाणें सुंदर व विचित्र रंगांचीं कमलें व वनपुष्पें थोड्याच देशांत उत्पन्न होत असतील. या देशाच्या कांहीं भागांत कापसाची लागवड करितात आणि जो कापूस पिकतो त्याचें सूत काढून देशी कपडे विणतात. तंबाखू व गांज्या यांची-ही बरीच लागण होते व त्यांचें पीक देशांतील खर्चास उपयोगीं पडतें. अलीकडे चहाच्या लावणीचा यत्न चालू केला आहे. तसेंच नाना प्रकारच्या वनौषधी येथें पैदा होतात. पण त्यांची माहिती आह्मांस कशी मिळणार?

## द्राक्ष.

येथील द्राक्ष ह्मणजे शुद्ध अमृत होय. हें स्वर्गांत इंद्रास सुद्धां दुर्लभ असा लेख राजतरंगिणींत असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. ही अतिशयोक्ति आहे. पण येथील द्राक्षें किती स्वादिष्ट असतात ह्याची खरी कल्पना आपल्या देशांत पेट्यांतून जीं **काबुली** द्राक्षें येतात त्यांचें सेवन ज्यांनीं केलें आहे त्यांस करितां येणार आहे. तत्रापि **काबुली** द्राक्षांत दोन तीन बिया असतात त्या ह्यांत मुळींच नसून हीं अधिक दिवस टिकतात व विशेष रुचिकर आहेत असें आह्मांस वाटतें. **कोंकणांत** कर-वंदीचीं झुडपें जशीं आपोआप उगवतात तशा द्राक्षवेली या देशांत चोहोंकडे उगवतात. पण यांच्या फलांस बागांत तयार केलेल्या द्राक्षांच्या गोडीची सर येत नाहीं. येथें त्याच्या सहा सात जाती आहेत. त्यांत किश-मिशी, कांद्री व हसनी या उत्तम होत. याच्या वेली

मंडप, घरें, झोपडीं आणि वृक्ष यांजवर चढवितात. या वेली पुष्कळ वर्षें टिकतात. यांची छाया इतकी गाढ पडते कीं, तींतून सूर्यकिरणाचा प्रवेश मुळींच होत नाहीं. उत्तम द्राक्ष चार रुपयेपासून सात रुपये मण विकतें आणि कनिष्ठ प्रतीस दरमणीं दोन अडीच रुपये पडतात. **दल** सरोवराचे कांठीं व **ब्रेन** नांवाच्या खेड्यांत याचे बगीचे अनेक लागून गेले आहेत. अलीकडे येथील सरकाराचें याच्या लावणीकडे विशेष लक्ष्य लागलें आहे. या वेलींची चांगली जोपा करण्याकरितां **इराण** देशांतील दोन माळी आणून ठेविले आहेत व त्यांजवर देखरेख करण्याचें काम एका **फ्रेंच** मनुष्याकडे सोंपविलें आहे. सप्टेंबर महिन्यांत या वेली घोसांनीं ओथंबून जातात. द्राक्षासव काढण्याचा कारखाना **दल** सरोवराच्या कांठीं उजवे बाजूस आहे, तो आह्मीं सरोवरांत जातेवेळीं पाहिला. आपल्या देशांत साखरेचा पाक करून त्यांत फळें घालून जसे मुरंबे तयार करितात तसे येथें द्राक्षांचा शिरका तयार करून या देशांत मिळणारीं फळें त्यांत घालून निरनिराळ्या प्रकारचे मुरंबे बनवितात. कौन्सिलचे सिनिअर मेम्बर रायबहादूर यांचे हेड क्लार्क यांनीं दोन प्रकारच्या मुरंब्याची व द्राक्षांच्या दालीची फरमास आह्मांस केली होती.

## केशर.

आह्मीं झंपानांत बसून केशराच्या बागा पाहण्यास **पांपूर** गांवीं गेलों. याचें जुनें नांव **पद्मपूर** होतें. हें गांव **वितस्तेच्या** तीरीं **श्रीनगरपासून** पांच मैलांवर

आहे. येथें महाराजांचा एक खासगी बंगला, पञ्च-स्वामी नांवाचें देवालय व एक जुनी मशीद हीं आहेत. नदीवरील पूल गांवाच्या शेजारीं आहे. केशराच्या व फलवृक्षांच्या बागा येथून जवळच आहेत. केशराच्या बागाची खरी शोभा आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत दृष्टीस पडते; कारण याच महिन्यांत त्याच्या फुलांस बहार येतो. आह्मीं याच दिवसांत **काश्मीर** देशांत असल्यामुळें त्या बागांची अत्यंत रमणीय शोभा आह्मांस सहज पाहण्यास मिळाली. ही शोभा व त्या पुष्पांचा सुगंध यांनीं आमचें नेत्रेंद्रिय व घ्राणेंद्रिय यांस इतका आनंद दिला कीं, कांहीं कालपर्यंत आह्मीं त्याचा उपभोग घेत तसेच उभे राहिलों. हे बगीचे पाहण्यापूर्वीं केशराचीं झाडें कुसुंब्याच्या झाडासारखीं असावींत अशी आमची कल्पना होती. पण ती निवळ चूक होती. हीं झाडें नसून तांबड्या गुलछबू सारखे याचे कंद असतात. या कंदांची उंची पातीसुद्धां ८।९ इंचांहून अधिक नसते. यांतील अर्धा भाग जमिनींत असून अर्धा वर असतो. प्रत्येक कंदास एकेक तुरा पातीवर बोटभर उंच येतो व त्यास एक फूल येतें. हें फूल कोरांटकीच्या फुलासारखें असतें. पण यास पाकळ्या सहा असतात. याच्या देंठाचा रंग शुभ्र असतो व पाकळ्यांचा अस्मानी असतो. यांत सहा तंतू असतात. पैकीं तीन तांबडे असतात. हेच मुख्य केशर होय. दुसरे तीन पिंवळेजर्द असतात, त्यांस वास नसतो; पण त्यांचीं केशरांत भिसळ करितात. वरील बागांत वाफे तयार करून त्यांतील बांदांवर एकेक फूटाच्या अंतरानें केशराच्या कंदांची लावण जून अगर जुलई महिन्यांत

करितात. ही लावण सात आठ वर्षांनीं एकवार करावी लागते. याचें उत्पन्न दर एकरास पहिल्या वर्षीं पांच सहा पौंड केशर येतें. पुढें पांच सहा वर्षें वीस बेवीस पौंड येतें. आह्मीं या बागा पाहण्यास गेलों तेव्हां कांहींतील केशर काढून तें आपल्या देशांत मिरच्या वाळत घालितात त्याप्रमाणें वाळत घातलें होतें. कांहींतील केशर काढण्याचें काम चालू असून कांहींतील काढावयाचें होतें. सुमारें पक्के १०,००० शेर ह्मणजे २५० मण केशर दरसाल या बागांत उत्पन्न होतें, असें तपास करितां समजलें. दर तोळ्यास आठ आणे प्रमाणें धरिलें असतां महाराजास याचें दरसाल चार लक्ष रुपये येत असतील. एक लदाकू प्रांतांत दरसाल पक्के ८०० शेर केशर येथून विक्रीस जातें असें डा० **हंटर** लिहितात. हे बगीचे पाहून आह्मी परत निघणार तों त्यांजवरील हवालदार किंवा रखवालदार शिपायानें आह्मी कोणी मोठे बाबू आहों असें समजून आह्मांस मुजरा ठोकला. त्या मुजऱ्याचा आह्मीं अर्थ समजून केशराचीं कांहीं फूलें व गड्डे किंवा कांदे काढून देण्यास सांगितलें. तेव्हां लगेच मूठभर फुलें व कांहीं कांदे काढून आह्मांस आणून दिले. आह्मीही चेरिमेरी ह्मणून कांहीं त्याचे हातावर ठेविलें, त्यानें तो खुष झाला असें त्याच्या मुद्रेवरून वाटलें. इकडे आमच्या बरोबरच्या मनुष्यांनींही कांहीं फुलें तोडून खिशांत भरलीं.

**फ्रान्स, इंग्लंद, स्पेन, इटली, चीन, इराण** इत्यादि देशांत याची लागवड अलीकडे बरीच करूं लागले आहेत; परंतु या अप्रतिम सुगंधि द्रव्याचें मूल उत्पत्तिस्थान **काश्मीर** देश होय. ह्मणूनच यास संस्कृतांत

**काश्मीर, काश्मीरज, काश्मीरजन्म** अशीं नांवें आहेत. तीं अगदीं यथार्थ आहेत. **काश्मीरी** भाषेंत केशरास ( कांग ) असें ह्मणतात. **इंग्लंद** देशांत **इसेक्स** प्रांता जवळ एका जागीं केशर उत्पन्न करीत तिला ( सॉफ्रन वॉल्दन् ) केशराची जागा असें नांव आहे. **काल्सी** नांवाचें **पंजाबां**त एक लहान संस्थान आहे, तेथें व कांहीं दुसऱ्या स्थलीं याची लागवड करूं लागले आहेत. आतां या द्रव्याच्या संबंधानें एक गोष्ट सांगून हें प्रकरण पुरें करितों. याच्या सुगंधाची व सुवर्णाची सर्वत्र तारीफ करितात तें ठीकच आहे. पण **भामिनी-विलासां**त एका स्थलीं याच्या कडूपणासही गौरव दिलेलें पाहून आह्मांस मोठें आश्चर्य वाटलें. तें वाक्य खालीं देतों. "काश्मीरजस्य कटुताऽपि नितांतरम्या" असो. परत येतेवेळीं आह्मीं **मुनशी** बागेंतून आलों. येथें रेसिदंट व दुसरे साहेब लोक यांस राहण्यासाठीं दाहा बारा बंगले बांधलेले आहेत. रेसिदंट साहेबांचा बंगला दुमजली असून त्याचें काम मोठें मजबूत व सुरेख दिसलें. तसेंच याच्या भोंवतालच्या बगीच्याची रचना मोठी प्रेक्षणीय आहे. येथें विवाहित साहेब लोक राहतात. अविवाहितांनीं राहण्याचे बंगले येथून थोड्या अंतरावर **हरिसिंग** बागेंत आहेत. हे सर्व बंगले **वितस्ते**च्या उजव्या तीरीं वरच्या बाजूस आहेत. **मुनशी** बागेच्या वरच्या बाजूस **राममुनशी** बाग आहे. तिच्यांत **आपलस्, पियर्स, तुती** हे वृक्ष व द्राक्षवेली आहेत. **श्रीनगर** येथील बहुतेक बागांचीं नांवें पूर्वकालीं तेथें असलेल्या अधिकाऱ्यांच्या नांवांवरून पडलीं आहेत.

# खनिज.

**हिमालय** पर्वत ह्मणजे सृष्टिजन्य संपत्तीचें एक भांडार आहे. यावरून या देशांत ती संपत्ति विपुल असलीच पाहिजे. पण तिचा अद्याप व्हावा तसा शोध झालेला नाहीं व जो थोडाबहुत शोध लागलेला आहे, त्याचा योग्य फायदा करून घेण्याचें ज्ञान येथील लोकांस आलेलें नाहीं. असो. **लदाकूच्या** पश्चिम भागांत व या देशाचे उत्तरेस **चित्रल** व **चिलास** या प्रांतीं सोन्याच्या खाणी असून त्यांतून कांहीं सोनें काढितात. तसेंच **गिलजित्**जवळ **सिंधु** नदाच्या पात्रांत व कोठें कोठें **वितस्तेंत** व **द्रास** नदीस मिळणाऱ्या **शिंगो** नांवाच्या प्रवाहांत सोन्याचे कण सांपडतात. पण ते इतके थोडे मिळतात कीं तेणेंकरून शोधणारांची मजुरी सुद्धां चांगली भागत नाहीं. अलीकडे **जम्मू**जवळ **नील** रत्नाच्या खाणीचा शोध लागला असून तींत बरेच **नीळ** सांपडूं लागले आहेत. ही खाण ज्यास सांपडते तो फार दिवस वाचत नाहीं अशी येथील लोकांची समजूत आहे. **लदाकू, चित्रल** व **अनंतनाग** इत्यादि स्थलीं लोखंडाच्या खाणी पुष्कळ आहेत. **सोपूर** गांवाजवळ **अर्वान, पांपूर**जवळ **शार** व **इस्लामबादे**जवळ **सोप** येथें लोखंड तयार करण्याचे कारखाने आहेत. **सोप** गांवाच्या शेजारच्या डोंगरांत शिसें, तांबें, रुपें व सोनें यांच्याही मिश्र धातु सांपडण्यासारख्या आहेत. पण त्या काढण्याचा उद्योग झालेला नाहीं. **कुतिहार** प्रांताच्या उत्तर टोंकास **हूर्पटनर** नांवाचें गांव आहे,

त्याच्याजवळ तांब्याची खाण आहे. तिचा शोध कांहीं वर्षांपूर्वीं लागला असून तींतून बरेंच तांबें काढूं लागले आहेत. **लदाक्** प्रांतांत **पुगा** नांवाच्या दऱ्याच्या पूर्व टोंकास गंधक व टाकणखार यांच्या खाणी चालू आहेत. **प्लुंबेगो** ( शिशासारखी एक धातु ) ही **पिरपंजाल** डोंगरांत पुष्कळ स्थलीं सांपडते. सुर्मा **जम्मू** नांवाच्या डोंगरांत व दुसऱ्या कांहीं स्थलीं सांपडतो. **भीमसेनी** कापूरही कोठें कोठें पैदा होतो. दगडी कोळसा अलीकडे क्वचित् स्थलीं सांपडूं लागला आहे. सैंधव व सोरमीठ हीं कांहीं स्थलीं पैदा होतात. या देशास मिठाचा पुरवठा मुख्यत्वें **पंजाबांतील दाराइस्मालखान** प्रांतांतून होतो ह्मणून समजतें.

## पशु व पक्षी.

सिंह व व्याघ्र हे भयंकर पशु या देशांत नाहींत. पण चित्ते मात्र पुष्कळ भागांत आढळतात. पांढरा चित्ता कोठें कोठें दृष्टीस पडतो. यांचीं कातडीं **श्रीनगरांत** क्वचित् विकरीस येतात. तीं फार महाग असतात. दर एकास वीसपासून तीस रुपयेपर्यंत किंमत पडते. अस्वलें देशाच्या सर्व भागांत आढळतात. यांचा वर्ण काळा व तांबूस किंवा पिंगट असतो. पिंगटांत दोन जाती आहेत. पिंगट जात पर्वताच्या उंच प्रदेशांत व काळी नीच भागांत राहते. काळीं अस्वलें तर याहीपेक्षां अधिक खालच्या भागांत राहतात. यास **काश्मीर** भाषेंत **हारपूत** असें नांव आहे. याची लांबी सहा साडेसहा फूट असते. याचें कातडें मोठें उबदार असतें.

याचें घ्राणेंद्रिय व कर्णेंद्रिय हीं फार तीक्ष्ण आहेत पण यास चांगलें दिसत नाहीं. यास झाडांवर चढतां येतें. तीं रात्रीं येऊन शेतांतील पिकांची नासाडी करितात आणि आक्रोड व तुतें पिकलीं ह्मणजे त्यांचा फडशा उडवितात. **लोलाब, सिंद** व **लिदार** नांवांच्या दऱ्यांत तीं पुष्कळ आढळतात. त्याच्या मादीचा आकार नरापेक्षां लहान असतो. येथील घोडे मोठे धिप्पाड किंवा विशेष देखणे नसतात पण पेगू सारखे लहान व मजबूत बांध्याचे असतात. यांत **बदकशानी** घोड्यांची अधिक तारीफ करितात. पर्वतांवरून जलदीनें व सावधपणानें ते जाऊं शकतात. असे जात असतां त्यांचा पाय कधीं घसरत नाहीं. **वितस्तेच्या** कांठीं व पर्वतांच्या बाजूंवर घोडीं, गाई, बैल, बकरीं व मेंढ्या हीं जनावरें चरत असलेलीं वेळोवेळीं दृष्टीस पडतात. गोवध या देशीं अगदीं बंद आहे. वर सांगितलेल्याशिवाय गुरल, लांडगे, कोल्हे, खोंकडें, कुत्रे, वानर, ससे इत्यादि पशु बरेच आढळतात. येथील बहुतेक जनावरांच्या आंगावरील केस लांब व दाट असतात. वनगाई व शामवा (वनबकरा) हीं क्वचित् दृष्टीस पडतात.

आह्मीं या देशांत प्रवास करीत असतां वृक्षांच्या दाट झाडींत व जलाशया समीप, पक्ष्यांचे कळप वरचेवर नजरेस पडत. पण आमच्या देशांतील कित्येक पक्ष्यांचीं नांवें ऐकून सुद्धां आह्मांस माहीत नाहींत, तेव्हां येथील पक्ष्यांची विशेष माहिती आह्मी कोठून देणार! तत्रापि जे पक्षी आमच्या पाहण्यांत आले त्यांतील कांहींचीं नांवें सांगून हें प्रकरण पुरें करितों. मोर, गिधाड,

ससाणा, बगळा, हंस, चकोर, कोकिल, बाज, कोंबडा, घार, घुबड, पारवा, कबुतर, राघू, कावळा, चंडोल, कवडा, बदक इत्यादि पक्षी येथें आढळतात. लदाक् प्रांतांत पांढरे कावळे असल्याचें ऐकिलें. बगळ्याच्या पंखांचे तुरे व कलग्या करितात. हीं पंखें फार महाग विकतात. ज्यावेळीं हा पक्षी आपलीं पंखें झाडतो, तेव्हां तीं जमा करण्याकरितां लोक फार टपून बसलेले असतात. याची पारध करण्याची बंदी आहे. बाजपक्षी आपण पोंहत असतां दुसरे पक्षी धरून ते आपल्या धन्याकडे आणून पोहोंचविण्याचें त्यास शिक्षण येथें देतात. तसेंच रेशीम उत्पन्न करणारे किडे येथें पुष्कळ असून त्यांचें खाद्य जें, तुतीचीं पानें त्यांच्या वृक्षांची रगाडी आहे. अलीकडे येथील सरकारचें या कामीं विशेष लक्ष लागलें असल्याचें समजतें. डास व माशा यांचा आगस्ट व सप्टेंबर महिन्यांत फार उपद्रव होतो ह्मणून सांगतात. येथें मधमाशा पुष्कळ असून उमदा मध पैदा होतो. दऱ्याच्या पूर्वेकडील खेड्यांतील लोक ह्या माशा बाळगून मध तयार करितात. **शुपियन** नांवाच्या खेड्यांतील मधाची तेथें फार प्रसिद्धि आहे. सर्प व विंचू या विषारी जीवांचा या देशांत विशेष उपद्रव नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. लहान मोठे मासे नद्या व सरोवरें यांत खेळत असतात. पण **श्रीनगरा**जवळ **वितस्तें**त, **मार्तंड**, **वर्नाग** व **अनंतनाग** या स्थलीं ते धरण्याची मनाई आहे.

## मृग.

येथें मृगाच्या तीन चार जाति आहेत. यांत कस्तूरी

6

मृग हा मुख्य होय. यांत दोन प्रकार आहेत. एक **तिबेटी** व दुसरा **नेपू**. हा अन्य मृगांपेक्षां लहान असतो. याच्या वरच्या जबड्यांत दोन सुळे दांत असतात. त्यांनीं तो झाडांचीं पानें, मुळें खणून खातो. याचे केस टणक व ताठ असून दाट असतात. याचे कान कांहीं मोठे, लांब व उभे असतात. पल्लेदार व उंच उड्डाण मारीत जाणें ही याची साधारण चाल होय. हा प्राणी मोठा भित्रा असतो व तो गुहेंत राहतो. याचा रंग करडा तांबडा असतो. याचें मांस मोठें रुचकर असतें असें सांगतात. या मृगास **काश्मीरी** भाषेंत **कस्तुना** असें ह्मणतात. याच्या पोटांत नाभी जवळ एक पिशवी असते. तींत कस्तुरी हा पदार्थ सांपडतो. तिचा वर्ण काळा असतो. हा मृग बसतो तेव्हां ज्या स्थलास त्याच्या नाभीचा स्पर्श होतो तेथील मृत्तिकेस कस्तुरी-प्रमाणें सुगंध येतो आणि ती मृत्तिका व्यापारी लोक खऱ्या कस्तुरींत मिसळ करितात व साधल्यास कस्तुरीच ह्मणून विकतात. **बाडगामन** नांवाच्या नाल्यांत व **तिलेल** दऱ्यांत हे मृग सांपडतात. पण **तिबेट** आणि **नेपाळ** या देशांत ते अधिक आहेत. यांची शिकार हिंवाळ्यांत करितात. ती करण्यास या देशीं महाराजांची परवानगी घ्यावी लागते. याची मादी वर्षांतून दोन वेळां विते व तिला दर खेपेस दोन पिलें होतात. तीं धरून पाळलीं तर आंधळीं होऊन मरतात असें सांगतात.

हरिणांत एक जात आहे. तींतील हरिण साप खातो ह्मणून त्यास **काश्मीर** भाषेंत **मारखाव** असें ह्मणतात. तो **पिरपंजाळ** नांवाच्या पर्वताच्या रांगेंत व जेलम

आणि **किसनगंगा** या नद्यांच्या मधील प्रदेशांत सांपडतो. याची शिकार साधण्यास याच्या मागून पुष्कळ फिरावें लागतें. दुसऱ्या जातीचा हरिण कुतऱ्यासारखा भोंकतो ह्मणून त्यास **भोंकणारा** हरिण ह्मणतात. या शिवाय चितळ, डांगळ, भेंकर व तांबड्या व काळ्या रंगांचे हरिण आढळतात. सांबर हा पशु हरिणाचीच एक जात आहे. सप्टंबर महिना अर्धा गेला ह्मणजे हा सर्वत्र दृष्टीस पडूं लागतो. अक्टोबर महिन्यांत त्यास शिंगें फुटूं लागतात. याच महिन्यांत याच्या माद्या वाफेस येतात. तेव्हां हे पशु अरण्यांत ओरडत फिरत असलेले ऐकूं येतात. या पशूंस त्या देशांत **बडासिंग** असें ह्मणतात. **दचिनपर** नांवाच्या परगण्यांत हे प्राणी पुष्कळ आढळतात.

## बकरे व मेंढे.

यांच्या या देशांत अनेक जाति आहेत. त्यांतील एकीस इंग्रजींत "मार्कोर" असें नांव आहे. हा दुर्गम व उंच पर्वतावर राहतो. उन्हाळ्यांत याचा रंग करडा-पिंगट असतो, तो हिवाळ्यांत मळकट पांढरा होऊन अखेर जांभळा पिंगट होतो. मोठ्या वाढलेल्या नरास लांब दाढी असते. याच्या मानेपासून तों गुडघ्यापर्यंत घोड्यांच्या आयालाप्रमाणें लांब केस असतात. तो पांच सहा फूट उंच वाढतो व त्याचीं शिंगें चार फुटापेक्षां अधिक लांब असतात. तीं मोठीं सुरेख दिसतात. याच्या मादीस दाढी असते, पण अयाळ नसते. हा पशु **पिरपंजाल** नांवाचे पर्वताच्या रांगांत व कांहीं

दुसऱ्या स्थलांत सांपडतो. डोंगरी बकऱ्यांत दोन भेद आहेत. एकास **सारन्** व दुसऱ्यास **सार** अशीं नांवें आहेत. याची आणखी एक जात आहे. तीस इंग्रजींत "इबेक्स्" असें ह्मणतात. हा बकरा पर्वतांच्या उंच भागांत सर्वत्र आढळतो. याचीं शिंगें चार सव्वा चार फूट लांब असतात. याच्या पोटावरची लोंकर मऊ व तजेलदार असते; ती मिळविण्यास याची शिकार करितात. या लोंकरीचें एक विशेष कापड करितात, त्यास "तुसी" असें ह्मणतात व तिचे हातमोजे व पायमोजेही चांगले होतात. याच्या केसांच्या ब्ल्यांकेटी चांगल्या होतात. हा बकरा मोठा धीट व चपळ असतो. तो हरिणाप्रमाणें उड्डाणें मारीत पळून जातो.

ज्या बकऱ्याच्या लोंकरीच्या शाली करितात तो बहुतेक अंशीं अन्य बकऱ्यासारखा असतो. पण त्याच्या पोटावरचे केस गुडघ्यापर्यंत खालीं लोंबत असतात व त्याचें शेंपूट जाड पण अखूड असतें. याचीं शिंगें लांब, चपटीं व कांहीं बाकदार असतात. **अंगोरा** येथील बकऱ्यांपेक्षां येथील बकऱ्यांचे केस अधिक लांब, बारीक व मृदु असतात. पण ते **तिबेटां**तील बकऱ्यांच्या केसांची बरोबरी करूं शकत नाहीं, करितां फार मौल्यवान् शाली तयार करण्यास लोंकर त्या देशांतून आणितात. एका बकऱ्याची चांगली लोंकर साडेसात तोळे निघते. लहान ओझीं वाहण्याच्या कामीं या देशांत बकऱ्यांचाच उपयोग करितात. **काश्मीर** व **अंगोरा** येथील बकऱ्यांच्या युग्मापासून नवीन उत्पत्ति करण्याचा यत्न **इंग्लंद** व **फ्रान्स** या देशांत अलीकडे चालू असल्याचें समजतें.

## शिकार.

हा देश डोंगराळ असून चोहोंकडे वृक्षांच्या दाट झाडीनें व्याप्त असल्यामुळें याच्या बहुतेक भागांत शिकार सांपडते. पण **गिलजित्, स्कार्डू, लदाक्, वर्दवान** व **किस्तवार** या स्थलांच्या पलीकडील प्रदेशांत ती विशेष सांपडते. पुष्कळ साहेब लोक या देशांत केवळ शिकारीच्या उद्देशानें जातात. शिकारीचे येथें दोन हंगाम आहेत. पहिला मार्च महिन्याच्या मध्यापासून तों जूनच्या मध्यापर्यंत व दुसरा सप्टंबरपासून नोव्हेंबरपर्यंत. **लंका** द्वीपांत मुख्य शिकार जशी हत्तीची तशी येथें अस्वलाची. त्यांत पिंगट अस्वलापेक्षां काळ्याची शिकार करणें अधिक कठीण व धोक्याचें आहे. ती करण्यास शिकारी मोठा तरबेज व धट्टाकट्टा असला पाहिजे. कारण पर्वतांच्या कड्यांवरून अति बिकट मार्गानें खालीं दऱ्यांत उतरण्याचे किंवा दऱ्यांतील निबिड झाडींतून वर चढण्याचे प्रसंग त्यास वारंवार येतात. जेव्हां उंच कड्यावरून खालीं दऱ्यांत शिकार दृष्टीस पडते, तेव्हां उताणें पडून पाठीनें घसरत त्यास तळाशीं जावें लागतें. काळ्या अस्वलांची शिकार करीत त्यांच्या मागें लागलें असतां तीं प्रसंगीं शिकाऱ्याच्या आंगावर एकाएकीं मागें उलटून त्यास मिठी मारण्याच्या तयारीनें मागल्या दोन पायांवर उभीं राहतात. तेव्हां त्यांच्या छातीवर घोड्याच्या नालाकृति पांढरा वाण असतो, तो सहजच दृष्टीस पडतो. शिकारी तरबेज असला ह्मणजे लगेच तो नाल रोंखून गोळी घालितो आणि त्यास एकदम चित करितो. जखमी

झालेल्या अस्वलाचा पाठलाग करणें मोठें धोक्याचें काम आहे. कारण तो प्राणी मोठा लबाड असल्यामुळें केव्हां केव्हां एकाद्या कड्याच्या आड राहतो आणि शिकारी खालून जाऊं लागला ह्मणजे मोठमोठाले दगड त्याच्या आंगावर लोटून देतो. **सिंद व लिदार** या दोन नद्यांमधील प्रदेश महाराजांनीं शिकार करण्याकरितां राखून ठेविला असल्यामुळें त्यांत अन्य लोकांस ती करण्याची परवानगी नाहीं.

या शिवाय चित्ता, रानडुकर, वनगाय, सांबर, शामवा ( रानबकरा ), मृग, लांडगा, याक (बैलासारखा एक पशु ) इत्यादि श्वापदांची शिकार करितात. दाट झाडींत व सरोवरांवर निरनिराळ्या जातींच्या पक्ष्यांचीही शिकार पुष्कळ मिळण्यासारखी आहे. पण ती फार करीत नाहींत. नद्यांत व सरोवरांत मासे पुष्कळ असून त्यांची शिकार बरीच करितात. येथें फार मोठा मासा चार पांच शेर वजन भरतो. माशांच्या शिकारीचे मुख्य दिवस जून, जुलई व आगस्ट हे महिने होत. **बर्फाची चिलीम.**—या देशांतील शिकारी व रानांत फिरणारे लोक बर्फाचा लहान एक गोळा घेऊन त्याच्या मध्यभागा पर्यंत एका बाजूनें भोंक पाडितात आणि त्या भोंकाशीं काटकोन होऊन त्यास जाऊन मिळेपर्यंत वरच्या बाजूनें दुसरें भोंक पाडितात. नंतर पहिल्या भोंकांत तंबाखू घालून त्यावर अग्नि ठेवितात आणि दुसऱ्या भोंकास तोंड लावून चिलमीप्रमाणें ओढूं लागतात. याप्रमाणें पांच सात झुरके घेतले ह्मणजे ती चिलीम उष्णतेनें वितळून जाते किंवा फुटते. केव्हां पहिला दम घेतला नाहीं तोंच फुटते.

तसेंच एका जातीच्या गवताचे जोडे येथें तयार करितात. तो दोन तीन पैशांस मिळतो ह्मणून गरीब लोक त्याचा फार उपयोग करितात. हा जोडा घालून बर्फावरून चाललें असतां पाय फार निसरत नाहींत व त्यांचा बचावही बराच होतो.

## शाली.

या देशांतील शालीची प्रसिद्धि हजारों वर्षांपासून पृथ्वीवर गाजत आहे. ही तयार करण्याचें मुख्य काम ह्मणजे तिचा नमुना तयार करणें हें होय. या शालींत दोन प्रकार आहेत. एक मागावर विणलेली व दुसरी हातानें काढिलेली. पहिल्यास **तिलिका** व दुसऱ्यास **अम्लिकल** असें ह्मणतात. पहिल्या प्रकारची शाल तयार करण्यास दुसऱ्यापेक्षां चौपट किंवा आठपट जास्त श्रम घ्यावे लागतात व ती दोन शेवटांकडून विणीत जाऊन मधलें काम अखेर तयार करितात; ह्मणून तिला किंमत फार अधिक पडते व ती जास्त टिकाऊ असते; पण हातानें काढलेल्या शाली प्रथम दर्शनीं विशेष भब्र-केदार दिसतात. सांप्रत दोन हजार रुपयांपेक्षां जास्त किंमतीच्या शाली फार तयार करीत नाहींत. बहुमोल किंमतीच्या शाली **युरोप** खंडांत विकरीस जातात. कोणी फरमास केल्यास पांच पासून दहा हजार पर्यंत किंमतीची शाल काढून देण्यास येथील व्यापारी तयार आहेत. या अतिमोल किंमतीच्या शालींत कलाबतूचें काम फार असत असेल असें कोणासही वाटणार, परंतु तसें मुळींच नसून शालीची किंमत वाढते ती तिजवर केलेल्या कामामुळें

वाढत असते व अशाच प्रकारच्या शालीस येथील लोक अधिक मान देतात. शालीच्या पदरावर व किनारीवर नकशीचीं व वेलबुटीचीं जीं कामें करितात तीं **शंकर** पर्वता खालून **वितस्ता** जीं चमत्कारिक वळणें घेऊन वाहते तीं वळणें व या देशांतील सुंदर वेली या दोहोंच्या नमुन्यावर तयार करितात. शाल विणून तयार झाली ह्मणजे तिला पदर व किनारी जोडण्याचें काम अखेर करितात. या शालीच्या विणकरीचा आणखी एक प्रकार आहे. तो कोणास खरा सुद्धां वाटणार नाहीं पण तो आह्मीं प्रत्यक्ष पाहिला, करितां त्याजविषयीं दोन शब्द लिहितों. कारागिरास जेवढी लांब व रुंद शाल काढण्याची असेल तेवढीस पुरण्यासारखें एकेक चौरस फूट लांबी रुंदीचे तुकडे तयार करून ते अशा बेमालूम रीतीनें सांधितात कीं, ते सांधे पाहणाऱ्याच्या एकाएकीं लक्षांत सुद्धां येत नाहींत. **अमृतसर** येथेंही **श्रीनगर** प्रमाणें शाली तयार करण्याचे हजारों माग चालू असून मोठमोठ्या किंमतीच्या शाली तयार करितात. पण **श्रीनगरांत** तयार होणाऱ्या शालींच्या संबंधानें येथील शाली डावा हात होत. याचें मुख्य कारण तसें पाणी दुसरीकडे नाहीं व रंगाचें कामही **काश्मीराप्रमाणें** उत्तम साधत नाहीं असें ह्मणतात. **पंजाबांत लुधिआना, सियालकोट, रामपूर, गुरदासपूर** इत्यादि गांवीं शाली काढण्याचें काम बरेंच चालतें. येथील विणणारे लोक मुळचे **काश्मीरी** आहेत. **रामपूर** हें शहर शालीपेक्षां उमद्या चादरी तयार करण्याकरितां विशेष प्रसिद्ध आहे. **श्रीनगर** व **अमृतसर** येथें शाली तयार करण्याचें काम

घराच्या आंतील भागांत चालू असतें पण तिचा पदर व किनारी हीं कारागीर लोक घराच्या ओव्यावर किंवा दुकानांत बसून तयार करीत असलेले रस्तोरस्तीं दृष्टीस पडतात.

मौल्यवान् शालीस लागणारी लोंकर तिबेट देशांतून आणितात. सुमारें आठशें उंटांचें ओझें होईल एवढी लोंकर तिबेट देशांतून दरसाल येते. तींतून लांब तंतूची, रेशमासारखी मृदु, पांढरी शुभ्र व तजेलदार अशी निवडून काढून तिचा उपयोग अति मौल्यवान् शाल तयार करण्यांत करितात. तिला **पश्मिन** ह्मणतात. ही उत्तम लोंकर दर रुपयास एक तोळा मिळते. दहा बारा हजार फुटांपेक्षां अधिक उंच पर्वतांवर राहणाऱ्या बकऱ्यांच्या लोंकरीच्या मौल्यवान् शाली तयार करितात. नीच टेंकड्यांवर राहणाऱ्या बकऱ्यांची लोंकर सरासरी असते, करितां तिचा उपयोग कमी किंमतीच्या शालीकडे करितात. ती पांढरी व पिंगट अशा दोन रंगांची असते. ती पिंजण्याचें काम बहुतकरून बायका करितात. शाली विणून तयार झाल्यावर त्या थोडे दिवस वापरून **काश्मीरांत** कांहीं प्रसिद्ध झरे आहेत, त्यांतील पाण्यांत नेऊन धुतात. तेणेंकरून त्या अधिक मृदु होऊन त्यांचा रंग विशेष खुलतो. त्या धुण्याचें कसब सर्वांस चांगलें साधत नाहीं. ज्या शाली विकरीस बाहेर पाठवितात त्यांतील एक चतुर्थांश किंवा पंचमांश तरी वापरून धुतलेल्या असतात. **दल** सरोवराच्या कांठीं **बदमर्ग** ह्मणून एक लहान खेडें आहे. त्याच्या जवळ या शाली धुण्याचें काम चालू असतें.

पूर्वकालीं या धंद्यास फारच तेजी होती. **मोंगल** बादशाहाच्या वेळीं येथें शालीचा चाळीस हजार माग चालू होता. पुढें **अफगाण** लोकांच्या वेळीं सोळा हजार होता. या प्रमाणें या धंद्यास मंदी येत गेली तरी इ० स० १८६० सालीं येथें तीन हजार माग चालू असून सुमारें पंचवीस लाख रुपये किंमतीच्या शाली एक **युरोप** खंडांत विकरीस गेल्या. इ० स० १८७० त **जर्मनी** व **फ्रान्स** या दोन देशांमध्यें जी लढाई झाली तिच्या योगानें या धंद्यास फार मोठा धक्का बसला. तसेंच अलीकडे वीस पंचवीस वर्षांत **इंग्लंड** व **फ्रान्स** येथें शाली तयार करूं लागले आहेत. त्या दिसण्यांत काश्मीरी प्रमाणें असून किंमतीस फार कमी असल्यामुळें त्यांचा खप विशेष होऊं लागला आहे. यामुळें या देशांतील शालींचा धंदा मंदावत चालला आहे. तत्रापि आजमितीस येथें सुमारें दोन हजार माग चालू असून वीस पंचवीस लक्ष किंमतीच्या शाली तयार होतात. त्यांपैकीं आठ नऊ लक्षांच्या **युरोप** खंडांत व बाकीच्या आपल्या व दुसऱ्या देशीं जातात. पांचशेंहून अधिक किंमतीच्या शाली काढितात, त्या **युरोप** खंडांत विकरीस जातात. त्याहून कमी किंमतीच्या आपल्या देशांत येतात. **युरोप** खंडांत ज्या शाली जातात त्याचें मुख्य गिऱ्हाईक **फ्रेंच** लोक होत. बाहेर देशीं ज्या शाली विकरीस जातात, त्यांजवर महाराजांची जबर जकात आहे. ही जकात सरकारी उत्पन्नाची एक मोठी बाब आहे. **रणजितसिंगाच्या** वेळीं जकातीच्या ऐवजीं शालीच घेत असत. येथील महाराज दरसाल बहुमोलाच्या तीन शाली महाराणीस नजर

पाठवितात. शालीच्या संबंधानें मिळाली तेवढी माहिती दिली आहे. या शिवाय लहान मोठ्या किंमतींचे चोगे, चादरी, मलीदे, पश्मीना, टेबलावरील कपडे, पट्टू, दुलया, कोट, लुई ( बहुमोलाचें कांबळें ), टोप्या, गळपट्टे इत्यादि येथें तयार करितात. शाली, तिचे पदर, किनारी आणि वर सांगितलेले दुसरे कपडे तयार करणारे लोक बहुतेक यवन असून त्यांस मजुरी फार थोडी मिळते. यामुळें ते अगदीं दरिद्रावस्थेंत आहेत. शालीच्या धंद्यास मंदी आल्यामुळें कांहीं लोक गालीचे विणूं लागले आहेत. **श्रीनगरच्या** दक्षिणेस सुमारें वीस मैलांवर **बाह-तोर** नांवाचें एक गांव आहे. तेथें निरनिराळ्या रंगांचे लोंकरी उमदे हातमोजे व पायमोजे तयार होतात.

## लोक.

आपल्या देशाप्रमाणें या देशांतही हिंदू व मुसलमान या दोन मुख्य जाति आहेत. त्यांत मुसलमानांचा भरणा फार मोठा आहे. येथें मुसलमानांचा अमल शेंकडो वर्षें झाल्यामुळें बहुतेक हिंदू खाण्यापिण्यांत व रितीभातींत अर्धे मुसलमान बनले आहेत. यांत पंडित हे प्रमुख आहेत. हे लोक उंच, सुदृढ, निरोगी व देखणे आहेत. यांचा वर्ण गौर असून चित्तवृत्ति मोठी आनंदी असते. देशांतील लहानमोठे अधिकार बहुतेकअंशीं याच लोकां-कडे आहेत. यांतील कांहीं लोक व्यापारधंदा व दुसरे उद्योग करितात. यवन लोकांपेक्षां हे लोक अधिक सुखी असावेत असें दिसतें. यवन लोकही पंडितां प्रमाणेंच उंच, सुदृढ व निरोगी आहेत. पण तसे देखणे

व गौर वर्णाचे नाहींत. यांत शियापेक्षां सुनीपंथाचे लोक अधिक आहेत. हे लोक व्यापार, शेतकी व दुसरे उत्पादक धंदे किंवा मोलमजुरी करितात. कांहीं सरकारांत शिपाईगिरीचें काम करितात. कांहीं नावा चालविण्याचे किंवा दुसरे धंदे करून निर्वाह करितात. यांतील थोडेबहुत सरकारी अधिकारी व व्यापारी आहेत. पंडित लोक मुख्यत्वें सरकारी नोकऱ्या करितात. पण त्यांतही व्यापार व दुसरे धंदे करणारे आहेत.

येथील स्त्रियांच्या सौंदर्याची प्रसिद्धि सर्वत्र आहे. त्या स्त्रिया पंडितांच्या बायका व मुली होत. पण या लोकांत गोषा फार चालू असल्यामुळें श्रीमान् व थोर लोकांच्या बायका आह्मांस कोठून दृष्टीस पडणार ! तत्रापि **श्रीनगरांत** एके दिवशीं फिरत असतां पंडितांच्या बायकांचा मेळा कांहीं समारंभा निमित्त रस्त्यानें जात असतां आह्मीं पाहिला. त्यावरून व गरीब पंडितांच्या बायका व मुली **वितस्ते**च्या कांठीं पाणी भरण्यास, भांडीं उजळण्यास व धुणीं धुण्यास येत असत; त्या आमच्या नेहमीं दृष्टीस पडत, त्यावरून त्यांच्या लावण्याविषयीं जी प्रसिद्धि आहे ती अगदीं यथार्थ आहे असें आह्मांस वाटलें. त्यांचा बांधा सुबक, नेत्र हरणी सारखे पाणीदार व टप्पोरे, नासिका सरळ, कपाळ मोठें, भिवया रेखल्या सारख्या कोरीव, वर्ण अतिगौर, केस काळेभोर, लांब व दाट असून त्यांचे सात, नउ पेड वळून वेण्या घालितात आणि त्यांत फुलपाखराच्या आकाराचे दागिने घालितात. याप्रमाणें रेखल्या सारखे सुंदर त्यांचे अवयव पाहून पंडिताची स्त्री ह्मणजे लावण्याची खाणच होय असें आह्मांस

वाटलें. या देशांत **लोलाब** दऱ्यांत **तावी** नदीच्या कांठीं **लालपूर** व **ठाणामंडी** नांवांचीं गांवें आहेत. तेथील स्त्रियांची तारीफ तर कांहीं विलक्षणच करितात. या सौंदर्याच्या संबंधानें राजतरंगिणींत बरेंच वर्णन आलें आहे. यांतील कांहीं भाग प्रियवाचकांकरितां खालीं देतों. "येथील स्त्रियांच्या ओष्ठांचा वर्ण द्राक्षासवासारखा आरक्त असून त्यांत अमृत असतें; या स्त्रियांचें सौंदर्य बालचंद्राच्या सौंदर्यास मागें सारितें व ह्या अहश्चंद्रिका आहेत." यांच्या या अप्रतिम सौंदर्यावरून एक ग्रंथकार या लोकांस देवयोनीचे लोक असें ह्मणतो. या सौंदर्याचें मुख्य कारण येथील अप्रतिम हवापाणी हें होय, असें एका इंग्रजी ग्रंथकाराचें मत आहे. या प्रमाणें येथील लोकांच्या सौंदर्याचें अनेक विद्वानांनीं निरनिराळ्या प्रकारें वर्णन केलें आहे. या देशास भूस्वर्ग असें जर नांव प्राप्त झालें आहे, तर येथील स्त्रियांस देवांगना किंवा अप्सरा ह्मणणें अगदीं योग्य आहे.

आतां या लावण्याच्या संबंधानें एक गोष्ट सांगून हें प्रकरण आटोपितों. एकाकालीं पृथ्वीवरील लोक फार दुराचरणी झाले. तेव्हां त्यांस सुधारण्याकरितां देवांनीं स्वर्गांतून **हरुत्** व **मरुत्** नांवांचे दोन दूत पाठविले. ते येऊन या लोकांस सुधारण्याचें काम एकीकडेच ठेवून उलट ते येथील स्त्रियांच्या लावण्यास भुलून त्यांच्या पाशांत सांपडले. विषयसुखाच्या इच्छेनें निरनिराळ्या देशांतील राजांनीं अनेक यत्न करून येथील स्त्रिया प्राप्त करून घेतल्याचीं उदाहरणें बहुत आहेत. **राजपुताना** नांवाची एक अतिरूपवती येथील

राज्ञी होती, तिच्या अभिलाषानें एका प्रधानानें राज्यपद बळकाविलें. तेव्हां त्याचा विश्वासघातकीपणा व कृतघ्नता हीं पाहून तिनें त्याची अत्यंत निर्भत्सना केली आणि आपल्या देहांत भोसका पाडून घेऊन प्राण सोडिला. प्राचीन काळीं आपल्या देशांतील राजे व अलीकडे दिल्लीचे बादशाहा या देशांतील उत्तम रूपवान् मुली आणून त्यांस आपल्या जनानखान्यांत ठेवीत असत.

## धर्म.

अति प्राचीन काळीं येथील लोक सर्पाची पूजा करणारे होते. इ० शकाच्या पूर्वी ६०० वर्षें जे **सिथियन्** लोक उत्तर हिंदुस्थानांत आले, त्यांच्यांतीलच हे लोक असावे असें पाश्चात्य लोकांचें अनुमान आहे. हिंदुस्थानच्या अगदीं ईशान्य दिशेस जे लोक राहतात, त्यांस **नाग** अशी संज्ञा सांप्रतकालीं सुद्धां असल्याचें प्रसिद्ध आहे. **चिनई** लोकांच्या ग्रंथांत **नाग** लोकांच्या राजांचें व त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचें वर्णन दिलेलें आहे. **चीन** देशांत नागाच्या ( ड्रेगन् ) पूजेची प्रवृत्ति व बौद्ध धर्माचा प्रसार हीं आपल्याच देशांतून गेलीं असावीं असें कांहीं विद्वान् लोकांचें मत आहे. तसेंच पुष्कळ **नाग** राजांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला असल्याचे लेख आहेत. **डा० हंटर** यांचें असें मत आहे कीं, **तक्षक** व **नाग** हे लोक सर्प व वृक्ष यांची पूजा करीत. या देशाच्या सभोंवतालच्या पर्वतांवर हे लोक राहत असत असें **काश्मीर** येथील लोकांचें मत आहे. या देशांतही **नाग** ( कर्कोट ) वंशांतील कांहीं राजे

जाहले. त्यांच्या कथा इतिहास प्रकरणांत पुढें दिल्या आहेत. तसेंच **नाग** नांवांचीं सरोवरें व झरे या देशांत अनेक स्थलीं आहेत. त्यांचा उल्लेख समयविशेषीं पुढें केला आहे. पुढें या देशीं वैदिक धर्म चालू झाला. तो पुष्कळ वर्षें होता. नंतर येथील कित्येक राजांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला, तेव्हां त्या धर्माचा प्रसार झाला. तत्रापि वैदिक धर्म अगदीं नाहींसा जाहला नाहीं. कारण **अशोक, मेघवाहन, ललितादित्य** इत्यादि राजे बौद्ध धर्माचे मोठे पुरस्कर्ते होते, तरी ते वैदिक धर्माचा द्वेष करीत नसत. इतकेंच नव्हे पण त्याही धर्मास ते मान देत, असें त्यांच्या इतिहासावरून स्पष्ट दिसतें. वैदिक धर्माच्या अभिमानानें बौद्ध धर्माचा छळ करणारे किंवा बौद्ध धर्माच्या अभिमानानें वैदिक धर्माचा छळ करणारे असे राजे फार थोडे जाहले. यामुळें कमी अधिक मानानें दोन्ही धर्म चालू होते. याप्रमाणें शेंकडों वर्षें लोटलीं. पुढें मुसलमान राजे जाहले. त्यांनीं आपल्या धर्माचा प्रसार करण्याकरितां शेंकडों देवालयें, मठ व विहार उध्वस्त केले, त्यांतील मूर्ति छिन्नविछिन्न केल्या आणि हजारों हिंदूंस व बौद्धांस जबरीनें मुसलमान बनविले. तत्रापि हिंदू धर्म अगदीं नष्ट न होतां तो अद्याप चालूच आहे. बौद्ध धर्म मात्र एक **लदाक्** प्रांतांत राहिला आहे. त्याजविषयीं थोडीशी माहिती पुढें दिली आहे.

सांप्रतकाळीं या देशीं मुसलमान लोकांचा मुख्य भरणा असल्याचें मागें सांगितलेंच आहे. हिंदू लोकांत पंडित हे प्रमुख आहेत. त्यांत आपल्याप्रमाणें कोंक-

णस्थ, देशस्थ व कऱ्हाडे इत्यादि भेद नाहींत. पण वडे लोक व सामान्य लोक असे दोन वर्ग मानितात. पंडित लोक आपणांस ऋग्वेदी सारस्वत ब्राह्मण ह्मणवितात. ते वेदशास्त्राचा अभ्यास करितात. आह्मीं एक दोघांस त्यांची शाखा कोणती ह्मणून विचारिलें. त्यास खतक ( पटक ) ह्मणून त्यांनीं सांगितलें. आह्मी वैदिक धर्मानें चालतों असें हे पंडित लोक सांगतात, पण विशेष शोध करितां सोळा संस्कारांपैकीं मौंजी, लग्न व मृत हे तीन संस्कार मात्र ते पाळितात व श्राद्धें करितात, असें समजून आलें. हे लोक शिव, दुर्गा, विष्णु, राम, गणपति यांची पूजा करितात व कोणी पंचायतनाची करितात. कांहीं पंडित तांत्रिक मार्गास विशेष मान देतात आणि ते देवीचे उपासक आहेत पण शैवोपासक अधिक आहेत. शिवरात्र व एकादशी हीं उपोषणें करितात व वितस्ता नदीस मोठी पवित्र मानून तींत स्नानें करितात. आपल्या देशाप्रमाणें ग्रहण पाळितात, ह्मणजे तें लागल्यावर व सुटल्यावर स्नानें करितात. या वेळीं दानधर्म करितात व त्याच्या वेधांत अन्न ग्रहण करीत नाहींत. आह्मीं कार्तिक शुद्ध पौर्णिमेचे ग्रहणास श्रीनगरीं होतों, ह्मणून या संबंधानें थोडी विशेष माहिती मिळाली ती दिली आहे. पण हे सर्व पंडित मत्स्याहारी असून कपडे घालून भोजनास बसतात व घरांतील सर्व काम यवन लोक करितात. यावरून त्यांच्यांत सोवळें ओवळें पाहण्याचा प्रचार विशेष नाहीं असें दिसतें. या लोकांत पुनर्विवाह चालू नाहीं. अमरनाथ व शंकरपर्वत हीं या देशांत दोन शिवस्थानें मुख्य असून श्रीनगर येथें

रामाचीं मंदिरेंही बरींच आहेत. त्यांचें वर्णन पुढें दिलें आहे.

## श्रीनगर.

कोणत्याही देशाचें वर्णन देतेवेळीं त्यांतील मुख्य शहराची माहिती देणें विशेष आवश्यक आहे, करितां या देशांतील मुख्य शहर जें **श्रीनगर** त्याजविषयीं कांहीं माहिती देतों. **काश्मीर** देशाची एका इंग्लिश ग्रंथकारानें **नेपल्स** प्रांताशीं तुलना करून **श्रीनगरास फ्लारेन्स्** शहराची व **वितस्तेस आर्नो** नदीची उपमा दिली आहे. या शहरास **सूर्यनगर** असें दुसरें नांव आहे. तसेंच मुसलमान लोक यास **काश्मीर** असेंही ह्मणतात. याची उंची समुद्राच्या सपाटीपासून ५,२०० फूट आहे. हें शहर **वितस्ता** नदीच्या दोहों तीरांवर हरिपर्वताच्या पायथ्याजवळ वसलें आहे. याची लांबी सुमारें दोन मैल आहे. शहराच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जाण्यास नदीवर सात ठिकाणीं पूल बांधिले आहेत. त्या सर्वांचें काम बहुतेक लांकडी असून त्यांस निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. **अकबर** बादशाहाच्यावेळीं येथें दोनच पूल होते. **श्रीनगराजवळ** प्रवाहाची रुंदी सुमारें नव्वद यार्ड व खोली सहा सात यार्ड असते. येथें सुमारें वीस हजार घरें असून लोकसंख्या लाख सव्वा लाख आहे. पैकीं आजमासें $\frac{1}{3}$ पंडित व बाकीचे बहुतेक यवन आहेत. नदीच्या दोहों तीरीं जागोजाग घाट व धक्के बांधले आहेत. हिंदूंचीं देवालयें पाडून त्यांचे दगड आणून हे घाट तयार केले असावे

असें त्यांस लावले असलेल्या दगडांवरून दिसून येतें. कांहीं जुन्या मशिदींतही असाच प्रकार झालेला दिसतो, असो. घाटांच्या वरच्या बाजूस प्रवाहाशीं समांतर जाणारे रस्ते असून त्यांजवर राजवाडे, मंदिरें, मशिदी, लोकांचीं लहान मोठीं घरें व दुकानें दुतर्फा लागून गेलीं आहेत. नदीच्या सपाटीपेक्षां शहराची सपाटी दहा पंधरा फुटापेक्षां अधिक उंच नसल्यामुळें तिजवरील घाटांच्या पायऱ्यांची संख्या दहा पंधरापेक्षां अधिक नाहीं. **बरामुला** नांवाचे गांवाहून **श्रीनगर** ३४ मैल असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. येथून वरच्या बाजूस **इस्लामबाद** गांव सुमारें ३३ मैल आहे. या प्रदेशांत व्यापारी लोकांच्या किस्त्या ९,००० वर आहेत. याशिवाय लोकांच्या खाजगी त्या वेगळ्याच. **अकबर** बादशहाच्या वेळीं येथें ८,९०० किस्त्या खेळत होत्या असा लेख आहे. येथील रस्ते एकंदरींत फार अरुंद व घाणेरे आहेत. त्यांत लहान रस्त्यांवर तर इतका दुर्गंध येत असतो कीं त्यांवरून जातां येतां प्रवाशाच्या मनास मोठी खंत उत्पन्न होते. शहरांत घोड्यांची किंवा बैलांची गाडी आमच्या नजरेस तर पडली नाहीं, याचें कारण रस्ते चिंचोळे हें असावें असें वाटतें. किस्ती हें येथील मुख्य वाहन होय.

येथें महाराजास राहण्याकरितां राजवाडे व बगीचे बरेच तयार केलेले आहेत. **शेरगडी** नांवाची एक विस्तीर्ण जागा **वितस्तेच्या** डावे कांठीं **आमीरकदल** नांवाच्या पहिल्या पुलाच्या वरच्या बाजूस आहे. तींत शहराचा किल्ला व राजवाडा आहे. याची लांबी

४०० व रुंदी २०० यार्ड असून त्याच्या तटाची उंची २२ फूट आहे व सभोंवतीं मजबूत बुरूज बांधिले आहेत. राजवाड्यांत मोठमोठाले दिवाणखाने व कचे-ऱ्याच्या जागा आहेत. याच्या पूर्वेकडून **वितस्ता** नदी वाहात असून उत्तरेस **कुंटिकुल** नांवाचा कालवा आहे. रायबहादूर पंडित **सुराजकोल सिनिअर मेंबर** यांचें राहणें व कचेरी हीं याच वाड्यांत आहेत. या सद्गृह-स्थांनीं या वाड्याच्या आवारांत आह्मांस राहण्यास जागा दिली होती. या वाड्याचें सर्व काम दगड, पक्क्या विटा, व लांकडें यांचें केलें आहे. या वाड्यास लागूनच दुसरा वाडा बांधण्याचें काम चालू असून त्यास पांच सहा लक्ष रुपये खर्च होणार असें समजलें. याच्या खालच्या बाजूस **महाराजका मंदिर** नांवाचें एक देवालय असून त्यांत **राम, लक्ष्मण** व **सीता** यांच्या मूर्ति आहेत. या मंदिराचें शिखर सोन्याच्या पातळ पत्र्यांनीं मढविलें आहे. हा सर्व राजवाडा तीन चार मजली असून शहराचा देखावा पाहण्यास याजवर कांहीं उघडे सज्जे राखिले आहेत. वाड्यास लागून खालच्या बाजूस एक बऱ्याच लांबीचा घाट बांधिला असून त्याजवर जाण्यास पूर्वाभि-मुखीं दोन द्वारें ठेविलीं आहेत. घाटाच्या समोर पली-कडच्या तीरीं वाफेच्या योगानें चालणाऱ्या दोन तीन किस्त्या ( स्टीमबोट्स ) उभ्या आहेत. यांपैकीं एक **हिंदुस्थानचे लाट** साहेब यांनीं महाराजास नजर केली असून दुसऱ्या दोन तिच्या नमुन्यावर महाराजांनीं तयार करविल्या असल्याचें समजलें. वाड्याच्या बाहेर पडून पांच पन्नास पावलें आलें कीं, एक मोठी दुतर्फा पेठ

लागते. तींत सर्व प्रकारच्या मालाचीं दुकानें आहेत. यांतील कांहींत लोंकर किंवा केस असलेल्या चर्माचे कोट विक्रीस ठेविलेले दृष्टीस पडले. यांच्या किंमतीचा तपास करितां मध्यमशा कोटास तीन चार रुपये पडतात ह्मणून समजलें.

वर सांगितलेल्या पेठेंतून आह्मी **लालमंडी** नांवाचा महाराजांचा दुसरा वाडा पहावयास गेलों. सुमारें चार हातांपेक्षां अधिक उंचीच्या चौथऱ्यावर हा वाडा बांधिला आहे. याच्या पहिल्या मजल्याचें सर्व काम दगड, पक्क्या विटा व चुना यांचें केलें आहे. **शेरगडी** राजवाड्यापेक्षां या वाड्यांतील मजल्याचें काम अधिक उंच दिलें असून वरच्या बाजूस सज्जे राखिले आहेत. यावरून सर्व शहराचा व आसमंतांतील भागांचा देखावा मोठा रमणीय दिसतो. यांतील दिवाणखान्याची उंची व रुंदी पाहून आह्मांस फार आश्चर्य वाटलें. कारण, आपल्या देशांतील लाखो रुपये खर्चून बांधलेले राजवाडे व बंगले आह्मीं पाहिले आहेत. पण त्यांतील दिवाणखाने एवढे उंच व रुंद नाहींत. तसेंच या दोन्ही राजवाड्यांतील दिवाणखान्यांच्या भिंती व छतें यांजवर जसें सुरेख सोनेरी वेलबुटीचें व नक्षीचें बारीक काम केलेलें आहे, तसें **दिल्ली, आग्रा** येथील कांहीं इमारतीवर मात्र दृष्टीस पडतें. या वाड्याच्या सभोंवार बगीचा असून त्यांत नाना प्रकारचे पुष्पवृक्ष व वेली लाविल्या आहेत. या बगीच्यांत लहानसे दोन तीन बंगले असून त्यांत कांहीं यंत्रें ठेविलीं आहेत. त्यांजवर एक तरुण पंडित कामगार नेमिला आहे. या गृहस्थानें डेसिमेटर

( भूकंप होण्याची सूचना देणारें यंत्र ) आह्मांस दाखविलें. हें यंत्र आह्मीं पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. राजवाड्याच्या सदरेच्या भिंतीस सांबर, काळवीट व दुसरे वनपशु यांचीं लांब व पुष्कळ फांटे फुटलेलीं शिंगें लावून ठेविलीं आहेत. आह्मीं या देशीं आल्याचे पूर्व वर्षीं आपल्या देशाचे **व्हाईसराय** साहेब हा देश पहावयास गेले होते. त्यांस राहण्यास महाराजांनीं हाच वाडा दिला होता. तेथून आह्मीं **बारादारी** नांवाचा बंगला पहावयास गेलों. ही इमारत **शेख** बागेच्या समोर आहे. महाराज व त्यांचे प्रतिष्ठित पाहुणे यांजकरितां ही तयार केली आहे. हिच्या छताचें काम पाहण्यासारखें सुंदर असून हिच्या दोहोंबाजूंस दोन घुमटाच्या आकृतीचे बंगले बांधिले आहेत. सरकारी दवाखाना व थोरलें पोस्टआफिस हीं येथून जवळच आहेत. दवाखाना पाहावयास सकाळीं आलें पाहिजे असें आमच्या बरोबर आलेल्या मनुष्यानें सांगितलें. आह्मीं तिकडे न जातां **हाजारी** नांवाचा बाग पहावयास गेलों. सांप्रत महाराजाचे वडील जे **रणवीरसिंग** ह्यांनीं हा तयार करविला होता. येथील इमारतीचें काम वरील **बारादारी** बंगल्याप्रमाणें चांगलें सुरेख आहे. येथें निरनिराळ्या जातींचे फलपुष्पवृक्ष व वेली असून त्यांच्या योगानें या स्थलास मोठी शोभा आली आहे.

आह्मीं भोजनोत्तर झंपानांत बसून **हरिपर्वत** (टेकडी) पाहण्यास गेलों. **प्रद्युम्न** नांवाचें स्थान याच टेकडीवर होतें ह्मणून सांगतात. ही टेकडी **श्रीनगर**च्या उत्तरेस आहे. आह्मीं पायथ्याजवळ गेलों, तेव्हां झंपा-

नांतून आलों ही निव्वळ चूक केली असें आह्मांस दिसून आलें. कारण, ही चढण ह्मणण्यासारखी मुळींच कठीण नाहीं. सारे दोन तीनशें फूट चढावें लागतें, एवढें चढण्यास आमचे आंगांत ताकद होती. आह्मीं पर्वताकडे जात असलेले पाहून शेजारचे खेड्यांतील लांब दाढीचे दहा बारा पंडित व त्यांचे कांहीं छोकरे आह्मां मागून येऊं लागले. यांतील एका दोघांचे हातीं पूजेचें सामान, पाणी व पोथी हीं होतीं. आह्मीं चढून वर गेलों तों, ही पंडित मंडळी आह्मांजवळ येऊन उभी राहिली आणि त्यांनीं आह्मांस **सारिका** देवीजवळ नेलें. देवीच्या नांवावरून यास **सारिका पर्वत** असेंही ह्मणतात. येथें त्यांच्या सूचनेप्रमाणें बूट काढून पादप्रक्षालन केलें आणि देवीजवळ एका कुशासनावर जाऊन बसलों. ही देवी ह्मणजे एक मोठी शिला असून तिजवर शेंदूर फासला आहे. एक बुड्ढे पंडितजी पोथी वाचून आह्मांस पूजा सांगूं लागले. त्याप्रमाणें आह्मीं सर्व पूजा केली. हा सर्व पूजाविधि संस्कृत भाषेंत लिहिला असून त्यांत क्वचित् परकी शब्द येत, ते **काश्मीरी** भाषेंतील असावेत असें आह्मांस वाटलें. पुढें **कश्यप** ऋषीनीं ज्या स्थळीं तपश्चर्या केली तें हेंच व त्यांस हीच देवी प्रसन्न झाली ह्मणून त्यांनीं सांगितलें आणि देवीवरील चार फुलें काढून आह्मांस प्रसाद ह्मणून दिलीं. आह्मीं त्या सर्वांस नमस्कार करून व कांहीं दक्षिणा देऊन त्यांचा निरोप घेतला. **अजमीर** सोडल्यापासून गुडमार्निंगवर आमचा सर्वांशीं व्यवहार चालू होता. पण येथें मात्र नमस्कार करण्याचा बरेच दिवसांनीं प्रसंग आलेला पाहून मनास मोठा

विस्मय वाटला. असो. नंतर आह्मीं येथील किल्ला पहावयास गेलों; पण आमच्या जवळ पास नसल्यामुळें शिपायानें आह्मांस आंत सोडलें नाहीं. तेव्हां तपास करितां दोनटांकीं व एक देवालय याहून पाहण्यासारखें तेथें कांहीं विशेष नाहीं असें समजलें. किल्ल्याचा परिघ सुमारें तीन मैल असून आंत जाण्यास तीन दरवाजे राखिले आहेत. त्यांतील एकास **काटीदरवाजा** असें ह्मणतात. याच्या तटाची उंची सुमारें २० हात असून १०० हातांच्या अंतरावर बुरूज बांधले आहेत. हा किल्ला **अकबर** बादशहानें इ० स० १५९० मध्यें बांधिला व त्यास एक कोट रुपये खर्च आला असें **काटी** दरवाज्यावर जो **परशियन** भाषेंत लेख आहे, त्यांत लिहिलें आहे ह्मणून मागून समजलें. येथें एका उंच स्थळीं कांहीं काल उभें राहून भोंवतालचा रमणीय देखावा पाहिला आणि खालीं उतरलों.

पुढें **वितस्तेच्या** कांठीं येऊन किस्तींत बसलों आणि शाली व त्यांचे माग पहावयास **समदशाह** व **अहमदशाह** यांचे दुकानीं जावयास निघालों. हीं दुकानें **वितस्तेच्या** अगदीं कांठीं असून तीन चार मजली आहेत. दुकान-दार लोक बहुतकरून दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यांत बसतात. हे लोक मोठे धूर्त व आर्जवी असतात आणि किस्तींतून जाणाऱ्या येणाऱ्या मुशाफरावर नजर ठेवून त्याच्या डामडौलावरून तो माल खरेदी करणारा आहे किंवा कसें हें तेव्हांच ओळखतात. तो खरेदी करणारा आहे असें वाटल्यास दुकानीं येऊन माल पाहा-ण्यास व खरेदी करण्यास मोठ्या आगत्यानें त्यास बोला-

वितात. अहंमदशाहाचें दुकान उजव्या तीरीं प्रथम लागलें. तेथें आह्मीं न जातां पुढें खालच्या बाजूस डावीकडे समदशाहाचें दुकान आहे तेथें गेलों. दुकानाचा मालक किंवा मुनीम यानें शिष्टसंप्रदायाप्रमाणें आह्मांस याबसा केलें आणि कोणता माल पाहिजे ह्मणून विचारिलें. तेव्हां शालजोड्या व दुसरा लोंकरी माल पाहण्यास आलों आहों ह्मणून सांगितलें. पुढें वीस पंचवीस रुपये पासून हजार बाराशें रुपये किमतीच्या शाली व दुसरा माल काढून दाखविला. तो पाहून दोन चार हजारांच्या शाली पाहण्याची आमची इच्छा प्रदर्शित केल्यावरून सुमारें दोन हजारांपर्यंत किंमतीच्या दोन शाली काढून त्यानें दाखविल्या. त्यांहून अधिक मौल्यवान् शाली दाखविण्यास विचारितां एवढी मोठी शाल तुह्मांस घेण्याची आहे काय? ह्मणून दुकानदारानें विचारिलें. खोटें बोलून कांहीं तरी थापा मारणें ही गोष्ट आह्मांस पसंत नसल्यामुळें मौल्यवान् शाली आह्मीं पाहण्यास मात्र आलों आहों, त्या खरेदी करण्याची आह्मांस मुळींच शक्ति नाहीं व कांहीं खरेदी करण्यास आलों नाहीं ह्मणून खरा प्रकार होता तो त्यास कळविला. आह्मांपासून कांहीं लभ्यांश होण्याची आशा नाहीं असें समजून उद्यां तिसरे प्रहरीं यावें ह्मणजे तशा मौल्यवान् शाली दाखवूं ह्मणून त्यानें सांगितलें. पुढें हातानें व मागावर शाली कशा विणतात हें पाहण्याची इच्छा कळविल्यावरून तें दाखविण्यास आह्मांबरोबर एक माणूस त्यानें दिला. आह्मीं मुख्य दुकानदाराचा निरोप घेऊन त्या मनुष्याबरोबर गेलों आणि हातानें व मागावर

विणण्याचें काम पाहून पुनः किस्तींत येऊन बसलों आणि "आंग्रेजी" शाळेकडे ती चालविण्यास हांजीस सांगितलें.

ही शाळा नदीच्या उजव्या तीरीं आहे. बाहेरच्या बाजूनें पाहिलें असतां येथें इंग्रजी शाळा आहे असें तिच्या इमारतीवरून कोणासही वाटावयाचें नाहीं. एका घराच्या चौकांत ही शाळा स्थापिली आहे. हींत अदमासें तीनशें विद्यार्थी असून ते **इंग्रजी, संस्कृत** व **परशियन** या भाषांचा व गणिताचा अभ्यास करितात. या शाळेवरील हेडमास्तर हे यवन असून **पंजाब युनिव्हर्सिटि**ची प्रवेश परिक्षा पास झालेले आहेत. यांस दरमाहा शंभर रुपये पगार मिळतो. हे गृहस्थ मोठे सुशील दिसले. यांचे हाताखालीं एक संस्कृत शिक्षक व सात आठ असामी मदतनीस आहेत. हेडमास्तर व संस्कृत शिक्षक यांजबरोबर आह्मीं बराच वेळ बोलत बसलों आणि त्यांच्या देशासंबंधी गोष्टींबद्दल कांहीं माहिती मिळविली. या शाळेंत जे अभ्यास चालतात त्यांचा तपास करितां विद्याखातें या देशांत बाल्यावस्थेंत आहे असें आह्मांस दिसून आलें. येथें पहिल्या वर्गांतील विद्यार्थ्यांचा इंग्रजी अभ्यास फार तर आपल्या इलाख्यांतील हायस्कूलच्या पांचव्या इयत्ते इतका होईल. येथून आह्मीं **महाराजगंज** नांवाचा बाजार पहावयास गेलों. हा बाजार ह्मणजे एक मोठा चौक असून चारही बाजूंच्या सोप्यांत निरनिराळ्या कारागिरांचीं दुकानें आहेत. चौकांतील पटांगणांत ओबडधोबड फरसबंदी केली असून तिजवर हलके व्यापारी आपला माल विकरीस

ठेवून बसतात. आठवड्यांतून एक दिवस येथें बाजार भरतो. त्या दिवशीं सर्व व्यापारी लोक आपला माल गिऱ्हाइकांचे दृष्टीस पडण्याकरितां दुकानांत बाहेर काढून ठेवितात आणि त्या दिवशीं येथें बरीच गर्दी होते. वर सांगितलेल्या कारागीर लोकांचे धंद्यांविषयीं आह्मीं वेगळीच माहिती देणार आहों, करितां त्यांजविषयीं येथें विशेष लिहीत नाहीं. सरकारी छापखाना येथून जवळच आहे पण तो पहावयास आह्मीं गेलों नाहीं.

वरील बाजार पाहून आह्मीं **शहाहमदन** नांवाची मशीद पहावयास गेलों. ही मशीद **वितस्तेच्या** उजव्या-तीरीं **फत्तेकदल** पुलाच्या खालच्या बाजूस आहे. हिच्या घुमटावर एक सोनेरी गोळा बसविला आहे. हिच्या आंतल्या बाजूस एक खोदीव लेख आहे. हिच्या खालच्या बाजूस नदीकडे जाण्यास एक लहानसा घाट आहे. या मशिदीच्या समोर नदीच्या पलीकडच्या बाजूस दुसरी एक मशीद दृष्टीस पडते. येथून आह्मीं **बादशाहा** नांवाची दुसरी मशीद पहावयास गेलों. ही **जैनकदल** नांवाच्या चौथ्या पुलाजवळ खालच्या बाजूस आहे. **श्रीनगर** येथें ज्या मशिदी आहेत, त्यांत ही फार जुनी आहे असें ह्मणतात व येथें **जैनुल्लआबदिन** बादशाहा याची कबर आहे. हा बादशाहा मोठा प्रतापी पुरुष होऊन गेला व कलाकौशल्यास त्यानें मोठें उत्तेजन दिलें अशी त्याची ख्याति आहे. **काश्मीर** येथें शाली विणण्याची कला त्यानें **तुर्कस्थानांतून** आणिली व **वूलर** सरोवरांत **लंका** नांवाचें जें बेट आहे तें यानेंच तयार करविलें असें ह्मणतात, पण यांतील पहिलें ह्मणणें

साधार नाहीं. येथून **जुम्मामशीद** नांवाची इमारत पहावयास गेलों. ही मशीद **शहाजहान** बादशाहानें बांधविली ह्मणून सांगतात. ही इमारत मोठी ढबदार व उंच आहे. तींत तीन दालनें केलीं असून त्यांतील प्रत्येक खांब ह्मणजे चाळीस हात उंचीचा एकेक देवदारु वृक्षच उभा केला आहे असें ह्मटलें असतां शोभेल. ह्या खांबांवर सुरेख कोरींव काम केलें आहे. हें काम पाहून येथें बांधविणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें इमारत पाहिजे तेवढी उंच व रुंद धरितां येते असें आह्मांस वाटलें. तिच्या स्थितीवरून तिची कितीएक वर्षें दागदूज झालेली नाहीं असें दिसलें. तिच्या दारावर एक **पर्शियन** लेख आहे पण त्याचा बोध आह्मांस कसा होणार! येथें एक बुढ्ढा फकीर बसला होता, त्यास ही मशीद कोणी व कधीं बांधिली ह्मणून विचारितां, **शिकंदर लोदी** बादशाहा पांचशें वर्षांपूर्वीं होऊन गेला, त्यानें ही बांधिली ह्मणून त्यानें सांगितलें. वर सांगितलेलीं सर्व स्थलें पाहण्यांत अगदीं अस्तमान होऊन गेला. बिऱ्हाडीं जाऊन कांग्रीचा सत्वर आश्रय करण्यास थंडी सांगूं लागली. तेव्हां किस्तींत येऊन बसलों आणि ती परतविण्यास हांजीस सांगितलें. परत येतेवेळीं **शेरगडी** राजवाड्याच्या खालच्या बाजूस पण पलीकडच्या कांठीं शहरांतील पोष्ट आफिस आहे, तेथें जाऊन आमच्या पत्रांचा शोध केला पण एकही पत्र मिळालें नाहीं, तेव्हां आमचे मनास फार वाईट वाटलें. हें पोस्ट आफिस ह्मणजे गोठ्यासारखी दहा बारा खण एक ठेंगणी व गलिच्छ इमारत आहे. तिच्या बाहेरच्या बाजूस 'पोस्ट आफिस' असे शब्द लिहिलेला

फळा लाविलेला आहे. तो नसता तर येथें पोस्ट आफिस आहे असें कोणाच्याही लक्षांत आलें नसतें.

नित्याप्रमाणें भोजनोत्तर किस्तींत बसून शहर पहावयास निघालों. प्रथम नदीच्या डाव्या तीरीं **राघवदास** नांवाचें एक देवालय आहे तेथें गेलों. हें मंदिर ह्मणण्यासारखें मोठें नाहीं पण याचें काम मात्र पाहण्यासारखें सुरेख आहे. मुख्य दरवाज्याच्या आंतल्या बाजूस लहानसें एक चौकोनी पटांगण असून मध्यभागीं एक चौथरा केलेला आहे, त्याजवर हें मंदिर बांधलेलें आहे. त्यांत मुख्य स्थानीं **राम, लक्ष्मण** व **सीता** यांच्या मूर्ति बसविल्या असून बाजूस **गणपति**, सूर्य व देवी यांच्या मूर्ति आहेत. देवदर्शन घेऊन आह्मीं बाहेरच्या बाजूस चौथऱ्यावर कांहीं पंडित बसले होते, त्यांच्या जवळ येऊन बसलों. यांतील दोन असामी हातांत पोथी घेऊन रामस्तोत्रांचा पाठ करीत होते. बाकीचे तीन चार असामी कांहीं गप्पा मारीत होते. तुम्ही कोण, कोठून आला व या देशीं येण्याचें कारण काय, असें त्यांतील एका वयस्क पंडितानें आम्हांस **हिंदुस्थानीं**त विचारिलें. या भाषेचें ज्ञान आमचें अगदीं बेताचेंच असल्यामुळें तींत भाषण करण्यास आम्हांस मोठी लाज वाटे. पण निरुपायास्तव ती बाजूस ठेऊन आमच्या या प्रवासांत "तुम आव, हम जाते," अशा मासल्याचें भाषण करीत असूं, तेव्हां आम्हीं मोठें साहस करीत आहों असें वाटत असे. पंडितांनीं विचारल्या प्रश्नांचीं आम्हीं जेव्हां उत्तरें देऊं लागलों तेव्हां आमची अपूर्व भाषणशैली ऐकण्यास स्तोत्रपाठ करीत असलेले दोघे पंडितही आमच्या मंडळींत येऊन

बसले. या पंडितांतील एक असामी बरींच वर्षे **पंजाबांत** राहिला असल्यामुळें त्यास आपल्या देशांतील धर्म, रीतिरिवाज इत्यादि गोष्टींची पुष्कळ माहिती असल्याचें त्याच्या भाषणावरून दिसलें. ब्राम्हण धर्मांतील सोळा संस्कार, हिंदूंचे सण, लग्नसंबंधी रीतिभाति इत्यादि अनेक गोष्टींविषयीं आमच्या घेडगुजरी **हिंदुस्थानी** भाषेमध्यें आम्हीं त्यास पुष्कळ प्रश्न विचारून कांहीं माहिती मिळविली, ती "या देशाची सांप्रत स्थिति" या प्रकरणांत दाखल केली आहे. वरील देवालयांत ४,९०० हस्तलिखित संस्कृत ग्रंथ असून त्यांची यादी **लाहोर** येथील 'ओरिएन्टल' कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ० एम्. ए. स्टीन ह्यांनीं तयार केली असून ती 'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाली आहे, असें आह्मांस मागाहून समजलें.

या पंडितांचा निरोप घेऊन आम्हीं **गदाधर** मंदिर पहावयास गेलों. याची बांधणावळ बहुतेक अंशीं **राघवमंदिरा** सारखीच आहे. पण हें तितकें सुरेख नाहीं. येथून **संमदशाहाचे** दुकानीं त्यानें सांगितल्याप्रमाणें अति मौल्यावान् शाली पाहण्याच्या हेतूनें पुनः गेलों. तेव्हां आपला मुनीम बाहेर गेला आहे, यामुळें त्या आतां दाखविण्यास सवड नाहीं म्हणून त्यानें सांगितलें. आम्हांपासून त्यास कांहीं लभ्यांश होण्याचा नसल्यामुळें उंच शाली काढून दाखवीत बसण्याची व्यर्थ मेहनत तो बहुतकरून करणार नाहीं, असें आम्हांस आदले दिवशींच वाटलें होतें; त्याप्रमाणें अनुभव आला म्हणून फार निराशा झाली नाहीं. तत्रापि अति मौल्यवान् शाली

पाहाण्यास मिळाल्या नाहींत म्हणून आमचे मनास ती गोष्ट लागली. पण उपयोग काय? असो. या वेळीं दोन घटका दिवस राहिला होता आणि आम्हांबरोबर दिलेल्या शिपायानें **अल्लीमशीद** पाहाण्यास जाण्याची शिफारस केली, तेव्हां बरें म्हणून तिकडे निघालों. ही मशीद **सफाकदल** नांवाच्या सातव्या पुलाच्या पलीकडे पण आमच्या बिऱ्हाडापासून बरीच दूर आहे. तिचें काम लांकडी असून भोंवतीं मोठमोठे चिनार वृक्ष आहेत. यांत एक वृक्ष एवढा मोठा होता कीं, तो चारपांच वावांत मावत नसे असें बरोबरच्या शिपाई बावांनीं सांगितलें. वरील मशीद **सुलतान हसन** बादशाहानें इ० स० १४७० त बांधल्याचा लेख आहे.

## जम्मू.

या देशांतील मुख्य व प्राचीन राजधानी (**श्रीनगर**) व त्यांतील दुसरीं रम्य स्थळें यांची प्रियवाचकांस बरीच ओळख करून दिली. आतां दुसरी राजधानी जी **जम्मू** तिजविषयीं दोन शब्द लिहितों. वायव्य **लोहमार्गा**वर **वजिराबाद** नांवाचें एक स्टेशन असून त्याचा फांटा **जम्मू** येथें जातो. **वजिराबादे**हून **जम्मू** हें गांव पन्नास मैलांवर आहे. तें **तावी** नांवाची **चिनाब** नदीची एक शाखा आहे, तिच्या उजव्यातीरीं वसलें असून डाव्या तीरीं **लोहमार्गा**चें स्टेशन आहे. येथील लोकसंख्या ४२,००० असून त्यांत हिंदूंचा भरणा अधिक आहे. सांप्रतचे महाराज **प्रतापसिंग** यांच्या पूर्वजांचें हें शहर मुख्य ठिकाण असल्यामुळें ते बहुतकरून येथें राहतात. उन्हाळयांत

मात्र ते **श्रीनगर** येथें किंवा त्याच्या आसपास रम्य व हवाशीर स्थळीं राहवयास जातात. **जम्मू** येथें पाहण्यासारखीं स्थळें सरकारी किल्ला, राजवाडा, कचेऱ्या, क्रीडास्थानें, बगीचे व दुसरे कारखाने हीं होत. महाराजांची टंकसाळही येथेंच आहे पण सांप्रत ती बंद असल्याचें समजतें. तोफखाना, घोडेस्वारांचीं व पायदळ पलटणें इत्यादि सैन्य येथें बरेंच राहतें. महाराजांचें येथें बरेच दिवस राहणें होत असल्यामुळें **श्रीनगराप्रमाणें** येथेंही सर्व कारखाने ठेविले आहेत. त्यांत संस्कृत व वेदशाला, इंग्रजीशाला, दवाखाना हीं मुख्य होत. पूर्वकालीं हें गांव आतां पेक्षां अधिक भरभराटींत होतें, असें याच्या आसपासच्या खुणांवरून दिसतें. याच्या मागल्या बाजूस **त्रिकुटी** नांवाची एक टेकडी आहे. तेथें एक देवस्थान असून श्रावण महिन्यांत एक मोठी जत्रा भरते. तेव्हां हजारो लोक देवदर्शनास जातात.

## श्रीनगर येथील धंदे.

या देशांत अनेक जातींचे कारागीर असल्यामुळें निरनिराळ्या प्रकारचे धंदे येथें चालू आहेत. त्यांत **श्रीनगर** येथें आज मितीस जे धंदे सुरू आहेत, त्यांजविषयीं कांहीं वर्णन देतों. येथील सर्व धंद्यांत मुख्य धंदा म्हटला ह्मणजे शाली विणण्याचा होय. त्यासंबंधाची माहिती पूर्वींच दिली आहे. येथें रेशमी कपडेही बरेच तयार होतात. रेशीम उत्पन्न करणारे किडे तुतीच्या पानांवर जगतात. ते वृक्ष या देशांत विपुल असल्याचें पूर्वीं सांगितलें आहे. या कृमींपासून

उत्पन्न होणारें रेशीम तयार करण्याचे कारखाने येथें पूर्वीं पुष्कळ असून मध्यंतरीं ते बंद पडले होते. पण सांप्रतच्या महाराजांचे वडील यांनीं या कारखान्यांकडे चांगलें लक्ष्य देऊन इ० स० १८७१ सालीं या कामीं तीन लक्ष रुपये खर्च केले. पुढच्या सालीं ७२० मण (१२०,००० रुपये किंमतीचें ) रेशीम उत्पन्न झालें. सांप्रत काळीं या कारखान्याची स्थिति कशी आहे तिचा आम्हीं तपास केला पण बरोबर माहिती मिळाली नाहीं. याशिवाय दुसरे धंदे पेपिअरम्याचीचें काम, सोनार, मिनेगार, मुलामा देणारे यांचीं कामें, बंदुका तयार करणें, कातडीं कमावून त्यांचें सामान करणें, कागद तयार करणें, चितारी, कातारी व सुतार इत्यादि कारागिरांचे धंदे चालू आहेत. यांतील प्रत्येकाविषयीं थोडी थोडी माहिती खालीं देतों. कागद कुटून त्यांचा लोण्यासारखा मऊ रद्दा करितात आणि त्यांत कांहीं चिकण पदार्थ घालून त्याचा रांधा बनवितात. नंतर त्याची लहान टेबलें, पेट्या, कलमदानें, तबकड्या, डबे व दुसरे इष्ट पदार्थ तयार करून त्यांजवर सुरेख वेलबुटीचें किंवा दुसरें नकशीदार काम करितात आणि त्या पदार्थांस निरनिराळे रंग देऊन त्यांजवर रोगण फिरवितात. वर सांगितलेल्या रद्याचे लहान मोठे फळे तयार करून त्यांजवरही वेलबुटीचें किंवा नकशीचें काम करितात आणि हे फळे श्रीमंत लोकांच्या घरांच्या भिंतीस व छतास लावितात. पेपिअरम्याची हा **फ्रेंच** शब्द असून हें काम प्रथम **फ्रान्स** देशांत करूं लागले. हें काम पुष्कळ वर्षेंपर्यंत टिकतें. **महाराजगंजा**-नजीक एका दुकानीं जाऊन पेपिअरम्याचीचे कांहीं

पदार्थ पाहिले, ते आम्हांस फार सुरेख वाटले. याच मासल्याचें काम मऊ लांकडाचे तक्ते घेऊन त्यांजवर करितात आणि ते तक्ते दिवाणखान्याच्या छतास व भिंतीस जोडितात. येथें बंदुका व पिस्तुलें जीं तयार होतात, त्यांतील नळ्यांचें काम मोठी तारीफ करण्यासारखें असतें. येथील चर्मकार कातडीं कमावण्याच्या कामीं मोठे कुशल असून त्यांस जिनें, त्रंक्स ( पेट्या ), डोल, बूट, चढाव इत्यादि हरएक सामान चांगलें करितां येतें. आपल्या देशीं पूर्वकालीं **दौलताबादी** कागदाची मोठी प्रसिद्धि होती. त्या नमुन्याचे चांगले मोहरेदार कागद येथें तयार होतात. ते तागाचे करितात. **श्रीनगरा**जवळ **नऊशिरा** नांवाचें एक स्थळ आहे, तेथें कागद तयार करण्याचा एक मोठा सरकारी कारखाना आहे. **पंजाब** प्रांतांतील सर्व व्यापारी लोक मुख्यत्वें याच कागदांचा उपयोग करितात. भांड्यांवर मिन्याचें सुरेख काम करून त्यांजवर सोन्याचा मुलमा देतात. हीं भांडीं वजनावर विकतात. नकशीचें कामही येथें सुरेख तयार होतें. चांदीच्या भांड्यावर नकशी खोदून तिजवर सोन्याचा मुलामा चढवितात. तसेंच नकशीचें काम तांब्याच्या भांड्यावर रुपें चढवून करितात. नकशीदार तबकें, सुरया, पेले, वाट्या, फुलपात्रें, चहादाण्या, शेंदुराच्या कळ्या इत्यादि पदार्थ **महाराजगंज** येथील दुकानांत विकरीस ठेविलेले असतात. ही नकशी शालीवर जें वेलबुटीचें काम करितात त्याच धरतीवर असते. नकशीदार चांदीचीं भांडीं दर तोळ्यास सव्वा रुपाया आणि तांब्याचीं दर तोळ्यास तीन आणे प्रमाणें विकतात. जडावाचें कामही येथें

दिल्लीप्रमाणें तयार होतें म्हणून समजलें, पण तें आह्मांस पहावयास मिळालें नाहीं. देवदारू किंवा दुसरें नरम लांकूड घेऊन त्याजवर कोरींव व जाळीदार काम येथें फार सुरेख तयार होतें. या कामास दर चौरस यार्डास एक रुपया पडतो. हें काम **श्रीनगर** येथील श्रीमंत लोकांच्या घरांत पुष्कळ दृष्टीस पडतें. येथील कारागीर इतके हुशार आहेत कीं, त्यांस हस्तकौशल्यानें केलेला कोणताही पदार्थ दाखविला असतां ते त्या बरहुकूम करून देतात.

## प्रसिद्ध बगीचे.

या देशांतील हवापाणी व जमीन हीं उद्भिज कोटीस चांगलीं अनकूल असल्यामुळें **श्रीनगर**चे आसपास सरकारी व खासगी अनेक बगीचे तयार केले आहेत. त्यांत **दल** सरोवराच्या कांठचे बगीचे मोठे रमणीय असून त्यांची रचनाही फार मजेदार आहे, करितां त्यांतील कांहींचें वर्णन देतों. **शालीमार** (मदनगृह) नांवाची प्रसिद्ध बाग सरोवराच्या ईशान्येस आहे. ही **जहांगीर** बादशाहानें त्याची प्रिया जी **नूरजहान** हिच्यासाठीं तयार केली होती. ही बाग आणि सरोवर यांच्यामध्यें एक कालवा आहे. याच्या दोहोंबाजूंवर चिनार, वाळुंज व दुसऱ्या वृक्षांची दाट झाडी लागून गेली आहे. या बगीच्याची लांबी अजमासें ६०० व रुंदी २५० यार्ड होईल. याच्या भोंवतीं पक्क्या विटांचा एक तट बांधिला आहे. या स्थळाचें सौंदर्य पाहून मनास फारच आनंद होतो. त्यांत एकावर एक चढते व एका रेषेंत पण पृथक् असे चार बंगले आहेत. प्रत्येकाच्या पुढच्या बाजूस एकेक चौकोनी

सज्जा राखिला असून त्याजवर बहुकोनी मनोऱ्यासारखी एक सुरेख इमारत बांधिली आहे. ही काळ्या संगमरवरी दगडांची असून तिजवर पाहण्यासारिखें कुसर काम केलें आहे. सज्ज्याच्या खालच्या बाजूस पुष्पवाटिका, हौद व त्यांत शेंकडों कारंजीं बांधिलीं आहेत. खजिने व हौद यांचें काम काळ्या संगमरवरी दगडांप्रमाणें चमकतें. त्यांच्या दोहोंबाजूस नयनांस आनंद देणाऱ्या वृक्षराजी लाविल्या आहेत. या बंगल्याच्या पृष्ठभागाच्या पर्वतांतील प्रवाह धरून त्याचें पाणी नळानें सर्वांत उंच अगर पहिल्या बंगल्याच्या खजिन्यांत आणून सोडिलें असून तोच नळ पुढें चवथ्या बंगल्याच्या खजिन्यास नेऊन मिळविला आहे. वर सांगितल्याप्रमाणें या बागेंतील बंगल्याची रचना असून सर्वांत उंच बंगल्यांतील कारंजीं चालू केली ह्मणजे त्यांच्या पाण्याचा जोत नळामार्गें लहानशा धबधब्याप्रमाणें खालच्या तीनही बंगल्यांतील हौदांत येऊन पडूं लागतो. तोंच जसें काय त्यास भेटण्याच्या बुद्धीनें बंगल्यांतील सर्व कारंजीं एकामागून एक उडूं लागतात. सर्वांत उंच किंवा मागील बंगल्यांत जनानखान्यांतील स्त्रिया आणि राजकन्या चैन मारीत रहात असत. वसंत ऋतूंत चंद्रमा आपल्या किरणांनीं द्रवरूप अमृताचें वरून सिंचन करीत असतां, त्याचा तारागण आकाशास रत्नजडित करून चमकत असतां, बाजूंचीं हिमाच्छादित शिखरें मधून मधून दृग्गोचर होत असतां, त्यांजवरील प्रवाह अस्फुट व मधुर शब्द करीत खालीं उतरत असतां, बागेभोंतालच्या वृक्षराजी आपल्या कोमल व आरक्त पल्लवांनीं शोभायमान झाल्या असतां,

पुष्पवाटिकेंतील वृक्ष व वेली प्रफुल्लित होऊन रमणीय दिसत असतां, शेंकडों कारंजांचे फवारे चोहोंकडे उडत असतां, त्यांवरून शीतल व सुगंध वायु वाहत असतां, **दल** सरोवरावरील सौंदर्याचा चित्रपट पुढें पसरला असतां, **जहांगीर** बादशाह आपल्या प्रियेचें मधुर गायन ऐकत तिच्याशीं विलाससुखाचा उपभोग घेत असे व केव्हां केव्हां उभयतांचा प्रेमयुक्त लाडझगडा उडत असे. या सर्व विषयांवर **मुर** नांवाच्या प्रसिद्ध इंग्लिश कवीनें फार सुरस कविता लिहिली आहे. ती पाहण्याची ज्यांस जिज्ञासा असेल, त्यांनीं **लालारुखा** नांवाचा ग्रंथ वाचावा. **हिंदुस्थान**चे **लाट साहेब** किंवा त्यांच्या सारिखे दुसरे बडे पाहुणे हा देश पहावयास येतात, तेव्हां हा बाग शृंगारून त्यांत चिराकदान करितात आणि सर्व कारंजीं चालू करितात; त्या वेळीं हें स्थळ किती रम्य दिसत असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. साहेब लोक व दुसरे श्रीमान् लोक या बागेंत वनभोजनें करितात किंवा चार दिवस मौजेनें येऊन राहतात. **जहांगीर**चा मुलगा जो **शहाजहान** यानें याच नांवाचा व याच नमुन्यावर **लाहोर** येथें एक बाग तयार करविला आहे. तो किंवा **सर रि० टेंपल** यांनीं या देशांतील कांहीं विशेष स्थळांच्या तसबिरी आपल्या पुस्तकांत दिल्या आहेत, त्यांत या बागेचीही तसबीर दिली आहे; ती पाहिली असतां हें स्थळ किती रम्य आहे, याची कल्पना वाचकांस करितां येणार आहे.

ही बाग पाहून **निशात्** नांवाची दुसरी बाग या सरोवराच्या कांठीं पूर्वेस आहे ती पहावयास गेलों. तिच्या भोंवतीं दगड आणि विटा यांचा एक तट बांधिला आहे.

हिची रचना, येथील कारंजीं, पाण्याचे खजिने हीं सर्व **शालिमार** बागेप्रमाणेंच आहेत. **शालिमार** बागेंत ज्या प्रवाहाचें पाणी आणिलें आहे, त्याच प्रवाहाचें पाणी या बागेंतील खजिन्यांत आणून सोडिलें आहे. यांतील बंगल्यांची संख्या **शालिमार**पेक्षां अधिक आहे. हा बागही **जहांगीर** बादशाहानें आपल्या प्रियेकरितां तयार करविला होता. याचे भोंवतीं पाप्लर व चिनार वृक्षांची दाट झाडी लागून गेली आहे. सर्वांत खालचा बंगला दुमजली आहे. खालच्या मजल्याच्या मध्यभागीं एक मोठें कारंजें राखिलें आहे. **ब्रेन** नांवाचें खेडें या बागेच्या दक्षिणेस आहे. तें सर्व द्राक्षवेलींनीं आच्छादून गेलें आहे. येथून **चाष्माशाई** नांवाचा बाग व झरा पहावयास गेलों. या बागेंत एकावर एक चढते पण पृथक् असे तीन बंगले असून त्यांतील पाण्याचा नळ, खजिने, कारंजीं व कृत्रिम धबधबे यांची रचना वरील दोन बंगल्यांतील रचनेप्रमाणेंच आहे. हा बाग **अकबर** बादशाहानें तयार करविला होता असें ह्मणतात. **चाष्माशाई** नांवाचा झरा या बागेच्या दक्षिणेस आहे. त्याचें पाणी आणून या बागेंत खेळविलें आहे. या झऱ्याचें पाणी मोठें स्वच्छ, गार, व पाचक असल्यामुळें **श्रीनगर** येथील श्रीमान् व साहेब लोक तें आणून पितात. या झऱ्याच्या आसपास द्राक्षवेलीचे पुष्कळ मंडप दृष्टीस पडले. या वेळीं थंडी फार असून तृषाही नव्हती पण स्वदेशीं परतल्यावर हें पाणी आह्मांस कोठून मिळणार असा विचार करून आह्मीं तें दोन तीन ओंजळी प्यालों. या अमृततुल्य उदकाची स्तुति कशी करावी हें आह्मांस समजत नाहीं.

याशिवाय **पेरिमहाल, नसिबबाग, हजारीबाग, बसंत-बाग** इत्यादि दुसरे बगीचे आहेत. **पेरिमहाल** दलसरोवराच्या दक्षिणेस एका मैलावर आहे. येथें सरळ रेषेंत एकाहून एक उंच अशीं सात दालनें बांधिलीं आहेत. ही इमारत जहांगीर बादशाहानें त्याच्या गुरूच्या सुचनेवरून विद्यालयाकरितां बांधिली होती असें ह्मणतात; कोणी ती आपल्या प्रियेच्या समागम सुखाचा उपभोग घेण्याकरितां तयार केली होती ह्मणतात. सांप्रत ती अगदीं मोडकळीस आली आहे. पण तिजवरून सरोवराचा देखावा मात्र सुंदर दिसतो.

## बाहेरील स्थलें.

येथपावेतों आह्मीं आमच्या वाचकांस **श्रीनगर** शहराची बरीच माहिती करून दिली. आतां बाहेरील कांहीं प्रसिद्ध व रम्य स्थलांची ओळख करून देतों.

**पाद्रितन्**—श्रीनगरच्या आग्नेयीस तीन मैलांवर **पाद्रितन्** नांवाचें एक स्थळ आहे. येथें प्राचीन काळीं **पुराण—आदिस्थान** नांवाची राजधानी होती. तिचा अपभ्रंश होऊन वरील नांव पडलें आहे. **चंद्रगुप्ताचा** नातू **अशोक** यानें येथें कांहीं देवालयें बांधिलीं असून त्यांतील एकांत **बुद्धाचा** दांत ठेविला होता. पुढें तो दांत **कनोजचा** बलाढ्य राजा जो **अभिमन्यु** याच्या स्वाधीन करावा लागला. त्यानें या सर्व देवालयांस आग लावून त्यांचा विध्वंस करून टाकला. त्यांतील एक देवालय तलावांत असल्यामुळें तें मात्र बचावलें. याचें काम दगडी असून त्याचा आकार मनोऱ्यासारिखा आहे. देवालयाप्रमाणें

याच्या छताचेंही काम दगडी आहे आणि त्यांत अप्सरांचीं चित्रें खोदिलीं असून त्यांच्या हातांत पुष्पगुच्छ दिले आहेत. हा तलाव चौरस असून त्याची प्रत्येक बाजू चाळीस यार्ड लांब आहे. पावसाळा लागण्यापूर्वीं यांत पाणी फार थोडें असतें आणि त्यांतून देवालय पाहाण्यास जातां येतें. हें काम **कौरव पांडवांच्या** वेळचें असावें असें कांहीं लोक मानितात पण त्यास आधार नाहीं. हें देवालय व दुसऱ्या देवालयांचे जे अवशिष्ट भाग येथें दृष्टीस पडतात, त्यांवरून **अवंतीपूर** व **मार्तंड** या गांवांतील इमारतींपेक्षां या देवालयांचें काम मोठें भव्य असावें असें अनुमान होतें. **पेशावराजवळ गांधार** नांवांचे जे मोठे मठ होते, त्यांच्याच नमुन्यावर हीं देवालयें **बौद्ध** धर्माच्या राजांनीं बांधिलेलीं असावींत असें दिसतें. येथें **प्रवरसेन** नांवाचें एक शिवस्थान होतें. **पांपूर** नांवाचें गांव येथून जवळ असून तेथील केशराचे बाग व दुसरीं स्थलें यांचें वर्णन पूर्वीं दिलेंच आहे. याच्या दक्षिणेस चार मैलांवर **ललितपूर** नांवाचें एक देवालय असून तें **ललितादित्य** राजानें बांधलें असावें असें ह्मणतात. **पांपूराहून** तीन मैलांवर **विअन** नांवाचें एक स्थल आहे. तेथें गंधक व लोह यांच्या मिश्रणाचे तीन व गोड्या पाण्याचा एक असे चार झरे आहेत. यांतील पाण्यास इंग्रजींत ( मिनरल वाटर ) खनिज पाणी असें ह्मणतात. या झऱ्यांच्या शेजारीं पुष्कळ सुवर्णमुखी असून त्यांतून पाणी येत असल्यामुळें तें **जर्मनी** व **इंग्लंद** येथील मिनरल वाटरप्रमाणें आमवात, कष्टसाध्य त्वचा रोग, ज्वरानें उत्पन्न झालेला साधारण अशक्तपणा व काळीज

रोग इत्यादि आजारांवर मोठें वस्ताद औषध आहे. या झऱ्यांचें पाणी प्राशन केल्यानें व त्यांत स्नान केल्यानें वर सांगितलेले आजार नाहींसे होतात. येथें आजारी लोकांस राहण्यास जागा व त्यांस स्नान करण्यास न्हाणीघरें बांधण्याचा येथील सरकार विचार करील तर लोकांवर मोठे उपकार होतील.

**अवंतीपूर**—हें गांव **श्रीनगरा**पासून १७ मैलांवर वितस्तेच्या उजव्या तीरीं आहे. हें शहर **अवंतीवर्मा** नांवाच्या राजानें स्थापिलें. त्या वेळीं **काश्मीर** देशाची वसति ३०,००,००० असून तो मोठा भरभराटींत होता. या राजानें अनेक देवालयें बांधिलीं होतीं. त्यांतील **अवंतिस्वामी** व **अवंतीश्वर** देवालयांचे जे अवशिष्ट भाग सांप्रत दृष्टीस पडतात, त्यांवरून या देशांत शिल्पकला किती उंच दशेस पोहोंचली होती, याचें अनुमान सहज करितां येतें. पहिलें देवालय राजानें गादीवर बसण्या-पूर्वीं बांधिलें व दुसरें राज्यपद मिळाल्यावर त्याच्या शेजारीं बांधिलें. पहिल्याचा प्राकार १७२ फूट लांब व १४६ फूट रुंद आहे व दुसऱ्याचा १९१ फूट लांब व १७१ फूट रुंद आहे. **अवंतीपूर** पैकीं एक मोठा चौक व त्याच्या भोंवतालचा तट यांचे अवशिष्ट भाग मात्र आतां दिसतात. येथून अजमासें आठ दहा मैलांवर **बिजबिहार** किंवा **विद्याविहार** ( ज्ञानमंदिर ) नांवाचें अगदीं मोडकळीस आलेलें एक गांव आहे, याच्या जवळ नदीवर एक लहानसा पूल असून त्याजवरून आसमंतांतील भागाचा देखावा मोठा रमणीय दिसतो. त्याची तसबीर **सर रि० टेंपल** यांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे.

येथें **बिजबिहार** नांवाचें एक सुंदर देवालय **अशोक** राजानें बांधिलें होतें पण **शिकंदर** बादशाहानें त्याचा नाश करून त्या स्थलीं एक मशीद बांधिली. पुढें **गुलाबसिंगाचे** हातीं हा देश आल्यावर त्यानें ती पाडून तेथें पुन्हा देवालय बांधिलें. येथून कांहीं अंतरावर **बवन्** नांवाचें खेडें लागतें. याच्याजवळ **भौमजो** नांवाची गुहा आहे, तींत एक देवालय आहे. तेथें एक झरा असून त्यास लोक मोठा पवित्र मानितात. येथून **इस्लामबाद्** चार पांच मैलांवर राहते. येथें चिनार वृक्षांची राई इतकी दाट लागून गेली आहे कीं, तींत सूर्यप्रकाशाचा मुद्धां रिघाव होत नाहीं. या राईच्या ठिकाणीं पूर्वकालीं एक मोठा बगीचा असल्याच्या खुणा दृष्टीस पडतात. यास लागून एक देवालय व तलाव आहे. यांतील पाण्यास गंधकाचा वास मारितो व त्यांत मासे पुष्कळ आहेत. येथून एक मैलावर दोन मोठ्या गुहा आहेत. थोरली गुहा पाहाण्यास मशालीचे मदतीनें दोनशें फूट पर्यंत आंत जातात. येथें यात्रा भरते ह्मणून त्यास **काश्मीरी** भाषेंत **भमज्यू** असें ह्मणतात. दुसरींत एक **हिंदू** देवालय असून त्याचें काम पाहण्यासारिखें आहे. येथून—

**मार्तंड**—नांवाचें जुनें गांव व देवालय हीं एक मैलावर आहेत. यांची स्थापना **ललितादित्य** राजानें केली ह्मणून लेख आहे. पूर्वकालीं येथें **रामपूरस्वामी** नांवाचें एक शहर होतें. वर सांगितलेलें देवालय सूर्या-प्रीत्यर्थ बांधिलें होतें ह्मणून त्यास **मार्तंड** असें नांव पडलें आहे. त्याचा कांहीं भाग अद्यापि दृष्टीस पडतो. हें

काम काळ्या संगमरवरी दगडांचें केलें होतें. त्यावरील कोरींव काम अगदीं झिजून गेलें असल्यामुळें तें चांगलें ओळखतां येत नाहीं. या देवालयाची लांबी सुमारें २४०, रुंदी १४० व उंची ४० फूट आहे. त्यास ( पांडकी-लेर ) **पांडवांचें** घर असें ह्मणतात. हें पाण्यांत बांधलेलें असून त्यास जाण्यास दगडी पायरस्ता होता. त्याच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. **ललितादित्य** राजानें हें देवालय बांधिलें असा राजतरंगिणींत लेख आहे. **हुजेल** नांवाचे प्रसिद्ध **जर्मन** ग्रंथकार हें देवालय **पांडवांनीं** बांधिलें असें ह्मणतात, पण या ह्मणण्यास आधार कोणता हें समजत नाहीं. **शिकंदर** उर्फ **भुटूशिकन** ( मूर्ति फोडणारा ) यानें येथील देवालयांचा व दुसऱ्या इमारतींचा नाश केला. यांची बांधणावळ **ग्रीक** आणि **रोमन** बांधणावळीसारखी होती असें एक **इंग्लिश** ग्रंथकार लिहितो. या स्थलाच्या आसमंतात् वाहणारे स्वच्छ पाण्याचे प्रवाह, वृक्षराजींनीं आच्छादिलेले झरे, फल-पुष्पांनीं शोभायमान् झालेल्या बागा, हिरवीं गार शेतें, या सर्वांच्या सभोंवतीं बर्फानें आच्छादिलेले पर्वत व त्यांची गगनचुंबित शिखरें इत्यादि गोष्टींनीं या जाग्यास अत्यंत शोभा आली आहे. येथील प्रमाणें अप्रतिम व रमणीय वनश्री पृथ्वीवर कोठें नाहीं असें कप्तान **बेट्स** ह्मणतात. **पाद्रितन्**, **अवंतीपूर** व **मार्तंड** येथील प्राचीन इमारतींचे अवशिष्ट भाग पाहिले असतां तीं कामें किती भव्य असावीं व **काश्मीरी** लोक शिल्पकलेंत किती प्रविण असावे, याची एकदम कल्पना करितां येते. तीं कामें पाहण्याची ज्यास अनुकुलता नाहीं, त्यांनीं त्यांचे

मे० **कनिंगहाम** साहेबांनीं दिलेले फोटो (तसबिरी) पहावे व वर्णन वाचावें. इ० स० १६०० त यांतील कांहीं कामें बऱ्या स्थितींत होतीं असें प्रसिद्ध इतिहासकार **फेरिस्ता** ह्मणतो.

**इस्लामबाद** (तारणपूर)—हें गांव **श्रीनगरा**पासून **वितस्ते**च्या कांठीं तेतीस मैलांवर आहे. येथें पात्राची रुंदी ८० यार्ड आहे. याचें जुनें नांव **अनंतनाग**, हें पूर्वकालीं एक मोठें शहर होतें. हें गांव एका सुळकेदार टेंकडीच्या पायथ्याशीं वसलें आहे. ही टेंकडी **काश्मीर** दऱ्याच्या प्रत्येक भागांतून दृष्टीस पडते. हें गांव फलबागा, चिनार, पापुर, पिअर, आक्रोड इत्यादि वृक्षराजींनीं आच्छादिलें असून त्या वृक्षांवर द्राक्षवेली व दुसऱ्या लता पसरल्या आहेत. येथें सरकारी एक बाग असून त्यांत महाराज कधीं कधीं राहतात. हें गांव मुख्यत्वें-करून येथील अनेक झऱ्यांकरितां प्रसिद्ध आहे. यांत **अनंतनाग, सलिकनाग, मलिकनाग** आणि **सोनारपोकरी** हे मुख्य होत. **अनंतनाग** हा झरा **विष्णू**च्या पादताडनानें उत्पन्न झाला असें समजून लोक त्यास मोठा पवित्र मानितात. हा झरा सरकारी बागेच्या अगदीं नजीक आहे. याचें पाणी फार उत्तम मानिलें असून त्याचे **इस्लामबाद**च्या पुष्कळ भागांत नळ बांधून नेले आहेत. यांतील एक दोन झऱ्यांतून ज्वालाग्राही वायु निघतो. सांप्रत या गांवीं सुमारें एक हजार घरें असून लोकसंख्या पांच हजार होईल. येथें शाली, लोंकरीच्या दुलया (रग्ज), चिटें व दुसरे कपडे तयार करितात. येथें एक पानचक्की आहे, तिच्या योगानें कणीक

दळून तयार होते. **पांपूरा**प्रमाणें येथेंही केशराच्या बागा असून त्यांत बरेंच केशर उत्पन्न होतें. या गांवाच्या पूर्वेस **गणेशबाल** नांवाचें एक गणपतीचें देवालय आहे. त्याजविषयीं अशी कथा आहे कीं, **शंकर** कैलासास जात असतां ते **गणपतीस** येथें ठेवून पुढें गेले. **अमरनाथ** नांवाचें **शिवस्थान** येथून ६० मैल आहे. तेथें जाणारे यात्रेकरू आपली शिधासामुग्री या गांवीं भरून घेतात.

**अचिबल**—या नांवाचें स्थल **इस्लामबादे**च्या पूर्वेस ६ मैलांवर आहे. हें स्थल मुख्यत्वेंकरून येथील सुंदर झरे व वनश्री करितां विशेष प्रसिद्ध आहे. ही वनश्री इतकी मनोरम आहे कीं, **काश्मीर** देशास भूस्वर्ग असें जें नांव पडलें आहे, त्याचें मुख्य कारण हें स्थल असावें असें **नाईट** साहेब यांचें मत आहे. ही जागा **नूरजहान**ची मोठी आवडती होती. येथें एक मोठा बगीचा असून त्यांत एकावर एक चढतीं दालनें केलीं आहेत. **शालिमार** बागेप्रमाणें या दालनांत कारंजीं केलीं असून पाणी नळानें चौहोंकडे खेळविलें आहे व त्याचे लहान पण टुमदार धबधबे बनविले आहेत. येथून जवळ **बिंघ** नांवाची एक नदी कांहीं अवकाशपर्यंत गुप्तरूपानें वाहत असून तिजपासून या झऱ्यांची उत्पत्ति झाली असें मानितात. यांचें पाणी कारंजाप्रमाणें वर उडतें आणि बर्फासारिखें थंड असतें.

**वर्नाग**—हें गांव **अचिबल**पासून १९ मैलांवर **शाहाबाद** नांवाच्या दरींत पर्वताच्या पायथ्याशीं आहे. **वर्नाग** नांवाचा झरा याच्या शेजारीं आहे. येथील

देखावा अत्यंत मनोहर असून उन्हाळ्यांत राहण्यास हें स्थल मोठें सुखकर आहे. **सर रि० टेंपल** साहेब या स्थलास **काश्मीरचें** सार असें म्हणतात. येथें महाराजांचें एक सुंदर मंदिर आहे. त्यांत प्रतिष्ठित प्रवाशांस कांहीं दिवस राहूं देतात. याच्या मागच्या बाजूस एक अष्टपैलू तलाव आहे. तो शंभर फूट लांब व पन्नास फूट खोल येईल. याच्या शेजारीं **नूरजहाननें** सांगितल्या बेताप्रमाणें बादशाहानें एक आरामबाग तयार केली होती. तींतील पाण्याचे नळ, खजिने, कारंजीं यांच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. याच्या वरच्या बाजूस पाईन व दुसऱ्या वृक्षांची दाट झाडी लागून गेली असून येथील देखावा मोठा रमणीय आहे. **जहांगीर** व त्याची प्रिया यांचें हें मोठें आवडतें स्थल होतें. बादशाहाच्या मनांत आपला अंतकाळ येथें व्हावा असें होतें.

**अमरनाथ**—अमरनाथाचें शिवस्थान काश्मीरच्या ईशान्येस **लिडार** नांवाचे दऱ्यांत आहे. सिंधु नदीजवळ **पंजतरणी** म्हणून एक दरा आहे. त्यांतून या स्थानास मार्ग जातो. हा मार्ग समयविशेषीं मोठा धोक्याचा आहे, कारण वाटेंत कोठें कोठें डोंगरासारिखे मोठे बर्फाचे गोळे व पावसाच्या योगानें बाजूचे पर्वत विभागून त्यांचे एवढे प्रचंड खडपे मार्गावर येऊन पडतात कीं, हत्तीसारखें जनावर सुद्धां त्यांच्या खालीं गारद होऊन जाईल. तत्रापि हिंदू लोक जसें **काशीस** मोठें पवित्र स्थान मानितात, तसें आपल्या देशांतील व **काश्मीरांतील** हजारों हिंदू लोक या स्थलास पवित्र मानून मोठ्या भक्तीनें याच्या यात्रेस जातात. या मार्गांत

मरण येणें हें एक स्वर्गप्राप्तीचें साधनच आहे असें ते मानितात. ही यात्रा जुलई महिन्याचे अखेर भरते. या स्थलीं तीन गुहा आहेत. **शिवस्थानाच्या** गुहेची लांबी व मुखाजवळ रुंदी अजमासें १५० फूट असून तिची उंची १०० फूट आहे. गुहेच्या वरच्या भागांतून जें पाणी ठिबकत असतें त्याच्या योगानें येथील **शंकराचा** देह बनतो आणि तो चंद्राच्या उदयाप्रमाणें वृद्धि पावतो आणि अस्ताप्रमाणें क्षीण होत जातो असें भाविक लोक मानितात. तसेंच यात्रेकरू लोक देवाचें दर्शन घेऊन त्याची प्रार्थना करूं लागतात, तेव्हां त्यांच्या गोंगाटानें गुहेंतील पारवे जर बाहेर पडले तर देवानें आपलें गाऱ्हाणें ऐकिलें असें समजतात. **हिमालयावर बाद्रि-नाथ** नांवाचें असें एक प्रसिद्ध स्थान आहे, तसें या देशांतही **अमरनाथा**पासून थोड्या अंतरावर याच नांवाचें एक **विष्णुस्थान** आहे.

**गुलमर्ग** ( पुष्पवाटिका )—या नांवाची दरी **श्रीन-गरच्या** पश्चिमेस **सोपूर** गांवाहून १७ मैलांवर आहे. हिची लांबी दोन तीन मैल असून रुंदी फार तर एक मैल होईल. या देशांत अति मनोहर वनश्री करितां जीं स्थलें प्रसिद्ध आहेत त्यांतील हें एक स्थल मुख्य होय. याच्या भोंवतीं दाट झाडी आहे. येथें बाराही महिने थोडा-बहुत पाऊस पडत असतो. त्यामुळें हा प्रदेश हिरव्या गार गवतानें आच्छादिला जाऊन निरनिराळ्या जातींचे वृक्ष व वेली यांच्या पुष्पांनीं हें स्थल अत्यंत शोभायमान् आणि रमणीय दिसतें. जुलई व आगस्ट महिन्यांत **श्रीनगर** येथें जेव्हां उन्हाळा फार होतो, तेव्हां साहेब

लोक या स्थलीं रहावयास जातात. येथें रेसिडेंटाचा बंगला, शर्यतींचें रौंड, क्रिकेट व लान्–टेनिस् खेळयाच्या जागा आहेत. **श्रीनगर** येथें पेपिअरम्याचीचें जें काम करितात, त्यावर येथील पुष्पांची नक्कल उतरितात. **बवामिश्री** नांवाचा एक अवलिया सुमारें चारशें वर्षांपूर्वी होऊन गेला. त्याच्या नांवाची वरील दरी नजीक मशीद आहे. तेथें यवन लोक दर आठवड्यास उन्हाळ्यांत त्याच्या दर्शनास जातात. येथून समोर पण अति दूर पर्वतांचीं गगनचुंबित शिखरें हिमानें आच्छादित होऊन चकाकत असलेलीं दृष्टीस पडतात. उजव्या बाजूस **पिरपंजाल** नांवाच्या पर्वताची रांग असून तींत **नंगा** नांवाचा पर्वत आहे. त्याच्या शिखरावरील मोठा रमणीय देखावाही दृष्टीस पडतो. हिंवाळ्यांत येथें बर्फ फार पडतें ह्मणून लोक कायमची वसति करून राहात नाहींत.

**सोनमर्ग** ( सुवर्णवाटिका )—हें स्थल **श्रीनगर**च्या ईशान्येस ९० मैलांवर **सिंद** दऱ्याच्या पायथ्याशीं आहे. येथील सृष्टिसौंदर्य **गुलमर्ग**पेक्षां अधिक रमणीय आहे. येथें झाडी दाट असून सर्व वाटिकेवर अनेक जातींच्या व रंगांच्या पुष्पांचा जसा काय गालिचा पसरल्यासारखा दिसत असून तिच्या वरच्या बाजूस बर्फाच्छादित शिखरें वज्रमण्यांच्या मुकुटाप्रमाणें झळकत असतात आणि चांदीच्या रसाप्रमाणें निर्मल पाण्याचे ओघ खालीं येत असलेले दृष्टीस पडतात. या पुष्पांसंबंधी असा एक चमत्कार सांगतात कीं, वसंतऋतूंत येथें प्रातःकाळीं जीं पुष्पें तांबडीं, पिवळीं, अस्मानीं व पांढरीं दृष्टीस

पडतात, त्यांचे रंग दुपारीं गुलभेंडीच्या फुलाप्रमाणें बदलून तांबड्याचीं पिंवळीं, पिंवळ्याचीं अस्मानीं किंवा जांभळीं, अस्मानीचीं पांढरीं व पांढऱ्याचीं तांबडीं होतात. अस्तमानाचे सुमारास हे सर्व रंग पुन्हां पालटून नवें रूप धारण करितात. याप्रमाणें येथील वनश्री दिवसांतून तीन वेळ आपला पोषाख बदलते. पण **श्रीनगरा**पासून तें स्थल अधिक दूर असल्यामुळें प्रवासी लोकांस तें पाहण्यास जातांना फार तस्दी घ्यावी लागते. तत्रापि अप्रतिम वनश्री पाहण्याची ज्यांस हौस असते ते तेथें उन्हाळ्यांत जातात.

**त्रिकोटा**—या नांवाचा पर्वत **श्रीनगर**च्या दक्षिणेस आहे. हा पर्वत बाराही महिने बर्फानें आच्छादित असतो. याच्या उत्तरेस एक झरा वाहत असून हिंवाळ्यांत त्याचें पाणी उष्ण असतें आणि उन्हाळ्यांत बर्फ वितळून तें यांत येऊन मिसळल्यामुळें तेंच पाणी थंड होतें. **हिंदू** लोक या स्थलास मोठें पवित्र मानून येथें जत्रा भरवितात.

**शपियनहून रामू** गांवास जातांना सुमारें सात मैलांवर एक मोठें मैदान लागतें. तेथें नाना प्रकारच्या आकारांचे दगड पुष्कळ पडलेले आहेत. त्यांजविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, कांहीं शतकांपूर्वीं एका लग्नाचें वऱ्हाड त्या मैदानावरून चाललें असतां वाटेंत एक फकीर बसला होता. त्याचा जीव वऱ्हाडांतील लोकांनीं विनाकारण घेतला. हे सर्व लोक आपल्या सरंजामासह मरून त्यांचे पाषाण होवोत ह्मणून त्या फकिरानें मरतेवेळीं शाप दिला. तेव्हां त्याप्रमाणें एकंदर वऱ्हाड,

त्यांचीं घोडीं, डोल्या वगैरे यांचे तत्क्षणीं दगड होऊन पडले ते तेथें तसेच आहेत.

**कोकुर**—या नांवाचा **पिरपंजाल** पर्वताच्या उत्तर पायथ्याजवळ झरा आहे. या झऱ्यास सहा मुखें असून याचें पाणी **बरेंग** नांवाचे नदीस जाऊन मिळतें. जेव्हां **अफगाण**चे बादशाहा या देशांत राज्य करीत होते, तेव्हां ते या झऱ्यावांचून दुसरें पाणी पीत नसत, असें **थार्नटन्** नांवाचे प्रसिद्ध ग्रंथकार लिहितात. **स्कार्डू** प्रांतांत **ब्राल्डू** नांवाचा एक मोठा झरा आहे. त्याच्या माथ्याकडील पर्वतशिखरें अति उंच गेलेलीं असून तेथें अति स्थूल आकाराचे ग्ल्यासियर्स ( बर्फाचे गोळे ) आहेत. त्यांत **बालतिरो** नांवाचा गोळा ३९ मैल लांब आहे.

## दरे व खिंडी.

पृथ्वीवरील सर्व पर्वतांत **हिमाचल** श्रेष्ठ असून त्याच्या रांगांनीं हा देश वेष्टिला असल्यामुळें त्यांतील दरे व खिंडी हीं मोठीं भव्य व विशाल असून त्यांतील देखावे मोठे रमणीय पण भयप्रद आहेत. यांचें वर्णन **इंग्रजी** ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं दिलेलें आढळतें. त्यांतील थोडेंसें आमच्या प्रिय वाचकांसाठीं येथें देतों. **पिरपंजाल** पर्वताच्या उत्तरेस **लोलाब** व **सिंद** नांवाचे दरे आहेत. **लिदार** दरा त्याच्या ईशान्येस व **नौबुग** पूर्वेस आहे. **लोलाब** याचें खरें नांव **लालभ**. ह्यांत सीदार, पाईन व अक्रोड इत्यादि वृक्षांची दाट झाडी लागून गेली आहे. याची लांबी १४ मैल आहे. पूर्वकालीं या दऱ्यांत अस्वलें फार राहात असल्यामुळें यास अस्वलांची बाग असें ह्मणतात.

येथील वनश्री अप्रतिम मनोहर आहे. **सिंद** हा दरा **श्रीनगर**च्या ईशान्येस आहे. याच्या भोंवतालच्या टेंकड्या लहान मोठ्या वृक्षांनीं आच्छादिल्या आहेत. यास लागून दुसरे लहान दरे आहेत. त्यांस मार्ग यांतून जातात. यांतून वाहणारे प्रवाह **सिंधु** नदीचा उगम बनवितात. बाकी राहिलेल्या दऱ्यांविषयीं लिहिण्यासारखी विशेष माहिती आह्मांस मिळाली नाहीं. या देशाच्या दक्षिणेस **पुंच** आणि **राजवारी** यांच्यामध्यें **फेरोजपूर** नांवाची एक खिंड आहे. तिची उंची १२,९०० फूट आहे. **राजदिहंगन्** नांवाची खिंड या देशाच्या उत्तरेस असून तिची उंची १३,९०० फूट आहे. **मार्गन, झोझीला, पिरपंजाल** इत्यादि दुसऱ्या खिंडी आहेत. शिकारी लोक यांतून शिकारीच्या शोधार्थ फिरत असतात. यांतील मार्ग फार बिकट असल्यामुळें कित्येक ठिकाणीं लहान मुलांप्रमाणें घोडा होऊन चालावें लागतें. वर सांगितलेल्या दऱ्यांतून अनेक प्रवाह वाहतात. त्यांतील कित्येकांवर दोऱ्यांचे पूल केलेले आहेत. त्यांत चिक्का व झुला असे दोन प्रकार आहेत. झुलावरून जाणें फार अवघड असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे.

## धरणीकंप.

या देशांतील अप्रतिम हवा, पाणी, सृष्टिसौंदर्य इत्यादि अनेक कारणांवरून यास भूस्वर्ग असें नांव प्राप्त झालें आहे ह्मणून पूर्वीं सांगितलेंच आहे; पण मानवी अरिष्टांचा विचार न करितां केवळ दैविकांचाच विचार केला असतांही हा देश परमेश्वराचा जितका

आवडता, तितकाच नावडता आहे असें ह्मणणें भाग पडतें. पूर्वकालीं येथें लहान मोठीं गांवें पुष्कळ असून त्यांत वस्तीही चांगली दाट होती, पण धरणीकंप, दुष्काळ व जरीमरी ही वेळोवेळीं प्राप्त होऊन येथील गांवें व त्यांतील लोक यांचा जो नाश होत गेला त्याचें वर्णन राजतरंगिणींत पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. हीं अरिष्टें याच देशावर अशीं वारंवार कां यावींत या गोष्टीचा विचार करूं लागलें असतां ईश्वरकरणी मोठी अगाध आहे ह्मणून स्वस्थ रहावें लागतें. असो.

आतां अलीकडे पन्नास साठ वर्षांत जीं अरिष्टें येऊन पडलीं त्यांजविषयीं थोडीशी माहिती देतों. इ० स० १८२८ च्या वर्षीं **श्रीनगर** येथें एक मोठा भूकंप झाला. तेव्हां नगरास मोठा धक्का बसून बाराशें घरांचा नाश झाला आणि हजारों मनुष्यें प्राणांस मुकलीं. हा कंप कमी जास्त पुढें दोन महिने चालू होता. पुढें थोड्याच दिवसांनीं जरीमरीची साथ आली, ती चाळीस दिवस होती. तिच्या तडाक्यानें सुमारें एक लक्ष मनुष्यें मेलीं. पुढें पांच वर्षांनीं मोठा दुष्काळ पडला व दुसरे रोग उद्भवले; त्यांच्या योगानें पुष्कळ लोकांचा संहार झाला. इ० स० १८८९ त जो भूकंप झाला त्याच्या योगानें वीस हजार घरें, तीस हजार जनावरें व तीन हजार मनुष्यें यांचा फडशा उडाला. हा धक्का उत्तरेस **गिलजित्** येथें प्रारंभ होऊन दक्षिणेस **सिमल्या** पावेतों जाऊन पोहोंचला. ह्याचें केंद्रस्थान **बरामुला** हें गांव होतें. यामुळें येथील किल्ला, रहदारी बंगला व शेंकडों घरें जमीनदोस्त झालीं. त्यांचें वर्णन मार्गक्रमण भागांत

दिलेंच आहे. **सोपूर** गांवींही असाच अनर्थ उडाला. हीं दोन्हीं गांवें वाटेंत लागत असून त्यांत घडलेल्या अनर्थांच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. त्या पाहण्यास या देशीं मुशाफरी करणारांस आह्मीं शिफारस करितों. या वेळीं **श्रीनगर** येथील बराकी पडून बरेच सोजिर चित झाले. याशिवाय राजवाडा, मुनशी बागेंतील बंगले व शहरांतील घरें यांस धक्के बसून भेगा पडल्या.

## पोट जहागीरदार.

येथील महाराजांच्या पदरीं दहा हजारांपासून तों लाख रुपयेपर्यंत उत्पन्न असणारे पोट जहागीरदार बरेच आहेत. त्यांतील कांहीं मुख्य मुख्य जहागिरीविषयीं थोडीशी माहिती मिळाली ती खालीं देतों. **१ लदाक्, २ गिलजित्, ३ चित्रल, ४ हंजा, ५ पुंच, ६ नागर, ७ चिनानी** हीं पोटसंस्थानें होत.

**लदाक्**—या प्रांताचें क्षेत्रफळ अजमासें तीस हजार चौरस मैल असून यांतील लोकसंख्या दीड लक्ष आहे. बौद्ध लोकांची वस्ती मुख्यत्वें याच प्रांतीं विशेष आहे. पृथ्वीवर वसाहत असलेल्या फार उंच प्रदेशांपैकीं हा एक भाग आहे. **इन्डस** ( सिंधु ) ही याच प्रांतांतील मुख्य नदी होय. येथें क्षार पाण्याचीं सरोवरें बरींच आहेत. त्यांत **प्यांगकांग** हें मुख्य होय. हें सरोवर या प्रांताच्या पूर्वेस असून त्याची समुद्राच्या पृष्ठभागापासून उंची सुमारें १४,००० फूट आहे. येथील पर्वत सर्वकाल बर्फाच्छादित असतात आणि त्याप्रमाणें येथें रात्रीं थंडी फार पडते, पण दिवसा अति उष्मा होतो. याप्रमाणें येथील हवा मोठी चमत्कारिक आहे. घोडे (बट),

गाढवें, बैल, मेंढे, बकरे आणि कुत्रे हे येथील ग्रामपशु होत. ओझीं वाहून नेण्या आणण्याच्या कामीं या प्रांतीं मेंढ्यांचा उपयोग अधिक करितात. या प्रांतांतील मुख्य शहराचें नांव 'ले.' येथील वसति सुमारें पांच हजार आहे. लोकांचीं घरें दोन तीन मजली आहेत. या गांवाचा व्यापार **हिंदुस्थान, यार्कंद, खोतान, तिबेट** व **चिनईतार्तरी** यांच्याशीं चालतो. **तिबेट** व **चिनईतार्तरी** येथून **काश्मीर** देशास लोंकर विकण्यास येते ती याच मार्गानें हजारों मेंढ्यांवर लादून येते. तसेंच या प्रांतीं टाकणखार व गंधक बराच उत्पन्न होतो. हा मालही बाहेर देशीं मेंढ्यांच्या पाठीवर लादून विकावयास नेतात.

या प्रांताच्या उत्तर भागांतील बहुतेक लोक बौद्ध धर्मी आहेत. तेथें प्रत्येक गांवीं त्यांचा एक मठ आहे. तो दुर्गम स्थलीं बांधिलेला असतो, त्यांत जोगी व जोगिणी राहतात. प्रत्येक मठांत दोन लामा ( गुरु ) असतात. एक पारमार्थिक व दुसरा ऐहिक विषयाकडे लक्ष देतो. यांतील कांहीं मठांस बऱ्याच नेमणुका आहेत. ले गांवाच्या आग्नेयेस **हिमिसूगोन्या** नांवाचा एक जंगी मठ आहे. त्याचें उत्पन्न मोठें आहे. त्यांत ८०० जोगी व जोगिणी राहण्याची सोय आहे. बौद्ध धर्मांत वैदिक धर्माचें कांहीं अनुकरण केलेलें दिसतें, तें खालीं दाखवितों. ब्राह्मण धर्मांत गायत्री जपाचें जसें महत् पुण्य धरिलें आहे, तसें बौद्ध धर्मांत "**बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि**" या मंत्राचा जप करणें हें मोठें पुण्य मानितात. गायत्री जशी त्रिपदा व अष्टाक्षरा आहे, त्याप्रमाणें वरील मंत्रांतही

तीन पदें आणि आठ अक्षरें आहेत. प्रत्येक मठाच्या द्वाराजवळ चक्रें ठेविलेलीं असून तीं त्यांच्या आंसांच्या अंकुचीवर उभीं केलेलीं असतात. वर सांगितलेला मंत्र ( गायत्री ) कागदाच्या चिटोऱ्यांवर लिहून ते चिटोरें वरील चक्रांच्या आरांस चिकटविलेले असतात. गायत्री-पुरश्चरण करणें हें जसें आपण महत् पुण्य मानितों तसें बौद्ध धर्मी लोक हीं चक्रें एकसारखीं फिरतीं ठेवणें हें मोठें पुण्य मानितात. म्हणून मठांत जाणारा किंवा बाहेर येणारा प्रत्येक माणूस या चक्रांस गति देतो. त्या योगानें तीं एकसारखीं फिरत राहतात व कांहीं चक्रें तर पाण्याच्या शक्तीनें पानचक्कीप्रमाणें सर्वकाल परिभ्रमण करीत असतात. या प्रांतीं **पांडवांप्रमाणें** तीन चार भावांत एक बायको करण्याची चाल आहे. तिचीं मुलें या बंधुवर्गांविषयीं बोलतांना थोरला बाप, लहान बाप असें म्हणतात. हे तीन चार नवरे असून आणखी पर-पुरुष नवरा करून घेण्याची तिला मोकळीक आहे. इत-केंच नाहीं पण, **ले** येथील स्त्रिया **काश्मीर** व **यार्कंद** येथील व्यापाऱ्यांशीं हंगामीं लग्नें करितात तीं वेगळींच. अशा स्थितींत परस्परांनीं सोडचिठी देणें ही गोष्ट साधा-रण असली पाहिजे.

**गिलजित्**—हा प्रांत **काश्मीर**च्या उत्तरेस असून त्यांत याच नांवाची एक दरी आहे. तींतून वाहणाऱ्या नदीस व प्रांतांतील मुख्य गांवासही **गिलजित्** हेंच नांव आहे. **गिलजित्** नदीवर दोऱ्यांचा पूल आहे. ती सिंधु नदास मिळते. **गिलजित्** गांव **श्रीनगराहून** २१० मैल आहे. या दरीची लांबी सुमारें ४० मैल

असून उंची पांच हजार फूट आहे. येथील जमीन मोठी सुपीक असून हवाही चांगली आहे. या प्रांताच्या भोंवतालच्या प्रदेशांपैकीं अर्ध्या भागाची सर्वे झाली असून अर्ध्याची होणें आहे. या प्रदेशांत जेवढीं उंच शिखरें व खोल दरे आहेत, तशीं शिखरें व दरे पृथ्वीच्या दुसऱ्या क्वचितच भागांत सांपडतील; राहिलेल्या अर्ध्या भागाची सर्वे झाली म्हणजे त्यांत **धवलगिरी** शिखराची बरोबरी करणारीं उंच शिखरें आढळून येण्याचा संभव आहे, असें **डा० डब्ल्यु हंटर** म्हणतात. येथें धरणीकंपानें दुभागलेल्या पर्वतांच्या प्रदेशांत व त्यांतून वाहणाऱ्या प्रवाहांत सोन्याची मिश्रधातु पुष्कळ सांपडते. ती मिळवून तींतून सोनें काढण्याचें काम लोक हिंवाळ्यांत करितात. त्यांस या कामीं बराच फायदा होतो. येथें पैदा झालेलें सोनें वीस कशी असतें. या प्रांताचा मालक जातीचा यवन आहे, त्यास थाम ( राय ) असा किताब आहे. त्यांजकडून **काश्मीर**चे महाराजांस सुवर्णमिश्रधातु खंडणी म्हणून दरसाल पाठविण्यांत येते. तसेंच **हंजा, नग्गर** व **यासिंद** येथील सरदार **काश्मीर**च्या महाराजांस खंडणीच्या रूपानें दरसाल कांहीं सुवर्ण पाठवितात म्हणून समजलें. **पामीर** नांवाचा प्रदेश, ज्याविषयीं **इंग्रज** व **रशियन्** यांजमध्यें मोठा लढा पडला आहे तो येथून जवळ आहे व त्या लढ्याकरितां **इंग्रजांनीं गिलजित्** येथें लढाईची चांगली तयारी ठेविली असल्याचें समजतें. असो. **हरिद्वारा**च्या वरच्या बाजूस **गोहना** सरोवर कसें बनलें व तें फुटल्यामुळें किती नाश झाला, याची माहिती वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झालीच

आहे. अशाच जातीचें सरोवर इ० स० १८४० मध्यें या प्रांतीं उत्पन्न होऊन फुटलें. तेव्हां त्याच्या पाण्याचा मुसंडा एवढ्या जोरानें चालूं लागला कीं, तेथून शंभर मैलांवर राहणारे पांचशें सीक शिपाई केरसुणीनें मुंग्यांचा पुंज झाडल्याप्रमाणें वाहून गेले.

**चित्रल**—ही जहागीर **बुनर** नांवाच्या दऱ्यांत आहे. यांतील मुख्य गांवास जहागिरीचेंच नांव आहे. येथील जमीन मोठी सुपीक आहे. **युरोपांत** पैदा होणाऱ्या फळांतील बहुतेक फळें येथें उत्पन्न होतात. त्यांत द्राक्षें तर फारच स्वादिष्ट असतात. येथील देखावा **काफ्रिस्थान**च्या देखाव्या सारखा असून हवाही तशीच थंड आहे. येथील पुरुष मोठे उंच असून त्यांचा बांधाही सुरेख आहे. **काश्मीरां**तील स्त्रियांच्या लावण्याविषयीं सर्वत्र प्रसिद्धि आहे. तेव्हां येथील स्त्रियांच्या स्वरूपासंबंधानें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. येथें गुलामांचा व्यापार पुष्कळ चालतो आणि त्यापासून होणारें उत्पन्न येथील जहागिरीच्या वसुलांतील एक मुख्य बाब आहे. येथील व्यापार करण्याची रीति मात्र अगदीं रानटी आहे. ती अशी कीं, पैशाच्या द्वारें विनिमय न करितां जिन्नसास जिन्नस देऊन किंवा घेऊन करितात.

**पुंच**—या नांवाची जहागीर **काश्मीर**च्या नैर्ऋत्येस आहे. यांतील मुख्य गांवास जहागिरीचेंच नांव आहे. या गांवीं ९०० घरें असून किल्ला, राजवाडा व रहदारी बंगला आहेत. येथील राजा जातीचा **रजपूत** असून सांप्रत महाराजांचा भाऊबंद असल्याचें समजतें. हिंवाळ्यांत येथें तीस इंच जाड बर्फ पडतें. याच्या जहागिरींत

**बरमगला** नांवाचें एक खेडें आहे. तेथें **जहांगीर** बादशाहा **श्रीनगरास** जात असतां मरण पावला. बाकी राहिलेल्या जहागिरींविषयीं लिहिण्यासारखी विशेष माहिती आह्मांस मिळाली नाहीं.

## राज्यकारभार.

अलीकडे येथें कौन्सिलची स्थापना होऊन राज्यकारभारासंबंधीं सर्व कामें त्याच्या हुकुमाप्रमाणें चालतात. हें सर्वांस माहितच आहे. या कौन्सिलचे अध्यक्ष महाराज असल्यामुळें त्यांस **महाराजांचें कौन्सिल** ह्मणतात. **गुलाबसिंगाचा** पुत्र **रनबीरसिंग**, त्यास पुत्र तीन. त्यांतील वडील पुत्र **प्रतापसिंग**, हे हल्लीं राज्याचे मुख्य मालक आहेत. ते मोठे सुस्वभावी व गुणग्राही असून त्यांस पांच सहा भाषा येत आहेत, ह्मणून समजतें. दुसरे बंधु **रामसिंगजी** हे सेनाधिपति असून कौन्सिलचे मेंबर आहेत. सर्वांत धाकटे **अमरसिंगजी** हे कौन्सिलचे उपाध्यक्ष असून मेंबरही आहेत. महाराजांस खाजगी खर्चाकरितां दरमाहा साठ हजारांची नेमणूक आहे व त्यांचे उभयतां बंधूंस एकेक लाख रुपयांची जहागीर असून प्रत्येकास दरसाल पन्नास हजार रुपये रोख मिळतात. याशिवाय रायबहादूर पंडित **सुराजकोल** हे सिनिअर ( जेष्ठ ) मेंबर आहेत. यांस रेव्हिन्यु मेंबर ह्मणतात व रायबहादूर पंडित **भागराम** हे ज्युडिशिअल मेंबर आहेत. या दोघांस फॉरिन मेंबर ह्मणतात. यांस दरमाहा १,५०० रुपये पगार मिळतो. रेव्हिन्यु मेंबर हे मुलकी आणि फौजदारी

खात्यांचे मुख्य अधिकारी आहेत आणि ज्युडिशिअल मेंबर यांजकडे दिवाणी, पोलीस व दुसरीं खातीं आहेत. येथील दिवाणी काम बहुतेक अंशीं **इंग्रजांच्या** दिवाणी कायद्याप्रमाणें चालतें व फौजदारी काम चालविण्यास इंडिअन् पिनल्कोडच्या धोरणानें एक कायदा केला आहे, त्या प्रमाणें चालतें. मुलकी काम न्यायास व जुन्या वहिवाटीस अनुसरून चालवितात. राज्यांतील सर्व कामकाज **पर्शियन्** भाषेंत चालतें. हा सर्व बाह्य देखावा सुरेख दिसतो, पण स्वदेशीं अन्य राज्यांप्रमाणें येथलि रेसिडेंत् हे खरे सूत्रधार असून राज्यांतील महत्वाचीं कामें त्यांच्या खासगी सल्ल्याप्रमाणें चालतात ह्मणून समजतें. सांप्रतचे महाराज गादीवर बसले तेव्हांपासून येथें रेसिडेंताची नेमणूक झाली. त्याचे पूर्वी **ब्रिटिश** सरकारचा जो येथें अंमलदार असे त्यास "ऑफिसर आन् स्पेशियल ड्यूटि" असें ह्मणत.

**काश्मीर** राज्याचे **काश्मीर** आणि **जम्मू** असे दोन भाग केले असून त्यांजवर दोन गव्हरनर नेमिले आहेत. मुलकी आणि फौजदारी खात्यांत गव्हरनरचे हाताखालीं वजीर, तहशील्दार, नायबतहशीलदार, लंबरदार (पाटील) व पट्टवारी ( कुळकर्णी ) हे कामगार आहेत. दिवाणीखात्यांत चीफ जज्, सिटी ( शहरचे ) जज्जेस आणि मुनसफ व पोलीस खात्यांत डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट्स्, इन्स्पेक्टर्स, डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर्स, जमादार व सार्जंट हे अधिकारी आहेत. दिवाणी कोर्टाचे व दस्त देण्या घेण्याचें काम स्टाम्प कागदावर चालतें. जन्म ठेपेचे किंवा पोलिटिकल कैदी यांस भुंजी नांवाचा सरहद्दीवर

एक किल्ला आहे त्यांत ठेवितात व दुसरे कैदी दल सरोवराचे कांठीं सरकारी तुरुंग आहे त्यांत ठेवितात. वसुलीसंबंधानें या देशाचे छत्तीस भाग केले असून त्यांस ठाणीं अथवा तहशिली ह्मणतात. त्यांत लहान मोठीं खेडीं वीस हजार आहेत; पण **श्रीनगर** आणि **जम्मू** हीं सोडून पाहिलें असतां सांगण्यासारखें मोठें शहर एकही नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. येथें जमिनीच्या प्रत्येक डागास पट्टा ह्मणतात. जमिनीचा सारा दर एकरी आठ आणेपासून दहा रुपयेपर्यंत असून कोठें नक्त व कोठें जमिनींत उत्पन्न झालेल्या महसुलापैकीं $\frac{1}{2}$ किंवा $\frac{2}{3}$ भाग घेतात. येथें दोन जातींचें रुप्याचें नाणें चालू आहे. त्यांतलि एका रुपयास खाम असें ह्मणतात. याची किंमत आठ आणे आहे व दुसऱ्यास चिल्कि रुपया ह्मणतात. त्याची किंमत दहा आणे धरितात व पाव आण्यास डबल पैसा व अर्ध्या पैशास खाम पैसा ह्मणतात.

या राज्याच्या जमाखर्चाचे आंकडे बरोबर मिळाले नाहींत पण सर्व बाबींचें उत्पन्न सुमारें ऐंशी लक्षांचें असून खर्च पंचाहत्तर लक्षांचा असल्याचें समजतें. जमेच्या मुख्य बाबी जमीन, व्यापारी लोकांस परवाने देतात त्यांजवरील कर, आयात व निर्गत मालावरील जकात, शाली व दुसऱ्या मालावरील कर, केशराचें उत्पन्न, नद्या व सरोवरें यांत उत्पन्न होणारे पदार्थांचें ( जसे शिंगाडे, मासोळी वगैरेचें) उत्पन्न, किस्त्यांवरील पट्टी हे व दुसरे लहान मोठे अनेक कर आहेत. खर्चाच्या मुख्य बाबी सैन्य, रस्ते, लोकोपयोगीं कामें, राज्यकारभार, विद्या,

धर्म व खाजगी या होत. येथें मोठे गुन्हे फार होत नाहींत, इतकेंच नाहीं पण चोऱ्या सारखे हलके गुन्हे सुद्धां फार होत नाहींत. एकंदरींत येथील लोकव्यवस्था नीट असून लोकांच्या जीवितांचें व जिनगीचें रक्षण चांगल्या प्रकारें होत आहे. महाराजांस २१ तोफांची सलामी आहे. दत्तकाची सनद आहे. महाराणीस एक घोडा, शालीच्या लोंकरीचे १२ बकरे व तीन उंच शाली खंडणी द्यावी लागते.

**सैन्य**—इरेग्युलर स्वार ९,०००, पायदळ १४,०००, तोफखान्याच्या ब्याटरी १६, यांपैकीं दोहोंस घोडे जोडतात. अलीकडे सार्वभौम सरकारानें महाराजांस एक मौंटन् ब्याटरी नजर केली आहे. स्वारांच्या पलटणी व तोफखाना हीं बहुतकरून **जम्मू** येथें असतात. पायदळ पलटणीस कवाईत शिकविलेली असून त्यांतील लोकांचा पेहराव **इंग्रजी** शिपायांसारखा आहे. यांत मुख्य भरणा **डोग्री** लोकांचा आहे. हें सैन्य **श्रीनगर, जम्मू, गिलजित्, अस्तार** इत्यादि स्थलीं राहतें. या सर्व सैन्याचे मुख्य अधिपति महाराजांचे धाकटे बंधु आहेत. याशिवाय महाराजांच्या खाजगीकडे पांच हजार घोडीं आहेत. तीं प्रांतांतील कुरणांत चारणीस घातलीं असल्याचें समजतें.

## सांप्रत स्थिति.

**विद्या**—प्राचीन कालीं हा देश सरस्वतीचें (विद्येचें) आद्यस्थान होता म्हणून पूर्वीं सांगितलेंच आहे आणि सांप्रतकालींही पंडित लोकांत नांवें घेण्यासारखे कांहीं चांगले

संस्कृतज्ञ आहेत असें समजतें. तसेंच **श्रीनगर,इस्लामबाद** व **सोपूर** इत्यादि गांवीं भूर्जपत्रांवर लिहिलेले तीन चारशें वर्षांचे कांहीं जुने ग्रंथ अद्यापि मिळतात; पण **इंग्रजी** किंवा साधारण विद्याभ्यासाच्या संबंधानें पाहिलें असतां हा देश आपल्या देशापेक्षां फार मागसलेला दिसतो. **श्रीनगर** येथें एक व **जम्मू** येथें एक अशा दोनच इंग्रजीशाळा आहेत. त्यांत पहिल्या शाळेची माहिती पूर्वी दिलीच आहे. याशिवाय **जम्मू** येथें एक संस्कृत व वेदशाळा आहे. विद्याखात्याकडे सरकारांतून दर-साल पन्नास हजार रुपये खर्च होत असल्याचें समजतें. जुन्या चालीप्रमाणें बहुतेक गांवीं देशीशाळा असून त्यांत **काश्मीरी** व **पर्शियन्** भाषांचें लेखनवाचन व कांहीं गणित शिकवितात. स्त्रीशिक्षणास तर अद्यापि आरंभ सुद्धां नाहीं. तत्रापि पंडित लोकांतील कांहीं स्त्रियांस घर-गुती रीतीनें अभ्यास करून सुरेख लिहितां वाचतां येतें ह्मणून समजतें. मिशनरी ( पाद्री ) लोकांनीं अन्य देशां-प्रमाणें येथेंही संचार केला असून **श्रीनगर** येथें व दुसऱ्या एक दोन गांवीं धर्मार्थ शाळा व दवाखाने स्थापिले आहेत. काश्मीरी भाषा **पर्शियन्** भाषेला जवळ आहे. तींत पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी शब्दांचें रूप एकच होतें ह्मणून समजतें. काश्मीरी भाषेंतील १०० शब्द घेतले असतां त्यांत ४० पर्शियन्, २९ संस्कृत, १९ हिंदुस्थानी, १० अरबी व १० तिबेटी किंवा लग-तच्या दुसऱ्या देशभाषेंतील असतात. **काश्मीरी** लिपीस शारदा लिपि असें ह्मणतात. ही लिपि **देव-नगरी** सारखी आहे. नीलपुराण, बृहत्कथा, राज-

तरंगिणी इत्यादि भूर्जपत्रांवर लिहिलेले जुने ग्रंथ शारदा लिपींत आहेत. अलीकडे लिहिलेले देवनगरी लिपींत आहेत. याशिवाय **पर्शियन्** भाषेंत लिहिलेले कांहीं जुने ग्रंथ आहेत. **काश्मीरी** भाषेशिवाय प्रत्येक प्रांतांत वेगवेगळी भाषा चालू आहे. या सर्वांस डोग्री भाषा असें म्हणतात. या भाषा **पर्शियन्** भाषेला जवळ असल्यामुळें ती ज्या प्रवाशास येते त्याचें या देशीं विशेष नडत नाहीं. वर सांगितलेल्या भूर्जपत्रांवरील ग्रंथांविषयीं अशी एक मौजेची गोष्ट ऐकण्यांत आली आहे कीं, ते ग्रंथ पाण्यांत बुडवून ठेविले असतां त्यांची लिपि न बिघडतां खुलते पण उष्णता लागली तर मात्र ती खराब होते.

**दळणवळण**—देशांतल्या देशांतील दळणवळण मुख्यत्वें नद्या व कालवे यांच्या सहाय्यानें चालतें. **वजिराबादेहून जम्मू** पावेतों लोहमार्ग असल्याचें व **रावळपिंडीहून बरामुलापर्यंत** टपालटांगे जात असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. **जम्मूहून श्रीनगरास** टपाल पोहोंचविण्यास सरकारी जासूद ठेविले आहेत व तेथून **लदाक्, स्कार्डु, गिलजित्** व दुसऱ्या प्रांतांतील गांवीं टपाल पोहोंचविणेचें काम हेच लोक करितात. **श्रीनगर, जम्मू, इस्लामबाद, बरामुला, कोहाला, गुलमर्ग, देवल, दोमेल, उरी** इत्यादि गांवीं पोष्टआफिसें आहेत. यांचें उत्पन्न व खर्च यांमध्यें **काश्मीर** सरकारचा कांहीं भाग असल्याचें समजतें. **श्रीनगर, जम्मू, इस्लामबाद, दोमेल, उरी, बरामुला, सोपूर, देवल, अस्तार, गिलजित्** इतक्या स्थलीं **काश्मीर** सरकारची तार आफिसें आहेत. एकंदरींत येथील दळणवळणाचीं

साधनें फार अपुरतीं आहेत. ही उणीव **श्रीनगरास** लोहमार्ग नेण्याचा विचार चालू आहे, तो सिद्धीस गेला म्हणजे दूर होईल.

**व्यापार**—या देशाचा मुख्य व्यापार **यार्कंद, तिबेट, अफगाणिस्थान, तुर्कस्थान,** हे देश व **पंजाब** प्रांत यांच्याशीं चालतो. **पंजाबांत अमृतसर** हें या व्यापाराचें मुख्य शहर होय. येथें **काश्मीराहून** शाली, लोंकरीचीं अन्य वस्त्रें, केशर व निरनिराळ्या जातींचीं फळें विकरीस येतात. **काश्मीर** देशास जो **इंग्रजी** मालाचा पुरवठा होतो तो सर्व **पंजाब** प्रांतांतून होतो. हा देश व आपला देश यांजमध्यें दरसाल नव्वद लक्ष रुपयांचा व्यापार होतो. तसेंच आपला देश आणि **यार्कंद** यांजमध्यें दरसाल साठ लक्ष रुपयांची घडामोड होते ती **काश्मीरच्या** द्वारें चालते. **काश्मीर** देशांत व्यापाराचें मुख्यस्थान **श्रीनगर** होय. येथें अनेक जातींच्या कारागिरींचे पदार्थ उत्पन्न होतात. त्यांत शाली मुख्य होत. याच्या खालोखाल **लदाक्** प्रांतांतील **ले** हें गांव होय. **तिबेट** व **यार्कंद** येथून जाणाऱ्या मालाची घडामोड वरील गांवीं होते.

**संपत्ति**—या देशांत सृष्टिजन्य संपत्ति विपुल आहे पण ती उदयास आणण्याचा उद्योग झालेला नाहीं. मोठमोठे जमीनदार, सावकार, व्यापारी व कामगार हे लोक वजा-करून सांप्रतकालीं बाकीची बहुतेक प्रजा गरीब अवस्थेंत असावी असें त्यांचा कपडालत्ता, खाणेंपिणें, कारागीर व मजुरदार यांच्या मजुरीचे दर यांवरून दिसून येतें; पण **अकबर** बादशाहाचे वेळीं व्यापार अधिक चालत असून

हा देश विशेष सधन होता असें दिसतें. कारण, त्या वेळीं व्यापारी होड्यांची संख्या अधिक असून बादशाहाचा सुभेदार हिंवाळ्यांत सहा महिने बाहेर व सहा महिने या देशीं राहत असे, तेव्हां त्यास एक लक्ष रुपये खर्चास लागत असा लेख मिळतो. तसेंच लोकहितवादी यांनीं लिहिलेल्या **हिंदुस्थान**च्या इतिहासांत **काश्मीर** सुभ्याचा वसूल **मोंगल** बादशहाच्या वेळीं १,२७,००,६३१ रुपये होता असा लेख आहे.

**पोषाक**—पंडित लोक पगड्या घालितात. त्यांची बांधणावळ नागर ब्राह्मणांच्या किंवा पारसी भिक्षुकांच्या पगडी सारखी असते. त्यांचा रंग पांढरा असतो. तो लग्नकार्यांत सुद्धां बदलत नाहीं ह्मणून समजतें. कांहीं पंडित धोतरें नेसतात. कांहीं विजारी व क्वचित् पाट-लुणी घालितात. ते अंगांत लांब पेहरणी घालून त्यांजवर जाकिटें, हाफजाकिटें घालून त्यांजवरून चोगे ( झुबले ) घेतात. चांगले सुखी असतात ते लहान मोठ्या किमतीच्या शाली वापरतात व गरीब लोक लुई ( धोतरासारखें लोंकरीवस्त्र ) पांघरतात. कांहीं सुरवाल पेहेरतात. गरीब लोक तर आंत लंगोटा घालून वर लांब पेहरण घालितात किंवा झुबला घेतात. बायका पुरुषांप्रमाणें मानेपासून पायापर्यंत पोहोंचत अशा लांब एक दोन पेहरणी घालितात. त्या **पारसी** लोकांच्या स्त्रियांसारख्या पांढऱ्या टोप्या घालितात. पोटाशीं कांग्री घेऊन बसतां येईल इतक्या त्या पेहरणी सैल असतात. सुखी लोकांच्या बायका पेहरणीवर शाली व लोंकरी दुलया पांघरतात. अकबर बादशाहाचा सेनाधिपति

**कासिमखान** हें राज्य काबीज करीत असतां त्यास येथील लोकांनीं फार दिवस शौर्यानें अडथळा केला, ह्मणून बादशाहास राग येऊन त्यानें त्यांचा मानभंग करून त्यांस पौरुषहीन करण्यासाठीं जबरीनें बायकांच्या पेहरणी वापरण्यास त्यांस लाविलें. यावरून पूर्वीं येथील पुरुष पेहरणी वापरीत नव्हते असें दिसतें. पंडित लोक व त्यांच्या बायका केशराचा किंवा शेंदुराचा कपाळास उभा टिळक लावितात.

**दागिने**—आपल्या देशाप्रमाणें बायकामुलें बहुतकरून सर्व प्रकारचे दागिने वापरतात, पण त्यांतील कांहींची करणावळ वेगळ्या तऱ्हेची असून त्यांत कुसरकाम विशेष दृष्टीस पडतें. **मुंबई** व **पुणें** येथें तयार केलेले आयते दागिने विकत मिळतात, तसे प्रथम **कोहाला** येथें कांहीं दागिने विकरीस मांडलेले एके दुकानीं आमच्या दृष्टीस पडल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. **श्रीनगर** येथें **महाराजगंजांत** एक दोन दुकानीं बरेच दागिने पाहण्यास मिळाले. त्यांतील कांहीं मुख्यांचीं नांवें सांगतों. नथ, बाळी, गळ्यांतील हार, गुलबंद, पटली, जुगनी, चंपाकळी; हातांतील कांकणें, पोंहची, कळे, कंकण, पथ्यली, बाजुबंद, नानगे; पायांतील कळे, छळे, पाजेब, झांजन. स्त्रियांच्या हातांत कांचेचीं कांकणें, बिलवर व प्रौढ स्त्रियांच्या पायांतही पैंजण व वाळे घातलेले दृष्टीस पडले.

**घरेंदारें**—**श्रीनगर** येथील बहुतेक घरें दोन व तीन मजली आहेत. क्वचित् चार मजल्यांचींही दृष्टीस पडतात. मोठमोठाल्या घरांत तळमजले राखण्याची

चाल आहे. पहिल्या व दुसऱ्या मजल्यास दगड, पक्या विटा व चुना यांचा उपयोग विशेष करितात. तळ-मजल्यावर मोठ्या व लांब तुळया घालून त्यांजवर जमीन करितात. तिसऱ्या व चवथ्या मजल्यांचें काम बहुतकरून लांकडी असतें. या मजल्यांच्या भिंतीऐवजीं शिंदी भरितात. सुखी लोकांच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यांच्या छतावर सुरेख कोरींव काम करण्याची बरीच चाल दृष्टीस पडते. पेठेंतील बहुतेक घरांस रस्त्याच्या बाजूस दुकानें राखिलीं आहेत. येथें कौलें मुळींच दृष्टीस पडलीं नाहींत. प्रत्येक घराच्या वरल्या मजल्यावर पांझरण घालून त्याजवर तव्याप्रमाणें भूर्जपत्रें अंथरून त्याजवर दीड दोन इंच जाड मातीचा थर पसरितात. हौसी लोक वसंत ऋतूंत त्याजवर लहानसे पुष्पवृक्ष व वेली लावितात. त्यांस बहार येतो त्यावेळीं रस्त्यानें जाणारे येणारे लोकांस मोठी मजा दृष्टीस पडते. खेड्यापाड्यांतील गरीब लोकांचीं घरें धाब्याचीं आहेत.

**खाणेंपिणें**—या देशांत गायी पुष्कळ असून त्यांचा या राज्यांत वध करण्याची सक्त मनाई आहे, ह्मणून सर्व लोकांस दूधदुभतें रगड प्राप्त होतें. तसेंच तांदूळ हें येथील मुख्य धान्य असल्यामुळें सर्व लोक त्याजवर निर्वाह करितात. चांगल्या स्थितींतील लोक दररोज दूधभात, गव्हाच्या पुऱ्या किंवा चपात्या व भाजा खातात. द्राक्ष व दुसऱ्या फलांचे मुरंब्यासारखे शिरके केले असून त्यांच्याशीं पुऱ्या खातात. तांदुळांत मांस घालून त्याचा भात खातात व त्यांत कांहीं मसालाही घालितात. श्रीमान् लोक विशेष प्रसंगीं

तांदूळ, गहूं, मूग व उडीद यांचीं पक्वान्नें करितात. गरीब लोक मुख्यत्वेंकरून तांदूळ, शिंगाडे, विरे व दुसरीं कंदमूळें, भाजा व कांहीं मांस यांजवर उपजीविका करितात. हे लोक चहा पिण्याचे मोठे शोकी आहेत. यामुळें प्रत्येक घरांत चहादाणी हें पात्र असावयाचेंच. सकाळीं व संध्याकाळीं असा दोन वेळ चहा तयार करून तो पुरुष व बायका मिळून घेतात. ह्यांत **सुरती** व **सबजी** असे दोन प्रकार आहेत. **सुरती** ह्मणजे **इंग्रजी** चहा, तो **पंजाबां**तून या देशीं येतो व **सबजी लदाक्** प्रांतांतून येतो. येथें कांहीं यवन भांग व तमाखू ओढतात व पंडित लोकांत कांहीं तपकीर ओढणारे आहेत; पण खाण्याच्या रूपानें तिचें सेवन कोणीही करीत नाहींत. तसेंच विडा खाण्याची वहिवाटही या देशांत बहुतेक नाहींच असें म्हटलें असतां चालेल. सर्व **श्रीनगर** शहरांत तांबोळ्याचें एकच दुकान असल्याचें समजून आह्मी शहरांत फिरत असतां एकवेळ तेथें गेलों होतों. दुकानदाराजवळ जाडीं व बत्ताडीं फार तर शंभर पानें होतीं. तीं डबल पैशास दोन देतों ह्मणून त्यानें सांगितलें.

## प्रत्यागमन.

**रावळपिंडी** येथें **श्रीनगरांतील** बड्या कामगारांस जरी आह्मीं पत्रें मिळवून ठेविलीं होतीं तरी तेथें गेल्यावर राहण्यास चांगली जागा न मिळाल्यास लोक होडींतच राहून दिवस काढितात, त्याप्रमाणें आपणही करूं व **श्रीनगर** येथें आपली सत्तेची होडी असली ह्मणजे कोठें

जाण्यायेण्यास ती उपयोगी पडेल, या दोन विचारांनीं आह्मी **बरामुला** येथें रोजच्या भाड्याची होडी ठरवून **श्रीनगरास** गेलों. पण तेथें गेल्यावर गैरमाहितीमुळें ती आमची चूक झाली असें समजलें व त्याचमुळें जातेवेळीं आह्मांस होडींत तीन दिवस काढावे लागले. **श्रीनगर** येथें शेंकडों होड्या **वितस्तेंत** खेळत असून पाहिजे तेथें जाण्यास त्या बेतवार भाड्यानें मिळतात व अनोळखी प्रवाशांस राहण्यास चांगल्या सोईच्या जागाही तेथें आहेत, असें तेथें गेल्यावर समजलें. तेव्हां बरोबर आणलेल्या होडीवाल्याचा झाल्या दिवसांचा व त्यास परत जाण्यास अधिक दोन दिवसांचा रोज चुकवून देऊन त्यास निरोप दिला. असो. **श्रीनगर** येथें व त्याचे आसपास ज्या विशेष गोष्टी आमचे पाहण्यांत आल्या त्यांचें वर्णन आम्ही प्रियवाचकांस सादर केलेंच आहे. **श्रीनगर** येथें आणखी कांहीं दिवस राहून तेथील लोकांचा आचारविचार याजविषयीं अधिक माहिती करून घ्यावी अशी आमची इच्छा होती, पण थंडी आपला अम्मल अधिक जोरानें गाजवूं लागली व तेथें झालेले शाळू स्नेही आतां थोड्या दिवसांतच चोहोंकडे बर्फ पडूं लागेल व **वितस्ता** नदींतील पाणी गोंठून तींतून नावा चालण्यास मोठी अडचण पडेल, याजकरितां आह्मीं स्वदेशीं जलदी परतावें ह्मणून सल्ला देऊं लागले, तेव्हां आह्मीं परतण्याचा निश्चय केला.

दुसरे दिवशीं आमचे स्नेह्याचे मार्फत एक टाकभाड्याची पण हलकी होडी ठरवून भोजनोत्तर आह्मीं सिनिअर मेंबर पंडित **सुराजकोल** यांचा व दुसऱ्या स्नेही

मंडळीचा निरोप घेऊन होडींत येऊन बसलों. येतेवेळीं केशराचीं फुलें, कांहीं स्वादिष्ट फळें, कांग्री व तेथील वनश्री व हवापाणी यांचें स्मरण हीं आह्मी बरोबर घेऊन परत निघालों. फुलें कुजून गेलीं, फळांचा मोहक स्वाद त्यांच्या नाशास कारण झाला. कांग्रीच्या उद-रांत सर्वकाळ राहणारा जो अग्नी त्यानें तिचाही पुढें थोड्या दिवसांत नाश केला. बाकी एक स्मरण मात्र आह्मापाशीं राहिलें व तें अद्यापि चांगलें जागृत आहे. या कांग्रीस **काश्मीर** देशांतील लोक मोठी आवडती चीज मानितात. त्यांत गरीब लोक तर तिला आपल्या प्रियेपेक्षां अधिक लाडकी समजून सर्वकाळ गळ्यांत बांधितात. तिच्या संबंधानें **कल्हण** कवीनें एक सुरस श्लोक लिहिला आहे, तो खालीं देतों.

**हिमागमे यत्र गृहेषु योषितां**
**ज्वलद्बहुच्छिद्रसखी हसन्तिका ॥**
**विभाति जेतुं मदनेन शूलिनं**
**धृता तनुर्वन्हिमयीव चक्षुषाम् ॥ १ ॥**

**अर्थः**—“ जणूंकाय **महादेवाला** जिंकण्याकरितां अनेक डोळ्यांची अशी **मदनानें** तनूच धारण केलेली आहे, अशी लहान लहान ठिणग्या ज्यांतून बाहेर येत आहेत, अशीं बहुत छिद्रें असलेली शेगडी ही हिंवाळ्यांत त्या देशांतील घरांत स्त्रियांची मैत्रीण होते.”

आह्मी या देशीं गेल्याच्या आदले वर्षीं गव्हर्नरजन-रल व **कांठेवाडांतील लाठीचे ठाकूर** साहेब हा देश पहावयास गेले होते. **ठाकूर** साहेबांच्या प्रवासाचें वर्णन **खरा प्रकार** नांवाच्या मासिक पुस्तकांत आलेलें

आह्मीं या देशीं जाण्याच्या पूर्वीं वाचिलें होतें. त्यांत खाण्यापिण्याच्या व दुसऱ्या गोष्टींसंबंधानें त्यांचे फार हाल झाले ह्मणून लिहिलेलें आठवून आह्मांस फार अचंबा वाटे. कारण त्यांच्या व आमच्या स्थितींत जमीनअस्मानाचा फरक असल्यामुळें प्रवासांतील सर्व दुःखें खरोखरी आमच्या वाट्यास यावयाचीं; पण तसें मुळींच अनुभवास आलें नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. **काश्मीर** देश सोडते वेळीं मात्र **ठाकूर** साहेबांच्या मनांत जे विचारतरंग आले तशाच प्रकारचे विचार आमच्या मनांत येऊन आम्हांसही एक प्रकारें फार वाईट वाटलें. वर सांगितल्याप्रमाणें होडींत बसून परत निघालों तेव्हां आह्मांस असें वाटलें कीं, येथील वनश्री, केशराच्या बागा, बर्फानें आच्छादित झालेलीं पर्वतशिखरें, त्यांवरून खालीं उतरणारे ओहोळ, **शंकरपर्वत** व त्यावरून दिसणारा शोभायमान देखावा, त्याच्या पायथ्याशीं वळणें घेऊन वाहणारी **वितस्ता, दल** सरोवर, त्यांतील कमलांच्या व दुसऱ्या वेली, त्याच्या कांठचीं आराममंदिरें, द्राक्षवेली, नैसर्गिक बगीचे व त्यांतील कुंज हीं यापुढें आपणास पहावयास कोठून मिळणार? तसेंच येथील प्रमाणें अप्रतिम उदक, आरोग्यवर्धक हवा व नाना प्रकारचीं स्वादिष्ट फळें, यांचा लाभ तरी कसा होणार? अशा प्रकारचे विचार मनांत येऊन एकवार असेंही मनांत आलें कीं, स्वदेशीं जाऊन तरी यापुढें आपणास काय काय कर्तव्य आहे? तर या भूस्वर्गींच राहून आयुष्य घालवावें पण आमच्या बरोबर असलेले दोन सेवक या गोष्टीस कधींही रुकार देणार नाहींत व त्यांच्या स्थितीचा

विचार मनांत आणिला असतां त्यांनीं तसें करणें हेंच योग्य होतें व आपण एकट्यानें राहून आपली निभावणी लागणार नाहीं, असे विचारतरंग मनांत येत असतां परत येतेवेळीं **वितस्तेचा** प्रवाह अनुकूळ असल्यामुळें एकाच वल्ह्याच्या सहाय्यानें होडी सपाट्यानें चालली होती. **श्रीनगर** मागें पडत चाललें, सातही पूल ओलांडून आह्मी पुढें आलों. सरकारी वाडे, मंदिरें, मशिदी व श्रीमान् लोकांचे वाडे हीं एकामागून एक मागें पडत चाललीं. **शंकर** पर्वत व **हरि** पर्वत हेही दृष्टीच्या आड होत गेले. जातेवेळीं **श्रीनगर** केव्हां दृष्टीस पडेल ह्मणून आमच्या मनास जें औत्सुक्य उत्पन्न झालें होतें त्याचे ठिकाणीं हा देश आपणास पुनः कशानें पहावयास सांपडणार, असें मनांत येऊन औदासीन्य वाटूं लागलें. **वितस्ता** व तिच्या कांठची वनश्री या दोन जुळ्या बहिणी मात्र जसें काय आमच्या वियोगजन्य दुःखाचें शांतवन करण्याच्या बुद्धीनें आह्मांस **बरामुलापर्यंत** पोंचविण्यास आल्या.

अशा प्रकारच्या विचारांनीं आमचें मन व्याकुळ झालें होतें. राहून राहून **श्रीनगरा**कडे मागें पाहात व नदीच्या दोहों तीरांवरील चित्तवेधक वनशोभा अवलोकन करीत आह्मी **सादीपुर** व **संबल** हीं गांवें ओलांडून पुढें आलों. जातेवेळीं **मानसबल** सरोवर व **लंका** बेट यांजवरील देखावा आह्मास पहावयास मिळाला नव्हता. तो परत येतेवेळीं अवलोकन करूं ह्मणून बेत केला होता, पण तो फसला. कारण त्या स्थलांच्या जवळ येण्यापूर्वींच रात्र पडली. तेव्हां आह्मीं होडींत उपहार

केला. प्रिया कांग्रीला मात्र आह्मीं बरोबर आणिली. तिला जवळ घेऊन तिच्या उबेनें झोपीं गेलों. रात्रीं हांजीनें कोठें वरवा केला किंवा नाहीं हें सुद्धां समजलें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं थंडीचा कडाका थोडासा कमी झाला. तेव्हां आह्मी बिछान्यावर उठून बसलों आणि वूलर सरोवर मागें केव्हां गेलें ह्मणून हांजीस विचारिलें. तें मागें रात्रींच गेलें आणि दोन प्रहरचे आंत आपण **बरामुला** येथें पोंहोचूं ह्मणून त्यानें सांगितलें. त्या-प्रमाणें आह्मी **श्रीनगर** सोडल्यापासून चोवीस तासांत तेथें परत आलों. पुढें **बरामुला** येथें भोजन करून आह्मी टांग्यांत बसलों आणि जातेवेळाप्रमाणें मार्गांत दोन मुक्काम करून **रावळपिंडीस** परत आलों. कोणाचा हात पाय न मोडतां किंवा विशेष हाल वनवास न होतां आह्मीं सुखरूप परत आलों. ही गोष्ट आमच्या बरो-बर असलेल्या दोन इसमांच्याच पुण्याईनें घडली असें आह्मीं मानिलें. कारण आह्मांस तर साडेसातीनें पुरें वेढिलें होतें. असो. मार्गाच्या एके बाजूस अति उंच कड्यावरून हत्तीच्या आकारास तुच्छ मानणारीं पर्व-तांचीं खडपें तुटून कोठें कोठें खालीं कोसळत असतां त्यांस आड येणाऱ्या प्रचंड वृक्षांचा सुद्धां चुराडा उड-वून त्यांसह सडकेवर येऊन पडतात. अशा वेळीं कां जर एकादा टांगा त्यांच्या सपाट्यांत सांपडला तर त्यांतील प्रवासी, कोचमन, त्याचा बारगीर व टांग्याचे घोडे या सर्वांचा कपाळमोक्ष होऊन त्यांस तेथें स्वर्ग-प्राप्ति होईल. तसेंच मार्गाच्या दुसऱ्या बाजूस अति खोल व विशाळ दरे लागतात. तिकडे कां जर टांगा

घसरला तर सर्वांच्या हाडांचा चुराडा उडून जाणार. या देशीं टांग्यास घोडे जोडण्याची विक्षिप्त रीत पाहून वरील प्रकारचा अनर्थ ओढवण्याची दहशत केव्हां केव्हां आम्हांस पडे. हे टपालटांगे एक्क्यासारखे असतात, म्हणजे त्यास दोन दांड्या असतात. एक घोडा या दांड्यांमध्यें व दुसरा उजव्या दांडीच्या बाहेर जोडतात. यामुळें तो अलग बाजूस राहतो. टपालाचे घोडे बहुतकरून मोठे इमानी व सालस असतात, पण त्यांतून एकादा मनुष्यप्राण्याप्रमाणें निमकहराम भेटून दुलाच्या मारूं लागे आणि टांगा भलतीकडेच ओढूं लागे, तेव्हां आमची अगदीं पांचावर धारण बसून जात असे, पण भोंवतालच्या वनश्रीची नानाविध मोहक रूपें अवलोकन करीत असतां स्वर्गास पोचविणाऱ्या या मार्गक्रमणापासून पराङ्मुख व्हावें असें कधींही वाटलें नाहीं. घोडा दांडगाई करूं लागला म्हणजे आम्ही मात्र घाबरत होतों, पण कोचमन आपल्या बारगिरास लगेंच खालीं उतरवून त्याजकडून त्या बेहुकमी जनावराच्या कानास चांगला मुंगा घालवून आपण चाबकानें त्याचा समाचार घेऊं लागे. तेव्हां तो एकदम वठणीस येऊन निमुटपणी सरळ मार्गानें चालूं लागे. वर सांगितलेले प्रचंड खडपे मार्गाचा अवरोध करितात ते काढून टाकून रस्ता साफ ठेवण्याकरितां मजुरांच्या टोळ्या काम करीत असलेल्या जागोजाग दृष्टीस पडत. येथपावेतों जाहलेली हकीकत आम्हीं प्रिय वाचकांपुढें ठेविली आहे.

आतां एक गोष्ट सांगून हा भाग पुरा करितों.

**श्रीनगर** येथें बहुमोलाच्या शाली आह्मांस पाहण्यास मिळाल्या नव्हत्या. ती इच्छा पुढें **अमृतसर** येथें तृप्त झाली. आह्मी त्या शहरीं गेलों तेव्हां **श्रीमन्महाराज छत्रपती सरकार करवीर** यांची स्वारी देशाटनास गेली होती, ती **पेशावराहून** थोडेच दिवसांत तेथें परत येणार ह्मणून आमचे प्रियबंधू यांचें पत्र आह्मांस तेथें पावलें. बंधूस भेटण्याच्या इच्छेनें आह्मी आमचा मुक्काम लांबविला. पुढें सुमारें एक आठवड्यानें महाराजांची स्वारी तेथें आली. आपले देशबांधव व प्रियबंधु यांस भेटून त्यावेळीं आह्मास किती आनंद झाला असेल ह्याची कल्पना कोणासही करितां येईल. **अमृतसर** येथें शाली करण्याचे हजारो माग असून **श्रीनगरच्या** खालोखाल तेथें शालीचा व्यापार होत असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. **श्रीनगराप्रमाणें** तेथेंही शालींचा व्यापार करणारे कांहीं श्रीमान् दुकानदार आहेत. त्यांत **शंभूनाथ रघुनाथ दास** या नांवाची एक प्रसिद्ध व्यापारी कंपनी आहे. तिचे पुढाऱ्यांनीं **श्री० म० छ०,** त्यांचे बंधु **श्री० बापू साहेब कागलकर, भावनगरचे** राजपुत्र **श्री० भावसिंगजी** व या त्रिवर्गांचे रक्षक **मे० फ्रेजर** साहेब आदिकरून मंडळीस आपले दुकानीं पानसुपारीस बोलाविलें. त्या वेळीं दुकानदारांनीं हातांनीं विणलेल्या व मागावर काढलेल्या लहान मोठ्या किंमतीच्या शाली, लोंकरी कपडे, काबुली लोंकरी कपडे, **बुखारा** येथील रेशमी कपडे, मिन्याचें व नकशीचें काम केलेलीं निरनिराळ्या जातींचीं पात्रें, दागीने, हस्तिदंत व चंदन यांजवर खोदीव काम केलेले पदार्थ, पेपिअरम्याचीचीं

पात्रें, संगमरवर व अन्य जातींच्या मौल्यवान् पाषाणांचे तयार केलेले निरनिराळे पदार्थ व दुसरे जिन्नस दाखविले. शाली ज्या दाखविल्या त्यांत दोन तीन हजार किंमतीच्या ह्मणजे कांहींच नव्हत! एक शाल तर पांच हजार किंमतीची दाखविली. तींत एक मासाभर सुद्धां कलाबतू नव्हता, पण तिची एवढी किंमत वाढण्याचीं मुख्य कारणें तिच्या विणकरीचें हस्तकौशल्य व तिची रेशमासारखी मऊ व बारीक लोंकर हीं होत. या वेळीं आह्मी तेथें असल्यामुळें हा सर्व माल आह्मांसही सहज पाहाण्यास मिळाला.

## इतिहास.

या देशाच्या इतिहासास मुख्य आधार राजतरंगिणी नांवाचा संस्कृत ग्रंथ होय. आतां त्यांत दिलेला कथाभाग वर्णन करण्यापूर्वीं या ग्रंथाविषयीं थोडीशी माहिती सांगतों. याचे चार भाग आहेत. त्यांतील पहिल्या भागाचा कर्ता **कल्हण कवि** होय. तो **जयसिंव्ह** राजाच्या वेळीं होता. त्यानें हा भाग तयार करण्याच्या कामीं नलिमतपुराण (काश्मिर महात्म्य), हरविजय, श्रीकंठचरित्र, अनेकमहात्म्यें, निरनिराळ्या कवींनीं लिहिलेलीं त्रोटक राजवर्णनें, प्राचीन देवालयें, विहार व दुसऱ्या इमारती यांजवरील लेख, शिलालेख, दंतकथा, जुनीं नाणीं इत्यादि आधार घेतले होते. वर सांगितलेल्या आधारांत पहिले तीन ग्रंथ **काश्मीर** येथें उपलब्ध आहेत. नीलमतपुराणांत अतिप्राचीन काळीं **नील** नांवाचा कोणी **काश्मीर**चा क्षेत्रपाळ होता, त्याची

कथा मुख्यत्वें वर्णिलेली असल्याचें समजतें. राजतरंगिणी हा ग्रंथ पद्यात्मक आहे. त्यांतील कथा कलियुगाच्या आरंभापासून तों **अकबर** बादशहानें हा देश काबीज केला, येथपर्यंत दिली आहे, ह्मणजे अजमासें पांच हजार वर्षांची आहे. या स्थलीं अजमासें म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, कलियुगाचा आरंभ कधीं झाला व कौरव पांडव हे कोणत्या कालीं होते, याविषयीं आपल्या व पाश्चात्य देशाचे विद्वान् यांत एकवाक्यता नाहीं, इतकेंच नव्हें पण **काश्मीर** देशीं जे राजे जाहले, त्यांतील कांहींच्या कालाविषयीं पाश्चात्य विद्वानांतही किती मत-भेद आहे, तो पुढें एक दोन स्थलीं दर्शविला आहे. आमच्या लोकांच्या मताप्रमाणें कृष्णावतार कलियुगाच्या आरंभी जाहला. या गोष्टीस सुमारें पांच हजार वर्षें होत आलीं. **कृष्ण** व **जरासंध** यांजमध्यें जेव्हां युद्ध प्रसंग चालू झाला, तेव्हां **काश्मीर**चा पहिला राजा **गोनंद** हा **जरासंधा**च्या मदतीस जाऊन त्यानें **मथुरा** शहरास वेढा घातला, असें राजतरंगिणींत लिहिलें आहे. ह्यावरून **गोनंद** हा **कृष्णा**चा समकालीन असून त्यास होऊन पांच हजार वर्षें होत आलीं असें सिद्ध होतें. पण पाश्चात्य विद्वानांच्या मताप्रमाणें तो इसवी शकाचे पूर्वीं ११०० वर्षें जाहला, ह्मणजे त्यास होऊन सुमारें तीन हजार वर्षें जाहलीं. येथें दोन हजार वर्षांची चूक पडते. ही ढोबळ चूक कशी भरून काढावी तें आम्हांस समजत नाहीं. तत्रापि आमच्या प्राचीन गोष्टींस होईल तितकें अर्वाचीनत्व देण्याचा बहुतेक पाश्चात्य विद्वानांच्या बुद्धीचा कल दिसतो आणि या कलास अनुसरूनच

त्यांनीं वरील काल स्थापित केला असावा असें वाटतें. शिवाय राजतरंगिणींत अमुक राजानें अमुक वर्षें राज्य केलें असे जे आंकडे दिले आहेत, ते सर्व घेऊन त्यांची जुळवा जुळव करून पाहूं लागलें असतां तोही मेळ बरोबर पडत नाहीं व कांहीं स्थळीं कविसंप्रदायास अनुसरून निवळ अतिशयोक्ति केलेली दृष्टीस पडते; करितां कोठें राजतरंगिणींत दिलेलीं व कोठें पाश्चात्य विद्वानांनीं ठरविलेलीं वर्षें आम्हीं पुढील कथावर्णनांत देत आहों.

राजतरंगिणी हा ग्रंथ महावंशो ( लंका द्वीपाचा पाली भाषेंतील इतिहास ) प्रमाणें चार कवींनीं निरनिराळ्या काळीं लिहिला आहे. यांतील प्रथम भाग **कल्हणानें** आरंभापासून तों इ० स० ११४८ पर्यंत ह्मणजे सुमारें ३८५० वर्षांत या देशांत जे राजे जाहले त्यांची कथा वर्णिली आहे. **जयसिंहाभ्युदय** नांवाचा ग्रंथ याच कवीनें केला अशी **काश्मीरांत** दंतकथा आहे. याच्या बापाचें नांव **चंपक** असून तो या देशांतील एका राजाचा मंत्री होता. **कल्हणानें** प्रथम भाग **शालीवाहन शकाच्या** अकराव्या शतकाच्या अखेरीस लिहिला. या भागाचे आठ तरंग आहेत. दुसरा भाग **जोनराज** नांवाच्या कवीनें लिहिला आहे, यास **राजावली** असें नांव दिलें आहे. यांत इ० स० ११४८ पासून १४१२ पर्यंतची कथा दिली आहे. नंतर **जोनराजाचा श्रीवर पंडित** नांवाचा एक शिष्य होता, त्यानें तिसरा भाग लिहिला व त्यास आपल्या गुरूनें दिलेलें नांव ( राजावली ) पुढें चालविलें. यांत सुमारें ६५ वर्षांची कथा दिली आहे. चवथा भाग **प्राज्यभट्ट** नांवाच्या कवीनें

लिहिला. यास **राजावलीपतक** असें नांव दिलें आहे. यांत **अकबर** बादशहानें ह्या देशावर स्वारी करून तो काबीज केला, येथपावेतों ह्मणजे इ० स० १९८६ पर्यंतची कथा दिली आहे. यांतील पहिला भाग फारच मोठा ह्मणजे सर्व ग्रंथाचा तीनचतुर्थांश होईल. आतां या राजतरंगिणींतील साद्यंत कथाभाग देण्याचा विचार मनांत आणिल्यास ग्रंथ विस्तार आमच्या इष्ट मर्यादेच्या फार पुढें जाणार, इतकेंच नव्हे तर तो एक स्वतंत्र ग्रंथच तयार करावा लागणार, करितां औदार्य, शौर्य, पराक्रम, न्याय, दया, विद्या इत्यादि उच्च गुणांनीं ज्या राजांचीं नांवें अमर होऊन राहिलीं आहेत, त्यांच्या कथा होईल तेवढ्या संक्षेपानें देणार आहोंत. समयविशेषीं वरील गुणांच्या विरुद्ध गुणांनीं जे राजे प्रसिद्धीस आले त्यांचीही कथा कोठें कोठें सांगणार आहों; याचें कारण एवढेंच कीं, एखाद्या चित्रांत किंवा तसबीरींत एखादा रंग चांगला खुलून दिसण्याकरितां त्याच्या विरुद्ध रंग त्याच्या शेजारीं भरित असतात.

येथील पहिला राजा **गोनंद** नांवाचा जाहला. यासच **आदिगोनर्द** असें राजतरंगिणींत ह्मटलें आहे. तो मोठा पराक्रमी व रूपवान् होता. तो **मगध** देशाचा राजा **जरासंध** याचा साह्यकारी असल्यामुळें त्याचें **कृष्णाशीं** जेव्हां युद्ध जाहलें तेव्हां त्यानें **गोनंद** यास आपल्या मदतीस बोलाविलें. त्यावेळीं तो फौज घेऊन गेला आणि त्यानें **मथुरा** शहरास वेढा घालून यादवी फौजेचा अगदीं पराजय केला. पुढें **बलराम** याच्याशीं युद्ध करण्यास येऊन त्यानें त्यास युद्धांत ठार मारिलें. यानें

३९ वर्षें सहा महिने राज्य केलें. नंतर त्याचा पुत्र **दामोदर** हा गादीवर बसला. हाही बापाप्रमाणें मोठा पराक्रमी होता. आपल्या बापास **बळरामानें** ठार मारिलें या त्वेषानें त्याचें मन जळत होतें. पुढें **सिंधु** नदीच्या कांठीं **गांधार** देशाच्या राजाच्या कन्येचा स्वयंवर असून तेथें यादवांस बोलावणें होतें, ह्मणून ते समारंभास आले असल्याचें राजा **दामोदर** यास कळलें. तेव्हां तो आपली फौज सज्ज करून यादवांबरोबर लढाई करण्यास गेला. तेथें **कृष्णाची** व त्याची लढाई झाली, तींत **दामोदराचा** पराजय होऊन तो पडला. यानेंही पस्तीस वर्षें सहा महिने राज्य केलें. याची बायको **यशोमति** ही या वेळीं गरोदर होती. तिला **कृष्णानें** गादीवर बसविलें. तेव्हां तें राज्य न बुडवितां **यशोदेस** गादीवर बसविलें, याचें कारण काय ह्मणून **श्रीकृष्णास प्रश्न** विचारतां तें राज्य ( काश्मीरदेश ) **उमाचें** माहेरघर आहे व तें बुडविलें तर **शंकरास** राग येईल ह्मणून त्यांनीं सांगितलें. ही कथा नीलपुराणांत दिली आहे ह्मणून आम्हांस **श्रीनगर** येथें असल्यावेळीं समजलें. असो. पुढें तिला पुत्र झाला. याचेंही नांव **गोनर्द** ( दुसरा ) ठेविलें. याच सुमारास भारती महायुद्ध झालें. पण **गोनर्द** हा लहान असल्यामुळें त्यास युद्धास बोलाविलें नव्हतें. याच्या नंतर बावन्न राजे झाले व त्यांनीं १२६६ वर्षें राज्य केलें. या ५२ नांपैकीं १७चीं नांवें मात्र **कल्हण** सांगतो. याहून विशेष माहिती देत नाहीं. यांच्या मागून **लव** राजा झाला, हा **देरायस हिस्तास्पिसचा** समकालीन होता,

असें पाश्चात्य विद्वानांचें मत आहे. त्याच्या नंतर त्याचा पुत्र **कुशेशय**, त्याचा पुत्र **खगेंद्र**, त्याचा पुत्र **सुरेंद्र** हे एकामागून एक गादीवर बसले. **सुरेंद्रानें** शंभर यज्ञ करून **इंद्राचें** नांव मागें सारिलें व **दरद** देशाजवळ **सौरक** नांवाचें शहर वसवून त्यांत **नरेंद्रभवन** नांवाचा वाडा बांधिला. यास पुत्र नव्हता, म्हणून त्याच्या पश्चात् दुसऱ्या घराण्यांतील **गोधर** नांवाचा राजा झाला. पुढें त्याचा पुत्र **सुवर्ण**, त्याचा पुत्र **जनक**, त्याचा पुत्र **सचीनर**, असे आठ राजे झाले. या राजांची बरीच कथा व प्रत्येकानें किती वर्षें राज्य केलें त्यांची संख्या दिली आहे. पण त्या कथांत विशेष रहस्य नसल्यामुळें आम्हीं वरील राजांनीं जितकीं वर्षें राज्य केलें त्यांची बेरीज देत आहों, ती सुमारें ३०० वर्षें होते. **शचीनरच्या** मागून त्याचा चुलत बंधु–

**अशोक** हा गादीवर बसला. **मगध** देशचा राजा **चंद्रगुप्त** त्याचा प्रसिद्ध नातू जो **अशोक** तो हा नव्हे. हा राजा त्याच्या प्रमाणेंच बौद्ध धर्माचा मोठा अभिमानी असून यानेंच तो धर्म या देशांत प्रथम चालू केला. पण ब्राह्मण धर्मासही तो कमी मानीत नसे. यानें **वितस्त** व **शुष्कल** हे दोन डोंगरी देश घेऊन आपलें राज्य वाढविलें. **श्रीनगर** शहरची स्थापना प्रथम यानें केली व त्यांत ९६ लक्ष घरें बांधविलीं. बौद्ध धर्माचे भिक्षुक लोक ( श्रमण ) यांस राहण्याकरितां **धर्मारण्य** नांवाचा एक मोठा विहार यानें बांधिला. **बिजबिहार** येथील प्राचीन देवालय यानेंच बांधविलें होतें म्हणून पूर्वीं सांगितलेंच

आहे. याच्या वेळीं *म्लेंच्छ लोक मोठे प्रबळ होऊन यास फार उपद्रव देऊं लागले. तेव्हां **अशोकानें शिवाची** आराधना करून या लोकांस जिंकण्यासारखा आपणास पुत्र व्हावा म्हणून वर मागून घेतला. त्याप्रमाणें पुढें त्यास पुत्र झाला. त्याचें नांव राजानें **जलौक** असें ठेविलें. हा पुत्र महान् धार्मिक, पराक्रमी व दाता निघाला. त्यानें म्लेंच्छ लोकांस जिंकलें आणि **उजूटडिंब** नांवाचा त्यांचा देश होता तो अगदीं उध्वस्त करून टाकिला. त्यानें कित्येक अग्रहार करून दिले आणि आपल्या कीर्तीनें ब्रह्मांड भरिलें. याची स्त्री **ईशानदेवी** ही मोठी धार्मिक असून तिनें मातृकेच्या मूर्तींची द्वारावर स्थापना केली आणि **नंदीक्षेत्रा**भोंवतीं तट बांधिला. एक बाई येऊन तिनें राजापाशीं नरमांस भक्षणास मागितलें, तेव्हां तें आपल्या शरीरांतील देण्यास तो तयार झाला असा तो धार्मिक होता. याच्या नंतर—

**दुसरा दामोदर** नांवाचा राजा गादीवर बसला. हाही मोठा शैव होता आणि **कुबेरा**ची व याची मैत्री होती. त्यानें **गंधर्वां**कडून एक मोठा सेतु (पूल) बांधविला. एके दिवशीं हा राजा पारोसा असतां कांहीं ब्राह्मण येऊन त्याजपाशीं भोजनास मागूं लागले. आपण अस्नात ह्मणून त्यानें त्यांस अन्न देण्याचें नाकबूल केलें.

---

* या शब्दाचा अर्थ सामान्यतः मुसलमान समजतात. पण या लोकांचा धर्मस्थापक जो **महमद** याचा जन्म होण्याच्यापूर्वीं हजारों वर्षें लिहिलेलें महाभारत व रामायण या ग्रंथांत तो येतो. यावरून **म्लेंच्छ** म्हणजे मुसलमान न समजतां **मध्य एशियां**तील लोक समजावे.

ते समयीं ते क्षुब्ध होऊन त्यांनीं तूं सर्प होशील म्हणून शाप दिला. त्याप्रमाणें तो सर्प झाला. तेव्हां त्यानें उःशाप मागितला. तूं एक दिवसांत सर्व रामायणाचें पारायण ऐकिलें असतां तुला पूर्वरूप प्राप्त होईल म्हणून त्यांनीं सांगितलें. त्याच्यानंतर **हून** जातीचे **हुष्क**, **जुष्क** व **कनिष्क** या नांवांचे तीन बंधु राजे झाले. **प्रिन्सेप**च्या मताप्रमाणें इ० शकाच्या पूर्वीं १२७७ वे वर्षीं हे राजे झाले. पण दुसऱ्या शोधकांच्या ह्मणण्याप्रमाणें ते त्या शकाच्या ५८ वर्षांपूर्वीं होते असें सिद्ध होतें. येथें बाराशें एकोणीस वर्षांची चूक पडते! या त्रिवर्गांनीं आपआपल्या नांवांचीं तीन शहरें स्थापिलीं. सांप्रत ज्यास **बरामुला** ह्मणतात तेथें **हुष्कपूर** होतें असें सांगतात. **जुष्का**नें **जयस्वामी** नांवाचें नगर स्थापिलें होतें. यांच्यामागून **नागार्जुन** नांवाचा राजा झाला. तो बौद्ध धर्माचा मोठा अभिमानी होता. याच्या मागून—

**अभिमन्यु** राजा झाला. त्याच्या आज्ञेवरून **चंद्र** नांवाच्या पंडितानें व्याकरण रचिलें व **पातंजली**चें महाभाष्य **काश्मीर** देशांत सुरू केलें. या वेळीं बौद्ध लोक मोठे प्रबळ होऊन ते वैदिक धर्माचा ऱ्हास करूं लागले. पण **अभिमन्यु** हा ब्राह्मण धर्माचा मोठा अभिमानी असून त्यानें बौद्धांचा फार नाश केला. तो **रोम**च्या **निरो** बादशाहासारखा मोठा क्रूर होता. त्यानें बौद्ध लोकांचीं कित्येक देवालयें जाळून फस्त केलीं. त्यानें आपल्या नांवाचें एक नगर व देवालय बांधिलें आणि नीलपुराणांत सांगितल्याप्रमाणें सर्पाची पूजा चालू

केली. याच्यानंतर पुनः **गोनर्द** घराण्यांतील पुरुष गादीवर बसला. हा तिसरा **गोनर्द** झाला. **वुईल्सन्**च्या मताप्रमाणें तो इ० शकाच्या ११८२ वर्षांपूर्वी राजा झाला. पण **जनरल कनिंगहाम**च्या मताप्रमाणें इ० सनाच्या ९३ वें वर्षी तो राजा झाला. वरील प्रमाणें येथेंही १२३९ वर्षांची चूक येते! याच्या मागून **बिभिषण, इंद्रजित, रावण** व दुसरा **बिभिषण** (किन्नर) हे अनुक्रमें गादीवर बसले. यांत **रावण** मोठा धार्मिक होता. दुसऱ्या **बिभिषणा**नें राज्यांत फार अनर्थ केले. एका श्रमणानें ( बौद्धजोगी ) योगबलाच्या सामर्थ्यानें या राजाची स्त्री हरण केली. त्या त्वेषानें राजानें त्याचा सूड उगविण्याकरितां बौद्ध लोकांचे हजारों विहार जाळिले आणि त्यांचें अग्रहार हिराऊन घेऊन ते ब्राह्मणांस दिले. यानें वितस्तेच्या कांठीं **किन्नरपूर** व **ऋद्धावण** या नांवांचीं दोन मोठीं नगरें स्थापिलीं होतीं. यांतील पहिलें नगर एका नागानें जाळून टाकिलें. **चंद्रलेखा** नांवाची एक ब्राह्मणाची स्त्री होती. तिच्या घरांत एके दिवशीं राजाचा घोडा शिरला. तेव्हां तिनें त्याच्या पुठ्यावर थाप मारिली. तेथें तिच्या हाताचा सोन्याचा पंजा उठला. हें वर्तमान राजास समजून त्याचें मन तिजविषयीं कामातुर झालें आणि तो तिच्या प्राप्तीचा उद्योग करित असतां मरण पावला. पुढें **नर, सिद्ध, उत्पलाक्ष** (पुष्कलाक्ष), **हिरण्याक्ष, हिरण्यकुल** व **वसुकुल** हे राजे झाले. मुद्राराक्षस नाटकांत **चंद्रगुप्त** व **मलयकेतु** यांच्या युद्धांत **मलयकेतू**च्या बाजूनें **पुष्कलाक्ष** म्हणून जो लढत होता तोच हा **उत्पलाक्ष** असावा असें

एका पंडिताचें मत आहे. याचे नेत्र खरोखरी कमला-सारिखे असल्यामुळें त्यास हें नांव मोठें शोभत असे. **हिरण्यकुला**नें आपल्या नांवाचें एक पूर वसविलें होतें. यांच्या मागून—

**मिहिरकुल** गादीवर बसला. हा **हूण** कुलांतील असून **यमासारखा** दुष्ट व क्रूर होता. याच्याजवळ ७०० लढाऊ हत्ती होते. त्यानें तीन कोट मनुष्यें ठार मारिलीं. त्याच्या मनांत बौद्ध धर्माची माहिती करून घेण्याचें आलें. तेव्हां चांगले विद्वान् पाहून त्यांस तो विचारूं लागला. त्यांनीं ती आपण न सांगतां तें काम आपल्या एका सेवकास करण्यास सांगितलें. या अपमानामुळें त्यास मोठा क्रोध येऊन तो त्या धर्मी लोकांचा फार छळ करूं लागला. त्याची राणी **सिंहलद्वीपा**ची होती. त्यानें त्या द्वीपावर स्वारी करून तेथील राजास मारिलें आणि त्याच्या जागीं दुसरा राजा बसविला. त्या द्वीपांत निशाणावर सिंहाचें चित्र काढण्याची चाल होती, ती **मिहिरकुला**नें बंद करून सूर्याचें चित्र काढण्याचा हुकूम केला. नंतर या द्वीपाहून परत येते वेळीं मार्गांत **चोल** व **कर्नाटक** येथील राजांस त्यानें जिंकिलें. त्याचें आणि **मगध** देशाचा राजा **बालादित्य** याचें फार वैर होतें. दोघांत युद्धप्रसंग होऊन त्यानें **बालादि-त्याचा** पराभव केला. त्यानें **गंध** देशांतील हलक्या जातीच्या ब्राह्मणांस अग्रहार करून दिले व **चंद्रकु-ल्या** नांवाच्या नदीचा ओघ फिरविला. त्यानें अठरा वर्षें राज्य केलें. याच्या मागून **बक, क्षितिनंद, वसु-नंद, नर** ( दुसरा ) **अक्ष** असे राजे झाले. यांत **वसु-**

नंद हा मोठा विद्वान् होता. त्यानें कामशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला होता. यांच्या नंतर अक्षाचा पुत्र—

**गोपादित्य** गादीवर बसला. या राजानें आपली कारकीर्द कृतयुगांतल्या **नल** राजाप्रमाणें केली. त्यानें वाईट चालीचे व शाक्तमार्गी ब्राम्हण यांचे अग्रहार काढून घेऊन त्यांस देशांतून घालवून दिले आणि त्यांच्या बदलीं मध्य देशांतील चांगले विद्वान् ब्राम्हण आणून त्यांस ते अग्रहार दिले. हिंसा करणें त्यास अगदीं आवडत नसे. यज्ञावांचून कोणी पशु मारूं नये म्हणून त्यानें हुकूम दिला होता. याच्यानंतर **गोकर्ण, नरेंद्रादित्य** व **युधिष्ठिर** ( अंध ) हे गादीवर बसले. **नरेंद्रादित्यानें पायच्छ** ( स्वच्छपाणी ) नांवाच्या गांवाजवळ एक शिवालय बांधिलें. तें सर्व सहाच दगडांनीं तयार केलें होतें. **युधिष्ठिर** आरंभीं **धर्म** राजाप्रमाणें नीतीनें वागणारा होता, पण तो पुढें फार अनीतीनें वागूं लागला. तेव्हां त्याच्या पदरचे मांडलिक राजे व त्याचे मंत्री हे त्यास कंटाळून त्याजवर उठले. आतां आपलें राज्य सुरळीत चालत नाहीं असें पाहून त्यानें अग्निप्रवेश केला. तेव्हां त्याचे मंत्री **सर्वरत्न, स्कंदगुप्त** व **जय**, यांनीं **प्रतापादित्य** यास आणून गादीवर बसविलें. **आदित्य** घराण्यांतील हा पहिला राजा होय. पाश्चात्य पंडितांच्या मताप्रमाणें **युधिष्ठिर** अखेर ३८ राजे झाले व त्यांनीं १०१९ वर्षें राज्य केलें. **प्रतापादित्य** राज्य मिळविण्याकरितां गळफास लावून घेणार होता. तो प्रसिद्ध **विक्रमादित्याचा** नातेवाईक होता. पुढें त्याचा पुत्र **जलौकष** हा राजा झाला. पण या

बापलेकाच्या कारकीर्दींत लिहिण्यासारख्या कांहीं विशेष गोष्टी घडल्या नाहींत. **जलौकषा** नंतर—

**तुंजीन** हा गादीवर बसला. याच्या राणीचें नांव **वाक्पुष्टा** होतें. ही महापतिव्रता होती. हा राजा मोठा पराक्रमी, नीतिमान्, धार्मिक व विद्वान् होता. यानें केलेले स्फुट श्लोक आढळतात म्हणून समजतें. यानें अति उत्तम रीतीनें राज्य केलें म्हणून **व्यासाच्या** शिष्यानें याजवर एक नाटक लिहून तें करून दाखविलें. **चंद्रक** नांवाचा एक मोठा कवि व नाटककार याचे पदरीं होता, पण त्याचे **ग्रंथ** सांप्रत उपलब्ध नाहींत. या राजानें **तुंगेश्वर** नांवाचें शिवालय बांधिलें होतें. याच्या वेळीं एक मोठा भयंकर दुष्काळ पडला होता; पण राजा, त्याची राणी व मंत्री यांनीं अतिशय झटून प्रजेच्या प्राणाचें रक्षण करण्याचा यत्न केला. अखेर राणीच्या प्रभावानें तो दुष्काळ बंद झाला. या दुष्काळाचें सुरेख वर्णन आमचे मित्र रा०रा० **वासुदेव वामन शास्त्री खरे** यांनीं कवितारूपानें लिहिलें आहे. यानें छत्तीस वर्षें राज्य करून स्वर्गारोहण केलें. तेव्हां अनाथ लोकांकरितां त्याच्या राणीनें जेथें अन्नसत्र घातलें होतें, त्या स्थलीं ती राजाबरोबर सति गेली. तें सत्र अद्यापि चालू आहे म्हणून समजतें. तसें असल्यास एवढें जुनें सत्र आपल्या देशांत तर कोठें असेल असें वाटत नाहीं. यास पुत्र नव्हता, याचें कारण ब्रम्हदेवास असें वाटलें कीं, या दंपत्यास पुत्ररत्न दिलें असतां तें यांच्यापेक्षां अधिक चांगलें कोठून निपजणार, असें **कल्हणकवि** म्हणतात. असो. याच्या मागून **विजय** नांवाचा राजा

झाला. हा दुसऱ्या कुलांतील होता. यानें आठ वर्षें राज्य केलें. नंतर—

**जयेंद्र** गादीवर बसला. हा आजानुबाहु असून पृथुराजासारखा पराक्रमी व मोठा शूर होता. **संधिमति** नांवाचा त्याचा प्रधान होता. तो सर्व गुण संपन्न होता म्हणून राजाचा त्याजवर मोठा भरंवसा व प्रेम होतें. ही गोष्ट राजाजवळ राहणाऱ्या अन्य लोकांस सहन न होऊन त्यांतील एकानें राजाजवळ अशी चुगली केली कीं, प्रधानाच्या मनांत आपली गादी बळकाविण्याचें आहे. ही गोष्ट ऐकून राजाची प्रधानावर इतराजी झाली आणि त्यानें त्यास दहा वर्षें कैदेंत ठेवून अखेर त्यास सुळीं दिलें. **ईशान** नांवाचा प्रधानाचा गुरु होता. त्यास हें वर्तमान कळून फार वाईट वाटलें. मंत्री **संधिमति** याच्या मस्तकावर विधात्यानें असें लिहून ठेविलें होतें कीं, तो सुळीं गेल्यावर दहा वर्षें राज्य करील. त्या लेखाप्रमाणें **योगिनी** नांवाच्या वनदेवतांनीं त्याचें प्रेत घेऊन तें सजीव केलें; कारण, तो त्यांस भोग देण्यास पाहिजे होता. मध्यंतरीं **जयेंद्र** राजा मरण पावला आणि कांहीं काळ गादी रिकामी होती. पुढें **संधिमति** हा राज्यावर येऊन बसला. त्यानें **आर्यराज** असें नांव धारण केलें. हा मोठा शिवभक्त होता. तो दररोज एक हजार शिवलिंगांची स्थापना करून त्यांची पूजा करी. त्यांतील लिंगें अद्यापि कोठें कोठें क्वचित् दृष्टीस पडतात म्हणून सांगतात. याच्या मागून पुनः **गोनर्द** घराण्यांतील—

**मेघवाहन** गादीवर बसला. हा बौद्ध धर्माचा मोठा वाली होता. यानें कांहीं गांव वसविलें आणि

विहार स्थापिलें. यास पुष्कळ बायका होत्या. त्यांत **यूकदेवी, इंद्रदेवी** व **अमृतप्रभा** ह्या तीन मुख्य होत्या. या तिहींनीं आपआपल्या नांवाचा एकेक विहार स्थापिला. **यूकदेवीस** बौद्ध सन्याशांची ( श्रवणांची ) सेवा करण्यास नेमिलें होतें. याच्या वेळीं एक भिक्षु आपला मुलगा बळी देण्यास तयार झाला असतां राजा त्यास आडवा येऊन ह्मणाला, तुझ्या मुलाबद्दल मी आपलें शीर देवीस अर्पण करितों. हें त्याचें उदार भाषण ऐकून देवी त्यास ह्मणते, तूं व **मिहिरकुल** एकाच कुलांत जन्मला असून तूं अहिंसा धर्मी आणि त्यानें तर तीन कोट मनुष्यें मारिलीं ही गोष्ट फारच विचित्र आहे. याच्या पूर्वजांनीं **वरुणाचें** छत्र हिरावून आणलें होतें. तें **वरुण** येऊन त्यानें मागितल्यावरून राजानें त्यास परत दिलें. तेव्हां तो मोठा प्रसन्न होऊन त्यानें राजास समुद्र तरून जाण्याची शक्ति दिली. तेव्हां राजा सैन्यासह लंकेस गेला. त्या वेळीं तेथें **बिभिषण** राज्य करीत होता. त्यानें **मेघवाहनास** पुष्कळ रत्नें व छत्रचामरें दिलीं. तो त्या द्वीपांतील लोकांस हिंसा न करण्याचा उपदेश करून परत आला. याच्या राज्यांत सिंह, व्याघ्र व ससाणा हे देखील हिंसा करीत नसत. असा तो धार्मिक व नीतिमान् होता. त्यानें ३४ वर्षे राज्य केलें. नंतर **मेघवाहनाचा** नातू—

**श्रेष्ठसेन** गादीवर बसला. त्याच्या मागून त्याचा पुत्र **हिरण्य** हा गादीवर बसला. त्यानें आपला धाकटा बंधु **तोरमाण** याला युवराज केला. एके वेळीं **तोरमाणानें** आपल्या शिक्क्याचीं **दिनार** नांवाचीं नाणीं पाडिलीं. तीं पाहून राजा **हिरण्य** याला मोठा राग

आला आणि त्याच्या सपाट्यांत त्यानें **तोरमाणाचा** वध केला. या वेळीं त्याची **अंजना** नांवाची बायको गरोदर होती. ही **इक्ष्वाकु** देशाचा राजा जो **वज्रेंद्र** याची कन्या होती. मरते वेळीं **तोरमाणानें** तिला कोठें तरी पळून जाऊन आपला बचाव करून घे ह्मणून सांगितल्यावरून ती एका कुंभाराच्या येथें छपून राहिली. तेथेंच प्रसुत होऊन तिला मुलगा झाला. त्याला कुंभारानें **प्रवरसेन** असें नांव ठेविलें. **अंजनेनें** त्या मुलाला आपल्या नांवानें लोकांत प्रसिद्धीस न आणतां कुंभारणीच्या नांवानें प्रसिद्धीस आणला. अजाणते लोक जरी त्याला कुंभाराचें मूल असें ह्मणत होते, तरी त्याचे गुण तसे नसून तो कुलीन राजपुत्रासारखा दिसत होता व श्रेष्ठ लोकांच्या मुलांबरोबर खेळत असे. त्याचा मामा **जयेंद्र** याला त्याची सर्व हकीकत माहीत होती. तो प्रौढ झाल्यावर एके दिवशीं आपण कुंभारपुत्र नसून राजपुत्र आहों हें त्याला कळून आलें, तेव्हां तो फार दुःखित झाला. त्याचा चुलता **हिरण्य** हा फार क्रूर असून प्रकट झालें असतां आपल्याला मारील असें त्याला वाटलें व कुंभाराच्या घरींही राहणें त्याला आवडलें नाहीं, ह्मणून तो तीर्थयात्रेला निघून गेला.

इकडे सुमारें ३१ वर्षें राज्य करून **हिरण्य** स्वर्गवासी झाला. त्याला संतान नव्हतें, यामुळें या वेळीं **काश्मीरचें** राज्य बिनवारसी झालें. याच समयास **उज्जयनी** नांवाचे नगरींत राजा **विक्रमादित्य** राज्य करीत होता. यास **श्रीहर्ष** असेंही ह्मणत. त्या वेळीं त्याचा ऐश्वर्यसूर्य अगदीं मध्याह्न काळावर

आला होता. **मातृगुप्त** नांवाचा एक कवि अत्यंत दरिद्री असून दैवाची परिक्षा पाहण्याकरितां **विक्रमादित्या**जवळ चाकरीस राहिला. त्यानें एक वर्षपर्यंत राजाची खडतर चाकरी केली, तरी त्याला त्यानें कांहीं दिलें नाहीं; यामुळें **मातृगुप्त** फार उदास झाला होता, पण **विक्रमादित्यानें** त्याचे अत्युत्तम गुण पाहून त्याचें कल्याण करण्याचा निश्चय केला होता. राजानें **काश्मीर** देश अराजक आहे असें जाणून गुप्तपणें आपले दूत तेथील प्रधानाकडे पाठविले आणि आपण ज्या मनुष्याला पत्र देऊन पाठवीन त्या मनुष्याला गादीवर बसवावें अशी आज्ञा केली. नंतर **मातृगुप्ता**ला एक लखोटा देऊन तो फोडून न पाहण्याविषयीं शपथ घालून **काश्मीरास** पाठविला. राजानें आपल्याविषयीं काय केलें आहे, तें न समजल्यामुळें **मातृगुप्त** या वेळीं फार दुःखित झाला होता. तरी वाटेंत चांगले शकून झाल्यावरून त्याला उमेद आली. **काश्मीरांत** जाऊन प्रधानांस लखोटा देतांच त्यांनीं मोठा सन्मान करून त्यास गादीवर बसविलें. त्या वेळीं **मातृगुप्ता**ला अतिशय आनंद झाला आणि राजा **विक्रमादित्याच्या** औदार्याची त्यानें फार तारीफ केली. **मातृगुप्तानें** फार उत्तम प्रकारानें राज्य केलें. त्यानें पुष्कळ विद्वान् लोकांना आश्रय दिला. **भर्तृमेंठ** नांवाच्या कवीनें "**हयग्रीववध**" नांवाचें काव्य करून त्याला अर्पण केलें, त्या वेळीं **मातृगुप्तानें** त्याला मोठी देणगी दिली. त्यानें **मातृगुप्तस्वामी** नांवाचें मंदिर बांधलें. याशिवाय पुष्कळ ब्राम्हणांस अग्रहार दिले. याप्रमाणें त्यानें सुमारें पांच वर्षें **काश्मीरचें** राज्य केलें.

इकडे **काश्मीर**चा खरा राजा जो **प्रवरसेन** तो तीर्थाटन करीत असतां **महादेवा**ची आज्ञा झाल्यावरून परत **काश्मीरां**त आला. त्यानें **मातृगुप्त** राज्य करीत आहे, हें पाहून कदाचित् आपल्यावर संकट येईल म्हणून गुप्तपणें प्रधान मंडळीची भेट घेतली. त्यांनीं हा आपला खरा राजा म्हणून त्याचा स्वीकार केला. **प्रवरसेना**ला **विक्रमादित्या**चा फार राग आला व **मातृगुप्ता**विषयीं कांहीं वाईट वाटलें नाहीं. **मातृगुप्त** या वेळीं **त्रिगर्त** देशावर स्वारी करण्यास गेला होता. तेथेंच **विक्रमादित्य** मेल्याची वार्ता ऐकून तो फार दुःखित झाला. याच समयास **प्रवरसेन** थोडीशी फौज बरोबर घेऊन त्याच्या भेटीस गेला. उभयतांचें बरेंच भाषण झालें व एकमेकांनीं राज्यस्वीकाराविषयीं आग्रह धरिला. **प्रवरसेना**नें दिलेलें राज्य आपण स्वीकारावें हें योग्य न वाटल्यावरून **मातृगुप्त** तेथून **काशीस** जाऊन सन्याशी झाला. तथापि **प्रवरसेना**नें मीं आपलें राज्य तुला दिलें असें जें म्हटलें तें खरें केलें. **मातृगुप्त काशीं**त १० वर्षेंपर्यंत जिवंत होता. तोंपर्यंत **प्रवरसेन काश्मीर**च्या राज्याचा वसूल दरसाल त्याला पाठवीत असे.

**मातृगुप्त** ब्रह्मीभूत झाल्यावर **प्रवरसेन काश्मीर**चा खरा राजा झाला. हा महान् धार्मिक, प्रतापि व विद्वान् असून पंडितांचा आश्रयदाता होता. यानें **सेतुबंध** नांवाचें काव्य बाळभाषेंत लिहिलें आहे. तें मुंबईंत **काव्यमाला** नांवाच्या मासिकपुस्तकांत छापिलें आहे. त्याच्या पदरीं **कालिदास** नांवाचा एक पंडित होता असा लेख आहे. प्रसिद्ध **कालिदास** तो हाच किंवा दुसरा हें

आमच्यानें खात्रीपूर्वक सांगवत नाहीं. तत्रापि वरील काव्य याच कवीनें केलें असेंही कांहीं विद्वानांचें मत आहे. तसेंच रघूंत ज्या देशाचें वर्णन दिलें आहे तो देश **काश्मीरच** असला पाहिजे, असें त्या काव्याचे टीकाकार **वल्लभ** व **सुमतिविजय** यांचें मत आहे त्याच प्रमाणें **कालिदास** व **बिल्हण** हे दोन कवि मात्र कुंकुमपुष्पांचें वर्णन देतात. यावरून **कालिदासाचें** जन्म **काश्मीरांतच** किंवा त्याच्या लगतच्या प्रदेशांत झालें असावें असें अनुमान होतें. **वितस्ता** नदीवर नौकांचा पूल बांधण्याची क्रृप्ति प्रथम त्याच्या वेळीं निघाली. यानें आपल्या नांवाचें एक शहर स्थापिलें. हा पुरा शैव होता तरी त्यानें अनेक विहार बांधून त्यांस अग्रहार करून दिले. याचा मातुल **जयेंद्र** यानें **जयेंद्र** व **बृहद्बुध** नांवाचे विहार बांधिले. पुढें **अश्वपाद** जो सिद्ध याची राजास खूण आल्यावरून तो राज्य सोडून देहानिशीं कैलासास गेला. यानें साठ वर्षे राज्य केलें. याच्या मागून **युधिष्ठिर** (दुसरा) व **नरेंद्रवत्** ( लक्ष्मण ) हे राजे झाले. **नरेंद्रवत्** हा विद्येचा मोठा चाहता असून त्यानें एक पुस्तकालय बांधिलें होतें. यांच्या मागून—

**रणादित्य** गादीवर बसला. हा **नरेंद्रादित्याचा** बंधु होय. याच्या कपाळावर शंख चिन्ह होतें. यास पूर्वजन्माची आठवण होती असा लेख आहे. हा मोठा प्रतापी होता. याच्या बायकोचें नांव **रणारंभा** ( भ्रामरीदेवी ) होतें. हा मागील जन्मीं मोठा द्यूत खेळणारा असून याच्याविषयीं त्या जन्मांतील

एक मोठी मौजेची गोष्ट वर्णिली आहे. ती अशी कीं, भ्रामरी देवी ( काळी ) च्या दर्शनास जावें असें त्याच्या मनांत आलें. देवीकडे जाण्याचा मार्ग कित्येक कोस दूर असून तो भ्रमरांनीं अगदीं व्यापून टाकिला होता. कोणी धाडस करून तिजकडे जाऊं लागल्यास ते भ्रमर त्यास चावून त्याचा प्राण घेत. **रणादित्य** यानें आंगावर चिलखत घालून त्याजवर रेड्याचें चर्म घेतलें आणि त्यावर शेण लिंपून तो तिजकडे जाऊं लागला, तेव्हां भ्रमरांनीं चावून चावून त्याचीं सर्व आच्छादनें तोडून टाकिलीं आणि त्यास अर्धमेला केला. तो तें सर्व दुःख सोसून अखेर देवीजवळ जाऊन तिजपुढें पडला. तेव्हां देवी प्रसन्न होऊन त्यास वर माग ह्मणाली. तिजपाशीं त्यानें संभोग मागितला. देवांत आणि मनुष्यांत ही गोष्ट कधींही होणार नाहीं, पाहिजे तो दुसरा वर माग असें ती म्हणाली. त्यानें तोच वर देण्याविषयीं आग्रह धरिला. तेव्हां पुढच्या जन्मीं मी तुझी बायको होईन, म्हणून तिनें सांगितलें. याच्या राणीचें नांव **रणारंभा** होतें. ती रात्रीं मायावी स्त्री पतिजवळ ठेवून आपण भ्रमर रूपानें उडून जात असे. या राजानें **प्रद्युम्न** पर्वतावर एक मठ बांधिला व गरीब आजारी लोकांकरितां एक दवाखाना स्थापिला. यानें **रामचंद्राप्रमाणें** राज्याचा ३०० वर्षें उपभोग घेतला असें **कल्हण** लिहितो. ही तर केवळ अतिशयोक्ति दिसते. पण **जनरल कनिंगहामच्या** मताप्रमाणें यानें ६९ वर्षें राज्य केलें. इतकीं वर्षें राज्य या देशांतील दुसऱ्या कोणत्याही राजानें उपभोगिलें नाहीं

असें म्हटलें असतां चालेल. याच्या मागून **विक्रमादित्य** गादीवर बसला. नंतर त्याचा बंधु—

**बालादित्य** गादीवर बसला. यानें **वंकाल** नांवाचें नगर जिंकून पूर्वसमुद्रापर्यंत जयस्तंभ उभे केले होते. यास तीन बंधु होते. त्यांनीं अनेक पूल बांधिले. **खड्ग**, **शत्रुघ्न** व **मालव** या नांवांचे याचे तीन मंत्री होते. याच्या बायकोचें नांव **बिंबा** होतें. तिनें **बिंबेश्वर** नांवाचें देवालय बांधिलें. **कर्कोट** नांवाच्या नागानें राणीशीं संभोग केला आणि त्याजपासून तिला कन्या झाली. तिचें नांव **अनंगलेखा** ठेविलें होतें. ही बत्तीस लक्षणी असून सौंदर्याची खाणी होती. ती शृंगारसमुद्रांत कौमुदी (चंद्रिका) होती. तिला पाहून एका ज्योतिषानें राजास असें सांगितलें कीं, हिचा पति पृथ्वीचें राज्य करील आणि **गोनर्द**चा वंश तुझ्या अखेर नाहींसा होईल. कन्येकडे किंवा तिच्या वंशाकडे राज्य जाऊं नये असा विचार करून राजानें तिचें लग्न **दुर्लभवर्धन** नांवाच्या एका मुलाशीं केलें आणि त्याचें नांव **प्रज्ञादित्य** ठेविलें. पण पुढें राजकन्येला तो पति आवडेनासा झाला. ती त्याजवर प्रेम न करितां, बापाचा **खड्ग** नांवाचा जो एक मंत्री होता, त्याजवर प्रेम करूं लागली. एके समयीं तीं दोघें एकमेकांस आलिंगन देऊन निद्राग्रस्त असलेलीं व संभोग दिल्याचीं चिन्हें त्यांच्या आंगांवर असलेलीं पतीच्या नजरेस आलीं. तेव्हां त्यांचा शिरच्छेद करावा असा विचार **प्रज्ञादित्या**चे मनांत आला, पण शांति, क्षमा व विवेक यांनीं त्यास आवरिलें. तुझीं उभयतां देहांत

शिक्षेस पात्र आहां, पण मी क्षमा करितों, असें त्यानें त्यांच्या कपड्यांवर लिहून ठेविलें आणि तो निघून गेला. जागृत झाल्यावर त्यांनीं तो लेख वाचिला आणि पुढें दोघांस फार पश्चात्ताप झाला. या राजानें ३७ वर्षें राज्य केलें. **गोनर्द** घराण्यांतील हा शेवटचा पुरुष होय. त्याच्या मागून **दुर्लभवर्धन** गादीवर बसला. हा **नाग** किंवा **कर्कोट** घराण्यांतील पहिला राजा. याच्या वेळीं म्हणजे इ० स० ६३० च्या सुमारास **चीन** देशाचा प्रसिद्ध प्रवासी **हूएनसंग** हा बौद्ध धर्माची माहिती करून घेण्याकरितां **काश्मीरांत** येऊन दोन वर्षें राहिला होता. तो आल्यावेळीं राजानें त्याचें आगतस्वागत करण्याकरितां आपल्या मातुलास त्याच्या सामोरें पाठविलें. पुढें तो राजाच्या भेटीस आला तेव्हां कचेरीस सर्व पंडित बोलाविले होते आणि त्या धर्माचीं सूत्रें तो उतरून घेऊं लागला तेव्हां राजानें त्यास वीस लेखक मदतीस दिले. **दुर्लभवर्धनानें** ३६ वर्षें राज्य केलें. नंतर—

**प्रतापादित्य** राजा झाला. यानें **प्रतापपूर** शहर स्थापिलें. तें इंद्राच्या **अमरावतीप्रमाणें** शोभिवंत होतें. एके दिवशीं हा राजा **नोण** नांवाच्या एका श्रीमंत वाण्याच्या घरीं गेला असतां त्याची अति रूपवति बायको पाहून तो कामातुर झाला आणि तिच्या प्राप्तीसाठीं झुरूं लागला. ही गोष्ट वाण्यास कळून त्यानें आपली बायको राजास अर्पण केली. तिजपासून **चंद्रापीड, तारापीड, मुक्तापीड** (ललितादित्य), **वज्रादित्य** व **दयादित्य** असे राजास पुत्र झाले. याच्या वेळीं **अरब** लोकांनीं याच्यावर स्वारी केली. तेव्हां

आपला त्यांच्यापुढें टिकाव लागत नाहीं, असें पाहून त्यानें **शालिवाहन** शकाच्या ७३९वें वर्षीं **चीन**च्या बादशहाची मदत मागितली व पुढें ७४२वें वर्षीं बादशहानें **चंद्रापीड** यास राजा असा किताब दिला, असें **चीन**च्या इतिहासावरून दिसतें. पण ही मदत त्याचा पुत्र **चंद्रापीड** यानें मागितली असें **फ्रेंच** विद्वान् **एम्. रिमसा** याचें मत आहे. यानें ९० वर्षें राज्य केलें. याच्या कारकीर्दीचें बरेंच वर्णन दिलें आहे. याच्या मागून याचा वडील पुत्र—

**चंद्रापीड** ( चंद्रानंद ) गादीवर बसला. हा **कार्तवीर्या**सारखा मोठा पराक्रमी व धार्मिक होता. एक विद्वान् ब्राह्मण निजला असतां आपोआप मरण पावला. तेव्हां त्याची बायको राजाकडे जाऊन ह्मणाली कीं, हा अन्याय तुझ्या राज्यांत कसा झाला व माझ्या नवऱ्यास कोणी मारिलें याचा पत्ता तूं न लावशील तर मी उपोषणें करून प्राण देईन. राजानें गुन्हेगाराचा तपास करण्यास पुष्कळ यत्न केला, पण कांहीं शोध लागेना. तेव्हां तो लागेपर्यंत अन्न ग्रहण करावयाचें नाहीं, असा निश्चय करून राजा उपोषणें करीत एका देवालयांत बसला. तेव्हां देवता प्रसन्न होऊन तिनें गुन्हेगाराचा शोध लावण्याची युक्ति सांगितली आणि त्याप्रमाणें शोध लागला. हा राज्य करीत असतां त्याचे प्रधान देवालय बांधण्यास जागा पाहिजे ह्मणून जबरदस्तीनें एका चांभाराचें घर घेऊं लागले, तेव्हां तो राजाकडे फिर्यादीस गेला. राजानें तो ह्मणेल तितका पैसा देऊन त्याचें घर घ्यावें म्हणून आज्ञा केली. याच्या राणीचें नांव **प्रकाशदेवी** होतें. हिनें एक विहार तयार

केला. याचा गुरु **मिहिरदत्त** यानें **गंभीरस्वामी** नांवाचें देवालय बांधिलें. हा राजा अभिचारानें (जारण-मारणविद्या) मरण पावला. नंतर याचा बंधु **तारापीड** हा गादीवर बसला. हा मोठा क्रूर व दुष्ट होता. यानें ब्राह्मणांचा फार छळ केला. याच्या मागून सर्वांत लहान बंधु—

**ललितादित्य** (मुक्तापीड) गादीवर बसला. याच्या पराक्रमाचें, धार्मिकपणाचें व दुसऱ्या गोष्टींचें पुष्कळ वर्णन दिलें आहे. त्यांतील थोडासा उतारा येथें देतों. हा मोठा धर्माभिमानी होता. यानें **गौड** देशाचा राजा जो **यशोवर्मा** यास जिंकिलें आणि त्याचें राज्य मोडून त्याच्या पांच जहागिरी करून त्या आपल्या सरदारांस दिल्या. प्रसिद्ध कवि **वाक्पति** व **भवभूति** हे या **यशोवर्म्याच्या** पदरीं होते. पहिल्यानें आपल्या राजाचें चरित्र (गौडवध) नांवाचा ग्रंथ प्राकृत भाषेंत लिहिला आहे. तो रा० ब० **शंकर पांडुरंग पंडित** यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांत **भवभूति** हा **वाक्पतीचा** शिष्य असावा असें ते ह्मणतात. **ललितादित्याच्या** सैन्यांत **कलिंग** देशांतील हत्ती पुष्कळ होते. त्यानें **कर्नाटक** देश जिंकला, तेव्हां **रट्टा** नांवाची राणी तेथें राज्य करीत होती. यानें **मगध**, **जालंदर** व **लाहोर** हे देश काबीज केले आणि तेथें आपल्या अनुजीवी लोकांस राजे नेमिले. त्यानें दक्षिणेस **मलबार** व उत्तरेस **तिबेट** व **बुखारा** यांजवर स्वाऱ्या केल्या होत्या. याप्रमाणें त्यानें आपलें सर्व आयुष्य स्वाऱ्या करून देश जिंकण्यांत घालविलें. **कमलावति**,

**इशानदेवी** व **चक्रमर्दिका** नांवांच्या ह्याच्या तीन राण्या होत्या. **शक्तिस्वामी** म्हणून याचा एक मंत्री होता. तो **अभिनंद** कवीचा मूळ पुरुष होय. **अभिनंद** हा अनुष्टुप्वृत्त उत्तम लिहीत असे. यानें कादंबरीकथासार नांवाचा ग्रंथ याच वृत्तांत लिहिला आहे. याच नांवाचा दुसरा एक कवि इ० स० ७८० च्या सुमारास होता. याच्या बापाचें नांव **शतानंद** होतें. त्यानें **राम**चरित्रकाव्य लिहिलें आहे. **चंकुण** नांवाचा दुसरा एक मंत्री राजानें बाहेरच्या देशांतून आणविला होता. त्याजपाशीं दोन मणी होते. त्यांतील एकाच्या योगानें नदीचा प्रवाह दुभागत असे आणि दुसऱ्यानें तो सांधत असे. ते मणी राजानें मागितले असतां त्यांच्या बदली **मगध** देशांतून जी बुद्धाची मूर्ति अंबारींतून राजानें आणिली होती ती मंत्र्यानें मागितली. तेव्हां ती देऊन राजानें ते मणी त्याजपासून घेतले. मंत्र्यानें ती मूर्ति नेऊन विहारांत स्थापिली. **ललितादित्य** पूर्वजन्मीं परम धार्मिक होता, त्यामुळें देवसुद्धां त्याचा हुकूम मानीत असत व **इंद्रानें** त्याच्या इच्छेवरून त्यास एके वेळीं कवठाची भेट पाठविली होती असें **कल्हण** लिहितो. अशा प्रकारचे लेख कविसंप्रदायास अनुसरून स्थलविशेषीं लिहिले असावे असें म्हणणें भाग पडतें. असो. एके प्रसंगीं हा राजा **मारवाड** देशावर स्वारी करण्यास गेला असतां तेथील मंत्र्यानें जवळचा मार्ग दाखवितों म्हणून फसवून त्यास वालुकामय प्रदेशांत नेलें. तेथें त्याचें सैन्य तृषाक्रांत होऊन मरूं लागलें. तेव्हां राजानें भाल्यानें त्या वाळवंटांत झरे काढिले. ते

अद्यापि आहेत असें **कल्हण** लिहितो. **मार्तंड** या गांवाची व याच नांवाच्या तेथील देवालयाची स्थापना यानेंच केली असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. यास **कुवलयादित्य** व **वज्रादित्य** असे दोन पुत्र होते. यानें इ० स० ६९३ पासून ७२९ पर्यंत राज्य केलें. याच्या मागून **कुवलयादित्य, वज्रादित्य, पृथिव्यापीडव** व **संग्रामपीड** हे अनुक्रमें राजे झाले. पण यांच्या कारकीर्दींत विशेष स्वारस्याच्या गोष्टी वर्णिलेल्या नाहींत. यांच्या नंतर **ललितादित्या**चा नातू—

**जयापीड** गादीवर बसला. तो आपल्या आजाप्रमाणें प्रतापी व शूर होता. त्याच्याजवळ ८० हजार लढाऊ रथ होते. तो आपलें सैन्य बरोबर घेऊन दिग्विजय करण्यास निघाला. तेव्हां मागें त्याचा मेहुणा **जज्ज** यानें त्याचें राज्य बळकाविलें. हें वर्तमान ऐकून त्याचे कांहीं मंत्री व सैनिक राजास सोडून देऊन **जज्जा**कडेस परत जाण्यास निघाले, तरी तो अगदीं न डगमगतां देश जिंकण्यास तसाच पुढें गेला. त्यानें **प्रयागांत** लक्षास एक कमी इतके घोडे दान दिले आणि जो कोणी मजपेक्षां एक घोडा जास्त देईल तो माझें नांव मागें पाडील, असा लेख तेथें करून ठेवून पुढें **गौड** देशांत **पौंड्रवर्धन** नांवाचे शहरीं गेला. तेथें एका देवालयांत **कमला** नांवाच्या एका कलावंतिणीचा नाच व गाणें चालू होतें. त्या स्थलीं राजा जाऊन बसला. तेथें त्यानें तांबुलाकरितां नेहमीच्या संवयीप्रमाणें हात मागें केला. तें पाहून हा कोणी मोठा राजा आहे असें त्या कलावंतिणीनें ओळखिलें. पुढें नाच आटपल्यावर

ती आर्जव करून राजास आपल्या घरीं राहावयास घेऊन गेली. याच वेळीं शेजारच्या अरण्यांतून एक सिंह त्या शहरांत येऊन माणसें खात असे. एके दिवशीं **जयापीड** बाहेर गेला असून त्यास परत येण्यास फार उशीर लागला. तेव्हां त्यास सिंहानें खाल्लें कीं काय, अशी शंका येऊन ती कलावंतीण मोठ्या चिंतेंत पडून दुःख करूं लागली. तों **जयापीड** परत आला आणि त्यास सिंहाचें वर्तमान समजलें. तेव्हां तो रात्रीं हातांत एक तलवार घेऊन बाहेर पडला आणि त्यानें तो सिंह ठार मारिला. हें वर्तमान तेथील राजा **जयंत** यास समजलें आणि त्यास फार आनंद झाला. पुढें **जयंतानें** सिंह मारणाऱ्याचा शोध करून त्यास आणिलें आणि आपली कन्या **कल्याणी** व राज्य हीं त्यास दिलीं.

नंतर **जयापीडानें पंचगौड** देशावर स्वारी करून तेथील राजास जिंकिलें. पुढें पूर्व देशाचा राजा जो **भीम** याच्या येथें तो ब्रह्मचाऱ्याचें सोंग घेऊन गेला. तेथें **सिंधु** नांवाचा **जज्जाचा** भाऊ होता. त्यानें त्यास ओळखून **भीम** राजास सांगितलें आणि त्यास अटकेंत टाकविलें. तेव्हां कांहीं युक्ति करून तो तेथून सुटला आणि त्यानें **भीमाचें** राज्य घेतलें. नंतर **जयापीडानें नेपाळ** देशावर स्वारी केली. त्या वेळीं तेथें **अरमुडी** नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें याच्या सैन्याचा नाश करून **जयापीडास** प्रतिबंधांत ठेविलें. या प्रसंगीं त्याचा मोठा विश्वासूक व इमानी एक मंत्री बरोबर होता. त्यानें आपले प्राण खर्च करून राजास सोडविलें. तेथून

**जयापीड गंडकी**च्या पलीकडे जाऊन आपल्या सैन्यास मिळाला आणि पुनः **नेपाळा**वर स्वारी करून तो देश त्यानें जिंकिला. याप्रमाणें स्वाऱ्या करून तो स्वदेशीं परतला. त्यानें पूर्वी **कनोज**चें राज्य जिंकिलें होतें. तेथील सिंहासन, **जयंत** राजाची कन्या **कल्याणी** व कलावंतीण **कमला** हीं बरोबर आणिलीं. स्वदेशीं परत आल्यावर **जज्जा**बरोबर लढाई करून तीन वर्षांनीं त्यानें आपलें राज्य परत मिळविलें. ज्या स्थलीं वरील लढाईत जय मिळविला तेथें आपल्या राणीच्या नांवानें **कल्याणपूर** त्यानें वसविलें. यानें **यादवांच्या द्वारावती**प्रमाणें सुंदर **बहिरकूट** नांवाचें दुसरें एक शहर वसविलें. याच्या गुरूचें नांव **क्षीर** होतें. याजपाशीं **दामोदरगुप्त, मनोरथ, वामन, शंखदत्त, संधिमान्** इत्यादि अनेक मंत्री होते. हे मोठे पंडित होते. **काशिकावृत्ति** ( व्याकरणावरील ग्रंथ ) हिचा आरंभ राजानें केला व **वामन** पंडितानें ती शेवटास नेली. **दामोदरगुप्त** यानें कुट्टिणीमत नांवाचा ग्रंथ केलेला प्रसिद्ध आहे. याच्या पदरीं जे पंडित होते त्यांत **उद्भट** हा मुख्य होता. यानें अलंकार शास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे. राजा या पंडितास दररोज एक लक्ष दिनार* देत असे असें **कल्हण** लिहितो. ही तर केवळ अतिशयोक्ति दिसते. पण तो विद्वानांचा मोठा आश्रयदाता होता एवढीच गोष्ट याजपासून घेण्याची आहे. असो. हा राजा अखेरीस कायस्थ लोकांच्या संगतीस लागून त्यानें ब्राह्मणांस दिलेले अग्रहार काढून घेतले आणि त्यांचा छल करूं

---

* दीनार = दहा माशांचें सोन्याचें नाणें.

लागला. तेव्हां ते फार पीडित होऊन त्यांनीं त्यास शाप दिला. त्याच्या योगानें वरील छताचा सुवर्णदंड त्याच्या मस्तकावर पडून राजा मरण पावला. त्याची माता **अमृतप्रभा** हिनें पुत्राचा उद्धार व्हावा ह्मणून **अमृतकेशव** नांवाचें देवालय बांधिलें. यानें ३१ वर्षें राज्य केलें. पुढें **ललितापीड, संग्रामपीड, बृहस्पति, अजितापीड, अनंगापीड** व **उत्पलापीड** हे अनुक्रमें गादीवर बसले. **बृहस्पती**पासून पुढचा कथाभाग विशेष विश्वसनीय आहे. **अजितापीडा**च्या वेळीं **शंकुक** नांवाचा एक कवि प्रसिद्धीस आला होता. याच्या कांहीं कविता मिळतात. या सर्व राजांनीं मिळून अजमासें ७० वर्षें राज्य केलें. या कालांत सर्व राज्यभर घोंटाळा व बखेडे चालू होते. **उत्पलापीड** हा **कर्कोट** घराण्यांतील शेवटचा राजा होय. या घराण्यांत १७ राजे झाले व त्यांनीं सुमारें २६० वर्षें राज्य केलें. हे राजे बौद्ध धर्माचे विशेष अभिमानी नव्हते. यांच्या मागून—

**अवंतिवर्मा** राजा झाला. **उत्पलाक्ष** घराण्यांतील हा पहिला. याचेंच नांव **आदित्यवर्मा** होतें. याचा राज्याभिषेक शा० शकाच्या ८७७ वे वर्षीं झाला. तेव्हां **काश्मीरां**तील शकाचें १३१ वें वर्ष होतें. यावरून तें मान शालिवाहन शकाच्या ७४६ त सुरू झालें असावें. या राजास मंत्री फार उत्तम मिळाला असल्यामुळें तो सर्व राज्यकारभार त्याच्या सल्ल्यानें करी. हा राजा मोठा धार्मिक व न्यायी होता. त्यानें युवराज असतां **अवंतिस्वामी** व राज्यपद मिळाल्यावर

**अवंतीश्वर** या नांवांचीं देवालयें बांधल्याचें पूर्वी सांगि-तलेंच आहे. त्यानें आपल्या राज्याचे विभाग करून आपल्या बंधूंस देऊन त्यांस प्रतिराजे बनविले. **शूरवर्मा** नांवाचा याचा सापत्न बंधु होता. त्यास यानें युवराज नेमिलें. हा विद्येचा मोठा चहाता होता. यामुळें याच्या आश्रयास मोठमोठाले पंडित होते. त्यांत **मुक्ताकण, शिवस्वामी, आनंदवर्धन, रत्नाकर** हे मुख्य होत. यांतील तिसरा व चवथा **राजशेखर** कवीस माहीत होते. **आनंदवर्धन** यानें ध्वन्यालोक, काव्यालोक व देवीशतक हे ग्रंथ केले. त्यानें **कालिदास, बाण, भटोद्भट, सत्यवाहन** या कवींचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला असून **माघ** कवीच्या कांहीं कविता घेतल्या आहेत. **रत्नाकर** यानें केलेला हरिविजय ग्रंथ उपलब्ध आहे. त्याचे वंशज **काश्मीरांत** अद्यापि आहेत ह्मणून समजतें. असो. **अवंतिवर्मा** हा शौर्याच्या कामांत **ललितादित्या-**सारखा मोठा प्रसिद्ध होता. यानें **गुजराथ** व **त्रिगर्त** हीं राज्यें जिंकून तीं तेथील राजपुत्रांस दिलीं. **गुजरा-**थच्या राजानें **टक्क** हा देश **अवंतिवर्म्यास** दिला.

**अवंतिवर्मा** हा राज्य करीत असतां **सुय्य** नांवाचा एक मोठा साधु व पंडित प्रसिद्धीस आला. तो अगदीं तान्हें बाळ असतां **सुय्या** नांवाच्या एका झाडू-वालीस एका मडक्यांत ती रस्ते झाडीत असतां सांपडला. तिनें यास वाढविलें. हा विलक्षण बुद्धिमान् होता. तो जाणतेपणीं एकाचे घरीं पंतोजीपणा करीत असे. तो असें बोलून दाखवूं लागला कीं, आपणाजवळ बुद्धि आहे पण द्रव्य नाहीं, तें असतें तर आपण हा देश

संपन्न करून दुसरीं महान् कामें केलीं असतीं. हें त्याचें भाषण ऐकून लोक त्यास वेडा समजून कांहींतरी बडबडतो असें ह्मणूं लागले. पुढें ही गोष्ट राजाच्या कानावर जाऊन त्यानें त्यास पाहिजे तेवढें द्रव्य दिलें. तें घेऊन त्यानें **वितस्ता** नदींत टाकिलें. ती नदी मोठ्या शिलांनीं भरलेली होती. गरीब लोकांनीं तें द्रव्य मिळविण्याकरितां तींतील सर्व शिला व दगड बाहेर काढिले. यामुळें तिचा प्रवाह चांगला चालू लागून तिच्या तीरचा प्रदेश पाण्यानें बुडालेला असे तो मोकळा होऊन तेथें पिकाऊ जमीन तयार झाली. तेव्हां देशांत पीक अधिक उत्पन्न होऊन पूर्वीं एका खारीस* जेथें २०० दीनार पडत, तेथें आतां ३६ पडूं लागले. हें नाणें कोणी **रोमन्** व कोणी **अरबी** होतें असें ह्मणतात. याप्रमाणें त्यानें देश संपन्न केला. **वितस्ता** व **सिंधु** या नद्यांचा संगमही यानेंच केला. याची उपमाता जी चांडाळीण हिच्या नांवें त्यानें एक गांव वसविला व एक सेतु बांधिला. वराह अवतारीं भगवंतानें समुद्रांतून पृथ्वी वर काढिली, **परशुरामानें** ती ब्राह्मणांस दान दिली, **रामावतारीं** समुद्रावर सेतु बांधिला व **कृष्णावतारीं कालिया** सर्पाला पाण्यांतून वर काढून **यमुना** निर्दोष केली; हीं चार अवतारीं केलेलीं कामें **सुय्य** यानें एकट्यानेंच केलीं. असा तो महात्मा होता. **कल्लट** नांवाचा दुसरा एक साधु त्या वेळीं प्रसिद्धीस आला. याप्रकारें **अवंतिवर्मा** यानें **मांधात्या**-प्रमाणें २७ वर्षें राज्य केलें. याच्या मागून याचा पुत्र—

* खारी = दीड मण.

**शंकरवर्मा** गादीवर बसला. **सुखवर्मा** नांवाचा एक राजपुत्र होता. त्यास यानें युवराज नेमिलें. पुढें कांहीं दिवसांनीं राजा आणि युवराज यांजमध्यें मोठा कलह उत्पन्न होऊन राज्यांत चोहोंकडे फार बखेडा माजला. तेव्हां त्यानें युवराज, त्याचे अनुयायी व दुसेरे भाऊबंध यांस जिंकिलें व **सिंधु** नदीवरील देश काबीज केला. यानें राज्यांत पुनः वैदिक धर्म चालू केला आणि देवांस व ब्राह्मणांस अग्रहार करून दिले. यानें आपल्या नांवाचें एक व **सुगंधा** नांवाची त्याची पत्नि होती तिच्या नांवाचें एक अशीं दोन देवालयें बांधिलीं. पुढें तो अत्यंत लोभी होऊन दिलेल्या देणग्या परत घेऊं लागला व गांवकऱ्यांस ( वतनदारांस ) दंड करून पैसा जमवूं लागला. त्यानें आपली तुला करून तिच्यांतील तीनचतुर्थांश द्रव्य ठेवून घेतलें आणि एकचतुर्थांश ब्राह्मणांस वाटलें. पुढें राजा कायस्थ लोकांवर विशेष प्रेम करूं लागला आणि विद्वान् ब्राह्मणांचा अनादर करून प्रजेस फार पीडा देऊं लागला. याच्या वेळीं **भल्लट** ह्मणून एक मोठा पंडित होता. पण राजा गुणग्राही नसल्यामुळें हा पंडित दरिद्रावस्थेंत होता. यानें भल्लटशतक नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. हा राज्य करीत असतां एक मोठा दुष्काळ पडला. तेव्हां प्रजेचे अत्यंत हाल झाले. **गोपाळवर्मा** नांवाचा त्याचा दुसरा पुत्र होता, त्यास राजानें एक वर दिला होता. या वेळीं पित्यानें प्रजेस पीडा देऊं नये ह्मणून बापापाशीं त्यानें तो वर मागितला. तेव्हां राजास हासूं येऊन तो पुत्रास ह्मणाला, तूं मजपेक्षां अधिक पीडा देऊं नको

ह्मणजे झालें. अखेरीस राजाच्या छलानें ब्राह्मण अति त्रस्त होऊन संतापले आणि त्यांनीं त्यास शाप दिले. त्यांच्या योगानें त्याचे पुष्कळ पुत्र मेले. शेवटीं एका चांडाळानें राजावर बाण सोडिला. तो त्याच्या गळ्यांतून गेल्यामुळें तो प्राणास मुकला. त्याजबरोबर त्याच्या तीन राण्या सति गेल्या. याच्या वर्णनांत शालीचा उल्लेख आला आहे. यावरून त्या कालीं त्या देशांत त्या तयार होत होत्या असें अनुमान सहजच करितां येतें. याच्यामागून **गोपाळवर्मा** व **संकट** हे अनुक्रमें गादीवर बसले. **संकट** हा या घराण्यांतील शेवटचा पुरुष झाला. याच्यामागून **शंकरवर्म्या**ची बायको जी **सुगंधा** राणी हिनें दोन वर्षें राज्याचा उपभोग केला. नंतर **पार्थ** व **निर्जितवर्मा** हे राजे होऊन पुढें—

**चक्रवर्मा** गादीवर बसला. तो मोठा उन्मत्त व दुराचारी होता. त्यास जार व जारिणी फार आवडूं लागल्या. एके दिवशीं एक डोंब तमाशेवाला आला. त्यास **हंसी** व **नागलता** नांवांच्या दोन मुली होत्या. त्यांचा तमाशा झाला. त्या मोठ्या देखण्या, गाणाऱ्या व नाचणाऱ्या होत्या. त्यांस पाहून राजा व दुसरे सभासद कामातुर होऊन अगदीं मोहित झाले. राजानें विचार केला कीं, त्यांच्या नेत्रकटाक्षांनीं व आवाजांनीं आह्मांस स्पर्श करावा तर त्यांच्या शरीरांनींच काय दोष केला आहे! पुढें राजा दररोज त्यांचा तमाशा पाहूं लागला आणि त्या दोघीशिवाय त्यास चैन पडेनासें झालें. पुढें राजानें त्यांच्याशीं संग केला आणि **हंसी** मुख्य राणी केली तेव्हां तिच्या उच्छिष्टास राजानें लोकांस

सोमपानासारखें मानण्यास लाविलें. पुढें चांडाळणीशीं संग केल्याबद्दल राजास पश्चात्ताप झाला. तेव्हां या पापाच्या क्षालनार्थ त्यानें एक अति पवित्र ब्राह्मण स्त्रीशीं संग केला. याच्या वेळीं ब्राह्मण इतके नीच झाले कीं, त्यांनीं राजास बायका देऊन इनामें मिळविलीं. एके दिवशीं राजा **हंसीस** घेऊन निजला असतां त्यास तिच्यासह डोंबांनीं बिछान्यावर ठार मारिलें. हा तीन वेळ राज्यभ्रष्ट होऊन पुनः गादीवर बसला होता. याच्या नंतर **शूरवर्मा**, पुनः **पार्थ, शंकरवर्धन, उन्मत्तिवर्मा** व पुनः **शूरवर्मा** हे अनुक्रमें गादीवर बसले. यांच्या मागून—

**यशस्कर** यास लोकांनीं गादीवर बसविलें. हा राजा मोठा धार्मिक, नीतिमान् व गुणग्राही होता. याच्या वेळीं एक ब्राह्मण कर्जानें पीडित झाला असतां बायकोच्या निर्वाहार्थ एक मळा ठेवून बाकीची सर्व मालमत्ता त्यानें मळारहित करून सावकारास दिली आणि आपण पैसा मिळविण्यास परदेशीं गेला. इकडे सावकारानें रहित शब्दाचा सहित करून तो बाग त्या ब्राह्मणीपासून काढून घेतला. तेव्हां ती एकाच्या घरीं चाकरीस राहिली. पुढें बराच काळ गेल्यावर तो ब्राह्मण कांहीं पैसा मिळवून स्वदेशीं परत आला आणि पहातो तों आपली बाग सावकारानें घेतली व बायको लोकांच्या घरीं चाकरी करीत असून कृश झाली होती. तेव्हां त्यानें सावकारावर फिर्याद केली. राजानें सावकारास कचेरींत आणविलें आणि कचेरींत लोकांच्या व सावकाराच्या हातांतील आंगठ्या पाहण्यास म्हणून मागून

घेतल्या. पुढें कांहीं निमित्त करून बाहेर येऊन राजानें सावकाराची आंगठी खूण ह्मणून आपल्या चाकराबरोबर सावकाराच्या मुनिमाकडे पाठवून त्याच्या वह्या आणविल्या आणि त्या तपासल्या. तेव्हां सावकारानें केलेली लबाडी उघडकीस आली. पुढें ती बाग राजानें ब्राह्मणास देऊन सावकारास मोठा दंड केला. याप्रमाणें हा राजा प्रथम मोठा न्यायमार्गानें चालत होता पण पुढें याची चाल बिघडली. त्यास डोंब लोक प्रिय वाटूं लागले. **लल्ला** नांवाची एक वेश्या होती, तिला राजानें आपली पट्टराणी केली. ती अति रूपवति होती राजा जरी तिजविषयीं इतका फिदा होता तरी ती एका चांडाळाबरोबर जात असे. त्या चांडाळानें तिच्या द्वारें राजाची बायको उपभोगास मिळविली. **हाड्डी** नांवाचा एक अधिकारी होता, त्यानें यांच्या खाणाखुणांवरून त्यांचें एककूट असल्याचें ओळखिलें. पुढें हें वर्तमान राजास कळून त्यास अति वाईट वाटलें. तेव्हां त्यानें आपलें बहुतेक राज्य ब्राह्मणांस अग्रहार रूपानें देऊन तो बैरागी होऊन गेला. यानें आर्य देशाच्या विद्यार्थ्यांस एक मठ बांधून दिला. अखेर हा राजा उदर होऊन इंद्राच्या भेटीस गेला. याच्या मागून **संग्रामदेव, पर्वगुप्त, क्षेमगुप्त, अभिमन्यु, नंदिगुप्त, त्रिभूवन, भीमगुप्त, दिद्दाराणी, संग्रामदेव** याचा पुत्र **हरिराज** हे अनुक्रमें गादीवर बसले. **संग्रामदेव** राजा झाला, पण थोड्याच काळांत **पर्वगुप्तानें** त्यास ठार मारून राज्य आपण बळकाविलें. त्या वेळीं त्याची राणी **त्रैलोक्यदेवी** सति गेली. **क्षेमगुप्ताची** राणी

**दिद्दा** ही **लाहोरच्या सिंह** राजाची कन्या होती. **पर्वगुप्त** व **क्षेमगुप्त** हे अति वाईट राजे झाले. त्यांनीं जीं दुष्ट कृत्यें केलीं त्यांचें **कल्हणानें** तिरस्कारबुद्धीनें वर्णन दिलें आहे. **पर्वगुप्ता**चाही अंत वरील राजाप्रमाणें होऊन **क्षेमगुप्त** राजा झाला. यानें बौद्धांच्या अनेक विहारांचा नाश केला. त्याची राणी **दिद्दा** ही भर्त्याप्रमाणें मोठी दुष्ट व दुराचरिणी होती. तिचा नातू जो **नंदिगुप्त** यास ठार मारून तिनें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला.

प्रसिद्ध पंडित जो **कैय्यट** तो वर सांगितलेल्या **भीमगुप्ता**च्या वेळीं होता. या पंडिताविषयीं एक आख्यायिका ऐकण्यांत आली ती येथें देतों. तो **पांपूर** येथें राहणारा असून फार दरिद्री होता. त्यानें व्याकरण महाभाष्याचा अभ्यास इतका उत्तम केला होता कीं, जीं स्थलें मोठ्या वैय्याकरण्यास कठीण वाटलीं होतीं, तीं यानें सोप्या रीतीनें लावून दाखविलीं आहेत. एके वेळीं **कृष्णंभट्ट** नांवाचा एक दाक्षिणात्य पंडित **काश्मीरां**त गेला होता तो याच्या भेटीस गेला. तेव्हां **कैय्यट** घरांतील कांहीं काम करीत असून हातांत पुस्तक घेतल्यावांचून भाष्यांतील मोठे बिकट भाग छात्रवर्गास पढवीत होता. ही त्याची अलौकिक विद्वत्ता व दरिद्रावस्था पाहून **कृष्णंभट्टास** मोठा विस्मय वाटला. पुढें तो तेथील राजाकडे गेला आणि त्याजकडून एक गांव व कांहीं धान्य यांच्या नेमणुकीची सनद मिळवून ती **कैय्यटास** आणून देऊं लागला. पण प्रतिग्रह निषेध धरिला असल्यामुळें त्यानें ती घेण्याचें नाकारिलें. पुढें

**कैय्यट काशी** क्षेत्रीं गेला आणि तेथें सभेंत त्यानें अनेक पंडित जिंकिले. भाष्यप्रदीप नांवाचा ग्रंथ त्यानें या क्षेत्रीं असतेवेळीं लिहिला. तसेंच **श्रीहर्ष** कवीनें नैषध काव्य लिहून तें त्याचा मातुल **मम्मट** यास दाखविलें. तेव्हां मातुलानें त्या काव्याच्या गुणदोषाविषयीं त्यास जें उत्तर दिलें ती आख्यायिका विद्वज्जनांस माहितच आहे. **कैय्यट, मम्मट, उब्बट** व **जय्यट** हे महान् पंडित **चंद्रादित्य** नांवाच्या पंडिताचे पुत्र होते असें कोणी ह्मणतात. तसेंच "**कैय्यटो जय्यटात्मजः**" हें वाक्यही ऐकण्यांत येतें पण या सर्वांस कांहीं आधार मिळत नाहीं. येथें थोडेसें विषयांतर झालें. करितां आतां मुख्य वर्णनाकडे वळूं. **हरिराजा** नंतर—

**अंनतदेव** यास त्याचा मातुल **सागर** व दुसरे मंत्री यांनीं तो लहान असतां गादीवर बसविलें. पुढें तो प्रौढ झाल्यावर मोठा प्रतापी, गुणग्राही व धार्मिक निघाला. त्यानें **जालंदर**चा राजा **इंदुचंद्र** याच्या कन्या **सूर्यवती** व **इंदुमुखी** यांस आपल्या बायका केल्या. पहिलीवर त्याचें विशेष प्रेम होतें. त्यानें **साकस** व **दरद** लोकांबरोबर युद्ध करून जय मिळविला आणि **चंपा, दारवाभिसार** व **त्रिगर्त** या देशांवर आपला अंमल बसविला. याचें **त्रिभुवनकंपनाधिपती**शीं युद्ध झालें. त्यांत त्यास पुष्कळ जखमा लागल्या. तरी अखेरीस त्यानें **त्रिभुवना**चा पराभव केला. त्यानें इतके वीर मारिले कीं, त्यांच्या रक्तानें त्याच्या हातांतील तलवार चिकटली ती मोठ्या युक्तीनें काढावी लागली. याचा मेहुणा **क्षितिपति** ( **सूर्यव-**

तीचा भाऊ) हा **भोज** राजाप्रमाणें कवींचा मोठा आश्रयदाता असून योद्धा होता. **अनंत** राजानें **विजय** क्षेत्रांत अग्रहार करून दिले. तसेंच त्याची राणी **सूर्यवति** हिनें आपल्या नांवाचें एक विद्यालय व एक शिवालय बांधिलें. या राजाच्या पदरीं **क्षेमेंद्र, सोमदेव** व दुसरे जाडे पंडित होते. **क्षेमेंद्राच्या** पित्याचें नांव **प्रकाशेंद्र** होतें. त्यानें अलंकार शास्त्राचा अभ्यास **अभिनवगुप्ताचार्य** याजपाशीं केला होता. **क्षेमेंद्रानें** अलंकार व दुसरीं शास्त्रें यांजवर इतके ग्रंथ लिहिले आहेत कीं, त्यांवरून त्यास **व्यासाचा** अवतार ह्मणूं लागले. पण त्यानें शालीनतेनें **व्यासदास** असें नांव घेतलें. त्यानें केलेले अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांत बौद्धावदानकल्पलता, कलाविलास, समयमातृका, दशावतारचरित्र, शशिवंशमहाकाव्य, भारतमंजरी व चित्रभारत नाटक इत्यादि प्रसिद्ध आहेत. **सोमदेवभट्टानें** कथासरित्सागर ग्रंथ राणी **सूर्यवतीच्या** आज्ञेनें लिहिला; ह्या ग्रंथाला आधार बृहत्कथा. याचा कर्ता **गुणाढ्य** पंडित होय. तो शककर्ता ( सातवाहन ) **शालिवाहन** याचा मंत्री होता. त्यानें पिशाच भाषेंत सात लक्ष ग्रंथ लिहून त्यास बृहत्कथा असें नांव दिलें होतें. पण त्यांपैकीं सहा लक्ष ग्रंथ त्यानेंच जाळून टाकिला. अशा अमोल्य वस्तूचा नाश करण्यास त्यास कारण काय झालें, त्याची सुरस कथा पंडित **वामन शास्त्री इसलामपूरकर** यांनीं आपल्या बृहत्कथासागर ग्रंथाच्या पहिल्या भागांत दिली आहे. बाकी राहिलेल्या एक लक्ष ग्रंथाचा **क्षेमेंद्रानें** राजाच्या सांगण्यावरून सारांश घेऊन संस्कृतांत बृहत्कथामंजरी

नांवाचा ग्रंथ तयार केला पण त्याची भाषा कठीण असून तो संक्षेपरूपानें लिहिला असल्यामुळें लोकांच्या पसंतीस उतरला नाहीं. तेव्हां राणीच्या सांगण्यावरून **सोमदेवानें क्षेमेंद्राप्रमाणें** सोप्या भाषेंत लिहून त्यास कथासरित्सागर हें नांव दिल्याचें वर सांगितलेंच आहे. **कलश** नांवाचा या राजाचा पुत्र असून तो मोठा दुर्गुणी होता तरी राणीचा फार लाडका होता. तिनें त्यास राज्यावर बसविण्यास राजाचें मन वळविलें. पण या कामीं त्याचे मंत्री **हलधर** व **रणादित्य** हे प्रतिकूळ असल्यामुळें त्यांनीं ह्या कृत्याचा पश्चात्ताप करावा लागेल ह्मणून राजास सांगितलें. तथापि राणीच्या आग्रहामुळें आपल्या राज्यकारकीर्दीच्या बेविसावे वर्षीं राजानें—

**कलश** यास गादीवर बसविलें. राजा **कलश चंद्रापीडा**प्रमाणें मोठा शूर असून त्यानें परराज्यांवर अनेक स्वाऱ्या करून त्यांत जय मिळविले. पण क्षमा, नीति, पितृभक्ति इत्यादि गुणांचा त्याच्या अंगीं अभाव होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. राज्यपद प्राप्त होतांच प्रथम त्यास आडवे येणाऱ्या दोन्ही मंत्र्यांचा त्यानें नाश केला. स्त्रियांच्या संबंधानें व दुसऱ्या गोष्टींत तो इतका गैर रीतीनें वागूं लागला कीं, त्याचें वर्णन आमच्यानें करवत नाहीं. पुत्राचें हें दुराचरण पाहून राजा **अनंतदेव** फार खेद करूं लागला. इकडे सुनांचा उत्कर्ष व उर्मटपणा पाहून राणी **सूर्यवती**सही फार वाईट वाटूं लागलें. पुढें पितापुत्रांत मोठें वैमनस्य पडून दोघांत लढाई होण्याचा प्रसंग आला होता. पण तो राणीच्या मध्यस्थीनें कांहीं काळ टाळला गेला.

नंतर **अनंतदेव** आपल्या राणीस बरोबर घेऊन **विजय** नांवाच्या क्षेत्रीं जावयास निघाला असतां मार्गांत **पद्मपूर** येथें त्याचे लोक येऊन त्यास भेटले आणि ह्मणाले कीं, तूं जें कृत्य केलें त्याचें हें फळ आलें. पुढें राजा वरील क्षेत्रांत जाऊन राहिला. तेथें त्यास पैशाची फारच अडचण पडली. तेव्हां त्यानें जवळ असलेलें एक रत्नलिंग सात लक्ष दिनारांस विकलें. राजा व राणी या क्षेत्रीं राहात असतां **कलशानें** त्यास आग लाविली आणि तो मोठा आनंद मानूं लागला. पण राजा व राणी नदी उतरून जाऊन त्या संकटांतून सुटका पावलीं. याप्रमाणें हा राजा व त्याचा पुत्र यांविषयीं लांब कथा दिली आहे. अखेर **अनंतदेवानें** राणीवर रागावून आत्महत्या केली. **जनरल कनिंगहामच्या** ह्मणण्याप्रमाणें यानें इ० स० १०२८ पासून १०८० पर्यंत राज्य केलें, पण **वुईलसनच्या** मताप्रमाणें यानें २२ वर्षें राज्य केलें. या मताप्रमाणें पित्याच्या पश्चात् **कलशानें** राज्योपभोग आठच वर्षें केला. **कलश** यास **उत्कर्ष**, **हर्ष** व **विजयमल्ल** असे तीन पुत्र होते.

**बिल्हण** नांवाचा प्रसिद्ध कवि या राजाच्या कारकीर्दीस कंटाळून देशांतर करण्यास निघाला. याची जन्मभूमि **सोणमुख** नांवाचें गांव **वितस्ता** आणि **सिंधु** या नद्यांच्या संगमाजवळ **प्रवरपूर** नांवाची **काश्मीरची** एक जुनी राजधानी होती तिजपासून तीन मैलांवर आहे. ही राजधानी **कुबेराची अलकावति** किंवा **रावणाची लंका** ह्यांपेक्षां अधिक शोभिवंत होती. **काश्मीरांतील ब्राह्मणांचा** पवित्रपणा व त्यांचें ज्ञान, तेथील स्त्रियांचें सौंदर्य व

त्यांची विद्वत्ता, तसेंच उन्हाळ्यांत तेथील हवेचा थंडपणा व उपवनांची शोभा यांची **बिल्हण** तारीफ करून आपल्या गांवचें वर्णन करितो. त्याच्या गांवाच्या एके बाजूस केशराच्या सुंदर बागा व दुसरे बाजूस द्राक्षवेली असून तें गांव हिमाचलरूपी स्त्रीच्या वक्षस्थलावर लीलापर एक भूषण होतें असें तो बिल्हण म्हणतो. तो पिढीजाद पंडित होता. त्याच्या पित्याचें नांव **ज्येष्ठकलश** व मातेचें नांव **नागादेवी** होतें. **ज्येष्ठकलश** यानें महाभाष्यावर टीका लिहिली होती. यास **इष्टराम**, **बिल्हण** व **आनंद** असे तीन पुत्र होते. **बिल्हणानें** आपला वडील व धाकटा बंधु यांच्या विद्वत्तेची मोठी प्रशंसा केली आहे. **बिल्हण** लहान असतां घरांत वेदशास्त्रांचा अभ्यास करून पुढें देशाटन करावयास निघाला. तो **मथुरेस** गेला आणि तेथें त्यानें अनेक पंडित जिंकिले. तेथून **कनोज**, **प्रयाग**, **काशी**, **सोमनाथ** इत्यादि तीर्थें करून तो **सोमनाथा**जवळ गलबतांत बसून **कोकणांत गोकर्णा**-जवळ उतरला. तेथून फिरत फिरत **रामेश्वरास** जाऊन पुनः परतला आणि दक्षिणेस **चालुक्य** देशाचा राजा जो **परमाडी** याच्या येथें गेला. राजानें त्याचा मोठा सन्मान करून त्यास छत्र व हत्ती बक्षीस देऊन **विद्या-पति** असा किताब दिला. तो **भोजराजा**चा समकालीन होता, पण त्याच्या दरबारीं कधीं गेला असल्याचा लेख मिळत नाहीं. त्यानें विक्रमांकदेवचरित्र, कर्णसुंदरी व चौरपंचाशिका हे ग्रंथ लिहिले, ते प्रसिद्ध आहेत. असो. **कलश उत्कर्ष** यास गादीवर बसवून मरण पावला. ही गोष्ट **हर्षा**चा धाकटा बंधु **विजयमल्ल** यास सहन न

होऊन त्यानें बंड केलें. **उत्कर्षा**च्या अंगीं शौर्य-गुणाचा अभाव असल्यामुळें तो भयभीत होऊन जनानखान्यांतील **सहजा** नांवाच्या राखेस बरोबर घेऊन एका दिवाणखान्यांत जाऊन बसला आणि पुढें परिणाम नीट दिसत नाहीं असें वाटून त्यानें आत्महत्त्या केली. या वेळीं एक चमत्कार घडला तो असा कीं, राजाच्या खुद्द राणीनें परपुरुषाचा हात धरिला, पण **सहजा** राखेनें त्याच्या चितेंत उडी टाकून सहगमनाचें पुण्य मिळविलें व विवाहित स्त्रियांस खालीं पाहण्यास लाविलें. **उत्कर्ष** हा सारे तीन आठवडे नांवाचाच राजा होता. पुढें **विजयमल्ला**च्या सहाय्यानें—

**श्रीहर्ष** गादीवर बसला. त्याच्याविषयीं **कल्हण** यानें लांबच लांब वर्णन दिलें आहे. याचें चरित्र मोठें विस्मय करण्यासारखें आहे. हा राजा विधात्यानें सद्गुण आणि दुर्गुण यांचा पुतळा निर्माण केला होता असें ह्मटलें असतां चालेल. त्यानें आरंभीं देवालयें व धर्मशाळा बांधिल्या. अग्रहार करून दिले. मोठा दानधर्म केला. राज्यांत अनेक सुधारणा करून प्रजेचीं सुखसाधनें वाढविलीं. या गुणांवरून त्याची उत्तम राजांत गणना करावी हें योग्य. पण त्या बरोबरच पुढें त्यानें पुष्कळ देवालयें, धर्मशाळा व मठ यांचा सत्यानाश केला. रयत अनेक प्रकारें लुटली व अखेर पुष्कळांचे प्राण हरण केले. व्यभिचार संबंधानें ह्याचें आचरण तर फारच निंद्य होतें. असो, हा राजा मोठा विद्वान् असून त्यास पुष्कळ भाषा येत होत्या. यास गायनकला मोठी प्रिय असून तिजवर त्यानें कांहीं कविता

केल्या होत्या. महान्‌कवि शंभु व दुसरे पंडित याच्या पदरीं होते. राजेंद्रकर्णपूर व अन्योक्तिमुक्तालता नांवाचे ग्रंथ शंभूनें लिहिलेले प्रसिद्ध आहेत. राज्यकारकीर्दीच्या आरंभीं हर्ष राजा न्यायाविषयीं इतका दक्ष असे कीं, अर्जदारांची दाद जलदी लागावी ह्मणून त्यानें शहराच्या चारी वेशींवर घंटा टांगून ठेविल्या होत्या. तसेंच याच्या जवळ जे याचना करीत ते दारिद्र्यमुक्त होत, असें याचें औदार्य होतें. **नोनक** नांवाचा ह्याचा एक मंत्री होता. त्यास दूर करून त्याच्या जागीं त्यानें आपला बंधु **विजयमल्ल** यास नेमिलें. पुढें **विजयमल्ला**चे मनांत मत्सर उत्पन्न होऊन राज्य बळकाविण्याचें आलें. तेव्हां त्यानें यज्ञ आरंभिला आणि त्यांत राजास मारण्याचा बेत करून त्यास यज्ञास बोलाविलें. **विजयमल्ला**च्या पापबुद्धीचा **हर्षास** संशय आला आणि कांहीं चांगले योद्धे बरोबर घेऊन तो यज्ञास गेला. पुढें दोघांत संग्राम होऊन **विजयमल्ला**चा पराजय झाला. तेव्हां तो बायकोस घेऊन **लाहोरा**कडे पळून गेला. **हर्ष** राजा मोठा भव्य पुरुष होता. त्यास **कर्नाटकी** उंच कपडे वापरण्याची फार आवड असे. दीपवाळींत पदरच्या लोकांस कुणबिणीकडून ओवाळण्याची चाल यानेंच चालू केली. **चालुक्य** देशाच्या **परमाडी** राजानें **बिल्हण** कवीस छत्र दिल्याचें वर सांगितलेंच आहे. हें वर्तमान **हर्षास** कळलें तेव्हां त्यानें आपल्या पदरच्या सर्व पंडितांस तशीं छत्रें दिलीं. पुढें हा राजा अति दुर्वृत्त निघून त्यानें अनेक गर्हणीय कृत्यें केल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. वर सांगितलेला

जो **परमाडी** याची **चंदला** नांवाची राणी अति रूपवति असल्याचें वर्तमान **हर्षास** कळून तो कामातुर झाला आणि तिच्या प्राप्तीकरितां त्यानें त्या देशावर स्वारी केली पण तींत त्याचा फार नाश झाला. याप्रमाणें या राजाची कारकीर्द जितकी स्तुतीस तितकीच निंदेस पात्र होऊन अखेर याचा अंत जसा शोचनीय झाला, तसा दुसऱ्या कोणत्याही राजाचा झाला नाहीं. याच्या मागून **उदयविक्रम, सांख्यराज, सल्हण** (उदयविक्रमाचा नातू ), **सुस्सल** व **मलीन** हे अनुक्रमें गादीवर बसले. नंतर **सुस्सलाचा** पुत्र—

**जयसिंह** राजा झाला. हा मोठा पराक्रमी होता. त्यामुळें यास सर्व राजे भीत असत. दातृत्वाविषयीं याची फार ख्याति होती, यानें आपल्या सचीवांस पुष्कळ संपत्ति देऊन प्रतिराजे बनविले. याच्या व मागील कारकीर्दींत **सुज्जी** नांवाचा एक मंत्री होता. तो मोठा पराक्रमी असून त्यानें राज्यांत अनेक उलाढालीचीं कामें केलीं. राजा या मंत्र्याचा द्वेष करूं लागला. राजाजवळ दोन पराक्रमी पुरुष होते. या दोघांनीं **सुज्जी** बेसावध असतां त्यास व त्याच्या पक्षाच्या दुसऱ्या लोकांस ठार मारिलें. **सुज्जी**चा वध करविल्याबद्दल राजास पुढें मोठा पश्चात्ताप होऊन राज्यास उतरती कळा लागली. या राजानें अनेक मठ, देवालयें व कालवे बांधिले व कांहींचा जीर्णोद्धार केला. हा राजा **अवंतिवर्मा** व **ललितादित्य** यांच्याहीपेक्षां अधिक धर्मशील होता. यानें यज्ञ केले, किती एकांचीं लग्नें केलीं, कित्येकांस घरें बांधून दिलीं, ब्राह्मणांस अग्रहार दिले व विद्वान्

लोक जवळ बाळगिले. इंग्लंदच्या **इलिजाबेथ्** राणीच्या वेळीं अनेक विद्वान् प्रख्यातीस आले, ह्मणून त्या कालास जसे **गोल्दन् एज** ( सुवर्णकाळ ) ह्मणतात, तसे **अनंतदेव** राजापासून **जयसिंव्ह** राजापर्यंतच्या कालास आह्मी तेंच नांव देतों; कारण त्यांच्या वेळीं शेंकडों पंडित उदयास आले व त्यांतील कित्येकांस राजाश्रय होता. या कालीं या देशीं असा नियम होता कीं, ज्यास पंडित हें पद मिळविण्याचें असेल त्यानें विद्वानांच्या पसंतीस उतरेल असा अलंकार किंवा दुसऱ्या शास्त्रावर एकादा ग्रंथ लिहिला पाहिजे. या नियमास अनुसरून **मंख** नांवाच्या कवीनें श्रीकंठचरित्र ( त्रिपुरवधवर्णन ) ग्रंथ लिहिला आणि त्याचें परीक्षण करण्याकरितां तो त्याचा वडील बंधु **अलंकार** ( लंकक ) याजकडे दिला. **अलंकार** हा राजाचा मंत्री होता. त्यानें तो त्यावेळीं असलेल्या पंडितांपैकीं तीस जणांस दाखविला. त्या सर्वांस तो मोठा पसंत होऊन **मंखाची** फार वाहवा झाली. आतां वर सांगितलेल्या तीस पंडितांतील कांहींविषयीं थोडी माहिती खालीं देतों. **मंख** हा पिढिजाद पंडित होता इतकेंच नाहीं, पण त्याच्या कुटुंबांतील सर्व लोक मोठे विद्वान् होते. याचा पिता **विश्ववर्त**, आजा **मनोरथ**, बंधु **शृंगार**, **भंग** व **अलंकार** हे सर्व प्रसिद्ध पंडित होते. या बंधुचतुष्टयांचा गुरु **रुय्यक** नांवाचा एक महान् पंडित होता, त्यानें काव्यप्रकाशसंकेत, श्रीकंठस्तव व **जल्हण**कविकृत सोमपादविलासकाव्य याजवर अलंकारानुसारिणी नांवाची टीका हे ग्रंथ लिहिले आहेत. **जल्हण** हा वर सांगितलेल्या

तीस परीक्षकांपैकीं असून **राजौरी** येथील मांडलिक राजाचा मंत्री होता. **देवधर** यास **भागवताचार्य** ह्मणत. यानें गृह्यसूत्रावर टीका लिहिली आहे. प्रख्यात मीमांसक **जीं** ( जें ) **दुक, त्रैलोक्य** व **श्रीगुन्न;** महान् वैय्याकरणी **नाग** व **जनकराज, आनंद** नांवाचा नैय्यायिक, **कन्होजच्या** राजाकडून आलेला वकील **सुहल; श्रीगर्भ** व त्याचे पुत्र **मंडन** व **श्रीकंठ; रम्यदेव** व त्याचा पुत्र **लोष्टदेव, अलकदत्त** व त्याचा शिष्य **कल्याण** हे परीक्षक होते. राजास पुष्कळ स्त्रिया असणें हा एक या देशीं नियमच झाल्यासारखा होता. त्यास अनुसरून या राजास बहुत राण्या होत्या. त्यांत **रत्नादेवी** ह्मणून अति रूपवति व उदार स्त्री होती. तिनें **रत्नपूर** नांवाचें गांव वसविलें. **रड्डा** ह्मणून दुसरी मोठी चतुर राणी होती. तिला पुष्कळ पुत्र होते, त्यांतील वडिलाचें नांव **गुल्हण** होतें. हा सात वर्षांचा असतांच राजानें त्यास **लाहोरच्या** गादीवर बसविलें. असा तो सुलक्षणी व गुणी होता. या राजाच्या वेळीं **कल्हण** हयात असून येथपावेतों कथाभाग त्यानें लिहिला असल्यामुळें राजा, त्याच्या राण्या, त्याचे सचीव व यावेळीं घडलेल्या दुसऱ्या उलाढाली यांचें अतिशय वर्णन दिलें आहे. याच्या मागून **परमाणू, बंदिदेव, भोप्यदेव,** त्याचा बंधु **जसदेव, जगदेव, संग्रामदेव, लक्ष्मणदेव, सिंहदेव, सिंहदेव** ( दुसरा ), **रिंचण** व त्याची पत्नि **कोटाराणी** हीं अनुक्रमें गादीवर बसलीं. यांत **भोप्यदेव** हा पहिल्या प्रतीचा अविचारी व जडमति होता. एके वेळीं तो एका जलाशयाच्या कांठीं बसून वेडीं वांकडीं तोंडें

करून आंत पाहूं लागला. पाण्यांत तसें प्रतिबिंब दिसूं लागलें. तेव्हां आपणास आंतून कोणी वेडावून दाखवीत आहे, अशी कल्पना करून त्यानें त्याच्या ( आपल्या ) तोंडांत मारिली. असा तो मूर्खशिरोमणी असल्यामुळें त्यास **मूर्खराज** ह्मणत, असें **जोनराज** कवि लिहितो. **रिंचण** हा **भोट्ट** देशाच्या राजाचा पुत्र होता. वर सांगितलेल्या राजांच्या पश्चात् हें राज्य **मुसलमान** लोकांनीं बळकाविलें. त्यांत—

**शहामीर** हा पहिला राजा. तो पूर्वींच्या राजाचा मंत्री होता. त्याच्या मागून त्याचे पुत्र **जमशेर** व **अल्लाउद्दीन**, नंतर त्याचा नातू **शहाबुद्दीन** हा चौथा राजा झाला. तो मोठा पराक्रमी निघाला. त्यानें उत्तरेकडील राज्यावर स्वारी केली. तेव्हां तेथील राजा यास शरण आला. पुढें त्यानें दुसरी स्वारी सिंध देशावर केली. तेथील राजाजवळ याच्या मागण्याप्रमाणें देण्यास खंडणी नव्हती, ह्मणून त्यानें आपली अति रूपवति कन्या यास दिली. त्यानें **गंधारदेश** जिंकिला व **गिझनीवर** स्वारी केली, तेथील राजा यास शरण आला. हा दक्षिणेस **सतलज** नदीपर्यंत आला होता. यास परदेशांवर स्वाऱ्या करणें फार आवडे. यामुळें याला स्वदेश परका झाला होता. जार लोकांचा तो मोठा शास्ता होता. याचे मंत्री **कोट** व **भट्टोदय** आणि सैनिक **चंद्रडामर** व **लौल** हे होते. हा मोठा शहाणा होता. याची पहिली बायको **उदयश्री** असतां, **लासा** नांवाची अति रूपवति याची भाची होती तिला यानें दुसरी बायको केली. **उदयश्री** ही मोठी गुणी व

शहाणी होती. तिची हिंदुधर्मावर मोठी भक्ति असे. हा राजा एके वेळीं शिकारीस गेला असतां एक सिंह त्यास खालीं पाडून त्याचे छातीवर बसला. तेव्हां मदन-लाविक नांवाचा सरदार बरोबर होता. त्यानें सिंहाचे आपल्या तरवारीनें तुकडे केले. राजानें त्याजला पाहिजे तितकें द्रव्य देऊन त्यास दिल्लीच्या मांडलिकाकडे राहण्यास पाठविलें. कारण जवळ ठेविला तर दुष्ट व चहाडखोर लोक आपल्या व त्याच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न करतील. यानें स्वप्नांत सोन्याची एक नगरी पाहिली. तींतील घरें ओस पडलीं होतीं. एका वाड्यांत मात्र एक प्रेत असून जवळ एक स्त्री उभी होती. हें प्रेत बादशहाचें होतें व थोडे दिवसांत तो परत येणार आहे ह्मणून तिनें सांगितलें. हें स्वप्न पाहून त्यानें लासाच्या सांगण्या-वरून जे पुत्र बाहेर हाकून दिले होते, त्यांस परत बोलाविलें. पण ते परत येण्याचे अगोदरच हा मरण पावला. यानें १८ वर्षें राज्य केलें. नंतर याच्या मागून याचा बंधु **कुतुबुद्दीन** याचा पुत्र **शिकंदर** व **अल्लीशहा** हे अनुक्रमें गादीवर बसले. त्यांत—

**शिकंदर** यानें औरंगजेबप्रमाणें हिंदूंचा व त्यांच्या धर्माचा अतिशय छळ केला. त्यानें शेंकडों देवालयें पाडून त्यांतील मूर्ती छिन्न विछिन्न केल्या आणि आपणांस **बुतसिकन्** ( मूर्तीफोड्या ) असा किताब मिळविला. त्याच्या अनुयायी लोकांनीं धर्म वेडानें व कांहीं अंशीं त्यास खुष करण्याच्या बुद्धीनें या कामीं त्याचें चांगलें अनुकरण केलें. त्यामुळें या वेळीं हिंदूंच्या देवालयांचा व त्यांतील मूर्तींचा जो भयंकर नाश उडाला,

त्याच्या खुणा सांप्रत काळीं सुद्धां **श्रीनगरांत** व अन्यत्र जागोजाग दृष्टीस पडत असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो आपल्या धर्माच्या लोकांवर विशेष प्रेम करूं लागला. त्यामुळें ते इतके श्रीमान् झाले कीं, त्यांस कोट रुपये कवडीप्रमाणें वाटूं लागले. त्याप्रमाणेंच ते मोठे शिर-जोर होऊन हिंदूंस फार छळूं लागले. तेव्हां कित्येक हिंदू मुत्सद्यांनीं आपणांस **यवनी** नांवें धारण केलीं. यांत विशेष आश्चर्य करण्यासारखी अशी एक गोष्ट होती कीं, या कालीं **सूहभट्ट** नांवाचा एक मंत्री जातीचा ब्राह्मण असून त्यानें देवालयांचा समूळ नाश व हिंदूंचा छळ करण्याच्या कामीं होईल तेवढी मदत केली. या बादशहानें २४ वर्षें राज्य केलें. नंतर **अल्लीशहा** गादीवर बसला. याच्या वेळींही **सूहभट्ट** हा एक मंत्री असून पूर्वींप्रमाणें तो हिंदूंचा छल करण्यांत पुढारी असे. पण प्रजेच्या पुण्यानें त्यास क्षय लागून तो मरण पावला. **अल्लीशहाच्या** मागून **शिकंदरचा** दुसरा पुत्र—

**जैनभूपति** ( जैनुल्लाभदीन ) हा गादीवर बसला. तो बापाच्या अगदीं उलट स्वभावाचा ह्मणजे मोठा गुण-ग्राही, दाता व न्यायी होता. धर्माच्या कामांत तर **अकबर** बादशहाप्रमाणें त्याची समदृष्टि होती. याच्या वेळीं मक्केहून एक **दौला** पुष्कळ पुस्तकें बरोबर घेऊन **काश्मीरास** आला. राजानें त्याचा मोठा सत्कार केला. पण येथें एक महान् योगी होता, त्याच्या आशीर्वादानें राजास **आदमखान, हाज्यखान, जस्सरथखान** व **बहिरामखान** असे चार पुत्र झाले. ही गोष्ट **दौला**

यास सहन न होऊन त्यानें आणखी चार नोडगे मिळवून त्यांच्या सहायानें त्या योग्यास बाणानें ठार मारिलें. हें वर्तमान राजास समजून त्यास फार वाईट वाटलें आणि त्यानें त्या **दौलाची** धिंड काढिली. याची **जैनधर्मा**-वर मोठी भक्ति होती. यानें कालवे काढून पुष्कळ जमीन सुपीक केली, मठ बांधिले, अग्रहार करून दिले व अन्नसत्रें घातलीं. तो आपल्या लोकांचा पक्षपात करीत नसे. एका चोरानें **जयापीडपूर** येथें राहणाऱ्या एका ब्राह्मणाची गाय चोरून **मडव** राज्यांत नेली होती. पुढें कांहीं वर्षांनीं तिचा पत्ता लावून ती मालकानें ओळखिली. चोर ती आपली ह्मणून वाद करूं लागला. हें भांडण राजाकडे आलें. **काश्मीरांतील** गाई शिंगाडे खातात. त्याप्रमाणें त्या गाईनें शिंगाडे खाल्ले; पण तिचीं वासरें ते खाईनांत यावरून ती गाय ब्राह्मणाची असें ठरवून चोरास शासन केलें. हा राजा योगी लोकांस मान देत असे. याच्या हातास एक विषारी फोड झाला होता तो बरा होईना. तो **शिवभट्टानें** बरा केला. हा भट्ट शाबरी मंत्रांत मोठा प्रवीण होता. राजानें या भट्टास पदरीं ठेवून घेतलें होतें. हा राजा विद्वानांचा मोठा पुरस्कर्ता असल्यामुळें, १ **रामानंद** ( टीकाकार ), २ **सौगत** (धर्मशास्त्रवेत्ता), ३ **कर्पूरभट्ट** ( वक्ता ), ४ **रूपयभट्ट** ( गणिती ), ५ **नोथसोम** यानें जैनांचें चरित्र संस्कृत व देशभाषेंत लिहिलें आहे, ६ **योद्धभट्टानें** देशभाषेंत **जैनप्रकाश** नांवाचें नाटक लिहिलें, ७ **भट्टावतार** यानें **जैनविलास** नांवाचें नाटक लिहिलें, ८ **जोनराज** कवि राजतरंगिणीच्या दुसऱ्या भागाचा

कर्ता व किरातार्जुन काव्याचा टीकाकार, ९ श्रीवरपंडित राजतरंगिणीच्या तिसऱ्या भागाचा कर्ता यानें योगवासिष्ट ग्रंथ राजास सांगितला. हे सर्व पंडित राजाच्या आश्रयास होते. राजानें कांहीं संस्कृत ग्रंथांचे तरजुमे पार्शी भाषेंत करविले. यास गाणें मोठें प्रिय असून त्या कलेच्या शाळा यानें स्थापिल्या होत्या. तानसेनाच्या खालोखाल बकसू नांवाचा प्रसिद्ध गवयी या वेळीं होता. या राजास रत्नाची एक खाण सांपडली होती. तींतील रत्नांस जैनमणी ह्मणतात. ते माणकासारखे लाल असतात. याच्या वेळीं देशांत एक मोठा दुष्काळ पडला. पुढें अतिवृष्टि होऊन नद्यांच्या तीरचे कित्येक गांव वाहून गेले. या दैविक संकटांनीं हजारों लोक उपाशीं मरूं लागले. तेव्हां राजानें आपलीं धान्याचीं कोठारें उघडून धान्य वाटलें आणि लोकांचे प्राण वांचविले. पुढें एक उच्च स्थळ पाहून त्याजवर राजानें जैनतिलक नांवाचें एक शोभिवंत शहर वसविलें. तो ब्राह्मणांवर मोठें प्रेम करी व वितस्तेचा उत्साह करवी. याप्रमाणें यानें इ०स० १४१७ पासून १४६७ पर्यंत राज्य केलें. याच्या मागून—

**हैदरशहा**, हसन, महंमद, फत्तेशहा, नाझूशहा, मिरजा हायदर व हुमेयून असे अनुक्रमें सात राजे झाले. त्यांत हैदरशहा मोठा जुलमी व अविचारी असून मद्यप्राशनांत सर्व वेळ निमग्न असे. त्यानें कित्येक लोकांचीं नाकें व कान कापून त्यांचे दुसरे अवयव छिन्न विछिन्न केले. याच्या दुराचरणानें सर्व लोक अत्यंत त्रस्त होऊन देशांत धामधूम चालू झाली.

राज्यास दुश्चिन्हें होऊं लागलीं. धूमकेतु दिसूं लागला. धरणीकंप झाला. भरदिवसा सिंह, अस्वलें इत्यादि हिंसक पशु गांवांत संचार करूं लागले. शहरांत एका हवेलीस आग लागून ती जळत होती, तरी याची मद्य-प्राशनलीला चालूच होती. यानें सारें दोन वर्षें राज्य केलें. नंतर **हसनशहा** गादीवर बसला. ह्याच्या वेळीं **श्रीवर पंडित** हयात असून राज्याच्या उलाढालींत त्याचें बरेंच अंग असे. या राजास पुढें धनलोभ फार सुटला. तेव्हां त्यानें एका श्रीमान् सावकारास लुटून एक कोट रुपये आणिले आणि त्यास कैदेंत टाकिलें. पुढें तो सावकार कैदेंतच मरण पावला. याच्या वेळीं **सय्यद** लोक मोठे उन्मत्त होऊन प्रजेस फार पीडा देऊं लागले. याच्या कारकीर्दीची वाचण्यासारखी बरीच कथा दिली आहे. पण ग्रंथविस्तारभयास्तव आह्मीं येथेंच अटोपतें घेतों. यानें बारा वर्षें राज्य केलें. नंतर ह्याचा पुत्र **महमदशहा** यास मंत्र्यांनीं गादीवर बसविलें. तेव्हां तो सात वर्षांचा होता. हा **गोनर्दा**-प्रमाणें रूपवान् होता. राजा अल्पवयी असून मंत्री चांगले नसल्यामुळें राज्यांत एकसारख्या लढाया व दंगे चालू होते. त्यामुळें हजारो लोक प्राणास मुकले. याचें कारण या वर्षी मंगळ राजा व गुरु आणि शनी यांची युती होती, असें ग्रंथकार ह्मणतो. वर सांगि-तल्याप्रमाणें राज्यांत एकसारखा घोटाळा चालू होता. पुढें या राजास पदच्युत करून त्याचा चुलता **फत्तेशहा** गादीवर बसला. पण राज्यांतील दंगे व बखेडे अधिक दुणावत जाऊन अखेर **महमदशहा** **फत्तेशहास** काढून

आपण पुनः गादीवर बसला. याप्रमाणें चुलता चार वेळां व पुतण्या तीन वेळां आळीपाळीनें राज्य-भ्रष्ट होऊन पुनः पुनः गादीवर बसले. **महंमद** राज्य करीत असतां **हुमायून** बादशहानें या देशावर एकवार स्वारी केली पण त्यास मागें परतावें लागलें. यांच्या मागून **नाझुकशहा, मिरजाहैदर** व **हुमायून** हे अनुक्रमें गादीवर बसले. यांच्या वेळींही देशांत शांतता मुळींच नसून दंगे मात्र एकसारखे चालू होते. ही संधि पाहून **अकबर** बादशहानें आपला सरदार **कासि-मखान** यास या देशावर स्वारी करण्यास पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें जाऊन तो देश इ० स० १५८७ मध्यें काबीज केला. तो १७५३ पर्यंत **मोंगल** राज्याखालीं होता. **अकबर** या देशीं तीन वेळा गेला होता. पण त्यानें येथील विशेष सुखोपभोग घेतल्याचा लेख मिळत नाहीं. एके स्वारींत **स्पेन** देशाचे **जेविअर** व **गोएज** हे त्याजबरोबर होते. तो सुखोपभोग घेण्याचें काम त्याचा विलासी व गुलहौसी पुत्र **जहांगीर** व त्याची प्रिया **नूरजहान** यांनीं केलें. तो उष्ण कालांत बहु-तकरून दरसाल आपल्या प्रियेस बरोबर घेऊन या भूस्वर्गीं जात असे असा लेख सांपडतो. या दंपत्यास हा देश किती आवडता होता, याचें व तिच्याकरितां बादशहानें तेथें तयार केलेल्या कितीएक रम्य स्थलांचें वर्णन आह्मीं पूर्वीं दिलेंच आहे. या देशास तो खरो-खरीचा भूस्वर्ग मानीत असून आपला अंतकालही येथेंच व्हावा अशी त्याची इच्छा होती. त्याप्रमाणें तो त्या देशांत असतां **पुंच** जहागिरींतील **बारांगला** नांवाच्या

गांवीं मरण पावला. याच्या नंतर याचा पुत्र **शहाजहान** यानें या भूस्वर्गीं पांच सहा वेळ जाऊन सुखोपभोग घेतला. पुढें याचा पुत्र **औरंगजेब** हा जनानखान्यांतील स्त्रिया बरोबर घेऊन जात असतां या देशांतील बिकट मार्गांत त्या अबलांवर जो जिवावरचा प्रसंग आला होता त्याची कथा आह्मीं पूर्वीं दिलीच आहे. असो, पुढें इ० स० १७५२ त हा देश **अहमदशहा अबदल्लीनें** जिंकिला. तो इ० स० १८१८ पर्यंत **दुराणी** बादशहांच्या ताब्यांत होता. याप्रमाणें सुमारें ५०० वर्षें हा देश यवनांचे अमलाखालीं होता. चालू शतकाच्या आरंभीं **शीक** लोक मोठे प्रबळ होत चालले. त्यांचा पुढारी **रणजीतसिंग** ( पंजाबचा सिंह ) यानें इ० स० १८१९ मध्यें हा देश आपल्या हस्तगत करून घेतला. तो १८४५ पर्यंत त्याजकडे होता. त्याच्या मागून त्याचा पुत्र **धुलीपसिंग** हा राज्याचा खरा मालक पण तो बाल्यावस्थेंत असतां आमच्या सार्वभौम सरकारांनीं त्याजपासून कोणत्या न्यायानें राज्याचा बेदावा लिहून घेऊन त्यास नेमणूकदार बनविलें आणि त्याच्या बापाच्या पदरचा एक सामान्य सरदार **गुलाबसिंग** यास हें राज्य इ० स० १८४६ त दिलें या सर्व गोष्टी चालू शतकांत घडलेल्या असल्यामुळें वाचकांस माहितच आहेत. **गुलाबसिंगानें** इ० स० १८५७ सालचें बंड मोडण्याच्या कामीं इंग्रज सरकारास कृतज्ञतापूर्वक मोठी मदत केली. सांप्रत त्याचे नातू **प्रतापसिंग** हे राज्याचे मालक आहेत. त्यांजविषयीं थोडीशी माहिती पूर्वींच दिली आहे.

आतां शेवटीं दोन शब्द सांगून हा भाग पुरा करितों. राजतरंगिणीरूप ऐतिहासिक ग्रंथांतील थोडीशी माहिती देण्याचा आह्मी वर यत्न केला आहे. पण आह्मांस संस्कृत भाषेचें ज्ञान नसल्यामुळें तो व्हावा तितका सफळ झालेला नाहीं व कचित् स्थलीं प्रमादही झाला असेल हें आह्मी समजून आहों. तर ह्या इतिहासाची साद्यंत व संगतवार माहिती, पंडित **वामन शास्त्री इसलामपूरकर** हे राजतरंगिणीचें मराठी भाषांतर करीत आहेत तें छापून प्रसिद्ध झाल्यावर वाचकांस प्राप्त होईल.

काश्मीर राज्याच्या मुख्य भागांतील निरनिराळ्या जातींच्या
लोकांची संख्या दाखविणारें पत्रक.

| भागाचें नांव. | यवन. | हिंदू. | बौद्ध. | ख्रिश्चियन्. | पार्सी. | अनिर्दिष्ट. |
|---|---|---|---|---|---|---|
| काश्मीर ........ | ८८३०९९ | ६५७८९ | ... | १४५ | ८ | ... |
| जम्मू .......... | ७९७४५९ | ६३७७४४ | ४२९३ | ४६ | १ | ... |
| लदाक् ........ | २९९१ | १८२ | २५०७६ | २५ | ... | ... |
| स्कार्डु ........ | ११००२२ | ६४ | २३९ | ... | ... | ... |
| गिलजित् ........ | १३९ | १३ | ... | २ | ... | १६६१५ |
| एकूण.......... | १७९३७१० | ७०३७९२ | २९६०८ | २१८ | ९ | १६६१५ |

### काश्मीर व जम्मू प्रांतांतील व सरासरीनें सर्व राज्यांतील दर हजारीं स्त्रीपुरुषांचें प्रमाण दाखविणारें पत्रक.

| जाति. | काश्मीर. | | जम्मू. | | सर्व राज्य. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष. | स्त्रिया. | पुरुष. | स्त्रिया. | पुरुष. | स्त्रिया. |
| ब्राह्मण ... | ५६५ | ४३५ | ५४३ | ४५७ | ५४६ | ४५४ |
| ब्राह्मणेतर. | ५९५ | ४०५ | ५५२ | ४४८ | ५४९ | ४५१ |
| यवन ... | ५२६ | ४७४ | ५३२ | ४६८ | ५३२ | ४६८ |

समाप्त.

" TATVA-VIVECHAKA " PRESS, BOMBAY.

F
39